


शुभ दीपावली



# ग्रंथाली

सप्रेम नमस्कार,
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.

आपले स्नेहांकित,
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
अरुण जोशी, कार्यकारी संपादक
धनश्री धारप, योगिता मोरे,
अनिरुद्ध गद्रे, सौमित्र शिंदे,
अनिल भोसले, किशोर कांबळे
आणि हरिप्रसाद जयस्वाल

shabdruchee24@gmail.com

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



# शब्द रुची

४९

दिवाळी विशेषांक

ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४ | मूल्य ३०० रु. | पृष्ठे १६०





यूनियन बैंक ऑफ इंडिया
भारत सरकार का उपक्रम
Union Bank of India
A Government of India Undertaking
VYOM
MOBILE BANKING SUPER APP
This Deepawali, Financing Your Dreams with
Union Nari Shakti
For MSME Entrepreneurs
• Term Loan and Working Capital for women owned and managed MSMEs
• Lower rate of interest
• Collateral Security – Nil for limit up to ₹ 5 Crore
• Need-based finance without any ceiling
For more details, please visit nearest Union Bank of India Branch/ MSME Loan Point
*T&C Apply
(Toll Free No.) 1800 208 2244 / 1800 425 1515 / 1800 425 3555 | 9666606060 | www.unionbankofindia.co.in
unionbankofindia UnionBankTweets unionbankinsta UnionBankofIndiaUtube unionbankofIndia unionbankinsta

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

## ( दादासाहेब फाळके चित्रनगरी )

**Dadasaheb Phalke Chitranagari is managed by Maharashtra Film, Stage & Cultural Development Corporation Ltd**



(popularly known as Film City). Established on 26 September, 1977 by Government of Maharashtra to promote cinema, theatre, culture & performing arts. Situated in the western suburb of Mumbai - spread over 521 acres of lush green and picturesque land. Film City provides myriad outdoor as well as indoor shooting locations. Dynamic place where sets are being created for films and mega TV serials on an ongoing basis. Film City offers 15 AC studios ranging from 2,000 sq. ft. to 16,000 sq.ft. for indoor shoots, 70 outdoor locations and 76 makeup rooms.




**Film City Court**

Think about law and order and what comes to your mind? Most certainly the famous Courthouse scenes! This location has been a filmmaker's mainstay in the heart of the Film City compound and always seen in  iconic films over the years. Films like Pink, Yamla Pagala Deewana, Jolly LLB 2, Batti Gull Meter Chalu, Damini, Ghayal, Ghatak Gajani have been shot here. The notoriety of this landmark cannot be missed on your law related films and TV Shows.

**Film City Temple**

Spread over an area of 32,300 sq ft, this location is your go-to shooting place spread with sprawling lawns and lush greenery around which make it an ideal location for TV and Film shootings. This is one of the favorite locations of the filmmakers shooting for various films. Prominent shoots include Iss Pyaar ko Kya Naam Du, Dil To Happy Hai Ji, Phir Na Maane Badtameez Dil, Big Boss






**Regional Financial Incentives**

Government of Maharashtra started a scheme in 1997 to provide financial assistance to Marathi film producers as incentive to produce quality Marathi Films. The films are scrutinized by the film Screening committee and awarded category: A&B. Category A Film is eligible for assistance of Rs. 40 lakhs.Category B Film is eligible for assistance of Rs. 30 lakhs

@filmcitymumbai_ @filmcitymumbai_ @FilmCityMumbai MFSCDL @filmcitymumbai_

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

४९

दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४, वर्ष बारावे
अंक सहावा–सातवा, मूल्य ३०० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**
अंकाची मांडणी : **प्रदीप म्हापसेकर**
आतील चित्रे : **प्रमोद जोशी**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee24@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम**

BHIM UPI
SCAN & PAY

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**



## अनुक्रम

### जन्मशताब्दी लेख

जयवंत दळवी
डॉ. अनंत देशमुख / ३७

शोभा गुर्टू
शुभा जोशी / ८६

पं. गोविंदराव पटवर्धन
आदित्य विद्याधर ओक / ९१

महंमद रफी
श्रीकांत बोजेवार / १२०

### स्मरण लेख

डॉ. विनायक श्रीखंडे
डॉ. अविनाश सुपे/ १३०

## कथा

**अभिजित पेंढारकर**
याचसाठी केला होता अट्टाहास / ७

**वृषाली मगदूम**
दुवा / ४२

**चांगदेव काळे**
मातीची ओल आणि तडा / १०६

**डॉ. निर्मोही फडके**
वेगळं काही... / १२४

## व्यंगचित्रे

**प्रभाकर वाईरकर / ९७**

## लेख

**रामदास भटकळ**
नातेचित्र / १३

**डॉ. उज्ज्वला दळवी**
'औपचारिक' नातं / १६

**अर्जुन डांगळे**
चळवळ आणि कार्यकर्ता / २२

**नीरजा**
आशयघन अभिव्यक्तीसाठी... / २७

**राणी दुर्वे**
स्त्री-पुरुष मैत्री : नातेसंबंधाचे बदलते रूप / ३२

**माधव ज. जोशी**
औद्योगिक क्षेत्रातील बदलते नातेसंबंध / ५०

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
तमसो मा ज्योतिर्गमय : नाते विद्यार्थी-शिक्षकांचे / ५५

**माधुरी अरुण शेवते**
शब्द जपून ठेवताना / ५८

**सुनंदा भोसेकर**
बदलती दैवतकल्पना / ६२

**राजीव जोशी**
नाटकातली 'नाती'गोती :
शतकी वाटचालीचा आढावा / ६७

**राजीव श्रीखंडे**
रिबेक्का / ७४

**समरेंद्र निंबाळकर**
ज्यांची बाग फुलून आली..त्यांनी तरी! / ८०

**मनोज बोरगावकर**
जाऊ कवितेचिया गावा... / ९४

**शिवकुमार आडे**
अंगण / १०१

**संजीवनी खेर**
बदलती नातीगोती / ११६

**प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**
वारीच्या पालखीचा भोई / १३३

**अश्विनी भोईर**
शिक्षक-विद्यार्थी बदलते नाते / १३५

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
न सांधलेली नाती : लग्नकहर! / १३९

## कविता / १४३ ते १५०

**प्रदीप म्हापसेकर, सदानंद डबीर, प्रतिभा सराफ, दिलीप पांढरपट्टे, उषा मेहता, जान्हवी खांडेकर, शिवकुमार आडे, संजय कृष्णाजी पाटील, किरण येले, प्रवीण दवणे, लक्ष्मीमंगेश, मोहन काळे, प्रदीप गुजर, माधुरी ताम्हाणे-देव, सतीश लोथे**

## वृत्तांत - ग्रंथपाने / १५१

# संपादकीय

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. त्यासह बंगाली, आसामी, पाली आणि प्राकृत भाषांचाही गौरव झाला आहे. भाषा ही संस्कृतिवाहक असते. प्रत्येक भाषकाचे आपल्या भाषेशी आत्मिक नाते असते. ते तुटते तेव्हा ती संस्कृती लोप पावू लागते. आज त्याचे दुर्दैवी चित्र दिसू लागले आहे. इंग्रजी–हिंदीच्या प्रभावाची विचित्र सावली पडल्याने मराठी भाषेचे नुकसान होत आहे. अभिजात दर्जा मिळाल्याचे स्वागत करताना आपले आपल्या मराठीशी नाते दृढ व्हावे, त्यात विकास व्हावा अशी अपेक्षा आहे.

खरे तर काळ कुठलाही असो, क्षेत्र कोणतेही असो, नाती म्हटली तर गुंतागुंतीची असतात, म्हटली तर सोपी. व्यक्ती तितक्या प्रकृती, तशी नाती. आजच्या काळात जी राजकीय दिवाळखोरी दिसते आहे, भाषिक, प्रांतिक, जातीय तेढ दिसत आहे, त्यानुसार नाती निर्माण होताना दिसतात, ती मनात एक आणि बाहेर एक! नाती सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी होतात तेव्हा समाज ऱ्हासाकडे जातो. माणसामाणसातील नात्यांची वीण म्हणजे समाज. त्यासाठी ती घरापासून असावी लागते. हा आजचा प्रश्न नाही. आपल्या महाकाव्यांतही भाऊबंदकी आणि संघर्ष, त्यातून नामशेष झालेली घराणी दिसतात... त्याचबरोबर वर्षानुवर्षे नात्यांत ओलावा राहावा, समाजातला सौहार्द टिकावा म्हणून शहाणपण पेरणारी माणसेही झाली. तरी माणसाचे विविध प्रकारचे अहं चार अंगुळे वरच राहिले. लहान–मोठा, शिक्षित–अशिक्षित, श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, सत्ता–चाकरी अशा प्रकाश–अंधाराच्या जोड्या जमवल्या असतील तिथे नात्यांतील सौहार्द कसा राहणार!

काळ बदलतो तसे जगण्याचे संदर्भ बदलतात. नवनवे शोध, नवनवी साधने, भौतिक जीवन अधिक सुखकर करतात. दर पिढीला आपली पिढी योग्य आणि पुढची बेजबाबदार वाटते, हे कालातीत सत्य आहे. सामंजस्य, संवाद, संवेदना आणि सहवेदना असेल तर काही सकारात्मक घडू शकते. तिथेच भिंती असतील तर नात्याचे स्थानच संपते. बदलत्या काळाने दिलेल्या सोयी आपण स्वीकारल्या. त्यात तरुण–वृद्ध भेद राहिला नाही. मग काही रूढी, परंपरा काळानुसार बदलणार हे मागच्या पिढीने समजून घेतले पाहिजे. त्याचवेळी, मागच्या पिढीवर असलेले अनेक शतकांचे संस्कार, त्यातून निर्माण झालेली मानसिकता सहजी बदलत नाही, हे तरुणांनीही समजून घेतले पाहिजे. दोन पिढ्यांतील संघर्षात नात्यावर परिणाम होऊ नये, असा विवेक राखला पाहिजे. तो उरत नाही त्यामुळे आत्मिक समाधानही उरत नाही. पूर्वी जगणे संथ होते, आता गती आवाक्याबाहेर वाढली आहे; नव्या संधी जगण्याची नवी परिमाणे घेऊन आल्या आहेत; व्यवसाय–नोकरीतील अपेक्षा बदलल्या आहेत.... हा रेटा अजूनही समजता येत नाही आणि ही गती वाढतच आहे...



खरेपणातून आलेली स्पष्टता स्वीकारण्याची तयारी ठेवली, न्यूनगंडातून लपवण्याची वृत्ती सोडली, तर नाती सुसह्य होऊ शकतात. नात्यांचा हा गुंता विविध पदरी असतो. तो जगण्याच्या सर्वच अंगांना वेढलेला दिसतो. या दिवाळी अंकात विविधांगी नात्यांचा वेध घेतलाय. डॉक्टर–रुग्ण, शिक्षक–विद्यार्थी, कार्यकर्ता–चळवळ, लेखक–संपादक, मालक–कर्मचारी, मित्र–मैत्रीण, अशा अंगांनी त्या त्या क्षेत्राशी निगडित मान्यवर लिहीत आहेत. कथा–कविता–लेख यातून जसे नाती उलगडतात, तशीच प्रभाकर वाईरकर यांची व्यंगचित्रे नात्यांवर भाष्य करतात.

काही नाती आत्मिक असतात. कलावंत आपल्या कलेतून रसिक मनात कायमचे घर करतात. पं. गोविंदराव पटवर्धन यांचे पेटीवादन, विदुषी शोभा गुर्टू यांच्या स्वरांतून मोहक रूप धारण केलेली ठुमरी, महंमद रफी यांच्या सुरांचे गारूड, जयवंत दळवी यांचे चतुरस्र लेखन ही आपल्या मर्मबंधातली ठेव आहे. त्यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. त्यांच्यावरील लेख त्या स्मृती जाग्या करतील.

हा अंक तयार करताना लेखकांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. तसेच तो साकारताना अनेकांचा हातभार लागलेला आहे. अंकासाठी 'नाते' हा विषय सुचवला सुदेश हिंगलासपूरकर यांनी. त्यासाठी मुखपृष्ठ केलेले सतीश भावसार, आतील चित्रे रेखाटणारे प्रमोद जोशी, अंकाची मांडणी करणारे प्रदीप म्हापसेकर, संगणकावर त्यानुसार अंक करणाऱ्या योगिता मोरे, त्यांना सहकार्य करणारे अनिरुद्ध गद्रे, जाहिरातव्यवस्था पाहणाऱ्या धनश्री धारप, वितरणात सहभाग घेणारे सौमित्र शिंदे, हरिप्रसाद जयस्वाल, किशोर कांबळे, अंकसंच योजनेला व या अंकाला उत्स्फूर्त सहकार्य करणारे ग्रंथालीचे सुहृद व जाहिरातदार, विक्रेते यांच्यापर्यंत अनेकांचा यात सहभाग आहे.

ग्रंथालीने वाचनसंस्कृतीचा प्रसार आणि संस्कृतिकरणाचे कार्य आरंभले त्याचे एप्रिल महिन्यात सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू झाले. हा पाच दशकांचा प्रवास रसिक वाचकांशी जडलेल्या नात्याचा प्रवास आहे. आज एकूणच नात्यांमध्ये संभ्रम दिसतो तो काळाचा गुंता आहे. तो जाणला आणि माणूसपणाशी नाते जपले, तर आरंभी म्हटल्याप्रमाणे सारीच नाती सोपी होतात. ती निर्माण व्हावी, ही अंधारावर मात करणाऱ्या दीपोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा.

**– अरुण जोशी**

# याचसाठी केला होता अट्टाहास

''सर आज सटकलेले दिसताहेत. इकडे कंपनीतल्या प्रत्येकाला म्युझिक व्हिडिओचा रीच वाढवण्याची टार्गेटदिली जातात. त्यासाठी एचआरकडून प्रेशर आणलं जातं आणि सरांनी आज बोलावलंय कुणाला, तर गोठस्करबुवा!'' रोहन बाहेर येऊन त्याच्या हातातली डायरी आपटत खुर्चीवर बसला. ''कोण आहे हा माणूस? मी तर कधी नावसुद्धा ऐकलेलं नाही. सरांनी त्यांच्या इंटरव्ह्यूसाठी एवढा हट्ट का चालवलाय?'' मघापासून त्याची धावपळ बघणारी श्वेता त्याच्या जवळ येत म्हणाली.



अभिजित पेंढारकर

**''सर,** बुवा एव्हाना यायला हवे होते. त्यांच्या इंटरव्ह्यूची सगळी तयारी झालेय. लाइव्ह इव्हेंट आहे. उशीर झाला, तर...'' असिस्टंटने आठवण करून दिली आणि विक्रम थोडा अस्वस्थ झाला.

''येतील. बुवा कधीच कुणाला दिलेला शब्द आणि वेळ चुकवत नाहीत.'' त्यानं असिस्टंटला दटावले. तो राग त्याच्यावरचा होता, स्वतःबद्दलचा होता की आजच्या या अवघड प्रसंगाबद्दलचा, हे सांगणे अवघड होते. विक्रमलाही आपला बदललेला स्वर जाणवला. त्याने स्वतःला सावरले.

''रोहन, अरे खरंच येतील ते, कदाचित काही जेन्युइन प्रॉब्लेम असेल, किंवा ट्रॅफिकमध्ये अडकले असतील.'' त्याने समजावले. तो समोर बघून बोलत असला, तरी रोहनशी नाही, स्वतःशीच बोलतोय की काय, असे वाटत होते. त्याचे चित्तही मघापासून थाऱ्यावर नव्हतेच. गोठस्करबुवांकडून या लाइव्ह मुलाखत कार्यक्रमासाठी त्याने भरपूर आटापिटा करून होकार मिळवला होता हे खरे, पण ते प्रत्यक्ष आलेच नाहीत तर काय, हा प्रश्न त्याच्या मनात अधूनमधून डोके वर काढत होताच.

विक्रम एकेकाळी त्यांचा पट्टशिष्य होता. अगदी लाडका आणि भरवशाचा. एवढा, की तोच बुवांचा वारसदार आहे, असे सगळे म्हणायला लागले होते. प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही. बुवांकडे शास्त्रीय संगीत शिकत असताना विक्रम स्वतःच्या हौसेसाठीही काही गाणी गात होता. बुवांना अर्थातच त्याबद्दल कल्पना नव्हती. शास्त्रीय संगीताचा पूर्ण अभ्यास झाल्याशिवाय कुठलीही मैफल करायची नाही, स्वतंत्रपणे कुठेही गायचे नाही, असा बुवांचा नियम होता. बुवांना त्यांच्या गुरूंनी जे शिकवले, तेच तेही पाळत होते. थोडे हट्टी, काही वेळा दुराग्रही असेच होते बुवा. आयुष्यभर स्वतःच्या तत्त्वांशी प्रामाणिक राहून जगले. शिष्यांसाठीही त्यांनी जगण्या-वागण्याचे काही नियम बनवले होते आणि विक्रमने त्यातला एक मुख्य नियमच तोडला होता. त्याची मोठी शिक्षा त्याला भोगावी लागणार होती.

विक्रमने त्याच्या एका मित्रासाठी एक गाणे रेकॉर्ड केले होते. अगदी उडत्या चालीचे, भडक असे गाणे होते ते. 'तू माझ्या दिलाची राणी, मी तुझा मजनू, सजनी माझी वाटते अप्सराच जनू' असे काहीतरी

छचोर शब्द होते. हे गाणे आपला मित्र व्यावसायिक उद्देशाने वापरणार आहे, याची विक्रमला अजिबात कल्पना नव्हती. मित्राने विक्रमच्या परवानगीशिवाय कुठल्याशा एका म्युझिक कंपनीला देऊन टाकले होते. त्या गाण्यावर तसाच काहीतरी भडक डान्स शूट करून त्यांनी ते गाणे बाजारात विक्रीसाठी आणले. कसे कुणास ठाऊक, गाणे एकदमच चर्चेत आले आणि हिट झाले. विक्रमला याबद्दल अजिबात कल्पना नव्हती, बुवांना तर त्याहून नाही. बुवांच्या कानावर ही खबर गेली, तेव्हा ते संतापले. त्यांनी विक्रमशी बोलणेच टाकले. शास्त्रीय संगीत शिकायला तर येऊ नकोसच, पण पुन्हा माझ्या दारातही उभा राहू नकोस, असा निरोप त्यांनी विक्रमला दिला. विक्रमने त्या वेळी त्यांना भेटायचा अनेकदा प्रयत्न केला, पण बुवा भेटले नाहीत. त्याचे काहीच त्यांनी ऐकून घेतले नाही.

बुवांना विनंती करून काही उपयोग होणार नाही, याची विक्रमला कल्पना होती. तरीही त्याने एकदोनदा बुवांना भेटण्याचा, त्यांची माफी मागण्याचा प्रयत्न केला. बुवा ठाम राहिले. त्यांनी त्याच्यावर आगपाखड केली नाही, की त्याला शिव्याशाप दिले नाहीत. बुवांचे मौनाचे अस्त्र फार प्रभावी होते. तेच यावेळीही त्यांनी वापरले. विक्रमच्या सगळ्या आशा मावळल्या, तेव्हा त्याने हताश होऊन माघार घेतली. मित्राच्या त्या एका गाण्यातून आणखी गाणी मिळत गेली. तीही गाजली आणि विक्रम त्यात गुंतला. काही काळ अशीच हिट गाणी दिल्यावर विक्रमला एक मोठी संधी मिळाली, म्युझिक कंपनी सुरू करण्याची. त्याच्या प्रेमात पडलेल्या मुलीने तिच्या वडिलांना सांगून त्याच्यासाठी ही ऑफर दिली आणि विक्रमच्या यशाचा मार्ग खुला झाला. विक्रम आयुष्यात यशस्वी झाला, पण गुरूशी त्याचे नाते तुटले ते तुटलेच.

विक्रमला आता हे सगळे आठवले आणि त्याच्या डोळ्यांच्या कडा नकळत ओलावल्या. तेवढ्यात कुणीतरी पुन्हा केबिनच्या दारावर नॉक केले आणि विक्रम सावरला.

''येस, कम इन!'' कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवलेल्या गंभीर आवाजात तो म्हणाला. मघाचाच असिस्टंट रोहन आत आला.

''काय झालं, आले का बुवा?''

रोहनने नकारार्थी मान हलवली.

''सॉरी सर!'' आपण पुन्हा विचारायला आल्याबद्दल आपला बॉस आपल्यावर रागावणार, अशी खात्री असल्यासारखी त्याने विक्रमची आधीच माफी मागून टाकली.

''त्यांचा फोनही लागत नाहीये मघापासून.''

''अशा ठिकाणी जाताना बुवा त्यांचा फोन बंदच ठेवतात. तू त्यांना पुन्हा फोन करू नकोस, मी बघतो.''

''अहो पण सर, आता आपल्याला...''

''मी बघतो, असं म्हटलं ना?'' विक्रमचा आवाज पुन्हा चढला, तसे रोहनने पुन्हा मान डोलावली आणि तो निरोप घेऊन निघून गेला.

आताही आपले रागावणे अनाठायी होते, हे विक्रमच्या लक्षात आले. तो आणखी अस्वस्थ झाला.

''काय चाललेय माझे? असे कुणावर उगाच रागवायला मला आवडत नाही. रोहनची काय चूक आहे ह्यात? तो तर त्याची ड्युटी करतोय. मुलाखतीसाठी येणारा पाहुणा वेळेत आला नाही, तर सगळे शेड्युल गडबडेल आणि मग मी त्यालाच झापेन. तो फक्त आठवण करून द्यायला आला होता आणि मी उगाच...'' विक्रमच्या मनात घालमेल सुरू होती. बुवा नक्की येतील, असे काही मिनिटांपूर्वी ठामपणे सांगणारा तो, आता बुवा खरेच येतील का, अशा शंकेपर्यंत येऊन पोहोचला होता.

''सर आज सटकलेले दिसताहेत. इकडे कंपनीतल्या प्रत्येकाला म्युझिक व्हिडिओचा रीच वाढवण्याची टार्गेट दिली जातात. त्यासाठी एचआरकडून प्रेशर आणलं जातं आणि सरांनी आज बोलावलंय कुणाला, तर गोठस्करबुवा!'' रोहन बाहेर येऊन त्याच्या हातातली डायरी आपटत खुर्चीवर बसला.

''कोण आहे हा माणूस? मी तर कधी नावसुद्धा ऐकलेलं नाही. सरांनी त्यांच्या इंटरव्ह्यूसाठी एवढा हट्ट का चालवलाय?'' मघापासून त्याची धावपळ बघणारी श्वेता त्याच्या जवळ येत म्हणाली.

''अगदीच अननोन नाहीयेत ग ते. शास्त्रीय संगीतातलं मोठं नाव आहे. एक काळ त्यांनी गाजवलाय. त्या वेळी त्यांच्या मैफली होत असत. अनेक अवॉर्डसुद्धा मिळाली आहेत त्यांना. पण आता जमाना किती बदललाय. त्यातून ट्रेंडिंग राहण्यासाठी सतत काहीतरी गिमिक्स करावी लागतात, सोशल मीडियावर एक्टिव्ह राहावं लागतं. ह्या बुवांची गाणी आताच्या काळात कोण ऐकणार?''

''तेच तर. पण सरांचा एवढा हट्ट कशासाठी चाललाय मग? सध्याच्या ट्रेंडिंग अल्बममध्ये असलेले किती जण आहेत आपल्याकडे. गेल्या महिन्यात बॉबी रंगरेजचा एक इंटरव्ह्यू केला आपण, त्यावेळी टीआरपी ऑल टाइम हाय गेला होता. त्याची एक छोटी क्लिप इन्स्टावर दिली होती, तिलाही १३ मिलिअन व्ह्यूज आहेत...१३ मिलिअन!'' श्वेता एक्साइट होऊन बोलत होती.

''हे सगळं मला पटतंय ग, पण मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार?''

''मांजराच्या गळ्यात व्हॉट? तू काय बोलतोयंस? त्याचा काय संबंध इथे?'' श्वेता म्हणाली आणि रोहन आणखी वैतागला.



"तू आता माझं डोकं खाऊ नको. एक तर सरांच्या डोक्यात काय चाललंय कळत नाहीये. आजच्या इंटरव्ह्यूचं काही खरं वाटत नाहीये मला!'' रोहन खुर्चीवरून उठला, पुन्हा दारापाशी गेला, बाहेरून कुणी येतेय का, याचा त्याने अंदाज घेतला. कुणाचीच हालचाल नव्हती. बुवांना पुन्हा फोन करावा का, असा विचार त्याच्या मनात आला, पण सरांना समजले तर ते जीव घेतील, याबद्दल त्याला खात्री होती. त्याने तो विचार रद्द केला. आता खरेच वेळ टळून चालली होती. काहीतरी निर्णय घ्यायला हवा होता. सगळा सेट अप तयार होता, कॅमेरा, लायटिंग रेडी होते. फक्त पाहुण्यांचीच काय ती कमतरता होती.

अलंकार म्युझिक स्टुडिओने स्पॉन्सर केलेला हा शो अगदी कमी काळात हिट झाला होता. गाजत असलेल्या कलाकारांच्या मुलाखती त्यात घेतल्या जात. विक्रमच ही मुलाखत घ्यायचा, त्याच्या खास शैलीत. दरवेळी काहीतरी वेगळे करून, मुलाखत देणाऱ्याला कम्फर्टेबल करून तो काहीतरी भन्नाट शोधून काढायचा आणि दरवेळी मुलाखतीला दणकून टीआरपी मिळायचा. अलंकार म्युझिक स्टुडिओ स्पॉन्सर असल्यामुळे चॅनेलच्या या शोसाठी काही सूचना नसायच्या. या वेळी मात्र विक्रमने गोठस्करबुवांचे नाव मुलाखतीसाठी निश्चित केले, तेव्हा सगळ्यांच्या भुवया उंचावल्या होत्या. ट्रेंडिंग व्यक्तींच्या मुलाखतीमध्ये हे जुनाट आणि आउटडेटेड नाव कशाला, अशीच सगळ्यांची पहिली प्रतिक्रिया होती. हळूहळू त्यातून खुसपूस, मग गॉसिपही सुरू झाले. विक्रमच्या कानावरही ही चर्चा गेली होती. कधी आडून, तर कधी उघडपणे लोकांनी या नावाबद्दल त्यांच्या शंका मांडायलाही सुरुवात केली होती. पण विक्रम अजिबात बधला नाही. कंपनीचे मालकच या नावाबद्दल ठाम आहेत, म्हटल्यावर सगळी कुरकूर हळूहळू शांत झाली. मुलाखतीची तारीख आणि वेळ ठरली.

रिसर्च करताना रोहनच्या हे लक्षात आले, की गोठस्करबुवा हे नाव हल्ली फारसे चर्चेत नसले, तरी त्यांनी पूर्वी खूप मोठे काम केले आहे. अनेक गायक, गायिका त्यांनी घडवल्या आहेत. काही जणांनी आपल्या गुरूंचे नाव लक्षात ठेवले, काही जण मात्र पूर्णपणे त्यांना विसरून गेले. किंवा, गुरूंचे नाव घेण्याची त्यांना गरज वाटली नसावी. बुवांचे व्यक्तिमत्त्वही तसेच होते. प्रसिद्धिपराङ्मुख. स्वतःहून कुठलेच क्रेडिट घेण्यासाठी ते कधी पुढे यायचे नाहीत. त्यांना पुरस्कारही मिळाले होते, ते अगदी मोजके. अनेक पुरस्कार तर त्यांनी नाकारले होते.

बुवांचे नाव सध्या कुठेच चर्चेत नसताना अचानकपणे त्यांना असे मुलाखतीसाठी बोलावण्याचा उद्देश काय असावा, हे मात्र रोहनच्या लक्षात येत नव्हते. चॅनेलचा हा स्लॉट म्युझिक कंपनीने विकत घेतलेला असला, तरी प्रेक्षकांना काही विकत घेता येत नाही. ते स्वतःच्या मनाचे राजे असतात. गोठस्करबुवांची मुलाखत विक्रमसरांनी हट्टाने घेतली, तरी ती बघणार कोण? टीआरपी कसा मिळणार? रोहनला अनेक प्रश्न पडले होते. खरे तर हे विक्रमसरांनाच विचारावे, असे त्याला कधीपासून वाटत होते, पण तसे धाडसच झाले नव्हते. आज तर सरांची अस्वस्थता पाहून त्याला केबिनमध्ये जायलाही

शंभरदा विचार करावा लागणार होता.

रोहन आपल्याच विचारांच्या तंद्रीत असताना त्याच्या खांद्यावर कुणाचातरी हात पडल्याचं त्याच्या लक्षात आले. त्याने दचकून मागे पाहिले.

''स....सर?'' तो कसाबसा धडपडत उभा राहिला. स्वतः विक्रम बाहेर येऊन त्याच्या टेबलपाशी उभा होता.

''एनी अपडेट्स?'' विक्रमनं विचारलं.

''नाही सर... तुम्हीच तर म्हणाला, की कॉल....''

''हं...मीच सांगितलं होतं. आहे माझ्या लक्षात. पण आता कॉल.... ठीकेय, मीच करून बघतो.'' विक्रमनेच असे म्हटल्यामुळे रोहनच्या चेहऱ्यावरचे टेन्शन थोडे कमी झाले. विक्रमने त्याचा मोबाइल काढला. कॉन्टॅक्ट लिस्टमधून बुवांचा नंबर शोधला. कॉलसाठी बटण दाबणार, एवढ्यात तो थबकला. बुवांशी शेवटचे बोलणे होऊनही अनेक वर्षे होऊन गेली होती. मुलाखतीसाठी त्यांचे नाव निश्चित केले, तेव्हाही विक्रमने दुसऱ्याच कुणालातरी त्यांच्याशी बोलून त्यांची वेळ घ्यायला सांगितले होते. स्वतः बोलणे केले नव्हते. आता मात्र ती वेळ आली होती. बुवांना फोन करावाच लागणार होता. तो कॉल लावणार, तेवढ्यात त्याचे दाराकडे लक्ष गेले. दारातून त्याचाच सहकारी आत आला होता. विक्रमने दाराकडे बघितले, तर दारातून पांढरा सदरा लेंगा, लाल जाकीट आणि पांढरे उपरणे घेतलेले गोठस्करबुवा येत होते. विक्रम एक क्षण त्यांच्याकडे बघतच राहिला. बुवांच्या रूपात एवढ्या वर्षांत काहीच फरक पडला नव्हता. तीच वेशभूषा, तोच उत्साह, तीच हात उडवण्याची लकब आणि तोच भारावून टाकणारा वावर. नाही म्हणायला चेहऱ्यावरचे तेज थोडे कमी झाले होते. मधल्या काळात आयुष्यात घडून गेलेल्या अनेक भल्या-बुऱ्या गोष्टींची पुटे त्या चेहऱ्यावर चढली होती. वयानुसार चालीचा वेगही किंचित मंदावला होता, पण ग्रेस मात्र तशीच होती.

विक्रमला काय बोलावे कळेना.

''सर...!'' रोहनने हाक मारून विक्रमला भानावर आणलं. तो सावरला आणि सरांचे स्वागत करायला पुढे झाला. इतर पाहुण्यांना देतो तसा टिपिकल बुके न आणता बुवांसाठी बकुळीची फुलं आणायची व्यवस्था करा, असं विक्रमने सकाळीच स्टाफला सांगून ठेवलं होतं. रोहनकडेच ती जबाबदारी होती. त्यानं बकुळीच्या फुलांचा पुडा विक्रमच्या हातात दिला आणि विक्रम तो घेऊन पुढे झाला.

''बुवा...!'' बुवांना हाक मारताना त्याचा कंठ दाटून आला होता. बुवांनी त्याच्याकडे बघितले. एक ओळखीचे हसू त्यांच्या चेहऱ्यावर पसरले. एवढ्या वर्षांनी भेटलेल्या लाडक्या शिष्याबद्दलचा जिव्हाळाही त्या चेहऱ्यावरच्या एका स्मितरेषेतून डोकावत होता. खरे तर तसेच धावत जाऊन बुवांच्या पाया पडावे, त्यांना घट्ट मिठी मारून आपल्या भावनांना वाट मोकळी करून द्यावी, अशी तीव्र भावना विक्रमच्या मनात आली होती. पण आपण स्टुडिओमध्ये आहोत, आजूबाजूला आपले सहकारी, कर्मचारी आहेत आणि आज बुवा एका प्रोफेशनल कार्यक्रमाचा भाग म्हणून इथे आले आहेत, याची जाणीव झाली आणि तो भानावर आला.

''नमस्कार, बुवा.'' असे म्हणून विक्रम वाकला. त्याने बुवांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला. एव्हाना इतर कुणासमोरही आपला मान न सोडणाऱ्या आपल्या बॉसला असे कुणाच्या पाया पडताना बघून आज सगळा स्टाफ गोंधळला होता. सगळेच डोळे विस्फारून समोर बघत होते.

बुवांनी विक्रमच्या डोक्याला ओझरता स्पर्श केला. विक्रमला त्या स्पर्शानेही धन्य वाटले.

''आम्ही सगळी तयारी करून ठेवली आहे. तसा काही फारसा उशीर झालेला नाही!'' बुवांनी काही बोलायच्या आधीच विक्रम त्यांना सांगून मोकळा झाला. बुवा नक्कीच कुठेतरी ट्रॅफिक किंवा आणखी एखाद्या महत्त्वाच्या कारणामुळे उशिरा आले असणार, याची त्याला खात्री होती. ते त्यांच्या स्वभावानुसार त्याबद्दल माफी मागतील, हेही त्याला माहीत होते आणि तेच त्याला टाळायचे होते.

खास बुवांसाठी मागवलेली बकुळीची फुले त्याने बुवांना दिली. त्यांच्या चेहऱ्यावरची आणखी एक स्मितरेषा खुलली. आज आपले सर नेहमीसारखे मोकळेपणाने वागत नाहीयेत, त्यांच्या वावरण्यात एक प्रकारचा तणाव आहे, हे स्टाफमधल्या प्रत्येकाला जाणवत होते. सरांचा उत्साह, त्यांचा आब आज जणू कुठेतरी गळून पडला होता, हेही लक्षात येत होते.

विक्रम बुवांना त्याच्या केबिनमध्ये घेऊन गेला. तिथे चहापाणी झाले, पण गप्पा रंगत नव्हत्या. अजूनही त्या दोघांमधला अवघडलेपणा कुणालाही चटकन लक्षात येईल, असा होता. खरे तर कुठलाही मोठा कलाकार आला, तरी आपले विक्रमसर त्याला गप्पांमध्ये खुलवतात, त्याला आधी बऱ्यापैकी रिलॅक्स करून मगच मुलाखतीला सुरुवात करतात, हे सगळ्यांनी बघितले होते. तेच तर या शोच्या यशाचे गणित होते. आज मात्र काहीतरी वेगळेच घडत होते. विक्रमसरच बोलताना अडखळताहेत, स्पष्ट बोलत नाहीयेत, मध्येच थांबताहेत, गप्प होताहेत, हे अनेकांना जाणवत होते. रोहनला तर जास्तच. विक्रमसर त्याचे फक्त बॉस नव्हे, तर आदर्श होते. त्यांच्याकडून तो अनेक गोष्टी कळत-नकळत शिकला होता. आज त्यांचे हे असे अडखळणे, धडपडणे त्याला पचत नव्हत.

रोहनने आठवण करून दिली, की मुलाखत सुरू व्हायला उशीर होतोय. ही मुलाखत लाइव्ह असणार होती, समोर काही निवडक प्रेक्षकही होते. विक्रम बुवांना घेऊन शूटिंगच्या ठिकाणी आला. सगळ्यांनी त्यांना अभिवादन केले.

विक्रमने त्याच्या टेक्निकल टीमला काही सूचना केल्या आणि मुलाखतीला सुरुवात झाली.

बुवांच्या शास्त्रीय संगीताच्या साधनेला सुरुवात कशी झाली, त्यांचे गुरू कोण, त्यांच्याकडून त्यांना कशी प्रेरणा मिळाली, असे ठरावीक प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक होतं. बुवांना पहिल्यांदा भेटल्यानंतर विक्रमसर अवघडलेले दिसत होते, पण आता ते बऱ्यापैकी नॉर्मल झाले आहेत, हे रोहनच्या लक्षात आले. एकदा मुलाखत रंगायला लागली, की विक्रमसरही बऱ्यापैकी खुलायचे. मुलाखत देणाऱ्याला खुलवायचे. आजही तसेच घडत होते. गोठस्करबुवाही मनापासून सगळी उत्तरं देत होते. संगीत हा त्यांच्या नुसत्या आवडीचा विषय नाही, तर आयुष्याचा ध्यास आहे, हे लक्षात आले होते. या माणसाला मुलाखतीसाठी का बोलावले असेल, हा आपल्याच मनात मघाशी आलेला प्रश्न किती चुकीचा होता, हे रोहनच्या नजरेतून स्पष्टपणे दिसत होते.

काही प्रश्नांची सविस्तर उत्तरे झाल्यानंतर विक्रम आणखी रिलॅक्स झाला.

''बुवा, तुम्ही एवढी वर्षं संगीतक्षेत्रासाठी दिलीत. तुमचा प्रवास आम्ही समजून घेतला. आता तुमच्या खाजगी आयुष्याबद्दल थोडं समजून घेण्याची आमच्या श्रोत्यांची इच्छा आहे.'' असे विक्रम म्हणाला आणि बुवा एकदम अस्वस्थ झाले. त्यांना हा प्रश्न अजिबात अपेक्षित नव्हता. त्यांनाच काय, कुणालाच अपेक्षित नव्हता.

''हे बघा, मी...'' रागावलेल्या बुवांनी विक्रमला तिथेच थांबवण्याचा प्रयत्न केला. खरे तर मुलाखतीत कोणतेही खाजगी प्रश्न विचारले जाणार नाहीत, अशी अट बुवांनी आधीच घातली होती. त्याच बोलीवर ते मुलाखतीसाठी यायला तयार झाले होते. विक्रमने तसे कबूल करूनही अचानक हा प्रश्न विचारल्याचा संताप त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. ते पुढे काही बोलणार, तेवढ्यात विक्रम त्याच शांतपणाने म्हणाला, ''हो बुवा, तुमच्या खाजगी आयुष्याबद्दल जाहीरपणे बोलायला तुम्हाला आवडत नाही, हे माहितेय मला. पण हा प्रश्न तुमच्या या क्षेत्रातल्या प्रवासाशीही संबंधित आहे, म्हणून विचारतोय. रोहिणी नावाच्या तुमच्या एक शिष्या होत्या. तुमच्या प्रवासात त्यांचीही मोलाची साथ आहे, असं तुम्हीच म्हणाला होतात. सध्या कुठे असतात त्या?''

या पुढच्या प्रश्नाने तर सगळीच टीम हादरली. रोहनलाही आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता. विक्रमसरांनी आतापर्यंत अनेक तरुण कलाकारांच्या मुलाखती घेतल्या, त्यांना काही कॅज्युअल, काही वैयक्तिक प्रश्न विचारलेही होते. परंतु एवढ्या सीनिअर व्यक्तीच्या खाजगी आयुष्याबद्दल ते काही विचारतील, याची त्याला अजिबात कल्पना नव्हती. विशेषतः बुवांचा स्वभाव, त्यांची ज्येष्ठता बघता हे अपेक्षितच नव्हते.

''मला माहीत नाही आणि माझा काही संबंध नाही!'' बुवा रागाने, पण ठामपणे म्हणाले.

''संबंध आहे, बुवा. तुम्ही हे नाकारू शकत नाही. तुमच्या सुरुवातीच्या अनेक मैफिलींमध्ये त्या तुमच्याबरोबर असायच्या. तुम्ही सुरुवातीला केलेल्या काही अल्बममध्ये तुमच्याबरोबर त्यांचाही आवाज आहे. तुमचे आणि त्यांचे संबंध नक्की कसे होते? त्या अशा अचानक कुठेतरी निघून गेल्या, त्याचं कारण काय? त्यासाठी तुम्ही जबाबदार आहात का? तुमच्या गायनाची शैली हल्ली बदललेली दिसते, त्यामागेही तेच कारण आहे का?'' विक्रमने एकामागून एक प्रश्न विचारले आणि बुवांच्या रागाचा पारा चढत गेला.

''मला याबद्दल काही बोलायचं नाही. यापुढे कुठल्याही प्रश्नाचं उत्तर द्यायचं नाही. ही मुलाखत इथेच संपली!'' बुवांनी थेट सुनावले आणि ते ताडकन जागेवरून उठले. विक्रमकडे संतापलेल्या नजरेने ते बघत होते. विक्रमवर मात्र फार परिणाम झालेला दिसत नव्हता. त्याचा हा पवित्रा बघून रोहनला धक्काच बसला होता. बुवांना समजावण्यासाठी रोहन धावला, पण विक्रम जागचा हलला नाही. रोहनची आणि बुवांची काहीच ओळख नव्हती. त्याच्या समजावण्याने ते ऐकणार थोडेच होते? माईक वगैरे काढून ते विक्रमपाशी आले.

''तू माझा सगळ्यात वाईट आणि नालायक शिष्य आहेस, हे पुन्हा एकदा सिद्ध केलंस तू! पुन्हा मला तोंड दाखवू नकोस!'' असे त्याला सुनावून ते ताड ताड पावले टाकत निघून गेले. स्टुडिओमध्ये सन्नाटा पसरला. जे काही घडलं ते तिथल्या मोजक्या प्रेक्षकांनी पाहिले होते. कॅमेरामनला अंदाज आल्यावर त्याने कॅमेरा बंद केला असला, तरी लाइव्ह कव्हरेजमुळे हा वाद प्रेक्षकांपर्यंत जाणार होताच. तसेच घडले.

सगळ्यांना आश्चर्य वाटत होते, ते विक्रमसरांचे. आधी बुवांची एवढी काळजी करणारा, त्यांच्या पाहुणचारासाठी शंभर सूचना करणारा हा माणूस एवढा विचित्र का वागला? खाजगी प्रश्न नकोत, अशी स्पष्ट सूचना बुवांनी आधीच केलेली असताना त्याने तो विषय का उकरून काढला? तोसुद्धा एवढ्या थेट आणि स्पष्टपणे? विक्रमसरांचा हा स्वभाव नाही. त्यांनी हे चुकून केले, की खरेच त्यांना बुवांना उचकवायचे होते? पण कशासाठी? फक्त टीआरपी मिळवण्यासाठी? सेन्सेशन म्हणून? की आणखी काही?

रोहनला हे प्रश्न भयंकर सतावत होते. एक साधीसुधी, अतिशय थंड प्रतिसाद येईल असे वाटणारी ही मुलाखत भलतीच स्फोटक ठरली होती. या शोमधले आतापर्यंतचे सगळ्यात जास्त रेटिंग ह्या मुलाखतीला मिळाले. गोठस्कर बुवांना ओळखत नसणाऱ्या, त्यांचे नाव विसरून गेलेल्या

अनेकांनीही ही मुलाखत पाहिली. मुलाखतीत ज्या रोहिणीबाईंचा उल्लेख होता, त्यांच्याविषयी लोकांचे कुतूहल जागे झाले. बुवांच्या आधीच्या गाण्यांमध्ये खरेच त्या बाईंचा आवाज होता का, आधीच्या व्हिडिओंच्या मैफलींमध्ये कुठे त्या दिसतात का, हे शोधण्याचा प्रयत्न केला. अचानकपणे त्या सगळ्या व्हिडिओंचे हिट वाढले, शेअर केले जाऊ लागले. गोठस्करबुवा पुन्हा प्रकाशझोतात आले. एका मुलाखतीने त्यांच्या आयुष्यात बरीच उलथापालथ घडवली. इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडियामधली पत्रकार मंडळी बुवांना या विषयावर बोलते करण्यासाठी धडपडू लागली. जे चटपटीत आणि चमचमीत, ते सगळे आजच्या काळात लोकांना हवेच असते, हे नव्याने सिद्ध झाले.

अलंकार म्युझिक कंपनीनेही गोठस्करबुवांची जुनी गाणी त्यांच्या यू ट्यूब चॅनेलवर, वेबसाइटवर पुन्हा प्रदर्शित केली. त्यांनाही भरपूर प्रतिसाद मिळाला. गेल्या दहा-पंधरा वर्षांत बुवांच्या गायकीची, त्यांच्या मेहनतीची कुणीही फारशी दखल घेतली नव्हती. या निमित्ताने त्यांच्याकडे सगळ्यांचे आपोआप पुन्हा लक्ष गेले.

या भल्यामोठ्या गोंधळानंतर बुवांच्या घरी भरपूर घडामोडी घडल्या होत्या. दररोज नव्या पत्रकारांना तोंड द्यायला नको, लोकांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला नकोत, म्हणून बुवा कुठेतरी निघून गेले होते. महिनाभराने ते परत आले. तोपर्यंत हे वादळ थोडे शमले होते. बुवांविषयीची उत्सुकता मात्र कायम होती. त्यांच्या गायकीमधल्या गुणांची, वैशिष्ट्यांची चर्चा सुरू होती. बुवा घरी परत आले आणि दुसऱ्याच दिवशी एक अनोळखी माणूस त्यांच्या दारात हजर झाला. त्याच्या हातात एक पाकीट होते. बुवांनी आधी त्याला टाळलेच, पण त्याने खूपच आग्रह केल्यावर त्याला घरात घेतले.

'साहेबांनी पाकीट दिलंय', एवढेच सांगून तो निघून गेला.

बुवांनी पाकीट उघडलं. त्यात एक चेक आणि चिठ्ठी होती.

''आदरणीय बुवा,

साष्टांग नमस्कार.

सर्वप्रथम मनापासून माफी मागतो. मी तुमचा चांगला शिष्य कधीच होऊ शकलो नाही. काही वर्षांपूर्वीही तुम्हाला माझ्यामुळे यातना झाल्या होत्या, आताही झाल्या. तो प्रश्न मी विचारायला नको होता, पण बोलण्याच्या ओघात ते घडलं. तुम्हाला किती मनस्ताप झाला असेल, मी समजू शकतो. शक्य झाल्यास मला माफ करा.

वाईटातून चांगलं घडतं, तसं काहीतरी घडलंय, हे मात्र खरं. तुमच्या गाण्यांना अचानक जास्त डिमांड आली आहे. त्यातून जी कमाई झाली, त्यातला तुमचा हिस्सा तुम्हाला पाठवतो आहे. कृपया स्वीकार करावा. पुढच्या काळात, तुमच्या शैलीतल्या संगीताचा अल्बम करायचा असेल, तरी अवश्य सांगा. आमची कंपनी सदैव तयार आहे.

तुमचा एकेकाळचा शिष्य.

विक्रम.''

बुवांनी पत्र वाचले. पत्राबरोबर असलेला चेक पाहिला. त्यावर मोठी रक्कम होती. पुन्हा पुन्हा त्या पत्राकडे आणि चेककडे ते बघत राहिले.

महिनाभरात रोहननेही उत्सुकतेपोटी बरेच संशोधन केले होते. आपले विक्रमसर बुवांचे पूर्वी शिष्य होते, त्यांच्यात नक्की काय बिनसले, याबद्दल सगळी माहिती त्याने काढली होती.

''सर, बुवांची मुलाखत तुम्ही का घेताय असं आम्हाला वाटत होतं आणि आता गेल्या महिन्यात सगळ्यात जास्त ट्रॅफिक आणि हिट त्याच बुवांच्या गाण्यांना मिळाल्या आहेत.'' रोहन म्हणाला. विक्रम फक्त हसला.

''असंच घडणार, हे मला माहीत होतं.'' तो म्हणाला, तेव्हा रोहनने चमकून बघितले.

''बुवांची तत्त्वं, नियम त्यांच्या जागी ठीक आहेत, पण सध्याच्या काळात तत्त्वांपेक्षा प्रसिद्धीला जास्त महत्त्व आलंय. मग ती कुठल्याही मार्गानं मिळालेली का असेना!'' विक्रम पोटतिडकीने बोलत होता.

''बुवांच्या कलेकडे लोकांचं लक्ष जायला हवं होतं. गेली काही वर्षं ते उपेक्षित, दुर्लक्षित आहेत. त्यांची आर्थिक स्थितीही चांगली नाही. मला त्यांना काहीतरी मदत करायची होती, गुरुदक्षिणा म्हणून. पण असेच पैसे दिले असते, तर त्यांनी ते घेतले नसते. बुवांनी एका हळव्या क्षणी मला सांगितलेली त्यांच्या प्रेमाची ही गोष्ट मला आठवत होती. मी योग्य वेळी तिचा मला हवा तसा वापर करून घेतला, एवढंच.'' विक्रम म्हणाला. डोळ्यांच्या ओलावलेल्या कडा त्याने पुसल्या.

एवढ्यात त्याच्या मोबाइलवर मेसेज आला. बुवांचे नाव बघून तो चमकला. आता काय वाचायला लागतेय, याबद्दलची शंका घेऊन, धडधडत्या छातीनेच त्याने मेसेज उघडला.

''चेक मिळाला. धन्यवाद. भेटायला कधी येतो आहेस? वाट बघतो.''

विक्रमच्या चेहऱ्यावरची स्मितरेषा खुलली. त्याचे डोळे पुन्हा पाण्याने भरून गेले.

**– अभिजित पेंढारकर**
abhi.pendharkar@gmail.com



रामदास भटकळ

# नातेचित्र

**आपापल्या आत्मपर लेखनातून अनेकांनी एकेका नात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीत 'गोफ दुहेरी' हे जया जोग यांचे पुस्तक मला अतिशय आवडते. इंग्रजीत सुझन स्ट्रासबर्ग यांचे 'मॅरिलिन अँड आय' हे पुस्तक तर अप्रतिम आहे. लेखिका लिहिते, की मॅरिलिनला आपण काय व्हावे हे माहीत नव्हते. मला मॅरिलिन व्हायचे होते. अशा पद्धतीने नात्यांचा शोध घ्यायला ताकद लागते.**



**पन्नास** वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या दिवसांत माझी विशेष सलगी होती ती 'माणूस' साप्ताहिकाच्या श्री.ग. आणि दिलीप ह्या माजगावकर बंधूंशी. मी अजून 'माणूस'चा लेखक झालो नव्हतो. परंतु वाचक आणि हितचिंतक होतो. 'माणूस' हे अमेरिकन 'टाइम'सारखे मोठा खप असलेले उत्तम दर्जाचे साप्ताहिक व्हावे अशी श्रीभाऊंची महत्त्वाकांक्षा होती. त्यांच्या दुहेरी हेतूंच्या परिघात विचार करायला मी असमर्थ होतो. तरी ते मला अनेक गोष्टी विचारत असत. मी गमतीने म्हणायचो की मी सांगतो ह्या उलट तुम्ही करा म्हणजे तुमचा हेतू सफल होईल.


त्या सुमारास माझे वडील गणेशराव भटकळ यांच्यावर त्यांनी लेख लिहायला सांगितला. निमित्त होते वडिलांना सप्टेंबर १९७० मध्ये पंचाहत्तरावे वर्ष लागत होते. त्याच अंकात विनोबा भावे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त रवींद्र पिंगे लिहिणार होते; तेव्हा मी चांगलाच घाबरलो होतो.

त्यातून मुलाने वडिलांबद्दल लिहिण्यात विशेष अडचणी असतात. पहिली गोष्ट म्हणजे स्वतः जाणते होईपर्यंत वडिलांचे आयुष्य कसे घडत गेले ते आपत्याने अनुभवणे अशक्य असते. तेव्हा कोणीही लिहिणार ते चार लोकांना विचारून किंवा संशोधन करून. औचित्याचे काही बंधनही सांभाळावे लागते. संशोधन करून एखादा तरबेज पत्रकार अधिक चांगले काम करू शकेल.

माझे वडील स्वतःबद्दल फारसे बोलत नसत तेव्हा त्यांच्या मुलाखतीचा आधारही कठीण होता. अशा परिस्थितीत मला तोडगा सुचला तो माझे आणि त्यांचे नाते शोधण्याचा. व्यक्तिचित्र लिहिण्याला लागणारा तटस्थपणा या नात्यात कठीण तेव्हा आपण भावनिक गुंतवणूक लक्षात घेऊनच 'मी आणि माझे वडील' अशा प्रकारचे लेखन करूया असे मी ठरवले. माझ्या तेव्हाच्या लेखनाला अर्थातच अनेक मर्यादा होत्या. नवशिकेपणाची होतीच, या नात्याचीही होती. परंतु या निमित्ताने माझ्या विचारात 'नातेचित्र' ही संज्ञा घट्ट बसली.

त्यानंतर 'माणूस'मधून बरेच लेखन मी केले. प्रकाशन-कार्याला माझ्या कुमारवयातच सुरुवात केली असल्याने माझे बहुतेक लेखक माझ्याहून बरेच मोठे असायचे. त्यांच्या निर्वाणांनंतर त्यांच्याबद्दल लिहिताना मी हीच पद्धत चालू ठेवली. मराठीत व्यक्तिचित्रे हा एक बराच रुळलेला वाङ्मयप्रकार आहे. त्यात श्री.के. क्षीरसागर, प्रभाकर पाध्ये, रवींद्र पिंगे अशांनी लिहिलेली परक्याच्या कर्तृत्वाची गुणवर्णन व परीक्षण करणारी, कुमार रघुवीर, वि.द. घाटे अशांनी रेखाटलेली

ललित व्यक्तिचित्रे, पु.ल. देशपांडे, जयवंत दळवी यांनी शब्दांतून मांडलेली अर्कचित्रे ही तर बहारदार आहेतच. शिवाय आपापल्या आत्मपर लेखनातून अनेकांनी एकेका नात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीत 'गोफ दुहेरी' हे जया जोग यांचे पुस्तक मला अतिशय आवडते. इंग्रजीत सुझन स्ट्रासबर्ग यांचे 'मॅरिलिन अँड आय' हे पुस्तक तर अप्रतिम आहे. लेखिका लिहिते, की मॅरिलिनला आपण काय व्हावे हे माहीत नव्हते. मला मॅरिलिन व्हायचे होते. अशा पद्धतीने नात्यांचा शोध घ्यायला ताकद लागते.



प्रकाशक ही जबाबदारी मी फार लवकर स्वीकारली आणि तीही पोटभरू व्यवसायापेक्षा माझी आनंदयात्रा म्हणून त्यामुळे माझ्या नातलगांपेक्षा माझी लेखक मंडळी मला जवळची वाटू लागली. लेखकांशी सबंध जुळायला त्यांचा स्वभाव माझ्याशी जुळलाच पाहिजे अशी शक्यता तर नव्हतीच शिवाय तशी आवश्यकताही नव्हती. माझे काही लेखक हे फार निरनिराळ्या प्रकृतीचे असायचे. काही वेळा शत्रुत्व असलेले दोघे माझ्या समोर एकत्र असायचे तरीही ते दोघेही माझे मित्रच. त्यांची विद्वता किंवा प्रतिभा माझ्यात असणे शक्यच नव्हते. तरी मामा वरेरकर, काका गाडगीळ यांसारखे एकोणिसाव्या शतकात जन्मलेले किंवा त्यानंतरच्या पिढीतील वि.वा. शिरवाडकर, वा.ल. कुळकर्णी, प्रभाकर पाध्ये यांच्यासारखे माझ्या जन्मापूर्वी मान्यता पावलेले लेखक यांनी मला मित्र मानले; त्यामुळे मी घडत गेलो याची मला जाणीव होऊ लागली आणि ह्या कुटुंबव्यवस्थेत मी रंगलो आणि नादावलो.

हे सारे करत असताना माझे आईवडील, भावंडे, शाळा-कॉलेजातील सोबती यांच्यापासून मी दुरावलो नाही ही आश्चर्याची बाब. का कुणास ठाऊक पण माझ्यावर प्रेम करण्यात इतरांना आनंद मिळतो असे मला जाणवू लागले. त्या दिवसांत घरच्या, व्यवसायातल्या किंवा परक्या लोकांना भेटायला आधी फोन करून ठरवावे लागत नसे. नात्यांत एक सहजता होती, मोकळेपणा होता. प्रत्येक गोष्टीकडे मला यातून काय मिळणार असे पाहण्याची वृत्ती नव्हती. प्रत्येक गोष्टीची परतफेड केलीच पाहिजे असे बंधन नसायचे.

मी तर या बाबतींत नालायकच होतो. परदेशी कोणाकडे जेवायला जाताना वाईनची बाटली नेण्याची पद्धत आहे. इथे कटाक्षाने मिठाई किंवा फळे-फुले यांची भेट देतात. मी कधी अशा वस्तू नेत नसे. कोणालाही मी व्यक्तिश: हवासा वाटलो पाहिजे; मी काय आणतो त्यासाठी नव्हे. असे काहीतरी मला तिरपागडे वाटायचे. अगदी माझ्या नातवंडांसाठी हट्टाने मी पेपरमिंट, चॉकलेट आणत नसे. तरी मला त्यांनी आपल्या प्रेमाने चिंब भिजवले आणि मी जगातील सर्वात भाग्यवान आजोबा अशी माझी प्रौढी असायची.

कधी ते नेमके सांगता येत नाही. कदाचित १९९०च्या सुमारास उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचे स्तोम वाढू लागले आणि चंगळवाद हा चांगलाच की असे वाटू लागले. जगभर आदर्शवादी विचारांपेक्षा रंजनाकडे किंवा ॲन रँड ही अमेरिकन लेखिका म्हणते त्याप्रमाणे स्वार्थ हे एक महत्त्वाचे मूल्य मानण्याकडे कल होऊ लागला. तंत्रज्ञान विकसित होऊ लागले तसे आपण तांत्रिक सोयीचे गुलाम होऊ लागलो. मुंबईसारख्या शहरात प्रवास त्रासदायक होऊ लागला आणि प्रत्येकाच्या घरी सुरुवातीला टेलिफोन आणि पुढे मोबाइल येऊ लागले, तशी आधी ठरवल्याशिवाय कोणी भेटायला येईनासे झाले. जुन्या पिढीतील लेखक-कलावंतांना मी कधीही भेटू शकत होतो. नवीन पिढीतील सगळे इतके आपापल्या कामात गढलेले की कोणाला भेटणे हे एक दिव्य होऊन बसले. त्यातून मी निवृत्त होऊन घरात बेकार बसलो की ह्या दुराव्याची मला

अधिकच जाणीव होई. माझ्याविषयी वयानुसार आदर वाढला पण माझी उपयुक्तता कमी झाल्यामुळे माझी गरज कोणाला वाटेनाशी झाली आहे, असे मला सारखे वाटायचे.

माझ्या नातेचित्रांच्या लेखनाविषयी काही सांगावसे वाटते. मी बहुतेक लेख लिहिले ते 'प्रभाकर गोरे आणि मी' या थाटात. शीर्षकच हे व्यक्तिचित्र नसून 'नातेचित्र' आहे याची जाणीव करून देत असे. तरी तुझ्या लेखात 'तू फार डोकावतोस' अशी टीका होत असे. म्हणजे ह्या लेखातील 'मी' त्या वाचकाला आवडलो नाही असा मी अर्थ काढत असे आणि माझ्या व्यक्तित्वाची आणि लेखनाची मर्यादा मी स्वीकारत असे. नाहीतरी माणसांना समजून घेणे आणि स्वत:लाही ही सोपी गोष्ट नाही. सगळ्या गोष्टी ह्या स्फटिकासारख्या स्वच्छ दिसू शकत नाहीत आणि दिसल्या तरी त्या सांगायला जमेलच असे नाही. म्हणूनच मी माझ्या पहिल्या पुस्तकाला 'जिगसॉ' हे नाव दिले. स्वभावाचे सगळे तुकडे जुळतात असे नाही. ह्या माझ्या पहिल्या पुस्तकावर एकदा चर्चा झाली. यातील सर्व व्यक्ती निधन पावल्या होत्या अशी त्याच्यावर टीका माझ्या जवळच्या व्यक्तींनीही केली. याचा माझ्या लेखनावर परिणाम होऊन बराच काळ मी असे लेखन स्थगित केले.

परंतु मानवी नात्यातला माझा रस कमी होईना. मग विचार केला की माझ्याबद्दल माझे लिहिणे असमाधानकारक असेल तर मी गांधींसारख्या उत्तुंग व्यक्तीच्या परिचितांबद्दल लिहावे. तेव्हा मी माझ्या ध्यासपूर्तीसाठी महात्मा गांधी आणि त्यांचा मित्रपरिवार यांविषयी 'साधना' साप्ताहिकातून लिहिलेल्या 'मोहनमाया' या सदराने पुस्तक तयार झाले. गंमत म्हणजे 'जिगसॉ'चे राजहंस प्रकाशन यांना ते नाकारावेसे वाटले. त्यांच्याच आग्रहाखातर 'जिव्हाळा' ह्या संग्रहासाठी मी माझ्या काही महत्त्वाच्या इंग्रजी आणि मराठी लेखकांबद्दल लिहिले.

त्याआधी काही लेखकांबद्दल त्यांच्या हयातीतच लिहिण्याचा प्रयत्न केला. तो अनुभव फारसा सुखद आला नाही. जवळच्या माणसांच्या मृत्यूनंतर मी काहीसा मोकळेपणाने लिहीत असे. तरीही ह्या स्पष्टपणालाही मर्यादा असतात हे लक्षात येऊ लागले. तसे ह्या नातेचित्राच्या मर्यादा जाचू लागल्या आहेत. कितीही झाले तरी आपण लिहिताना स्वत:ची प्रतिमा झाकोळू नये याची काळजी घेत असतो. महात्मा गांधींसारखा परखडपणा आपल्याला कसा झेपणार?


इतरांनी लिहिलेली नातेचित्रे मी जाणीवपूर्वक वाचत असे. एकेका नात्याविषयी लिहिलेले अनेक ग्रंथ माझ्या वाचनात आले. मी विशेष भाग्यवान की इतका अद्वितीय माणसे माझ्या आयुष्यात आली आणि त्यांनी मला जवळ येऊ दिले. यामुळे माझ्या लेखनाला मर्यादाही आल्या. मी प्रत्यक्ष न अनुभवलेले पात्र निर्माण करू शकत नाही. तरीही इतक्या जणांनी मला स्नेह कसा दिला असेल याचा विचार करताना लक्षात आले की माझ्या घरच्यांनी मला जे प्रेमाचे कवच दिले, विशेषत: माझ्या कुमारवयात मी नासण्यापासून मला वाचवले. त्या पाखर घालणाऱ्यासंबंधी लिहिले पाहिजे. काही निमित्ताने 'पाखर' ह्या माझ्या संकल्पित पुस्तकाच्या पाच नमुना प्रती मी तयार केल्या. परंतु या माझ्या लेखनातील आणि व्यक्तित्वातील मर्यादामुळे ते प्रसिद्ध होऊ शकले नाही.

**– रामदास भटकळ**
ramdasbhatkal1935@gmail.com

ग्रंथाली

**स्वास्थ्यसखा**

**डॉ. प्रभाकर देशपांडे**




स्वास्थ्य म्हणजे नेमकं काय याविषयीच अनेकांच्या मनात गोंधळ असतो. तो दूर करण्यापासूनच डॉ. प्रभाकर देशपांडे यांनी या पुस्तकाला सुरुवात केली आहे.

**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**



डॉ. उज्ज्वला दळवी

# ‘औपचारिक’ नातं

**विसाव्या शतकात फॅमिली डॉक्टर हा देवमाणूस भारतात, युरोपात, अमेरिकेत सर्वत्र अस्तित्वात होता. गावातल्या किंवा शहरातल्या काही घराण्यांतली सगळी माणसं आपल्या बारीकसारीक शारीरिक-मानसिक दुखण्याखुपण्यांसाठी, घरातल्या भांडणांवर उतारा शोधण्यासाठी, अगदी मुलांमुलींच्या लग्नासाठी सल्ला विचारायलाही त्याच्याकडे हजेरी लावत.**



## हुपहुपहुऽऽऽ

वानरांचा कळप रानात धुमाकूळ घालत होता. इतक्यात एका पिल्लाचा तोल गेला. खाली अणकुचीदार दगड होते. पिल्लाच्या पायाला वेडीवाकडी जखम झाली. कळपातल्या वानरांनी हवेतले उडते किडे पकडले. ते तोंडात धरून त्या जखमेवर लावले. पुढचे काही दिवस रोज तसेच नवे लाळमिश्रित किडे चोपडून त्यांनी पिल्लाच्या जखमेची निगा राखली. जखमेला किडे लावून घेणाऱ्या पिल्लाचा आपल्या वडिलधाऱ्यांवर पूर्ण विश्वास होता. ते त्यांच्यातलं एक वेगळं, ‘औपचारिक’ नातं होतं. ते विशिष्ट जातीचे किडे आणि लाळ यांच्या मिश्रणानं जंतुनाशक बनत असावं अशी शास्त्रज्ञांची अटकळ आहे. वानर स्वतःच्या जखमांनाही तसे किडे लावतात. कधी कधी झाडपालाही चावून चोथा करून लावतात. त्यानं त्यांच्या जखमा पूर्ण बऱ्या होतात. परंतु तसं औषधपाणी ते कळपातल्या इतरांसाठीही निगुतीनं करतात. त्यातून त्यांचं उपचारांचं ज्ञान, कळपातल्या भाईबंदांविषयीची आत्मीयता आणि सहवेदना हे सारं दिसून येतं.

तसलं वानरवैद्यक आणि ते ‘औपचारिक’ वैद्य-रुग्ण नातं किती लाख वर्षांपूर्वी सुरू झालं ते समजणं कठीण आहे.

प्राणी-घराण्यातले आपले जवळचे नातलग- निअँडरथल - सुमारे चाळीस हजार वर्षांपूर्वी नामशेष झाले. त्यांच्यातल्या वैद्य-रुग्ण नात्याच्या गोष्टी उत्खननात सापडलेल्या त्यांच्या सांगाड्यांनी सांगितल्या आहेत.

उंचावरून पडून एका निअँडरथलाचं खुब्याचं हाड मोडलं. त्या काळच्या मानवपूर्वज वैद्यानं मोडलेल्या हाडाचे दोन भाग जमले तेवढे नीट जवळ आणले. ते शक्यतो फार हालू नयेत म्हणून बाहेरून बांधकामही केलं. नंतर ते हाड सांधेपर्यंत त्यानं त्या रुग्णाची काळजी घेतली. निअँडरथलांच्या कळपाचं पोट हातावर आणि जीव पळत्या पायांवर अवलंबून असे. वैद्यकीय निगेशिवाय त्या कळपातला तो रुग्ण हाड सांधेपर्यंत जगलाच नसता.

दुसऱ्या कळपांबरोबरच्या लढाईत आणि हिंस्र श्वापदांशी झालेल्या मारामाऱ्यांत निअँडरथलांना मोठ्या जखमा झाल्या. त्या चिघळल्या. त्यांच्यातून हाडांना जंतुलागण झाली. मग त्या हाडांत जंतूंची वस्ती फोफावली. पू झाला. त्या पुवाचा निचरा करायला टोळीतल्या उपचारकर्त्यांनी त्या हाडांना भोकं (trephining) पाडली. तसं भोक पाडताना त्या रुग्णाला असह्य

वेदना झाल्या. तरीही, तो योग्य उपचार करायचं ज्ञान आणि कर्तव्यबुद्धी त्या निअँडरथलांना होती. त्या रुग्णांनीही तसे वेदनादायी उपचार विश्वासानं करून घेतले.

वैद्य आणि रुग्ण यांचं परस्पर नातं मानवजातीच्या उगमापूर्वीच्या काळातही कळपमान्य होतं. त्या सगळ्याची साक्ष द्यायला ती हाडं हजारो वर्षं मानवी संशोधकांची वाट बघत थांबून राहिली.

वानरांहून, निअँडरथलांहून मानव अधिक बुद्धिमान. त्याच्यात भोवताली पसरलेल्या अज्ञात जगाचा वेध घ्यायची आणि न समजणाऱ्या घटनांमागच्या रहस्यांची अमूर्त, अतिमानवी कारणं शोधायची कुवत होती. त्यानं आजारपणावर झाडपाल्याची औषधं तर शोधलीच, पण आजार हा दैवी कोपामुळे किंवा भूतपिशाच्चांच्या बाधेमुळे होतो असा कार्यकारणसंबंधही स्वीकारला. टोळीतल्या जाणकाराला, 'शामान'ला झाडपाल्याचं ज्ञान असे. शिवाय तो हवनही करी; आहुती देई; धूप-सुगंध-मंत्रजप करी. तो ताईत-गण्डेदोरे देई. ढोलताशे वाजवून, फटके देऊन भूत काढायची जादूही तो करत असे. त्या 'निरौषधी' पद्धतींचा रुग्णाच्या मनावर सकारात्मक परिणाम (प्लासीबो इफेक्ट) होत असे. त्याला फायदा होई. कित्येक शतकं वैद्यक हे वनौषधींचं ज्ञान आणि जादूटोणा यांचं चलाखीनं एकत्र घोटलेलं मिश्रण होतं. अतिमानवी शक्तींशी जानपछान असलेल्या शामानला रोगी आणि टोळीतले सगळेच लोक वचकून असत, मान देत; शरण जात.

उत्तर आफ्रिका, दक्षिण अमेरिका, फ्रान्स, पोर्तुगाल, युक्रेन वगैरे एकमेकांशी संबंध नसलेल्या, वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीचे सांगाडे सापडले. त्यांच्यातही हाडांना मुद्दाम भोकं पाडलेली दिसतात. ती भोकं मुख्यत्वे कवटीला पाडलेली आहेत. ती अघोरी पद्धत ग्रीक, रोमन काळातही होती. हिपोक्रेटिसनं त्या भोकांचे फायदे सांगितले आहेत. ती भोकं कधी डोकेदुखीवरचा तर कधी वेडावरचा उपाय म्हणून पाडलेली आहेत. डोक्याला मार लागल्यामुळे मेंदूला सूज आली तर कवटीच्या आतमधला दाब वाढतो. डोकं प्रचंड दुखतं. माणूस वेड्यापिशासारखा ओरडू लागतो. दाब अधिक वाढला तर जिवावर बेतू शकतं. प्राचीन वैद्यांनाही त्या सगळ्याचा अंदाज असावा. ती पद्धत दक्षिण अमेरिकेत इंका संस्कृतीत अगदी सोळाव्या शतकापर्यंत चालू होती. कवटीला भोक पाडायची शस्त्रक्रिया सोपी नव्हती. शिवाय त्या काळात भूल द्यायचं शास्त्रच नव्हतं. सहवेदना असलेला वैद्य जाणकारही होता. त्यामुळे रुग्ण कळवळत असतानाही तो ती गरजेची शस्त्रक्रिया तडीला नेई. रुग्णाची किंवा समाजाचीही काही तक्रार नसे.

पुरातन इजिप्तमधल्या समाजाच्या, त्याच्यातल्या प्रथांच्या चित्रलिपीतल्या नोंदी अनेक पपायरस नावाच्या कागदांवर जतन केलेल्या आहेत. त्याकाळच्या वैद्यकातदेखील जंतरमंतरची रेलचेल होती. वैद्य हा देवाचा माणूस असे. त्यामुळे 'देवच त्याच्याकरवी उपचार देई. त्यांच्या दुष्परिणामांची जबाबदारी वैद्याची नसे.' रुग्ण पूर्ण शरणागती पत्करत.

इसवी सनापूर्वी चौथ्या शतकापासून पाश्चात्त्य वैद्यक व्यवसायातले लोक हिपोक्रेटिसची शपथ घ्यायला लागले- 'माझ्याकडे येणाऱ्या रुग्णांना फायदा व्हावा म्हणून मी यथाबुद्धी आणि यथाशक्ती प्रयत्न करीन. त्यांचं नुकसान होईल, त्यांना त्रास होईल असं काहीही मी करणार नाही. रुग्णावर उपचार करताना मी त्याचा गैरफायदा अजिबात घेणार नाही. उपचारादरम्यान त्या घरात मला जे काही दिसेल, ऐकू येईल, त्या घरातलं जे गुपित मला समजेल ते षट्कर्णी होऊ नये म्हणून मी जिवापाड प्रयत्न करीन.' तसं वागणाऱ्या वैद्याविषयी अर्थातच रुग्णांना आदर वाटे.

भारतातल्या पुरातन वैद्यकात रुग्णाचा उल्लेख 'चिकित्सापुरुष' असा केला जाई. 'उपचार आजारावर न होता त्या पुरुषावर व्हावे; आजार, त्यांची लक्षणं वगैरे सगळ्याचा विचार त्या पुरुषाला मध्यवर्ती धरून व्हायला हवा,' हेच त्याच्यातून सूचित केलेलं असे. 'वैद्यानं रुग्णाला बरं करावं; आपुलकीनं, सर्व प्रकारे प्रयत्न करावा आणि रुग्णाच्या मनात त्या प्रयत्नाविषयी, वैद्याच्या ज्ञानाविषयी कौतुक आणि आदर असावा. त्यानं वैद्याला सन्मानानं वागवावं' असं सुश्रुत आणि चरक या दोघांनीही सांगितलं होतं. 'वैद्याने रुग्णाची शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक काळजी घ्यावी. औषधामुळे रुग्णाला कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये. त्याच्या घरातलं कुठलंही गुपित बाहेर फोडू नये.' हे नियम त्यांनीही घालून दिले होते. त्याशिवाय 'वैद्यानं नेहमी धुतलेले, शुभ्र कपडे घालावे, त्याच्या डोक्यावर पगडी आणि हातात काठी असावी, त्याचं आचरण आदरणीय आणि धर्मनिष्ठ असावं', अशाही अटी घातल्या होत्या.

मौर्य-शुंग-गुप्त घराण्यांच्या काळात (इ.स.पू. २०० ते इ.स. ७००) वैद्याचा मान मोठा होता. त्याला आणायला कुटुंबातला वडीलधारा पुरुष जाई. परंतु कुठलाही आजार होणं हा पापाचा परिणाम आहे असा त्यावेळचा समज होता. त्यामुळे सतत आजारांशी झुंजणारा, पापाच्या सहवासात राहणारा वैद्य अमंगळ ठरे. त्याला सन्मानानं आणला तरी घरात घेण्यापूर्वी ऊन पाण्याच्या अंघोळीसाठी पाठवला जाई. अंघोळीनंतर त्याला पोटभर ऊन ऊन भात खाऊ घालून नंतरच रुग्णाकडे नेलं जाई. त्यानं रुग्णाला तपासून औषध, आहार आणि वर्तन या तिन्ही बाबतींत सल्ला दिला की तो काटेकोरपणे, पूर्ण विश्वासानं मानणं आणि पाळणं हे रुग्णाचं कर्तव्य असे. वैद्याला पोचवायलाही घरातली महत्त्वाची व्यक्ती जाई. 'रुग्णावर उपचार केल्यावर वैद्याला योग्य तो मोबदला मिळायलाच हवा,' असं ऋग्वेदात

सांगितलं आहे. तसा मोबदला तत्काळ दिला जाई.

रोगी पूर्ण बरा झाला की त्याला न्हाऊन, फुलांच्या हारांनी सजवून, त्याची गावभर मिरवणूक काढली जाई. त्यामुळे ती सुवार्ता गावभर पसरेच, शिवाय वैद्याचा नावलौकिकही वाढे.

वैद्यानं रुग्णाची आपल्या पोटाच्या पोरासारखी काळजी घ्यावी आणि त्याचा सगळा सल्ला रुग्णानं पूर्ण विश्वासानं आचरणात आणावा असं परस्परांविषयीचं आदराचं नातं पुढची अनेक शतकं, जगभर टिकलं. डॉक्टर हा शब्द डॉकीरे म्हणजे शिकवणं या मूळ लॅटिन शब्दावरून आला आहे. औषध-आहार-वर्तन यांच्याविषयीची शिकवण देणारे 'डॉक्टर' मूळ आजाराबद्दल मात्र रुग्णाला माहिती देत नसत. त्याला ती माहिती देऊच नये असं हिपोक्रेटिसचं म्हणणं होतं. त्यामुळे आज्ञाधारक रुग्णाच्या डोक्यातली स्वतःच्या आजाराबद्दलची कल्पना अगदीच चुकीची किंवा बालबुद्धी असे. आपल्यावरच्या इलाजांची जबाबदारी डॉक्टरवर किंवा वैद्यावर सोपवून तो अज्ञानातला आनंद घेत राही.

---

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा माहिती, ठोकताळे लक्षात ठेवायचा, त्यांच्यावरून योग्य निष्कर्ष काढायचा आवाका फार मोठा असतो. त्यामुळे आजाराचं निदान अधिक बिनचूक आणि लवकर होऊ शकेल. मग तशा सकलवस्तूसुसंवादामुळे डॉक्टर नावाच्या माणसाला भेटायची गरजच सरेल का? नाही. वैद्य मरणार नाही.**

• • • • • • • • • • • • • • • • • • •

अठराव्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती झाली. त्यानंतर नव्यानं निर्माण झालेल्या बहुसंख्य कामगारवर्गात विज्ञान आणि स्वतःची प्रकृती यांच्याविषयी नवी जाण आली. सूक्ष्म जंतू आजार आणतात; आजारपण बाहेरून शरीरात येतं; लस घेतल्यानं काही आजार टाळता येतात, हे त्यांना समजू लागलं. गोवराच्या लसीविषयी जाणूनबुजून अपप्रचार झाला तेव्हाही लोकांना लसीची सक्ती करणाऱ्या सरकारचा राग आला. परंतु डॉक्टरविषयीचा आदर विसाव्या शतकापर्यंत टिकून राहिला.

'येसूला विषमज्वर (टायफॉईड) झाला आहे. तिला हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागेल. विषमज्वरावरचं नवं औषध फार महागडं आहे. जरा पैशांची जमवाजमव करावी लागेल', १९५६ साली फॅमिली डॉक्टरांनी येसूच्या मोठ्या भावाला, रघुनाथ कुलकर्णींना सांगितलं. ''हो, हो! मी सगळी तजवीज करतो'', म्हणून रघुनाथनं हॉस्पिटलची व्यवस्था केली. आईवडलांना त्याचे मोठे उपकार वाटले. रघुनाथच्या औदार्याचा बोलबाला झाला. परंतु ते नवं औषध आणायचं काम मात्र रघुनाथनं परस्पर धाकट्या भावावर, गुरुनाथवर सोपवलं. त्याने आज्ञाधारकपणे आणि मुकाट्यानं, कर्ज काढून, नव्या औषधाचा दहा दिवसांचा इलाज पूर्ण केला. फॅमिली डॉक्टरांना अंदाज होताच. येसू घरी आल्यावर त्यांनी संपूर्ण कुटुंबाला एकत्र बोलावून शहानिशा केली आणि 'दोन्ही भावांनी खर्च विभागून घ्यावा,' असा सल्ला दिला. त्यांचा तो अ-डॉक्टरी सल्ला धुडकावून लावायची कुणाचीही हिंमत झाली नाही.

विसाव्या शतकात फॅमिली डॉक्टर हा देवमाणूस भारतात, युरोपात, अमेरिकेत सर्वत्र अस्तित्वात होता. गावातल्या किंवा शहरातल्या काही घराण्यांतली सगळी माणसं आपल्या बारीकसारीक शारीरिक-मानसिक दुखण्याखुपण्यांसाठी, घरातल्या भांडणांवर उतारा शोधण्यासाठी, अगदी मुलांमुलींच्या लग्नासाठी सल्ला विचारायलाही त्याच्याकडे हजेरी लावत. त्याला घरातल्या सगळ्यांची प्रकृती तर ठाऊक असेच शिवाय प्रत्येकाचा स्वभाव, आपसातली भांडणं, आर्थिक समस्या आणि तेढ, सगळं माहीत असे. येसूला मोठ्या आजारासाठी हॉस्पिटलात ठेवलं तर भावांना किती खर्च परवडेल, कोण खर्च करेल आणि कोण फुकटचं श्रेय लाटेल हेही ते डॉक्टर जाणून असत. वैद्यकीय ज्ञानासोबत मनुष्यस्वभावाचा मोठा अनुभव त्यांच्या गाठीला असे. त्यामुळे मोठ्या दुखण्यांच्या बाबतीतले आणि इतरही अनेक निर्णय त्यांच्यावर सोपवून कुटुंब निर्धास्त राही. एखादा रुग्ण बरा झाला नाही तर दोष दैवाला दिला जाई. डॉक्टरांबद्दलचा आदर अढळ राही. आजारी पडणं तेव्हा सोपं होतं.

त्या आश्वस्त सोपेपणाला दुसऱ्या महायुद्धापासून तडे जायला लागले होते. हिटलरच्या आज्ञेवरून, संशोधनाच्या बहाण्यानं जर्मन डॉक्टरांनी ज्यूंवर, जिप्सींवर अमानुष, विकृत प्रयोग केले. सैतानाच्या दूतांनी केलेल्या त्या अघोरी पापामुळे डॉक्टरांची देवमाणूस ही प्रतिमा डागाळली. १९९८मध्ये डॉ. वेकफील्ड यांनी गोवर-गालगुंडाच्या लसीविरुद्ध जागतिक अपप्रचार मोहीम काढली. 'ती लस घ्या,' म्हणून सांगणारे डॉक्टर खलनायक ठरले. डॉ. वेकफील्ड यांचा खोटेपणा नंतर सिद्ध झाला. तरीही त्या दोन घटनांमुळे लोकांच्या मनात डॉक्टरांविषयी किल्मिष निर्माण झालं. व्यवसायाला बट्टा लावणारे काही डॉक्टर असतातच. तशाच एका भारतीय डॉक्टरवरच्या खटल्यानं प्रकरण अधिक चिघळलं. १९९६साली भारतीय सर्वोच्च न्यायालयानं ग्राहक संरक्षण कायदा डॉक्टरांवरही लागू केला. लोकांचं मन डॉक्टरांविषयी साशंक झालं. ते डॉक्टरी सल्ल्याकडे अविश्वासानं, विरोधी भूमिकेतूनच पाहायला लागले.

साधारण त्याच काळात वैद्यकीय संशोधनाची घोडदौड प्रचंड वेगानं व्हायला लागली. वैद्यकाचं समग्र ज्ञान एका माणसाच्या आवाक्याबाहेर गेलं. एकेका वैद्यकीय शाखेसाठी वेगळ्या तज्ज्ञाची गरज भासायला लागली. आधी फॅमिली

डॉक्टरांनीच कठीण समस्यांसाठी रुग्णांना त्या तज्ज्ञांकडे पाठवायला सुरुवात केली. पुढे लोक थेट त्या बड्या डॉक्टरांकडे जायला लागले. फॅमिली डॉक्टर विस्मरणात गेला.

एकविसाव्या शतकात एक चिमुकली नळीभर रक्त वापरून यकृताचे, मूत्रपिंडाचे, थायरॉईडचे वगैरे अनेक आजार हेरणारे तपासता आले. सीटी स्कॅनमध्ये रिंगण घालत वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून शरीराच्या आरपार बघणारे क्ष-किरण, एमआरआयमध्ये पेशींचा कामसूपणा जोखणाऱ्या चुंबकलहरी, PET स्कॅनमध्ये रक्तप्रवाह मापणारे किरणोत्सारी कण वगैरेंनी रेखलेल्या, शरीरातल्या खोलवरच्या भागांच्या लखख प्रतिमा मिळू लागल्या. रुग्णाचं तोंडही न बघता बिनचूक, झटपट निदान व्हायला लागलं. चाचपडून, ठोकूनठाकून, नळीला कान लावून शरीराच्या आतल्या, खोलवरच्या घडामोडींची कोडी सोडवायची गरज उरली नाही. मग रुग्णाशी बोलायचंच कशाला? त्याला हात लावायची गरजच काय? दुखल्याखुपल्याचा बारीकसारीक तपशील ऐकून घेणारा, मन की बात स्पर्शातून जाणणारा डॉक्टर हवाच कशाला?



शिवाय जागतिक लोकसंख्याही भरमसाट वाढली. त्या प्रमाणात रुग्णसंख्या वाढली. डॉक्टरांचं काम अतोनात वाढलं. तेवढ्या लोकांना त्यांच्या आजाराचं स्वरूप, औषधांचे फायदेतोटे समजावून सांगायला त्यांना पुरेसा वेळ मिळेना. पूर्वीसारख्या मोकळ्या-ढाकळ्या गप्पा मारणं, कौटुंबिक सल्ले देणं तर दूरच राहिलं. डॉक्टरांचं बोलणं तुटक-त्रोटक झालं. डॉक्टर-पेशंट नात्यातला जिव्हाळा लोपून दुरावा वाढला. गैरसमज वाढले.

''माज्या नातीच्या मानंला मागं गाठी आल्याती. जिग्नेसदादानी बघिटल्यानी आन म्हनल्ये, 'टीबीन्हाय त क्यान्सर आसंल. यक्सरा, आप्रेशन समदं कराय लागंल.' प्वार मस्त ख्येलतिया पन आयबापांनी रडून धुमशान घाटल्यानी,'' तुकीमावशी उसासल्या. जिग्नेश नुकताच एमबीबीएस झाला होता. त्याचा घरादाराला आणि तुकीलाही मोठा अभिमान होता.

''मंग आमच्या जुन्या डाक्टरांकडं न्ह्येलं. त्ये म्हनल्ये, 'क्येसांत उवा जाल्याती. त्येच्या गाठी हायत. उवाचां वशेद द्येतू. गाठी लगीच जानार न्हायत. क्यान्सर न्हाय; टीबी न्हाय; कालजीचां काय न्हाय.' आता आयबाप निवांत जाल्ये.''

अननुभवी जिग्नेशदादानं पाठ्यपुस्तकी निदान केलं आणि पुढच्या तपासण्याही चालू केल्या. आईबापांचा थरकाप उडाला. अनुभवी डॉक्टरांनी मुलीचं वय, तिचा खेळकरपणा सगळं लक्षात घेऊन, गाठी तपासून नेमकं निदान केलं. त्यांच्या आत्मविश्वासातून, देहबोलीतून, समजावण्यातून आईबापांना दिलासा मिळाला. टाळण्याजोगं कारण समजलं. त्यांचं शिक्षण झालं. तशा समजावणाऱ्या, दिलासा देणाऱ्या डॉक्टरविषयी लोकांना आदर वाटतो. त्यांच्याकडे पेशंट गर्दी करतात. त्यांच्या लहानसहान चुका लोक सहज पदरात घेतात, त्यांना कोर्टात खेचत नाहीत. डॉक्टरला स्वतःलाही त्याच्या रोजच्या कामातून अधिक आनंद मिळतो. परदेशात हल्ली वैद्यकीय विद्यार्थ्यांना तसं बोलायला शिकवणारे खास वर्ग असतात. तरीही प्रत्यक्षात तसं बोलणारे डॉक्टर कमी दिसतात.

एकविसाव्या शतकातल्या उपचारपद्धतीसुद्धा अभिनव झाल्या. तीन छिद्रांतून पोटात डोकावून, शिरून शस्त्रक्रिया फत्ते करणारे यांत्रिक डोळे आणि हात आले. तऱ्हातऱ्हांची अँटिबायोटिक्स आणि गनिमी काव्यानं शरीरभर पसरणाऱ्या कॅन्सरच्या पेशींना हुडकून मारणारी रामबाण औषधं आली.

रक्तवाहिन्यांतून मेंदूत–हृदयात खोलवर शिरून तिथल्या गुठळ्या काढणारी 'तारायंत्रं' आणि खोलवरचे उपचार बिनचूक साधणारे दूरगामी किरण आले. त्यांच्यातलं विज्ञान न कळल्यामुळे त्या नव्या तंत्रांच्या मर्यादाही लोकांना समजल्या नाहीत. 'आता कुठलाही आजार बरा होऊ शकतो. झाला नाही तर डॉक्टरांचा हलगर्जीपणा हेच त्याचं कारण असणार,' असा पूर्वग्रह समाजमनात पक्का झाला.

''हृदयविकारानं पिडलेल्या नव्वदीपार आजोबांना सुखानं जाऊ द्यावं,' हे लोकांना पटेना. ''डॉक्टर, पैशाकडे बघू नका. आम्ही अमेरिकेहून औषधं आणू, पण आजोबा बरे व्हायलाच हवेत!'' या वेड्या हट्टापायी डॉक्टर जेरीला आले. पटत नसूनही अस्तित्वात असलेले सगळे महागडे उपचार, केवळ नातेवाईकांच्या आग्रहापायी त्यांनी आजोबांसाठी योजले. फुगलेल्या बिलाचं खापर अर्थात डॉक्टरांच्याच माथ्यावर फुटलं.

त्यातच समाजमाध्यमांवर आजारांबद्दलची खोटीनाटी माहिती, त्यांच्यावरचे गुले बकावलीच्या फुलांसारखे इलाज आणि डॉक्टरांविषयीचा अपप्रचार यांचा सुकाळ झाला. त्या बेजबाबदार किंवा खोडसाळ माहितीवर लोकांचा विश्वास बसला. डॉक्टरांचा सल्ला मानण्यापेक्षा त्यांची परीक्षा घेणं, त्यांना शब्दांत पकडणं, त्यांना वठणीवर आणणं हेच त्यांचं उद्दिष्ट झालं. ग्राहक कायद्याचा बडगा उगारलेला होताच. डॉक्टरांनी बचावाचं धोरण स्वीकारलं. रोगाचं निदान 'बावनकशी' करायला कोन्याकोपऱ्यातल्या तपासण्या व्हायला लागल्या. लोकांनी त्या भरमसाट खर्चासाठीही डॉक्टरांनाच दोष दिला. उद्रेक झाल्यावर नुसता दोषच नाही तर ठोकही दिला. कोर्टात फिर्याद केली.

डॉक्टर–पेशंट नात्याला अविश्वासानं, परस्परविरोधानं तडा गेला.

एकविसाव्या शतकात जगाची जीवनशैलीही बदलली. घरबसल्या करता येणारं काम, टीव्ही, कॉम्प्युटर गेम वगैरे सोफ्यावर बसून होणारं मनोरंजन आणि तूप–तेल–साखरेची रेलचेल असलेलं, बहुसंस्कारित, बाजारी, झटपट खाणं यांनी आजारांचेही प्रकार बदलले. संसर्गजन्य रोग मागे पडले आणि मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार शरीरात जन्मभरासाठी वस्तीला आले. त्यांची रोजची सरबराई रुग्णालाच करावी लागते. त्यामुळे डॉक्टर–पेशंट नात्याचं स्वरूप अधिकच बदललं.

''काका, ब्लडप्रेशर फार चढलंय. औषध नियमितपणे घ्याच, शिवाय रोज सकाळसंध्याकाळ बीपी घेऊन नोंदून ठेवा. खाली आलं नाही तर मला ताबडतोब कळवा. शिस्तीत पाळलेल्या डाएटनं आणि नियमित व्यायामानं सहा महिन्यांत कोलेस्टेरॉल घटलं नाही तरच स्टॅटिन्स सुरू करू. रक्तातली साखर सत्तराच्या खाली आली तर गोळी घेऊ नका आणि ताबडतोब एक पोळी खा.'' एकविसाव्या शतकातले डॉक्टर सल्ला देताना रुग्णाचं शिकाऊ सहकार्य गृहीत धरतात.

दोनशेपर्यंत चढलेला रक्तदाब किंवा चारशेला भिडलेली रक्तशर्करा डॉक्टरांच्या तीन महिन्यांनंतरच्या भेटीपर्यंत दुर्लक्षित, बेलगाम राहिली तर अनर्थ होऊ शकतो. म्हणून स्वतःचा रक्तदाब किंवा साखर तपासायला शिकणं आणि त्याच्यावर रोजच्या रोज नजर ठेवणं याला पर्याय नाही. आपल्या आजाराचं स्वरूप, त्याचे संभाव्य दुष्परिणाम, औषधांचे फायदेतोटे हे सगळं आता डॉक्टरांकडून, इतर अधिकृत ठिकाणांहून शिकून घ्यावं लागेल. जीवनशैलीतल्या, आजाराला कारणीभूत ठरणाऱ्या चुका जाणून घेणं आणि मग आपल्या नाठाळ आजाराचा लगाम आपल्याच हातात घेणं नुसतं गरजेचं नाही तर अपरिहार्य आहे. आपल्या आजारावर सजगपणे, सतत नियंत्रण ठेवावंच लागेल. त्यातून वैद्यकशास्त्राच्या मर्यादाही कळतील; गैरसमज ओसरतील.

वैद्यकशास्त्र इतक्या झपाट्यानं प्रगती करत आहे की त्याचा सांगोपांग अभ्यास करणं ही एका माणसाच्या मेंदूला झेपणारी बाब राहिली नाही. पण प्रत्येक पेशंटला स्वतःच्या आजाराची अद्ययावत आणि संपूर्ण माहिती गूगलवरच्या विश्वासार्ह संकेतस्थळांवरून सहज मिळू शकते. सध्याही काही बुद्धिमान, जिज्ञासू आणि अभ्यासू पेशंटांना स्वतःच्या आजाराची जेवढी सखोल माहिती असते तेवढी सर्वसामान्य डॉक्टरांना नसते. तशा पेशंटांना त्या माहितीच्या आधारानं आजाराविषयीच्या स्वतःच्या शंका सोडवणं, नवेनवे निर्णय घेणं वगैरे कामं त्यांना जमताहेत.

त्या सगळ्या धडपडीत डॉक्टरगुरुजींचं नियमित मार्गदर्शन मिळत राहील. पण ज्याचात्याचा रोजचा गृहपाठ ज्यानं त्यानं स्वतःच करायला हवा.

तिथेही 'निर्मनुष्य' आरोग्यसेवेचा एक नवा फाटा फुटतो आहे. रुग्णाला त्याचा आजार समजावून सांगायला, त्याच्या प्रश्नांची उत्तरं द्यायला, त्याला पुढच्या तपासांची, उपायांची माहिती द्यायला आता कृत्रिम बुद्धिमत्ता सरसावते आहे. फिटबिटसारखे बुद्धिमान संगणकी दागिने, कृत्रिम बुद्धिमत्ताविभूषित यांत्रिक कुत्रीमांजरं, डोकेबाज ताट–वाट्या–चमचे, कृत्रिम बुद्धिमत्तामंडित शौचकुंडं वगैरे भविष्यातले नोकरचाकर रुग्णाच्या प्रकृतीवर, हालचालींवर, औषधं घेण्यावर चोवीस तास लक्ष ठेवतील. ते एकमेकांशी, डॉक्टरांच्या संगणकाशी गप्पा मारून प्रकृतीची बारीकशी गडबड देखील पटकन हेरतील; तिच्यावरचे इलाजही आपल्या आपण सुरू करतील. कृत्रिम बुद्धिमत्तेचा माहिती, ठोकताळे लक्षात ठेवायचा, त्यांच्यावरून योग्य निष्कर्ष काढायचा आवाका फार मोठा असतो. त्यामुळे आजाराचं निदान अधिक बिनचूक आणि लवकर होऊ शकेल.

मग तशा सकलवस्तूसुसंवादामुळे डॉक्टर नावाच्या माणसाला भेटायची गरजच सरेल का? नाही. वैद्य मरणार नाही.

ती सगळी यांत्रिक-तांत्रिक वैद्यकीय सेवा महागडी असेल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आहारी गेल्यामुळे त्या सेवेवर नियंत्रण ठेवणं कठीण झालेलं असेल. अनपेक्षित नैसर्गिक कोपामुळे यंत्रजालाचं संगनमत बिघडलं तर ती व्यवस्था पूर्णपणे कोलमडू शकेल. प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं.

संगणक अद्याप तरी सांगकामे आहेत. त्यांच्यावर माणसाचा वचक गरजेचा असतो. पृथ्वीवरच्या संगणकानं अंतराळातल्या संगणकाशी संगनमत करणं ही जुनी गोष्ट झाली. तशा संगनमतानं यंत्रमानवी शस्त्रक्रिया (रोबॉटिक सर्जरी) करायचे प्रयत्न आता चालू आहेत. मात्र त्या संगणकांवर पृथ्वीवरच्या शल्यविशारदाचा ताबा असतो. ते अंतराळातले रोबॉटिक हात पृथ्वीवरचा माणूस हालवतो. यांत्रिक, संगणकी प्रगती कशी व्हावी ते ठरवायची, निर्णायक जबाबदारी माणसाचीच असेल.

कामसू यंत्रांच्या नेटकरी दोस्तीमुळे साध्या साध्या दुखण्याखुपण्यांसाठी प्रत्येक वेळी डॉक्टरांना हजर राहावं लागणार नाही. डॉक्टरांचा वेळ वाचेल, दगदग टळेल. तो वेळ जिथे त्यांची खरीच गरज असते तिथे वापरता येईल. त्यांचा व्यासंग वाढवायला, आपापल्या क्षेत्रातलं अद्ययावत ज्ञान सांगोपांग अवगत करून घ्यायला त्यांना फुरसत मिळेल. आणि तसे ऋषितुल्य, श्रेष्ठ डॉक्टर टेलिमेडिसिनमुळे दूरच्या रुग्णांनाही सल्ला देतील. खेड्यापाड्यातल्या रुग्णांच्या निकडीला, त्यांच्या दिमतीला हवा असला तर जगातला सर्वश्रेष्ठ डॉक्टरसुद्धा तत्परतेनं हजर होऊ शकेल. रक्ताचे अनेकविध तपास, क्ष-किरणी आणि इतरही अद्ययावत प्रतिमातंत्रं वापरली तरी कधी कधी एक दूरस्थ का होईना, मानवी डोकं चालवायची गरज लागेल. तेव्हा हजर होणारा डॉक्टर दरवेळी नवा असला तरी त्या त्यावेळच्या समस्येसाठी तो सर्वोत्तम असेल. तो रुग्णाला, त्याच्या यांत्रिक दोस्तांना पुढच्या कार्यक्रमासाठी मार्गदर्शनही करेल.

त्याच वेळी स्वतःची जबाबदारी जाणणाऱ्या व्यासंगी, जिज्ञासू रुग्णाकडे ते मार्गदर्शन समजून घ्यायची कुवत असेल. आजाराबद्दल, उपचारांबद्दल विचारायचे प्रश्न त्याने आधीपासूनच अभ्यास करून, विचारपूर्वक तयार ठेवलेले असतील आणि ते योग्यच असतील. डॉक्टर आणि पेशंट यांची एकमेकांकडून कसलीही अवाजवी अपेक्षा नसेल. ग्राहक संरक्षण कायद्याच्या कचाट्यातून डॉक्टरांची सुटका होईल अशी शक्यता दिसते आहे. तसं झालं तर डॉक्टर आणि पेशंट यांच्यातलं सध्याचं आरोपी-फिर्यादी नातं ओसरेल. ते एकमेकांना जाणीवपूर्वक, जास्तीत जास्त सहकार्य करतील. काही क्षणांपुरत्या भेटणाऱ्या दूरच्या शहरातल्या डॉक्टरांशी जुना सलोखा, मायेचं नातं प्रस्थापित होणार नाही. परंतु त्या तज्ज्ञाचे जे काही थोडेसे क्षण त्याच्या वाट्याला येतील ते सत्कारणी लागतील.


जुन्या डॉक्टर-पेशंट नात्याच्या दुधात किल्मिषांचा, नियमांचा मिठाचा खडा पडल्यामुळे आता त्याची बासुंदी होणार नाही, पण रसगुल्ले बनतीलच की!

**– डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com


॥ग्रंथाली॥

**मु.पो.वडाचे म्हसवे ते यु.एस.ए.**

**आनंद म्हसवेकर**




आपल्या 'जीवनाचे गणित' किती शांतपणे सोडवले आणि आपल्या कुटुंबाला कशाची झळ न पोचवता, एका समृद्धीच्या वाटेवर आणून सोडले, त्याची ही सफळ संपूर्ण कर्मकहाणी असलेले आत्मचरित्र.

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**



अर्जुन डांगळे

# चळवळ आणि कार्यकर्ता

**'मराठी'च्या प्रश्नावर मी अनेक आंदोलने पाहिली आहेत. परंतु मराठी अस्मितेचा एकजिनसी आविष्कार म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होय. याचे कारण हेही होते, संयुक्त महाराष्ट्र समितीत जे विविध पक्ष होते, त्यांची आयडियॉलॉजी वेगवेगळी होती तरी त्या वेळच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वासाचा आणि बांधिलिकीचा धागा मजबूत होता. त्या काळी नेते आणि कार्यकर्ते हे चळवळीला व्यवसाय मानत नव्हते. चळवळ हे त्यांच्यासाठी व्रत होते.**



**डॉ.** बाबासाहेब आंबेडकरांनी एकदा त्यांच्या चळवळीतील कार्यकर्ते कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना निरोप पाठवला की मुंबई महानगरपालिकेत शे.का. फेडरेशनच्या नगरपित्यांना काँग्रेसच्या स.का. पाटलांना मतदान करायला सांगा. दादासाहेब चक्रावून गेले होते. कारण त्याकाळी काँग्रेस पक्ष हा त्यांच्या लेखी कट्टर शत्रूपक्ष होता. त्यावेळी दादासाहेबांनी त्यांना जे उत्तर दिले होते ते मुद्दाम इथे देत आहे. त्यांनी दिल्लीत असलेल्या बाबासाहेबांना जे पत्र पाठवले त्यात त्यांनी म्हटले, 'बाबासाहेब, एक वेळ आम्हाला तुमची धोतरं धुवायला सांगा. आम्ही ते करू पण काँग्रेसला मतदान करायला सांगू नका. पण करणार काय तुमची आज्ञा मोडवत नाही. तुम्ही सांगता म्हणून आम्ही ते करू.' यातून हे ध्वनित होते, की चळवळीत त्या कार्यकर्त्याची बांधिलकी ही आपल्या चळवळीशी, चळवळीतील तत्त्वज्ञानाशी आणि नेत्याशी किती घट्ट आणि निष्ठावान होती.

अगदी लहान वयात माझा चळवळीशी संबंध आला. माटुंगा लेबर कॅम्प इथे मी वाढलो. त्या काळात तिथे दोनच चळवळी प्रभावी होत्या. एक, बाबासाहेब आंबेडकर यांची शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची आणि दुसरी, कम्युनिस्टांची म्हणजे लालबावट्याची चळवळ होय. साधारणतः या दोन्ही चळवळींत मी लहानपणी वावरलो आहे. विशेषतः लालबावट्याच्या छायेखाली माझे बालपण गेले आहे. कारण आमच्या दोन्ही चाळी ह्या लालबावट्याच्या म्हणून प्रसिद्ध होत्या आणि माझ्या आईचे मामा कॉ. शंकर नारायण पगारे हे त्या काळी लालबावट्याचे प्रमुख कार्यकर्ते होते. आम्ही तिथेच राहत असू. त्या काळात त्यांचे घर चळवळीचे आणि कार्यकर्त्यांचे एक केंद्र होते. मी तिथेच घुटमळत असे. मला या सर्वांचे कुतूहल होते. वाढत्या वयाबरोबर समज वाढत गेली. मी त्या काळातील दोन्ही चळवळींतील म्हणजे आंबेडकरी चळवळीतील आणि कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्यांची चळवळीविषयीची निष्ठा, त्या पायी केलेला त्याग, समर्पण आणि कष्ट यांना कधीही विसरू शकत नाही. विशेषतः चळवळीतील नेत्यांविषयी असलेला अतीव आदर तर विलोभनीय होता. आजही माटुंगा लेबर कॅम्पमधील चळवळीतले दिवस आठवले की अंग शहारून येते.

चळवळ आणि कार्यकर्ता यामधील चैतन्यदायी सळसळते नाते मी माझ्या कुमार वयात अनुभवले आणि पाहिले आहे ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत. किंबहुना त्या वयात माझी

सांस्कृतिक-सामाजिक-मानसिक जडणघडण त्या चळवळीत अधिक घट्ट झाली. ती निश्चितच निखालस अशी राजकीय चळवळ नव्हती. मराठी अस्मितेचा तो प्रखर हुंकार होता. तरी काही अपवाद वगळता त्या चळवळीचा चेहरा एकारलेला नव्हता. याचे कारण त्या चळवळीतील नेत्यांनी जो मूल्यभाव जपला होत त्यात होते. 'मराठी'च्या प्रश्नावर मी अनेक आंदोलने पाहिली आहेत. परंतु मराठी अस्मितेचा एकजिनसी आविष्कार म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होय. याचे कारण हेही होते, संयुक्त महाराष्ट्र समितीत जे विविध पक्ष होते, त्यांची आयडियॉलॉजी वेगवेगळी होती तरी त्या वेळच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वासाचा आणि बांधिलिकीचा धागा मजबूत होता. त्या काळी नेते आणि कार्यकर्ते हे चळवळीला व्यवसाय मानत नव्हते. चळवळ हे त्यांच्यासाठी व्रत होते.

मी जन्मापासूनच मुंबईकर असल्यामुळे कामगार चळवळ बघत बघतच वाढलो. गिरणी कामगारांची चळवळ ही त्या काळात कामगारांची प्रमुख चळवळ होती. मुंबई गिरणी कामगार युनियन ही एक बलाढ्य संघटना होती. कॉ. एस.ए. डांगे यांचे दमदार नेतृत्व ह्या संघटनेला होते. ह्या युनियनच्या कार्यकर्त्यांत आणि पदाधिकाऱ्यांत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भरणा होता. त्यामुळे हे कार्यकर्ते लढाऊ आणि निष्ठावान होते. हे कार्यकर्ते कामगारांच्या प्रश्नांसाठी कुठल्याही पातळीवर संघर्षाला उतरायला मागे-पुढे पाहत नसत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत या गिरणी कामगारांनी जे लढाऊ योगदान दिले आहे ते अतुलनीय आहे. आज गिरणगाव उद्ध्वस्त झाल्यानंतर त्या काळातील कामगारांना राहण्यासाठी घर मिळावे यासाठी अजूनही यातनामय संघर्ष करावा लागतो. गिरण्या चालू कराव्यात आणि कामगारांचे पुनर्वसन व्हावे यासाठी दत्ता इस्वलकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते एकत्र आले होते. काही काळ या चळवळीत कार्यकर्ता म्हणून माझाही सहभाग होता. परंतु तत्कालीन सत्ताधारी आणि भांडवलदार यांनी एकमेकांचे हितसंबंध जपले. थोडक्यात, गिरणी कामगारांच्या चळवळीला एक तात्त्विक किनार होती. हा कामगार आणि कार्यकर्ते हे राजकीय जाणिवेने भारावलेले जागृत कार्यकर्ते होते. एकोणीसशे साठ-सत्तरच्या दशकात या कार्यकर्त्यांची आदरयुक्त राजकीय दहशत एकूणच मुंबईच्या नकाशावर होती. इतकेच नव्हे तर त्याचे पडसाद हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर उमटलेले दिसतात.

मुंबईतील कामगार चळवळीविषयी लिहीत असताना जॉर्ज फर्नांडीस आणि दत्ता सामंत यांचा उल्लेख अपरिहार्य आणि अटळ आहे. जॉर्ज फर्नांडिस हे समाजवादी पक्षाशी संबंधित होते. त्यांनी आक्रमकपणे म्युनिसिपल कामगार, बेस्ट, टॅक्सी, फेरीवाले ह्या क्षेत्रांत संघटनात्मक वर्चस्व मिळवले. तर दत्ता सामंत यांनी मुंबईत वाढलेल्या औद्योगिक क्षेत्रात कामगार संघटना उभ्या केल्या. या चळवळींना मोठ्या प्रमाणावर कामगारांचा पाठिंबा मिळाला याचे कारण पगारवाढ आणि बोनस या दोन बिंदूंवर हे नेते आक्रमक भूमिका मांडत. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की यातील प्रमुख कार्यकर्ते हे प्रामुख्याने त्या त्या पक्षाचे पदाधिकारी होते आणि ते पक्षाशी आणि नेतृत्वाशी बांधिल होते. पण, त्यांच्या पाठीशी उभे राहिलेले कामगार हे पक्षाचे कार्यकर्ते म्हणून वावरत नव्हते. दत्ता सामंत यांच्याशी माझी चांगली मैत्री होती. ते नेहमी सांगायचे कामगार पगारवाढीसाठी आमच्या बरोबर असतात आणि निवडणुकीत मते शिवसेनेला देतात. ढोबळमानाने सीटू, आयटक, हिंद मजदूर सभा, हिंद मजदूर किसान पंचायत ह्या डाव्या विचारसरणीच्या कामगार संघटना आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंटक या संघटना ह्या कामगार क्षेत्रात कार्यरत होत्या. तत्कालीन जनसंघाचे नेते दत्तोपंत ठेंगडी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय म जदूर संघ संघटनेचे कार्यकर्ते कार्यरत होते. तसेच, लाल निशाण पक्ष, शेतकरी कामगार पक्ष यांच्याही छोट्या-मोठ्या संघटना आणि कार्यकर्ते होते.

कामगार, कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, मध्यमवर्गीय म्हणजे शिक्षक, बँका, विमा क्षेत्रांतील कर्मचारी यांच्या प्रश्नांसंबंधी फक्त डाव्या आणि समाजवादी चळवळीतील कार्यकर्तेच सक्रिय होते. या समीकरणाला धक्का देणाऱ्या दोन चळवळींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तो म्हणजे शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली 'शेतकरी संघटना' या नावाने उभी राहिलेली शेतकऱ्यांची चळवळ आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या माध्यमातून भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कासाठी उभी राहिलेली स्थानीय लोकाधिकार समिती या होत. ज्या मार्क्सवादी वर्गीय सूत्रावर आधारित कामगार चळवळी होत्या त्याला छेद देणाऱ्या ह्या दोन प्रभावी संघटना होत्या. यातून चळवळ कार्यकर्त्यांचा एक वेगळा चेहरा असलेला वर्ग उभा राहिला. ग्रामीण भागातील शेतकरी संघटनेच्या यशापयशाचे मूल्यमापन हे वेगवेगळ्या स्तरावर करता येईल. माझ्या दृष्टीने आपल्याला न्याय मिळवायचा असेल तर चळवळी कराव्या लागतील ही जाण आणि भान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये रुजली आणि या जाणिवेने भारावलेली कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. आज शेतीमालाला हमी भाव मिळवण्याच्या लढ्यात हे कार्यकर्ते कार्यरत आहेत.

स्थानीय लोकाधिकार समिती, भारतीय कामगार सेना आणि तिचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे शिवसेनेचा कणा आहेत. अगदी बाळासाहेब ठाकरे हयात असताना शिवसेनेला अनेक धक्के बसले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला तर हादरे बसले, तरी शिवसेना ही उफाळून उभी राहिली. शिवसैनिकांची निष्ठा हे कारण आहे, त्याचबरोबर शिवसेनेची संघटनात्मक बांधणी हे महत्त्वाचे कारण आहे.

आमदार, खासदार, सत्ता, सत्ताधाऱ्यांचे दुहेरी दडपण यातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही आजही उभी आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांची इच्छाशक्ती आणि निष्ठा ही अतुलनीय आहे.

'शिवशक्ती-भिमशक्ती' हा प्रयोग रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली आम्ही केला. मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत आम्हाला बऱ्यापैकी जागा सनेने सोडल्या पण रिपब्लिकन पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. या संदर्भात 'मातोश्री'वर चर्चा करताना बाळासाहेब ठाकरे म्हणाले, 'तुम्ही कार्यकर्त्यांचे शिबिर घ्या. पक्षाची बांधणी कशी करायची या संबंधात मी तिथे मार्गदर्शन करायला येईन.' या संदर्भात मला आठवते बाळासाहेबांनी एका शिबिरात शिवसैनिकांना मार्गदर्शन करण्यासाठी कम्युनिस्ट नेते कॉ. एस.ए. डांगे यांना बोलावले होते.



थोडक्यात कार्यकर्त्यांची जडणघडण करण्यासाठी कार्यकर्त्यांची चर्चा शिबिरे आवश्यक असतात आणि अशी चर्चाशिबिरे एके काळी बहुतेक पक्ष संघटनेत सातत्याने होत असत. डॉ. अनिल अवचट यांनी या संदर्भात एक टिप्पणी केली होती. ते म्हणाले, 'बौद्ध समाजात मूल जन्माला येतानाच निळी टोपी घालून येते.'

सत्ताधारी काँग्रेस वगळता महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्षांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी यांच्यासाठी चळवळी केल्या. त्यातून अनेक कार्यकर्ते तयार झाले. डाव्या चळवळीत अनेक पूर्णवेळ कार्यकर्ते होते. त्यांची अनेकदा आर्थिक ओढाताण होत असे. कुटुंबाकडे दुर्लक्ष होत असे तरी त्यांनी चळवळीविषयी किंवा नेत्याविषयी दुस्वास धरला नाही. चळवळीला आणि संघटनेला वाहून घेतलेले अनेक कार्यकर्ते महाराष्ट्राने पाहिले आहेत. अशा कार्यकर्त्यांना समाजात मानसन्मान दिला जात असे. याच भांडवलावर ते एखाद्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर त्याचे फळ त्यांना मिळत असे. सत्ता मिळावी म्हणून चळवळीशी नाते तोडणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या नगण्य असायची. महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशी दोन व्यक्तिमत्त्वे मला आठवतात. एक म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे सांगोल्याचे गणपतराव देशमुख आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अमरावतीचे सुदाम देशमुख होय. त्या भागातील कार्यकर्ते आणि जनताच त्यांची निवडणूक लढवत असे. मालेगावचे समाजवादी नेते निहाल अहमद यांची या संदर्भात आठवण येते.

चळवळीने भारावलेले मला अनेक कार्यकर्ते आठवतात. झोपडपट्टीवासियांसाठी लढा देणारे समाजवादी चळवळीतील बाबूराव मुंबरकर, रिपब्लिकन चळवळीतील बी. बी. आशय्या, कामगारांच्या मोर्च्यात पोलिसांना भिडणारे कॉ. जी. एल. रेड्डी आठवतात. महिलांच्या आंदोलनात मृणाल गोरे, कॉ. अहिल्या रांगणेकर, कॉ. तारा रेड्डी, मंजू गांधी, कमल देसाई या महिला कार्यकर्त्या-नेत्यांचा आवेश व आक्रमकता मी पाहिली आहे.

आंबेडकरी चळवळीत कार्यकर्ता-नेता या नात्याने मी पन्नासहून अधिक वर्षे सक्रिय होतो. आजही आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या आंबेडकरी निष्ठेशी कुठचीही शंका घेणे अनुचित ठरेल. ह्या निष्ठेत बांधिलकी आणि भावनिकता असली तरी तिला वैचारिक अधिष्ठान आहे. शिवसेनेसारख्या बलाढ्य संघटनेला आव्हान देण्याची क्षमता एकेकाळी आंबेडकर चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये होती. बाबासाहेब आंबेडकरांनी जे लढे दिले ते कार्यकर्त्यांच्या जिद्दीवरच. साधनसामग्रीचा अभाव, वर्णवर्चस्ववादी प्रवृत्तीचा आक्रमक स्वभाव या पार्श्वभूमीवर आंबेडकरी चळवळीतल्या तत्कालीन कार्यकर्त्यांनी जिवाची वा घरादाराची पर्वा न करता चळवळी केल्या. त्या वेळची एकूण परिस्थिती, आर्थिक परिस्थिती पाहिली म्हणजे त्या कार्यकर्त्यांना अभिवादन केल्याशिवाय राहवत नाही. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह असो, नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह असो, शेड्युल कास्ट फेडरेशनची राजकीय चळवळ असो वा एकोणीसशे छप्पन साली नागपूर इथे झालेल्या बौद्ध धम्मदीक्षेचा सोहळा असो, यातून याचे प्रत्यंतर येते. एखाद्या अभावग्रस्त समाजाने इतक्या जिद्दीने आणि निष्ठेने चळवळीत सामील होणे

हे अद्वितीय होय.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाच्या वतीने झालेला भूमिहीनांच्या देशव्यापी विराट सत्याग्रहात साडेतीन लाख लोक कार्यकर्त्यांनी तुरुंगवास भोगला आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या गटबाजीमुळे चळवळीला आलेली अवकळा, दुर्बलता, त्यांचे तडजोडीचे राजकारण यामुळे कार्यकर्त्यांमध्ये, विशेषतः जो तरुण कार्यकर्त्यांचा वर्ग निर्माण झाला होता, हा वर्ग आंबेडकरी चळवळीतील नेत्यांच्या गटबाजीला आणि एकाजातीय भूमिकेविषयी नाराज होता. एकोणीसशे सत्तरच्या दशकात जो तरुण वर्ग दलित पँथरच्या रूपात चळवळीत सक्रिय झाला ते कार्यकर्ते निव्वळ तत्कालीन राजकारणापुरते मर्यादित राहिले नाहीत तर त्या कार्यकर्त्यांनी इथल्या साहित्य-संस्कृती आणि परंपरांची समीक्षादेखील केली. दलित साहित्याची चळवळ हा ह्या भूमिकेचा प्रारंभबिंदू होता. आंबेडकरी चळवळ ही अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक व्हावी ही कार्यकर्त्यांची इच्छा होती. दलित पँथरचे कार्यकर्ते हे आक्रमकपणे, लढाऊपणे ह्या व्यवस्थेविरुद्ध लढले. अनेक कार्यकर्त्यांनी या चळवळीसाठी आपले सर्वस्व दिले. कार्यकर्त्यांच्या ह्या संघर्षशील आणि लढाऊ भूमिकेमुळे केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील दलित-कष्टकऱ्यांच्या चळवळीला नवे बळ मिळाले. नवे मूल्यभान आले. प्रस्थापितांना हादरे देण्याची ताकद या चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये होती.

दलित पँथरचा आवेश ओसरल्यानंतरदेखील आणि संघटनात्मक फाटाफुटीच्या पार्श्वभूमीवरदेखील वेगवेगळ्या संघटना काढून कार्यकर्ते सक्रिय झाले. संघटना वेगवेगळ्या असल्या तरी 'बाबासाहेब आंबेडकर' हे नाव सगळ्यांच्या भावनांचा केंद्रबिंदू होते. रिडल्सचा लढा, मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा, ही त्याची ठळक उदाहरणे होत.

साधारणतः एकोणीसशे सत्तरीच्या दशकात महाराष्ट्रात सर्वच स्तरांवर एक तरुणांची पिढी एक नवा परिवर्तनवादी दृष्टिकोन घेऊन अवतरली. केवळ राजकीय पक्षात किंवा कामगार चळवळीत भाग घेणे म्हणजे कार्यकर्ता होणे हे भान ह्या पिढीला नक्कीच होते. अशाप्रकारच्या अनेक चळवळींतले बरेच कार्यकर्ते उच्चशिक्षित आणि संवेदनशील परिवर्तनवादी भूमिका घेऊन जगणारे होते. केवळ राजकीय अंगाने ह्या चळवळीतले कार्यकर्ते काम करत नव्हते तर त्याला सामाजिक-सांस्कृतिक किनार होती. यामध्ये डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखालील 'एक गाव - एक पाणवठा' ही चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, युवक क्रांती दल, शहाद्यामधील 'मागोवा'ची आदिवासी चळवळ, दलित साहित्य चळवळ, 'ग्रंथाली'ची वाचक चळवळ, नक्षलवादी चळवळ, पर्यावरणवादी चळवळ अशा चळवळींत कार्यकर्ते हे स्वतः झीज सोसून कार्य करत होते. याव्यतिरिक्त विषम समाजव्यवस्थेत बदल झाला पाहिजे ह्या भूमिकेतून पत्रकारितेच्या क्षेत्रात, तसेच नाट्य आणि सिनेमासृष्टीतील कलावंत, लेखक काम करत. त्यांनाही मी एक प्रकारचे कार्यकर्तेच मानतो. थोडक्यात भूमिका घेऊन, वेळप्रसंगी त्याची किंमत मोजावी लागली तरी हरकत नाही ही जाणीव ठेवून आपल्या क्षेत्रात काम करणारे हे चळवळीतील कार्यकर्तेच होत. समाजजागृतीच्या काळात ज्यांच्यावर सेवाभावी संस्कार होते अशा अनेकांनी त्या काळात शिक्षणसंस्था, वसतिगृहे, आश्रमशाळा काढून दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्तांमध्ये रचनात्मक काम केले तेदेखील चळवळीतले कार्यकर्तेच होत. कैक वर्षे हुंडाविरोधी चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आजही मी बघतो आहे. अशा चळवळीतील कार्यकर्ते फारसे प्रकाशझोतात नसतात. एका ध्येयवादी दृष्टिकोनातून ते कार्य करत असतात. अनेकदा त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात हलाखीचे, कष्टमय जीवन वाट्याला येते. कम्युनिस्ट, रिपब्लिकन, समाजवादी चळवळीतील अनेक असे कार्यकर्ते मी पाहिले आहेत. एकच उदाहरण देतो. आज मंडल आयोग, ओबीसी चळवळ याची चर्चा जोरात आहे. परंतु ह्या चळवळीचे बीजारोपण करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये जर्नादन पाटील यांची आठवण किती जणांना आहे? जर्नादन पाटील हे मुंबईत चुनाभट्टी इथे राहायचे. खादीचे कपडे, सडपातळ देहयष्टी, काखेत झोळी अडकवून ते सतत फिरत असायचे. त्यांच्यावर राम मनोहर लोहिया यांचे संस्कार होते. आमच्या तरुणपणात ते सतत आमच्याबरोबर चळवळीत असायचे. किंबहुना अंगाखांद्यावर आजार घेऊनच फिरायचे. आंबेडकरी चळवळीतील कवी, गायक, शाहीर यांची परिस्थिती तर आज भयानक आहे. ते चळवळीतील सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्तेच होते.

मी घेतलेला हा संघटना, चळवळ व कार्यकर्ते यांचा हा ढोबळ आढावा आहे. हा इतिहास किंवा चळवळीचा दस्तऐवज नव्हे. ह्या नोंदी टिपत असताना गेल्या काही वर्षांतील चळवळी व कार्यकर्ता यांच्या नात्यामधील एक साधारण चित्र उभे राहावे हा हेतू आहे. अनेक निरिक्षणे किंवा नोंदी टिपायच्या राहून गेल्याही असतील. पण प्रामुख्याने त्या काळात म्हणजे साधारणतः १९८०पर्यंत किंवा आसपास चळवळ आणि कार्यकर्ता यांचे कसे एक अतूट नाते होते, कार्यकर्ते आपल्या पक्ष-संघटनेने उभारलेल्या चळवळीत कसे जीव ओतून आणि प्रामाणिकपणे काम करत होते हे अधोरेखित करायचे होते. लाभाचा, लोभाचा किंवा स्वार्थाचा त्यांच्यात वावर नव्हता. अर्थात प्रत्येक गोष्टीला अपवाद असतातच.

आज जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, उद्योगधंद्याचे खाजगीकरण, जागतिक पातळीवर झालेली डाव्या विचारांची पीछेहाट अशा अनेक कारणांमुळे आणि संघपरिवाराने

'राममंदिरा'च्या निमित्ताने सत्तेच्या दिशेने केलेली वाटचाल यामुळे ह्या सर्व पातळ्यांवरच्या चळवळींना आणि संघटनांना शिथिलता आली. याचे दुसरे एक महत्त्वाचे कारण म्हणजे या अगोदर चळवळीशी कार्यकर्त्यांचे जे नाते होते ते बांधिलकीचे होते. या अगोदर कामगार कष्टकरी, मध्यमवर्गीय आदिवासींच्या, शेतकरी, भूमिहीन शेतमजुरांचे लढे हे तात्त्विक पातळीवर लढवले जात होते. कारण अशा चळवळी ह्या डाव्या, समाजवादी, परिवर्तनवादी संघटनांच्या-पक्षाच्या प्रभावाखाली होत्या. आज चळवळीच्या सर्व क्षेत्रांत एक व्यावहारिकता दिसून येते. आता शिवसेना, भारतीय जनता पक्ष यांसारख्या संघटना समाजाच्या सर्व स्तरांवर सक्रिय झालेल्या दिसतात. या चळवळींचा आणि काही प्रमाणात कार्यकर्त्यांचा चेहरा बदललेला दिसतो. कार्यकर्ता आणि चळवळीचे जे नाते होते ते बहुतांशी व्यवहारवादी झाले. म्हणजेच आज चळवळ आणि कार्यकर्ते ह्या नात्यामध्ये स्वरूपात्मक बदल तर झालेच पण गुणात्मकदेखील बदल झालेले जाणवतात. आंबेडकरी चळवळीतला कार्यकर्तादेखील आज संभ्रमात आहे. आंबेडकरवादाच्या नावाने उभ्या राहिलेल्या पक्ष-संघटनादेखील प्रभावहीन झालेल्या आहेत. ह्याची कारणमीमांसा अनेक पातळ्यांवर करता येईल. त्यात मी शिरत नाही. थोडक्यात ह्या कार्यकर्त्यांची बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाशी आणि विचारांशी असलेली बांधिलकी आजही तितकीच आहे. परंतु आंबेडकरवादाचे नाव घेऊन उभ्या राहिलेल्या गटा-तटाशी नाते जुळवताना दिसत नाही. संघटना, पक्षाशी नाते जोडण्याऐवजी आज या आंबेडकरी चळवळीतले तरुण कार्यकर्ते बाबासाहेबांच्या विचारांशी आणि तत्त्वज्ञानाशी नाते जोडत आहेत. ही बाब सकारात्मक आहे. हे नाते आजच्या तरुणांमध्ये, विशेषतः भारतीय जनता पक्षाने जी संविधानविरोधी भूमिका घेण्याचा जो प्रयत्न केला त्याविरुद्ध आंबेडकरी चळवळींतील कार्यकर्ते एकवटले होते, तसेच मुस्लीम समाजातील कार्यकर्तेदेखील एकवटले होते. माझ्या प्रयत्नाने लोकसभा निवडणुकीच्या आधी जो कार्यकर्ता मेळावा 'शिवसेना भवन' इथे झाला. ही मोठा ऐतिहासिक क्षण होता. कारण कधीही शिवसेना भवनाची पायरी न चढणारे डावे, समाजवादी, रिपब्लिकन आणि मुस्लीम संघटनांचे कार्यकर्ते एकत्र आले होते. त्याला शिवसेनेचे सुभाष देसाई प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी खासदार अरविंद सावंत म्हणाले हाते, 'आज शिवसेना भवनाच्या भिंती थरारल्या असतील.'

आज चळवळी आणि कार्यकर्ते एकमेकांशी बांधील असले तरी ते परिवर्तनवादी आणि समग्र समाजाच्या न्याय्य हक्कासाठी लढताना दिसत नाहीत. धार्मिक आणि जातीच्या म्हणजे विशिष्ट समाजाच्या चळवळीतदेखील कार्यकर्ते प्रकर्षाने उतरताना दिसतात. हिंदू आक्रोश मोर्चा, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा समाजाच्या आरक्षणाची चळवळ, ओबीसी, धनगर समाजाचे आरक्षणाचे आंदोलन यातही कार्यकर्ता सामील होताना दिसतो. तसेच, सगळ्या चळवळींशी, पक्ष-संघटनांशी समान अंतर ठेवून, पोटार्थी कार्यकर्त्यांच्या वर्गात वाढ झालेली दिसते. ह्या कार्यकर्त्यांचा सर्वत्र वावर असतो. सत्ताधाऱ्यांशी तो संधान बांधतोच पण निवडणुकीच्या काळात अधिक सक्रिय होऊन तो 'गरिबी हटाव'च्या कार्यक्रमात व्यग्र असतो. बेरोजगारी, आर्थिक कोंडी, ग्रामीण भागातील कोलमोडलेली कृषिप्रधान अर्थव्यवस्था आणि ध्येयवादी मूल्यांची होत चाललेली घसरण अशा अनेक पातळ्यांवर याची चर्चा करता येऊ शकते. निवडणुकीच्या काळात विशिष्ट पक्षाचे ह्या वर्गाशी जे संबंध वाढत चालले आहेत ते लोकशाहीव्यवस्थेला मारक तर आहेतच, पण चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांना विचलित करणारे आहेत. निवडणुकीच्या काळात पक्ष-संघटनेचे नाव घेऊन आकर्षक आणि भावनिक आवाहन करून अप्रत्यक्षपणे आपले लक्ष्य टिपणारे सुपारीबाज नेते आणि त्यांच्या आवाहनाला बळी पडणारे कार्यकर्ते हे यांचे संघटित रूप होय.

आज चळवळ आणि कार्यकर्ता यामधील एक महत्त्वाची बाब म्हणजे आज चळवळीची शैली बदलली आहे. पूर्वीसारखे मोर्चे, घेराव, परिषदा, व्याख्याने, कलापथके यातून कार्यकर्ते घडायचे. आज तसे होताना दिसत नाही. प्रबोधनाच्या चळवळीत खंड पडलेला दिसतो. वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग करून स्वयंघोषित कार्यकर्त्यांचा वर्ग एखाद्या गोष्टीचे 'भांडवल' करून 'रोजगार हमी योजना' राबवताना दिसतो.

साधारणतः आज आपल्याला ढोबळमानाने हा निष्कर्ष काढता येईल की चळवळ आणि कार्यकर्ता यांचे संबंध जे माय-लेकरांचे होते ते धूसर होत चालले आहे. भविष्यकाळात हे नाते घट्ट होणे आवश्यक आहे. संविधानिक मूल्यांना हादरे बसत आहेत. हे काळाचे आव्हान ओळखून इथल्या लेखक, कलावंत, विचारवंत आणि बुद्धिजीवींनी भूमिका घेऊन उभे राहणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही ही अराजकाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचेपर्यंत तटस्थतेच्या नावाखाली मूग गिळून बसणे धोकादायक आहे. या सगळ्यांनी 'शहीद' होण्याची आवश्यकता नाही. नैतिकतेच्या पातळीवर अभिव्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य ही लोकशाहीशी संबंधित मूल्ये टिकवण्यासाठी आपल्या कुवतीप्रमाणे योगदान देणे हेदेखील आजच्या काळात चळवळ आणि कार्यकर्त्यांना उजागर करण्याच्या दृष्टीने उचित ठरेल.

**– अर्जुन डांगळे**
भ्रमणध्वनी : ९८२०५ ०३१५४



नीरजा

# आशयघन अभिव्यक्तीसाठी...

**मला वाटतं संपादकानं लेखकाची ऊर्मी, त्याच्या शब्दातलं सच्चेपण समजून घ्यायचं असतं आणि लेखक/कवींनी संपादकाची मर्मदृष्टी आणि चिकित्सक दृष्टी समजून घ्यायची असते. तसं झालं तर अनेक दर्जेदार साहित्यकृती जन्माला येतात.**

***बारावी*** झाल्यानंतरच्या मे महिन्याच्या सुटीत मी कथा लिहिली होती. माझ्या हातून झालेलं ते पहिलं लेखन. ती कथा मी घाबरत घाबरत बाबांना दाखवली. ती वाचल्यावर ते म्हणाले, 'बरी आहे, ह्युमर बरा पकडला आहेस.' पण त्यानंतर चार-पाच महिन्यांतच लिहिलेल्या कवितेकडे पाहून ते फक्त हसले होते आणि म्हणाले होते, 'ठीक आहे पण वेगळं काहीच नाही. कथेत जो सूर पकडला आहेस, काहीतरी वेगळं सांगण्याचा प्रयत्न केला आहेस तसं कवितेत होताना दिसत नाही. गद्य सुरू ठेव.' त्यानंतर लिहिलेल्या दोन कथांना महाविद्यालयानं घेतलेल्या स्पर्धेत अनुक्रमे दुसरं आणि पहिलं बक्षीस मिळालं होतं. बाबांच्या दृष्टीनं मी कथा बरी लिहीत असले तरी कवितेच्या बाबतीत त्यांची निराशाच करत होते. 'तारुण्यातला व्याकूळ सूर, एकारलेपण याविषयी बोलत असलीस तरी सांकेतिक पद्धतीनं येतंय. तुझा असा वेगळा ठसा या कवितेत उमटताना दिसत नाही' असं ते एकदा म्हणाले होते.

त्यानंतर जवळजवळ चारसाडेचार वर्षं बाबांनी आपल्या कवितेला कधीतरी चांगलं म्हणावं या प्रतीक्षेत मी होते आणि बाबांसारखा कवितेचा समीक्षक एखाद्याला किती आजमावून पाहू शकतो याचा अनुभवही घेत होते.

त्या काळात आमच्या घरी मनमाड, धुळे, जळगाव, श्रीरामपूर, लासलगाव इथं राहणाऱ्या खलील मोमीन, सुशील पगारिया, उत्तम कोळगावकर, प्रकाश घोडके, प्रकाश होळकर वगैरे कवींचं येणंजाणं असायचं. बाबा त्यांच्या कविता ऐकायचे. कौतुक करायचे. कमीअधिक झालेल्या शब्दांचं, प्रतिमांचं वजन तोलायचे. काहीतरी सुचवायचे. त्यांना चांगलं चाललं आहे असंही म्हणायचे. माझ्या बाबतीत मात्र असं काहीच होत नव्हतं. 'लिहीत राहा' एवढंच काय ते प्रोत्साहन!

तो काळ 'अनुष्टुभ'च्या संपादनाचा काळ होता. डॉ. रमेश वरखेडे या बाबांच्या विद्यार्थ्यानं म्हणजे आमच्या रमेशकाकांनी 'पाऊलवाट' नावाचा दिवाळी अंक काढला होता. तो लोकांना आवडला. पुढे पु.शि. रेगे यांनी त्याचं 'अनुष्टुभ' हे नामकरण केल्यावर तो द्वैमासिकाच्या स्वरूपात निघायला लागला. 'अनुष्टुभ' सुरू झाल्यावर अनेक कथा-कविता-लेख मनमाडच्या पत्त्यावर येऊन पडायला लागले. त्या साहित्याची निवड करण्यासाठी त्या काळात संपादक मंडळाच्या बैठका होत. लेखनाच्या दर्जाचे स्तर लावले जात. उत्तम दर्जाचं साहित्य

छापण्याचा विडा उचललेल्या या गुरुशिष्याकडे 'अनुष्टुभ'साठी कविता देण्याचं धाडस मी कधीच केलं नाही. पुढे ज्येष्ठ कवी पुरुषोत्तम पाटील ज्यांना आम्ही पुपाजी म्हणायचो, ते 'अनुष्टुभ'चे संपादक झाले. भा.ज. कवीमंडन, वा.रा. सोनार, प्रभाकर पाध्ये, गंगाधर पाटील असे दिग्गज सल्लागार आलेल्या साहित्यावर रात्रंदिवस चर्चा करत आणि त्यातून अत्यंत दर्जेदार असं साहित्य निवडत. ज्यांची निवड झाली आहे त्यांना पत्र लिहिली जात आणि निवड न झालेल्यांनाही पाठवली जात. त्या त्या लेखक/कवीचं लेखन का आवडलं आणि का आवडलं नाही याचं विस्तृत टिपण लिहून हे संपादक पाठवत. अनेक दिग्गज साहित्यिकांना, कवींना त्यांचं साहित्य साभार परत पाठवल्याचं मला आठवतं. अगदी शांता शेळके, इंदिरा संत, शंकर रामाणी यांच्यापासून अनेक नवोदितांनाही त्यांनी पाठवलेलं साहित्य साभार परत पाठवलेलं मला आठवतं. अनेक दिग्गज कवींच्या कविता नाकारण्याचं आणि दुसऱ्या पाठवा असं सांगण्याचं धाडस असलेले संपादक त्या काळात होते आणि साभार परत येऊनही, त्या लेखातील अथवा कवितांतील त्रुटी दूर करून पाठवणारे किंवा नवं काहीतरी पाठवणारे लेखक, कवीही त्याकाळात होते. त्यातील दिग्गज साहित्यिक ही पत्रं मोठ्या मनानं स्वीकारून मग कधी दुरुस्त्या करून तर कधी नवं लिहिलेलं पाठवून द्यायचे. कोणतीही कटुता मनात न ठेवता. कारण त्यांना आधीपासूनच आचार्य अत्रे, प्रभाकर पाध्ये, राम पटवर्धन, श्री. पु. भागवत इत्यादींसारख्या अनेक जाणकार संपादकांच्या संपादनाची सवय होती. काही नवोदितांना (माझ्याबरोबर आणि नंतर लिहिणाऱ्या त्या काळातल्या कवींना) मात्र ही टीका स्वीकारता आली नाही. आजही काही कवी तो राग मनात ठेवून आहेत.

एकूण काय तर माझ्या घरातला म.सु. पाटील नामक हा संपादक आणि समीक्षक सडेतोड, लेखनाच्या दर्जाबाबत अत्यंत काटेकोर असा होता आणि तो शेवटपर्यंत तसाच राहिला. मला आठवतं, माझ्या कवितेला बरं म्हणायला बाबांना चार वर्षं लागली. तोवर मी माझी कविता महाविद्यालयाच्या मासिकांना सोडून कुठंही पाठवली नव्हती. मी एमएला असताना दिवाळीच्या सुटीत मनमाडला गेले होते, त्या रात्री खलील मोमीन आले होते. त्यांची कविता त्यांनी बाबांना आणि मला वाचून दाखवली. ती छानच होती. बाबांनी त्यांना एक-दोन ठिकाणी काही करता आलं तर पाहा असं सांगून बाकी कविता उत्तम आहे असं सांगितलं. त्या रात्री मी फार अस्वस्थ होते. आपल्याकडून का नाही लिहून होत असं काही ज्याला बाबा बरं म्हणतील, कधी या संपादकाची मेहेरनजर आपल्यावर होईल, असं मनात येत होतं. रात्री अंथरुणावर पडले तेव्हा अस्वस्थच होते आणि त्यात बेकेटचं 'वेटिंग फॉर गोदो' शिकून आलेले होते. स्टेजवर बसलेले व्लादिमिर आणि एस्ट्रॅगॉन समोर दिसायला लागले. मग कधीतरी अचानक शब्द वळचणीला येऊन बसले आणि पहिली ओळ सुचली..

एक झाड<br>
त्यावर एकच पक्षी<br>
पालवी फुटायच्या प्रतीक्षेत कित्येक दिवस.<br>
आणि हा रस्ता<br>
क्षितिज खणून पुढं गेलेला.<br>
ह्याच खुणा जागेच्या<br>
वेळेचं नीटसं आठवत नाही<br>
पण आज तो नक्की येईल.

या ओळी मनातून पुसल्या जाऊ नयेत म्हणून अंधारात उठले. सगळे झोपले होते. रात्रीचा एक-दोनचा सुमार असावा. स्वयंपाकघरात जाऊन दार बंद करून दिवा लावला, वहीवर ओळी लिहून काढल्या आणि पुन्हा जाऊन झोपले.

अंथरुणात पडल्यावर आधीच्या ओळी मनात घोळत होत्याच. मग पुढच्या ओळी यायला लागल्या पटापट. गर्भाशयातून मूल बाहेर येण्याची धडपड करताना एकामागून एक येणाऱ्या कळा आणि हातपाय मारत बाहेर येऊ पाहणाऱ्या माझ्या कवितेच्या ओळी या दोघांत काहीच फरक उरला नाही. मी पुन्हा उठून स्वयंपाकखोलीत गेले आणि मग एकटाकी कविता लिहून काढली-

स्वतःलाच मागं फरफटत आणत<br>
ह्याच रस्त्यावरून<br>
पोझ्झो घोड्यावर बसून आला<br>
अन् इथूनच<br>
जमीन तुडवीत<br>
अन् डोळ्यांतील रक्तानं माखलेली<br>
छाती बडवीत<br>
इडिपस गेला.<br>
इथूनच भीष्मानं त्याच्या बापाची<br>
वरात आणली<br>
अन् इथूनच ईव्ह आणि साप<br>
हसत हसत गप्पागोष्टी करत गेली.<br>
इथंच कुणा द्रौपदीची वस्त्रं फेडली<br>
आणि त्याच्याच पताका करून<br>
इथूनच पंढरपूरची दिंडी गेली.

अजूनही तो आला नाही.

तेच झाड<br>
पक्ष्याच्या पंखाची मी आता टोपी केलीय<br>
सावलीसाठी.<br>
रस्त्यावर लोट उठला आहे धुळीचा

जवळचेही न दिसण्याइतपत.
ह्याच का खुणा जागेच्या?
वेळेचंही नीटसं आठवत नाही
पण आज तरी तो नक्की येईल.

कविता लिहून झाल्यावर मी गाढ झोपले. आपण आज काहीतरी वेगळं लिहिलंय याचं समाधान मला होतं. पण, हे वेगळं बाबांच्या पसंतीला उतरेल की नाही, माहीत नव्हतं. सकाळी उठल्यावर मी वहीच्या त्या पानामध्ये पेन घालून बाबांच्या लिहिण्याच्या टेबलावर ती ठेवून दिली आणि घाबरतच बाबांना म्हणाले, 'कॉलेजला जाण्याआधी पाहा..' त्यांच्या खोलीचं दार बंद करून मी बाहेर आले. आतून थरथर वाढली होती. खूप मोठा रिझल्ट होता आणि तो चांगला लागावा असं वाटत होतं.

तेवढ्यात आई बाबांना चहा देण्यासाठी काहीतरी बोलत आत गेली. बाबांचा तिच्यावर ओरडल्याचा आवाज आला. आई बाहेर आली. मी तिथंच उभी होते. 'यांना काय झालं?' म्हणून मला विचारलं. 'चहा घेऊन बाहेर जा आधी असं म्हणाले मला. काय वाचताहेत देव जाणे?' म्हणून आई स्वयंपाकघरात निघून गेली. बहुतेक बाबांना आवडली नसावी कविता या कल्पनेनं मी अस्वस्थ झाले होते.

थोड्या वेळानं बाबांनी मला हाक मारली. 'हे असं कसं काय सुचलं तुला?' त्यांनी विचारलं. मी म्हटलं, 'माहीत नाही. काल रात्री सुचलं.' ते म्हणाले. 'अगदी उत्तम. आज तू वेगळं लिहिलंस. एवढे दिवस लिहीत होतीस त्यापेक्षा आणि इतरांपेक्षाही.' असं म्हणून माझी पाठ थोपटली आणि मग आईला बोलावून म्हणाले, 'बघ तुझ्या लेकीनं काय लिहिलंय.' त्यांनी ती कविता तिला वाचून दाखवली. त्या दिवशी बाबांनी कॉलेजमधील काही प्राध्यापकांनाही ती कविता वाचून दाखवली.

माझ्यासाठी तो क्षण म्हणजे आयुष्यातील सर्वांत संस्मरणीय क्षण झाला. गेल्या चाळीस वर्षांत अनेक पुरस्कार मिळाल्यावर जे वाटलं त्यापेक्षाही अलौकिक असा आनंद देणारा क्षण होता तो. त्यानंतर मात्र मी 'अनुष्टुभ'ला कविता पाठवण्याचं धाडस करायचं ठरवलं. परंतु मला बाबांची मुलगी म्हणून कोणी कविता छापू नये असं वाटत होतं. मग मी माझ्या हॉस्टेलमधली आणि माझ्याबरोबरच एमए करत असलेली माझी मैत्रीण माधुरी देशपांडे हिच्या घरचा पत्ता लिहून पुपाजींना 'शाप' ही कविता पाठवली. त्यात केवळ 'नीरजा' हे नाव लिहून खाली डॉ. देशपांडे, अकोला, संगमनेर, जिल्हा अहमदनगर असा पत्ता घातला होता. पुपाजींना अजिबात संशय आला नाही. त्यांनी नव्या कवीला पत्र पाठवतात तसं कविता आवडल्याचं आणि अशाच लिहीत राहा आणि अनुष्टुभला सहकार्य करत राहा या आशयाचं पत्र पाठवलं. त्यांचं पत्र आलं तेव्हा मी हॉस्टेलला होते. मग बाबा आणि पुपाजी एका सेमिनारसाठी पुण्यात आले तेव्हा दोघांनाही ते पत्र दाखवलं. त्या दिवशी माझ्या चेहऱ्यावर खूप मोठी लढाई जिंकल्याचा आनंद होता.

बाबांच्यातल्या बापापेक्षा त्यांच्यातला संपादक जागृत राहिल्यानं असेल, पण आजपर्यंत मला अशी शाबासकी प्रत्येक कविता किंवा कथेला मिळाली नाही हे आज कबूल करावं लागेल. पहिला संग्रह 'निरन्वय' काढण्याचं ठरवलं तेव्हा कविता निवडताना त्यांनी माझ्या अनेक कविता बाजूला ठेवल्या आहेत. आजवर माझे जे काही सहा काव्यसंग्रह आले त्यातील कविता निवडताना जवळपास साठ-सत्तर कविता त्यांनी बाजूला ठेवल्या होत्या. 'या कविता लिहिल्यास तू. कारण तुला शब्द सापडले होते आणि लिहावंसं वाटत होतं म्हणून. पण यात तू नाही सापडत. तू सापडतेस ती 'व्यथा'सारख्या कवितेत, 'सीझर, हॅम्लेट आणि लीयर' यासारख्या कवितेत, 'अहिल्या', 'मरण' यांसारख्या कवितेत.''

त्यांचं हे असं माझ्या प्रत्येक शब्दाच्या बाबतीत चिकित्सक राहाणं ते जाईपर्यंत म्हणजे २०१९पर्यंत चालू होतं. माझ्या सहाव्या संग्रहातील कवितांची निवडही त्यांनीच केली होती. नंतर लिहिलेल्या कविता 'कवितारती'चे संपादक आशुतोष पाटील यांनी पाहिल्या आणि एक संपादक म्हणून कोणत्या अंतर्मुख करणाऱ्या आणि कोणत्या बाहेर वळलेल्या वाटतात हे आवर्जून सांगितलं. बाबांप्रमाणेच दोन-तीन कविता गाळायलाही सांगितल्या.

अनेकदा मीच माझ्या कथा-कवितेच्या प्रेमात असायचे, पण एक एक शब्द मोजून, तोलून कसा घ्यायचा याचं बाळकडू बाबांकडून मला मिळालं. स्वतःला रिपीट करायचं नाही असं ते सांगायचेच, त्याचबरोबर कवितेतला एखादा शब्द गद्यप्राय वाटला तर त्याजागी दुसरं काही काव्यात्म सुचतंय का पाहा म्हणून सांगायचे. कविता उत्स्फूर्त येत असली तरी नंतर तिच्यावर काम करून ती बंदिस्त करावी लागतेच असं त्यांचं म्हणणं असायचं. तसंच कथेच्या बाबतीत. कथेत केवळ पांढरं आणि काळं नसतं. फार गुंतागुंत असते माणसांत, नातेसंबंधांत, अगदी राजकारण आणि सत्ताकारणातही. ते लक्षात घेतलं नाही तर कवी किंवा लेखक म्हणून तुम्हीच स्वतःला संपवता.

मला वाटतं कोणत्याही कलाकृतीच्या या नेटक्या, रेखीव, आशयघन अभिव्यक्तीसाठी एकूणच साहित्यव्यवहारात संपादकाचं फार मोठं स्थान आहे. कोणत्याही प्रकारचं साहित्य ज्यावेळी वाचकांपर्यंत पोचतं तेव्हा ते संपादकांच्या नजरेखालून गेलेलं असतं, अक्षरजुळणी होण्याआधी संपादकाच्या मनात त्या साहित्याची जुळणी व्हावी लागते. त्या साहित्याचा पोत कसा आहे, ते काळाच्या कसोटीवर टिकणार आहे की नाही याची परीक्षाच एकप्रकारे संपादक करत असतो. अनेक प्रकाशन संस्थांकडे असं संपादक मंडळ असतं. अनेक मासिकांकडेही

आणि दिवाळी अंकांकडेही असं संपादक मंडळ असतं. हे संपादक त्यांना न आवडलेलं पुस्तक किंवा अंकांसाठी आलेलं साहित्य परत करण्याचं धाडस दाखवतात. जी.ए. कुलकर्णींच्या अगदी सुरुवातीच्या कथा आपल्याला फारशा आवडत नव्हत्या पण पुढे त्यांच्याच कथांची अनेक पुस्तकं आपण कशी काढली याचा किस्सा पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ सांगतात. सदानंद रेगेंचा कथासंग्रह काढायच्या वेळी त्यांनी लिहिलेल्या दीडशे कथा वाचून त्यावर मोठमोठी टिपणं काढल्याचंही भटकळसर सांगतात. श्री. पु. भागवत, रामदास भटकळ, वसंत दावतार, गंगाधर पांतावणे यांच्यासारख्या अनेक साक्षेपी संपादकांचं त्यांच्या लेखकांशी असलेलं नात हे खुशमस्कऱ्याचं नव्हतं तर ते चुका दाखणाऱ्या वडिलधाऱ्या माणसासारखं किंवा खऱ्या मित्रासारखं होतं.



राम पटवर्धन आणि श्री. पु. भागवत यांचे किस्से तर अनेक लेखक आजही सांगत असतात. सत्यकथेनं नव्यानं लिहिणाऱ्या लेखककवींना आणि समीक्षकांनाही अगदी छोट्या छोट्या चुका दाखवून नाराज तर केलंच पण कधीकधी आपण लेखक होण्याच्या लायकीचे तरी आहोत का असा प्रश्न स्वतःला विचारायलाही भाग पाडलं होतं. त्यामुळे काही लेखकांनी सत्यकथेला नाकारलं आणि स्वतःची नियतकालिकं काढायला सुरुवात केली. अनियतकालिकांची चळवळ या नकारातूनच उदयाला आली. पण तरीही त्याकाळात सत्यकथेत छापून येणं म्हणजे त्या लेखकाच्या लेखनाचा दर्जा चांगला असण्यावर शिक्कामोर्तब होण्यासारखं होतं. अशी मान्यता खूप कमी नियतकालितांना मिळायची. सत्यकथेनंतर ती 'अनुष्टुभ'ला मिळाली होती. त्याला कारण होतं ते त्यांचे संपादक, त्यांची चिकित्सक दृष्टी आणि लेखकांना आणि वाचकांनाही घडवण्याचा अतुलनीय असा संयम आणि दर्जाचं भान. याच काळात निघणाऱ्या 'आलोचना', 'प्रतिष्ठान', 'युगवाणी', 'अस्मितादर्श' अशा अनेक मासिकांना त्यांच्या संपादकांमुळे एक दृष्टी आणि दर्जा मिळाला होता. हा दर्जा टिकवण्याचा त्यांनी कायम प्रयत्न केला. आलं ते छापलं हा प्रकार इथं नव्हता. पुढच्या काळात निघालेल्या अनेक नियतकालिकांनी नव्यांना संधी द्यावी म्हणून आणि त्यांना नाराज करू नये म्हणून कधीकधी सामान्य दर्जाचं लेखनही छापलं. त्यामुळे त्यांचं आणि लेखक/कवींचंही नुकसान झालं. काय छापायचं, कोणाचं छापायचं, कोणत्या ग्रूपचं छापायचं, कशा प्रकारचं छापायचं, हे ठरवून काही नियतकालिकं, अनियतकालिकं निघाली आणि स्वतःच्या मर्यादांमुळे त्यांच्या वर्तुळात फिरत राहिली तर काही संपूनही गेली. परंतु 'आलोचना', 'प्रतिष्ठान', 'सत्यकथा', 'युगवाणी', 'अनुष्टुभ' यांसारख्या नियतकालिकांची उंची त्यांना गाठता आली नाही. काहींची सुरुवात चांगली झाली. काही हळूहळू उतरणीला लागली. आज निघणारी अनेक नियतकालिकं आणि अनियतकालिकं नवोदितांना संधी देताना संपादक म्हणून आपण नेमके काय संस्कार करतो त्याचा कितपत विचार करतात हा प्रश्नच आहे. आलेल्या लेखांवर व त्यांच्या लेखकांवरही संस्कार करणाऱ्या संपादकांची पिढी आता जवळजवळ अस्ताला आली आहे, अशी परिस्थिती आहे.

अशा काळातही संख्येनं कमी असले तरी काही प्रकाशक आणि संपादक लेखकांना दुखावण्याची जोखीम घेत आहेत. माझे प्रकाशक माझ्याशी चर्चा करतात. कमी-अधिक काय हवं ते सांगतात. मॅजेस्टिकनं माझा पहिला संग्रह काढला तेव्हा अशोक कोठावळे यांनी त्यांच्या संपादक मंडळाकडे त्या पाठवल्या होत्या आणि कथांचं विश्लेषण करणारं त्याचं रीतसर पत्र आलं होतं. माझे सारेच संपादक या चर्चा करतात हे महत्त्वाचं वाटतं.

आज मी बऱ्यापैकी लिहित असले तरी माझ्या कथा-कवितांवर बाबा असेपर्यंत त्यांनी संपादकीय संस्कार केलेत. बाबा असतानाही आणि ते गेल्यानंतर हे काम माझा नवरा राजन यानं केलं आणि करतो आहे. वाचल्यावर बाबा जसं सांगायचे तसंच राजन अजून जमलं नाही असं सांगतो. कधी कधी मी दोघांवरही चिडायचे. नेमकं काय हवंय तुम्हाला, आता मी थकलेय असं म्हणायचे. पण असं म्हटलं तरी मला माहीत होतं काहीतरी कमी असल्याशिवाय ती दोघंही बोलणार नाहीत. मग मी पुन्हा नव्या दृष्टीनं माझ्याच लेखनाकडे पाहायचे आणि पुन्हा लिहायचे. आजही लिहिते. माझा एक लेख किंवा कथा मी जेवढ्या वेळा दुरुस्त करेन तेवढ्या वेळा बाबा वाचायचे आणि राजन तर अजूनही वाचतो. बाबा गेल्यावर लिहिलेली कादंबरी तर त्यानं अनेकदा वाचली असेल. कारण बाबांनंतर ती त्याला त्याची जोखीम वाटत होती. प्रत्येक वेळी नव्या सूचना तो करत राहिला, चर्चा करत राहिला. आजही एखादा लेख प्रवाही होत नसेल तर पुन्हा पुन्हा लिहायला सांगतो. कवितेच्या बाबतीत त्याला नेमकं सांगता येत नाही. अशा वेळी कवितारतीचे संपादक आशुतोष पाटील, मौज दिवाळी अंकाच्या संपादक मोनिका गजेंद्रगडकर किंवा दीपावलीच्या शुभांगी पांगे ही मंडळी नेमक्या सूचना करतात. काही गोष्टी स्पष्ट सागंतात. आजही मी अनेक संपादकांना आवडलं तर स्वीकारा असं सांगते. कारण अनेकदा आपण

आपल्या प्रत्येक शब्दाच्या प्रेमात असलो तरी वाचणारा वाचक त्या शब्दांच्या प्रेमात पडेलच असं नाही.

बाबांसारख्या संपादकाच्या सहवासात राहिल्यामुळे असेल पण एकूण सहित्याबाबतीत माझीही दृष्टी तयार झाली आहे. मीही काही संपादनं केली. त्यात 'अनुष्टुभ'च्या एका 'स्त्रीवादी विशेषांका'चं मी डॉ. प्रतिभा कणेकर यांच्या सोबत संपादन केलं. २००८ पासून ते २०१४ पर्यंत आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राकडून छापल्या जाणाऱ्या 'मायमावशी' या षण्मासिकाचं संपादन करण्याची संधी मला मिळाली. त्या निमित्तानं अनुवादाविषयी एक दृष्टी तयार झाली. चांगले जाणकार लेखक शोधणे, त्यांच्याकडून लिहून घेणे ही कसरत करताना बरंच शिकायलाही मिळालं. दरम्यान डॉ. रमेश वरखेडे यांच्या आग्रहाखातर नाशिकच्या यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या बीएच्या अभ्यासक्रमासाठी 'मुंबईच्या कविता' हे मुंबईविषयीच्या कवितांचे पुस्तक संपादित केले. लोकवाङ्मय गृहाच्या एका प्रकल्पासाठी 'निद्राहीन रात्रीच्या कठोर कातळावर' या रजनी परुळेकर यांच्या निवडक कवितांचे संपादनही केले. अलिकडेच सुप्रसिद्ध कवयित्री अरुणा ढेरे यांच्या 'ऊनउतरणीवरून' या निवडक कवितांच्या संग्रहाचेही संपादन केले. या तीनही संग्रहांना दीर्घ प्रस्तावना लिहितानाचा अनुभव फारच चांगला होता. तीनही संग्रहांतील कवितांचा बाज वेगळा होता आणि तरीही ती सारी कविता कवेत घेत तिच्यात शिरून, तिचं मर्म शब्दात मांडण्याचा प्रवास हा खऱ्या अर्थानं सुखकारक झाला.

या व्यतिरिक्त काही नव्या कवीकवयित्रींच्या कवितांवर मी हात फिरवला आहे. ग्रंथालीकडे आलेले काही कवितासंग्रह मी डोळ्यांखालून घातले आहेत. श्रीकांत देशमुख, मंदाकिनी पाटील, योगिनी सातारकर-पांडे अशा काही कवींच्या कविता नजरेखालून घातल्या आहेत आणि त्यांनीही माझ्या सूचना सहज स्वीकारल्या आहेत.

आपण सांगितलेलं सर्वांनाच आवडतं असं नाही. काही नाराजही होतात. सगळ्यांना खूप लवकर प्रकाशझोतात यायचं असतं. बरेचसे नवे कवी लेखन हाही एक रियाज असतो हे लक्षात घेत नाहीत. लिहिलेल्या प्रत्येक शब्दावर लेखकांचं प्रेम असतं. माझंही होतं असं. परंतु मला जमिनीवर आणणारे माझ्या घरातच आहेत. मागताहेत लोक म्हणून काहीही द्यायचं नाही असं सांगणारे बाबा आणि राजन, दोघंही आहेत आणि मी ऐकते त्यांचं. त्यांच्याबरोबर माझा मित्र संजय भास्कर जोशीही आहे. माझी कादंबरी मी त्याला आणि माझा मित्र रोहित कावळे य़ाला वाचायला दिली होती आणि त्यांनी चांगल्या सूचना केल्या होत्या.

अलीकडे अशा प्रकारचं संपादन करण्यात मी ज्या कवींना मदत केली त्यात आदित्य दवणे हा आजच्या पिढीचा कवी आहे. त्यानं त्याच्या कविता पाठवल्याच, शिवाय मोकळेपणानं त्यावर बोला असंही म्हणाला. मला संपादकीय संस्कार हवेत हा त्याचा हट्ट होता. त्याच्या 'युद्धानंतर' या संग्रहातला त्याचा सूर सच्चा आहे, हे तो संग्रह वाचल्यावर मला जाणवलं. त्या पोझ घेऊन लिहिल्या नाहीत हेही जाणवत होतं. फक्त थोडं गद्यात्मक वाटत होतं तिथं त्याला काम करायला सांगितलं. त्यानं बरंच काम केलं. अनेक कविता बंदिस्त करण्यासाठी कितीतरी ओळींवर मी काट मारली. कविता ही अत्यंत नेमक्या शब्दात बरेच काही सांगणारी असते, त्यामुळे शब्दांची निवड फार महत्त्वाची असते, ती विधानात्मक होता कामा नये, अशा काही बाबींविषयी मी त्याला सांगितलं होतं आणि ते त्याला पटत होतं. मी केलेली काटछाट त्यानं स्वीकारली आणि अनेक वाक्यं आणि नेमक्या शब्दांवर खूप काम केलं. आधीच्या ओळी आणि काम केल्यानंतरच्या ओळी, किंवा कविता तो व्हॉट्सअॅपवर पाठवत राहिला. एकदा तो घरी आला आणि त्यानंतरची आमची चर्चा मेसेजेमधून व्हायला लागली. अत्यंत छान अनुभव होता तो. बऱ्याच कवितांवर संस्कार झाल्यावर राजहंस प्रकाशनानं काढलेला तो संग्रह आज वाचकांच्या पसंतीला उतरला आहे. ही माझ्यासाठीही आणि त्याच्यासाठीही समाधानाची बाब आहे. मुख्य म्हणजे माझ्या या संपादनाचा उल्लेख तो जाहीरपणे न संकोचता करतो.

मला वाटतं संपादकानं लेखकाची ऊर्मी, त्याच्या शब्दातलं सच्चेपण समजून घ्यायचं असतं आणि लेखक/कवींनी संपादकाची मर्मदृष्टी आणि चिकित्सक दृष्टी समजून घ्यायची असते. तसं झालं तर अनेक दर्जेदार साहित्यकृती जन्माला येतात. पूर्वीच्या काळात त्या येत होत्या, आजही येतात. परंतु लेखक स्वतःच्या पैशांनी पुस्तकं काढायला लागल्यापासून हा दर्जा घसरत गेला. पूर्वीच्या काळात प्रकाशकानं स्वतःहून लेखक शोधण्याची, त्याचं पुस्तक आवडलं तर काढण्याची पद्धत होती. आज अनेक लेखक पदरचे पैसे खर्च करून हौसेनं पुस्तकं काढतात. त्यातली सगळीच वाईट नसली तरी संपादकाचा परीसस्पर्श न झाल्यानं बरीचशी पुस्तकं ही लेखक स्वतःच मोठी करत राहातो. समाजमाध्यमातून सतत आपल्या पुस्तकाविषयी लिहून आणल्यानं लेखक खरंच मोठा होतो का, की त्याच्या शब्दांत वजन असेल तर तो आपोआपच लोकांपर्यंत पोचतो, याचा विचार लेखक-कवींनीही करायला हवा आणि आजच्या संपादकांनीही थोडं धाडस करून संपादनाची कातर चालवायला हवी. तसं झालं तर पूर्वीसारखीच लेखक-संपादकांच्या नात्याला झळाळी येईल आणि एका आगळ्यावेगळ्या मित्रत्वाच्या नात्याला बहर येईल.

**– नीरजा**

nrajan20@gmail.com



राणी दुर्वे

# स्त्री-पुरुष मैत्री : नातेसंबंधाचे बदलते रूप

**जे अशारीर मैत्रीचे खास नाते स्त्री-पुरुषात असायला हवे ते या पिढीतल्या मंडळींना सापडले आहे तर! भलेही ते नाते दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे प्लेटोच्याही 'प्रीतीच्या कल्पनेपलीकडील' नात्याइतके भव्य नसेल, पण सामान्य मैत्रीचे जरूर असेल.**



**मैत्री** हे नाते विशुद्ध प्रेमाचे आणि समाजाने सहज स्वीकारावे असे. किंबहुना घरातल्या अमक्या-तमक्याचा मित्र किंवा मैत्रीण हा सगळ्यांच्याच औत्सुक्याचा, जिव्हाळ्याचा विषय असतो. ती व्यक्ती तितक्याच प्रेमाने घरात सामावून घेतली जाते. मैत्री हे एकच नाते असे आहे की जे शरीराने नाही तर मनाने जडते. जन्माने निर्माण झालेली नाती स्वीकारावीच लागतात. काके-मामे-आते-चुलत-सख्खे ही सगळी नाती, मान्य असोत वा नसोत, आपल्याबरोबर कायम असतात. फार तर संबंध दुरावतात. पहिल्या वर्तुळातील नात्यांखेरीज इतर नातेसंबंधांचे पाश हळूहळू विरळ होऊ लागतात. तरीही नाते हे राहतेच. लग्नाने निर्माण झालेले नाते आणि त्या अनुषंगिक नाती ही स्वीकारलेली नाती आहेत. त्यातही बंधनाचा भाग अधिक. लग्नबंधनातली नाती तोडता येतात पण जन्माने निर्माण झालेली नाती, माना न माना, तिथेच राहिलेली असतात. या सर्व गोतावळ्यांच्या नात्यांपलीकडे असते ती मैत्रीची शुद्ध भावना. मित्र किंवा मैत्रीण हे रूढ अर्थाने 'नाते' असण्यापेक्षा तिथे प्रेमभाव असतो, जो दोन्ही घटकपक्षांमध्ये असणे आवश्यक असते. आदर आणि जुळलेल्या मनाचा भाव दोघांमध्येही असतो. हा बंध कुणाशी, कधी, कुठल्या वयात जुळेल सांगता येत नाही आणि दूर गेले तरी मैत्रभावात सहसा जन्मभर फरकही पडत नाही. अपवाद सर्वमान्य.

दोन मैत्रिणी किंवा दोन मित्र यापलीकडे मैत्रीचा एक धागा हा स्त्री-पुरुष अशा दोन भिन्नलिंगी मैत्रीचा. मात्र हा एक असा प्रांत आहे की जिथे त्या मैत्रीच्या निखळतेविषयी एखादा किंतू लोकांच्या मनात राहिला तर नवल नाही. जितक्या सहजपणे पत्नीची मैत्रीण किंवा पतीचा मित्र हे नाते दुसऱ्या जोडीदाराकडून स्वीकारले जाते तितक्या सहज, दिलखुलासपणे माझ्या पत्नीचा मित्र किंवा माझ्या पतीची मैत्रीण हे नाते मान्य होते का? केले जाते का? मुलांच्या बाबत मुलाची मैत्रीण किंवा (अनेक) मैत्रिणी कुटुंबाला मान्य असतात, पण मुलीचा मित्र किंवा मुलीचे मित्र (अनेक) यांत तसूभर अंतर अजूनही मनात राहते का? स्त्री आणि पुरुष यांच्यात एक नैसर्गिक अशी आकर्षणाची भावना असतेच परंतु स्त्री-पुरुष या भिन्नलिंगी व्यक्तींमध्ये निरलस मैत्री असते हे समाजाला पूर्णपणे मान्य असते का? की त्यात एक संशयाचा, किमान अविश्वासाचा धागा गुंतून असतो? हे नाते पूर्वप्राचीनकाळापासून कुठे दिसले आहे किंवा कसे व अलीकडील काळात या नात्यात काही बदल घडला आहे किंवा कसे, व बदल असेल तर कशाप्रकारे घडला आहे याचा विचार

करण्याचा हा एक प्रयत्न आहे. खरे तर विचार करण्याइतपतही महत्त्व या मैत्री प्रकाराला समाज देत नाही. समाज सतत परिवर्तनीय असतो आणि वरच्या पातळीवर दृश्य होणारे बदल खरे तर खूप खालच्या स्तरांत घडत असतात.

पुढे जाण्याआधी एक अगदी छोटा घडलेला प्रसंग सहज आठवला म्हणून सांगते. आम्ही पाच-सहा जणी मध्य प्रदेशात फिरत होतो. याही गोष्टीला आता पाच-सहा वर्षे होऊन गेली आहेत. गाडी आपल्या वेगात जात असताना अचानक एक तरुण बरोबरीच्या तेवढ्याच तरुण मुलीला मारत असलेला दिसला. हा नवरा-बायकोमधील वाद आहे हे तर दिसत होते. मध्य प्रदेशात तसे गाव सोडले की मैलोन् मैल मोकळाच रस्ता असतो. त्यामुळे त्या दोघांखेरीज रस्त्यावर कोणीच नव्हते. त्यांच्या खाजगी बाबीत पडावे की न पडावे, पण मग त्या तरुण मुलीला मार खावा लागतो तर तिला असेच सोडून कसे पुढे जावे अशा द्विधा मन:स्थितीत भरधाव जाणारी गाडी बरीच पुढे गेली; पण गाडीत बसलेला स्त्रीवाद वरचढ होऊन आम्ही ड्रायव्हरला गाडी मागे घ्यायला लावली. अजूनही वाद, मारणे चालूच होते. फक्त तिथे तेवढ्यात एक बस येऊन थांबून बसमधले लोकही त्या वादात पडले होते. आम्ही शहरी दिसणाऱ्या बायकांनी त्यात मध्ये पडून नवऱ्याला जाब विचारला तर तो म्हणाला, की ही माहेरी जाते म्हणून सांगून गेली होती. कुठे आहे म्हणून मी फोन केला तर माहेरीच आहे म्हणून मला सांगते आणि प्रत्यक्षात ती इथेच माझ्यासमोर तिच्या मित्राबरोबर बोलत बसली होती. आता पारडे उलटले. चूक मुलीची आहे वाटू लागले. ती खोटे बोलत होती, हे जाहीर होते. मात्र यातही ती मुलगी सांगत होती की तिचा शाळेपासूनचा मित्र तिला भेटला, ती त्याच्यासोबत बोलत बसली. पण मग नवऱ्याला मित्राबरोबर बोलत आहे हे बहुधा सांगणे शक्य नव्हते म्हणून खोटे सांगण्याचा पर्याय तिने निवडला असावा. 'वो दोस्त है मेरा बचपन का, स्कूलसे हम साथ है। उसके साथही तो मैं बात कर रही थी।' किमान आम्हाला तरी कळेल म्हणून ती सांगत होती. बसमधल्या लोकांच्या नजरेत तर नवऱ्याचे बरोबर व बायको चूकची होती. त्यांना पोटात घेऊन बस निघून गेली. काय चूक; काय बरोबर या नैतिक तिठ्याशी येत आम्ही आमच्या दिशेने निघालो. मुळात आम्ही त्यात पडणेच चूक की बरोबर हाच एक प्रश्न होता.

कदाचित हे अगदी सामान्य स्तरातील स्त्री-पुरुष उदाहरण! त्यामुळे इथे मैत्रीइतके उन्नत, प्रगल्भ नाते असण्यापेक्षा नवरा-बायको-प्रियकर हा तिढा असूही शकेल, पण कधीतरी मला ती तरुण स्त्री आणि तिच्या डोळ्यांतले भाव आठवतात तेव्हा वाटते की खरंच तो तिचा जवळचा मित्र असू शकेल आणि ती मित्रापाशी मन मोकळे करायला काही काळ थांबलीही असेल. मात्र तिथे थांबलेल्या बसभर समाजाच्या नजरेत ती दोषी होती आणि तिला निर्दोषत्व सिद्ध करून देण्याइतके आमच्याजवळ काहीच पुरावे नव्हते. कित्येक सहस्र-शतके पसरलेला हा काळ आणि स्त्री-पुरुष हे तर त्यातले आदिम नाते. आकर्षण हा त्यांच्यातला केंद्रबिंदू, कारण त्यावरच सगळ्या मानवजातीच्या निर्माणाचा भार. जितकी माणसे या कालौघात होऊन गेली असतील तितके भाव-भावनांचे कल्लोळ आणि तितकेच नात्यांचे गुंताळे असतील. शोभादर्शक यंत्र अगदी कणभर अंशातून जरी फिरवले तरी त्यातला आकृतिबंध वेगळा होतो. नात्यांचेही असेच आहे, ठोकळेबाजपणे जरी आपण नात्यांचे वर्गीकरण करत असू तरी प्रत्येकाचा असलेला आकृतिबंध निराळा, कारण व्यक्ती निराळ्या. नात्यांचे रंग सूक्ष्म पातळीवर बदलून प्रत्येक नात्याला एक वेगळीच लय प्राप्त होते त्यामुळे कुठल्याही नात्याचा वेध घेणे हे आकाशातल्या एखाद्या ताऱ्याचा वेध घेण्यातकेच कठीण. नात्यांच्या परिघात उभ्या असलेल्या दोन व्यक्तींनाही आपल्यातल्या नात्याचा नेमका सूर सापडणे कठीण असते. आई-मुलगी, बाप-मुलगा, सासू-सून, नवरा-बायको, भाऊ-बहीण, नणंद-भावजय या ठळक नात्यांमध्येही 'व्यक्ती तितक्या प्रकृती' इतके पदर असतात, तर स्त्री-पुरुष मैत्रिबंध हे तर तसे खास गरज नसलेले आणि रुढ मान्यताही नसलेले नाते. त्यामुळेच सहसा कुणी त्या नात्याचा फारशा गांभीर्याने विचारही करत नाही. मात्र एका प्रगल्भ पातळीवर जे नाते अतिसुंदर होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे हे एक नाते आहे!

बदलत्या नात्यांचा संदर्भ शोधताना साधारणपणे आपण दाखले शोधू लागतो ते थेट पुराणकथा, रामायण, महाभारत ते आजतागायत. मुळात तिथे कुठे ते अस्तित्वात आहे का आणि असल्यास कशाप्रकारे दाखवले गेले आहे? पुराणकथांचे जेवढे संदर्भ ऐकून-वाचून माहीत आहेत त्यांत किंवा अगदी रामायणातही असे स्त्री-पुरुष मैत्रीचे संबंध सापडत नाहीत किंवा असले तर, माहीत नाहीत. राम-सीता-लक्ष्मण वनवासात एकत्र असले आणि सीता आणि लक्ष्मणात प्रेम असले तरी त्यात मैत्रभाव असण्यापेक्षा लक्ष्मण हा आपल्या मोठ्या भावा-वहिनीप्रती निष्ठा, आदरभाव बाळगून आहे आणि ते नाते दीर-भावजयीचे नाते आहे. मैत्रीचे अनेक संदर्भ पुराणकालीन कथांनी दिले आहेत, प्रणयाचे तर महामुर आहेत, मात्र स्त्री-पुरुष विशुद्ध मैत्रीचा असा खास उल्लेख 'व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्' म्हणतात तसा महाभारतकालीन कृष्ण-द्रौपदी नात्यातच सापडतो. द्रौपदीला कृष्णाची बहीण म्हणून संबोधले जात असले तरी 'व्यासपर्व'मध्ये दुर्गाबाई (दुर्गा भागवत) यावर अधिक प्रकाश टाकत लिहितात, 'व्यासाने मात्र कृष्ण आणि द्रौपदी यांच्या नात्याला कोणताही विशिष्ट घाट दिला नसला, तरी त्यात एक अनामिक नाजूक रंग त्याने भरला आहे. ज्याप्रमाणे द्रौपदीच्या नीलमण्यासारख्या कांतीचे चित्र प्रत्यक्ष डोळ्यांपुढे



उभे करता येत नाही, ते सारखे भासत राहते आणि इतरांपेक्षा ही कांती काही निराळी आहे असे सतत जाणवते, तसाच प्रकार या दोघांच्या आकर्षणाबद्दलचा आहे. भक्ती, प्रणय आणि सख्य या तिन्ही भावनांचे मिलन या आकर्षणात आढळून येते. द्रौपदी विवाहित आणि त्यातही आर्यधर्मानुसारी पतिव्रता असल्याने या नात्याला एक वेगळीच पातळी येते. अत्यंत तलम पोताचे हे नाते आहे. तरीपण अती दृढ आणि तितकेच विलक्षण कोमल. या नात्यावर व्यासाने सुखाची नाजूक शिंपण केली आहे. कृष्णाच्या सान्निध्यात द्रौपदी आपोआप उमलते. आतल्या गाठीची ही स्त्री मनमोकळेपणाने वागते. त्याच्याकडे झुकते. त्याच्यावर विसंबते. पांडवांप्रमाणेच. परंतु त्यांची बायको म्हणून नव्हे, तर कृष्णाची मैत्रीण म्हणून. द्रौपोदीचे समग्र व्यक्तिमत्त्व आणि पूर्णपुरुष व्यासाने मुग्धता बाळगली नसती तर त्यांची मैत्री ही अधिक कलापूर्ण, कोणत्याही नात्याने न जखडलेली, शरीराच्या किंवा समाजाच्या नात्याने न जखडलेली अशी मैत्री होण्याचा संभव होता. प्लेटोने वर्णन केलेल्या प्रीतीहूनही जरा भिन्न; अधिक भव्य. मात्र प्रारंभीच्या इतिहासाबद्दल व्यासाने मौन पाळल्यामुळे पुढच्या काही त्रोटक उल्लेखांवरूनच या विलक्षण मैत्रीचा साक्षात्कार होऊ शकतो.'

महाभारतातील काही त्रोटक उल्लेखांवरून त्यांनी बांधलेला हा कृष्ण-द्रौपदी यांच्या मैत्रीचा बंध. त्यापलीकडे इतरत्र कुठेही स्त्री-पुरुष शुद्ध मैत्रीचा संदर्भ किमान भारतीय तत्त्वविचारात नसावा.

प्रेमाच्या छटा दाखवणारे विविध शब्द आपल्याकडे असले तरी मूलत: प्रेम हा एकच शब्द सर्व नात्यांसाठी इंग्रजी भाषेप्रमाणे आपल्याकडेही वापरला जातो. पाश्चात्त्य विचारवंत प्लेटो-अरिस्टॉटलच्या प्रेमाच्या व्याख्या व वर्णनांमध्ये प्रेमासाठी तीन प्रकारचे शब्द येतात. इरॉस (eros), आगेपी (agape) आणि फिलिया (philia). पैकी अगदी सोप्या व्याख्या करायच्या तर इरॉस हे स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाचे रूप आहे, आगेपी त्याहून वेगळे म्हणजे मुलांविषयी पालकांना वाटणारे किंवा नात्यातील संबंधामुळे एकमेकांविषयी वाटणारे प्रेम आहे. ह्या दोन्ही प्रकारांत ते प्रेम दुसऱ्यालाही वाटलेच पाहिजे अशी सक्ती नसते, तर फिलिया ह्या प्रकारात दोघांनाही एकमेकांबद्दल प्रेम असेल तरच घडू शकते, जसे की मैत्री. अर्थात हे अगदी साधेसोपे विवेचन आहे. ॲरिस्टॉटलने म्हटल्याप्रमाणे; मित्र होण्यासाठी (फिलिया) दोन्ही पक्षांना एकमेकांबद्दल सद्भावना वाटली पाहिजे, म्हणजेच एकमेकांच्या हिताची इच्छा त्यांनी बाळगली पाहिजे आणि एकमेकांच्या सद्भावनांबद्दल जागरूक असले पाहिजे.

प्लेटोच्या सिंपोझियममध्ये ॲरिस्टोफेनिसने सांगितलेली एक कथा आहे. त्यानुसार एके काळी सर्व मनुष्यप्राणी दुहेरी

प्राणी होते. प्रत्येकाला दोन डोकी, दोन शरीरे आणि आठ अंगे (चार पाय व चार हात). ही दोन डोकी एकमेकांना पुढे-मागे अशी जोडलेली होती. ती दोन डोकी दोन पुरुषांची, दोन स्त्रियांची किंवा एक स्त्री व एक पुरुष अशी असू शकत होती. ते देवांना वरचढ होऊ लागले त्यामुळे पुढे मग झ्यूसच्या आज्ञेनुसार (प्राचीन ग्रीक पौराणिक कथांमध्ये, झ्यूस हा ऑलिंपस पर्वतावर राहणारा देवांचा राजा आहे. तो सर्व देवता आणि मानवांचा शासक, संरक्षक आणि पिता आहे.), प्रत्येक दुहेरी प्राणी अर्धा कापला गेला, ज्यामुळे त्या मनुष्यप्राण्यांची शक्ती कमी झाली. आणि म्हणून आपण ओळखतो त्या रूपात मानव अस्तित्वात आला. आता हा प्रत्येक अपूर्ण मानव आपल्याच दुसऱ्या रुपाच्या शोधात असतो व तो त्याला विविध नात्यांत सापडतो. जसे की नवरा-बायको, प्रियकर-प्रेयसी किंवा मित्र-मैत्रीण वगैरे रूपांत. ही गोष्ट कदाचित माणसे एकमेकांना मूलतः सापडण्याचे, जोडली जाण्याचे कारण शोधण्याशी निगडित असेल. परंतु यातच इतर नात्यांप्रमाणेच स्त्री-पुरुष मैत्रीच्या प्रेमाचा (फिलिया) धागाही सापडतो. प्लेटो ज्याला प्लॅटोनिक प्रेम म्हणतो ते स्त्री-पुरुषांमधील प्रेम हे मुख्यत: ज्ञान व खऱ्या सौंदर्याच्या जवळिकेशी निगडित असून शारीरिक आकर्षणापासून पलीकडे जात आत्म्याच्या आकर्षणापर्यंत जाते. मात्र दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे प्लेटोने वर्णन केलेल्या प्रीतीहून वेगळा, अधिक भव्य असा एक प्रांत स्त्री-पुरुष मैत्रीमध्ये संभवतो, फक्त सापडतो का असा प्रश्न आहे.

आता सर्व रामायण-महाभारत-प्लेटो-ॲरिस्टोटल असा प्रदेश हिंडून आपल्या समाजस्थितीतले स्त्री-पुरुष मैत्रीचे नाते व त्यात कालानुरूप बदल हा विचार करायचा झाला तर मुळात एखादी स्त्री व एखादा पुरुष असे 'खास विशुद्ध मैत्रीचे नाते' अस्तित्वात आहे का असा प्रश्न आज साठी-सत्तरीला पोचलेल्या किंवा त्याआधीच्या पिढीला केला तर बऱ्याच अंशी नकारात्मक उत्तर सापडत जाऊ शकते, कारण कितीही निकोप वाटले तरी त्यात आकर्षणाचा भाग असतोच याविषयी बऱ्याच जणांच्या मनात शंका नसते. अर्थात मला कल्पना आहे की स्त्री-पुरुष शुद्ध मैत्री हा विचार अत्यंत मर्यादित अशा वरच्या स्तरातील समाजापुरताच किंवा प्रगल्भ व्यक्तींपुरताच होऊ शकतो कारण समाजाचे बाकीचे स्तर अजून त्या उन्नत नात्यांपर्यंत येऊन पोचायचे आहेत. पाश्चात्त्य देशांत अशी बुद्धिप्रधान स्त्री-पुरुष मैत्रीची उदाहरणे खूप सापडतीलही. आपल्या समाजातही साहित्य, सिनेमा, नाटक, कलाकार अशा कलासक्त, बुद्धिप्रधान क्षेत्रामध्ये नावे सापडतात, पण त्यातही अनेकदा संभ्रम कायम असतो. यापलीकडच्या सामान्य सम ाजाचा विचार करता मध्यमवर्गीय समाजात स्वातंत्र्यपूर्व काळात बायका नोकरीसाठी घराच्या फारशा बाहेरच पडत नसत तेव्हा घराच्या चौकटीत असे नाते घडून येण्याची शक्यताही कमी होती. आणि असलेच असे मैत्र तर ते मानलेले भाऊ-बहीण अशा पदराखाली झाकले जात असे आणि कालांतराने लग्नाच्या मंडपापर्यंतही हे भाऊ-बहीण नाते जाऊन पोचत असे. स्वातंत्र्योत्तर काळात नोकरीनिमित्त स्त्री घराबाहेर पडू लागली, लिहू-वाचू-स्वतंत्र विचार करू लागली तरी मूलत: संसार, नवरा व लग्नाने बांधलेली सर्व नाती जपण्यातच ती गुरफटलेली होती. तिथेही अशा स्त्री-पुरुष मैत्रीचा संभव कमीच वाटतो. मात्र सत्तर-ऐंशीच्या दशकात तरुण पिढीत अनेक कारणांनी, शिक्षण-नोकरीच्या प्रसाराने व विविध चळवळींच्या निमित्ताने स्त्री व पुरुषांतले अंतर कमी होऊ लागले. त्यात एक धीट, मोकळेपणा येऊ लागला. विशेषत: कॉलेज आणि नोकरीचे ठिकाण यातील मित्र व मैत्रिणींचा ग्रुप व त्यातला वावर यांत नावीन्य राहिले नाही. मात्र तरीही स्त्री-पुरुष अशा वैयक्तिक मैत्रीची परिणती लग्नात होण्याचे प्रमाण अधिक. त्याअर्थाने मैत्री ही ग्रुपमध्ये अधिक असावी. शिवाय मैत्री असली तरी तीच भावना दोघांमध्येही असणे आवश्यक ठरते अन्यथा ते नाते विस्कटू शकते. स्त्रीपेक्षाही स्त्रीकडे बघण्याचा पुरुषाचा दृष्टिकोन हा नैसर्गिक आकर्षणाचा भाग ठरून जुळणारे नाते शुद्ध मैत्रीच्या पातळीवर जाणे शक्य होत नाही आणि स्त्री-पुरुष मैत्रीत आकर्षण हाच केंद्रबिंदू असतो असे मानणाऱ्यांचा गट प्रभावी ठरतो. ह्यामागच्या पिढीत अजूनही जोडीदाराची खास मैत्रीण किंवा मित्र या स्थानाला विरोध नसला तरी आवश्यकता नसावी. हा झाला साधारण आता पन्नास-साठ-सत्तरच्या पिढीतल्या गटाचा विचार.

यापुढे ज्याला आपण मिलिनियल पिढी म्हणतो ती आताच्या काळात तरुण असलेली पिढी, म्हणजे चाळीशी ते पंचविशीत असलेली पिढी, त्यामानाने खुल्या वातावरणात जन्मली आणि जागतिकीकरणामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचेही संस्कार सहज आत्मसात करत गेली आहे. ही पिढी इंटरनेटपश्चात जन्मली, अभावाचे जग यांना फारसे माहीत नाही. फोनशिवाय आयुष्य माहीत नाही. खाणे-पिणे-लेणे यांत आमूलाग्र बदल होत मोठी झालेली ही पिढी अधिकाधिक पाश्चात्त्य विचारसरणीकडे झुकलेली. 'आमचे जीवन आम्ही जगणार आणि आताच्या क्षणासाठी जगणार' या विचारसरणीची. त्याग वगैरे मूल्यांचा बाऊ न करणारी, तरीही भारतीयत्वाच्या मुशीत राहणारी. हे जरी अगदी वरच्या समाज स्तराचे वर्णन वाटत असले तरी नोंद घेण्याची बाब म्हणजे वस्त्रप्रावरणांच्या आणि फोन किंवा इंटरनेट कनेक्शनच्या बाबत शहरी आणि खेड्यातील किंवा आर्थिक समाजगटांचा भेद त्यात फारसा नाही. जे कपडे शहरातील मुले-मुली घालतात तेच कपडे आज खोडोपाडीही दिसू शकतात आणि हातातले फोनही वारंवार बदलले जातात किंवा महागडे असू शकतात. त्या अर्थाने मिलिनियल पिढी एकसंध होत जाताना दिसते. शहरातले व गावातले हा भेद

किमान राहण्याच्या बाबतीत तरी कमी झाला आहे. इथे परत समाजातला वरचा स्तर हा अधिकाधिक परदेशी स्थलांतरित होताना दिसतो. वरच्या स्तरातील बदल नेहमीच खाली झिरपून कालांतरने तिथेही बदल दिसून येतो. या पिढीत बोलण्यात व वागण्यातही सहज मोकळेपणा आहे. क्वचित पारंपरिक भारतीय मनाला खटकेल इतकाही मोकळेपणा यांच्यात दिसून येतो. कुठल्याही विषयाला ते सहसा दचकत नाहीत.


पुन्हा एकदा स्त्री-पुरुष मैत्री या मूळ विषयाकडे येते. शिक्षण-नोकरीसाठी परदेशी राहात असलेल्या एका तरुण मुलीशी मी बोलत होते. एव्हाना ती परदेशी वातावरणाशी चांगलीच परिचित झाल्यामुळे तिथले सामाजिक प्रश्न, तिथला विचार, तिथले खुले प्रेमसंबंध, लग्न-घटस्फोट वगैरेंबद्दल ती सांगत होती. मी ऐकत होते. अधूनमधून तिच्या काही इतर देशी विखुरलेल्या मित्रमंडळींची चौकशीही करत होते. कोण काय शिकतो आहे तर कोण कुठे नोकरी करत आहे. कुणा मित्राची मैत्रीण व्हिएतनामी तर कुणा मैत्रिणीचे ठरलेले लग्न अजून कुठल्या देशातल्या वंशाचे. त्यातल्या भेदाची तिला अजिबात पर्वा नाही. त्याहीपलीकडे सहज आवजात ती मला सांगत होती की तिच्या अमक्या-तमक्या मित्राचा फोन आला होता. बराच वेळ तो बोलत होता. लग्नासाठी त्याच्या मागे लागलेल्या घरच्यांना त्याने कळवले की तो कुठल्याच मुलीशी लग्न करू शकणार नाही कारण त्याला मुलींमध्ये नाही तर मुलांमध्येच इंटरेस्ट आहे. मग त्याच्या घरच्यांच्या प्रतिक्रिया, गावातल्या नातेवाईकांच्या प्रतिक्रिया, घरच्यांनी समजून घेणे, त्यांचे अनुमोदन वगैरे वगैरे. हे सगळे इतके सहज-स्वाभाविक सुरात की त्यात काही वेगळे नाहीच. ती सांगत असताना, युरेका म्हणावे असा मला क्षण सापडला, की या दोघांत सांगणारा पुरुष, ऐकणारी स्त्री. दोघांत आकर्षणाचा जराही भाव नाही हे तर निर्विवाद सत्य. दोघांनाही माहीत आहे. म्हणजे स्त्री-पुरुष मैत्रीत आकर्षण हेच केंद्रस्थानी असते या विचाराचा पार बिमोड इथे होतो आहे. तरीही ते दोघे आपले मन एकमेकांसमोर बोलून दाखवत आहेत. समाजातील एका फारसे रूढ नसलेल्या नात्याबद्दल ती त्याला पाठिंबा देत आहे आणि तोही तितक्याच मोकळेपणाने आपले मन तिच्यासमोर उघड करत आहे, एक मैत्रीण म्हणून. केवळ या उदाहरणापुरतेच नाही पण सामान्य परिस्थितीतदेखील जे अशारीर मैत्रीचे खास नाते स्त्री-पुरुषात असायला हवे ते या पिढीतल्या मंडळींना सापडले आहे तर! भलेही ते नाते दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे प्लेटोच्याही 'प्रीतीच्या कल्पनेपलीकडील' नात्याइतके भव्य नसेल, पण सामान्य मैत्रीचे जरूर असेल. एक अडचण दूर होत स्त्री-पुरुष नाते निकोप मैत्रीच्या दिशेने विकसित होताना किमान क्षितिजावर दिसते आहे.'तुला काय वाटते, स्त्री-पुरुष निरपेक्ष मैत्री असू शकते की नाही' या माझ्या प्रश्नावर, प्रश्नच न कळल्याचा चेहरा करून ती म्हणाली, 'असे काय विचारतेस? का नाही असू शकत?' मी काहीच बोलले नाही. आठवली मध्य प्रदेशातली मार खाणारी मुलगी. 'वो मेरा दोस्तही तो था, उसके साथ बात कर रही थी' म्हणणारी. अजून समाजातील त्या स्तरापर्यंत हे नाते विकसित व्हायला खूप काळ लागेल तरीही कधीतरी समाजपरिवर्तनात ही विशुद्ध मैत्री तिथवरही पोचेल आणि एक सुंदर नाते सर्व स्तरांतील स्त्री-पुरुषांच्या हाती सापडेल या आशेसह समाप्त.

– **राणी दुर्वे**
ranidurve@gmail.com

॥ग्रंथाली॥

**मालमत्ता खरेदी करताना...**

**धनराज खरटमल**




मालमत्ता खरेदी करताना सर्वसामान्य लोकांना कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात. त्यावर काय उपाययोजना करावी, त्याबाबत लेखक धनराज खरटमल यांनी तपशीलवार व लहान-सहान मुद्द्यांचा बारकाईने विचार करून उपाय या पुस्तकात सुचवले आहेत.

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**



डॉ. अनंत देशमुख

# जयवंत दळवी

**प्रसिद्ध साहित्यिक जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीवर्षाची सांगता अलीकडेच पुण्यात झाली. मराठी साहित्यातील साठोत्तरी कालखंड आपल्या कादंबरीलेखनाने, नाट्यलेखनाने आणि 'ठणठणपाळ' या वाङ्मयीन स्वरूपाच्या विनोदी लेखनाने त्यांनी गाजवला. दळवींची अभिजात रसिकता सर्वज्ञात होती. त्यांच्या लक्षणीय कार्याचा हा धावता आलेख.**

**सुप्रसिद्ध** साहित्यिक जयवंत दळवी यांचे माझे किंचित का होईना ऋणानुबंध असावेत. नाहीतर ते मोठे साहित्यिक आणि मी सामान्य अभ्यासक, पण आमचे स्नेहसंबंध जुळले. त्यांच्यामुळे मला लेखनप्रेरणा मिळाल्या, त्यांनीच मला 'ललित' या एका महत्त्वाच्या नियतकालिकाची दारे उघडून दिली. तिथं मी केलेल्या लेखनाने साहित्यिकांचा माझ्याशी पत्रव्यवहार राहिला. इतका की त्यातून आता 'पत्रसंस्कृती' हे पुस्तक सिद्ध होत आहे. कोणत्याही लेखकाच्या उमेदवारीच्या काळात त्याला प्रोत्साहन देणारी एक सशक्त वडीलधारी व्यक्ती असावी लागते. त्यामुळे त्याला लेखनाच्या संधी आणि काही प्रमाणात दिशा सापडण्याची शक्यता असते. जयवंत दळवी माझ्या आयुष्याच्या त्या टप्प्यावर मला भेटलेले एक वडीलधारी व्यक्तित्व होते. त्यांच्या जन्म शताब्दीची सांगता पुण्यात अलीकडेच सिद्ध झाली.

'धर्मभास्कर' या मासिकाचे संपादक प्रा. अवधूत शास्त्री माझे स्नेही होते. हिंदुत्ववादी विचारांचे होते आणि मला कोणतीही राजकीय भूमिका नव्हती आणि नाही. केवळ साहित्याभ्यास हीच माझी निष्ठा होती. जयवंत दळवी राष्ट्रसेवादलातून आलेले. पण शास्त्री यांचे साऱ्यांशीच पटत असे. त्यामुळे जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, प्रा. शांता शेळके, प्रा. केशव मेश्राम यांच्याशी त्यांचे सारखेच सख्य होते.

साधारण १९८५चा काळ होता. तेव्हा मी 'सिंदिया कॉलनी, अंधेरी (पूर्व)' इथे राहात होतो. प्रा. शास्त्री विलेपारले पूर्वला राहात. एका संध्याकाळी ते सायकलवरून माझ्या घरी आले. त्यांनी बरोबर दळवी यांच्या 'पर्याय' या नाटकाचे हस्तलिखित आणले होते. तिथपासून दळवी यांच्याशी माझा संबंध आला.

'ललित'चे संस्थापक केशवराव कोठावळे यांचे निधन झाले होते आणि 'मॅजेस्टिक प्रकाशन' आणि 'ललित' मासिक अशोकराव कोठावळे यांच्याकडे आले होते. अशोकराव तरुण होते आणि साहित्यव्यवहाराला नवखे होते. दळवींनी त्यांना भरपूर सकारात्मक पाठिंबा दिला होता. अशोकराव दळवींच्या सल्ल्याने वागत असत. अशा काळात प्रा. शास्त्री मला दळवींकडे घेऊन गेले होते. तेव्हा त्यांनी आम्हा दोघांशी मनापासून गप्पा मारल्या. दरम्यान त्यांनी मला 'ललित'ची दोन पाने देण्याची तयारी दर्शवली. इथून माझा आणि 'ललित' मासिकाचा संबंध सुरू झाला.



जयवंत दळवी

परंतु पुढे दळवींचे निधन झाले आणि माझा एक आधारवड कोसळला.

जयवंत दळवी यांचे मूळ गाव कोकणातील आरवली. परवा त्यांच्या जन्मशताब्दी समारोप कार्यक्रमाला आरवलीहून काही नातेवाईक आले होते. स्वाभाविकच दळवींचे लहानपण कोकणात गेले. कोकणात भाऊबंदकी, गावस्की, भुतेखेते, देवदेवस्की, विवाहबाह्यसंबंध यांच्यासंबंधी अनेक सत्यकथा, दंतकथांचा फैलाव, कोकण देवदेवळांचा परिसर, दळवींनी लहानपणापासून ते पाहिलेले, ऐकलेले, वाचलेले. याचा परिणाम त्यांच्या बालमनावर विलक्षण झाला असावा. मुळातच दळवींचे मन अत्यंत संवेदनशील. त्यांची निरीक्षणशक्ती सूक्ष्म. मानवी स्वभावाची जाणीव पक्की. जुन्या काळातील गावातील भिन्न वयाच्या स्त्री-पुरुषांचे स्वभाव, त्यांची देहबोली, भाषा त्यांनी विलक्षण ताकदीने टिपून घेतलेले. उदाहरणार्थ, 'सारे प्रवासी घडीचे' घ्या. त्यांना ती गावातली माणसे आणि त्यांचे संबंध एका नाटकात बसवायचे होते. त्यातील व्यक्तिचित्रांचा बाज ते नजरेआड करू शकले नाहीत.

दळवींच्या ठिकाणी असलेले मानवी स्वभावाच्या अपार कुतूहलाला ते केव्हाच काबूत ठेवू शकले नाहीत. पुढे ते मुंबईत आले आणि मुंबईच्या व्ही.जे.टी.आय.मध्ये टेक्स्टाइल इंजिनीअरिंगचा डिप्लोमा घेण्यासाठी अभ्यास करू लागले. पुढे वर्तमानपत्रात नोकरी मिळाल्यावर त्यांनी एम.ए. करण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी 'इमोशन अ‍ॅन्ड इमॅजिनेशन अ‍ॅन्ड देअर प्लेस इन लिटरेचर' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. अमेरिकन सरकारच्या मुंबई येथील माहिती खात्यात (युसिसमध्ये) त्यांना नोकरी मिळाली.

त्यांनी १९४८ साली 'दातारमास्तर' ही कथा लिहिली आणि मग त्यांचा लेखक म्हणून त्यांचा प्रवास सुरू झाला. सुदैवाने आपल्याला चांगले प्रकाशक मिळत गेले असे त्यांनीच लिहिले आहे.

त्यांनी कथा (१५ संग्रह, वेचक वेगळे), कादंबरी २२-पैकी ५ अप्रकाशित), नाटक (१८-पैकी १ अप्रकाशित), विनोद (८), व्यक्तिचित्रे (१), प्रवास (१), अशा विविध प्रकारांमध्ये लेखन केले.

दळवी यांचे कथालेखन सुरू झाले तेव्हा गंगाधर गाडगीळ आणि अरविंद गोखले यांची कथा स्थिरावली होती. पात्रांच्या मनाचे सूक्ष्म पिंजण आणि चित्रण करण्यात या दोन लेखकांना विलक्षण रस आणि रुची होती. त्यांच्या कथांनी वाचकांचा एक जाणकार वर्ग तयार केला होता. दळवी यांच्या कथांना ही एक सकारात्म पार्श्वभूमी लाभली होती. त्यांच्या कथांतील, कादंबऱ्यांतील आणि नाटकातील पात्रे आणि त्यांच्या भावभावना म्हणूनच वाचकांना अधिकच भावणाऱ्या होत्या.

आपण 'बॅरिस्टर' नाटकाचे उदाहरण घेऊ. त्या काळात डॉ. अरुण जोशी यांचे लोकहितवादी यांच्याविषयीचे संशोधन विलक्षण गाजले होते. प्रा. सरोजिनी वैद्य यांनी 'गोपाळराव हरी' हे पुस्तक लिहिले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील व्यक्तींविषयी आमचे कुतूहल वाढले होते. वातावरणात 'आनंदी-गोपाळ' ही कादंबरी चर्चेचा विषय झाली होती. त्या दरम्यान डॉ. स. गं. मालशे यांनी सरोजिनी वैद्य यांच्या 'गोपाळराव हरी'वर 'आलोचने'त कठोर परीक्षण लिहिले होते. त्यामुळे लोकहितवादी, त्यांचे पुत्र बॅरिस्टर कृष्णराव गोपाळ यांच्या जीवनचरित्राकडे रसिकांचे लक्ष वेधले होते. दळवी हे सारे पाहात होते. त्यांचे लक्ष कृष्णराव गोपाळच्या व्यक्तित्वाकडे गेले.

त्या काळात अन्नपूर्णा तर्खडकर, कृष्णराव गोपाळ, श्रीपाद बाबाजी ठाकूर, रामभाऊ आणि श्रीधर बळवंत टिळक, डॉ. नारायणराव रानडे, यशवंत फुले ही काही तत्कालीन कर्तबगार पुरुषांची मुले. त्या प्रत्येकाच्या आयुष्याने वेगवेगळी वळणे घेतली. सुशिक्षित कौटुंबिक पार्श्वभूमी, इंग्रजाळलेले पुरोगामी, मोकळे-ढाकळे वातावरण आणि सनातनी संस्कृती यात यापैकी काही तरुणांची गोची झाली.

सन १९६८ नंतर 'आनंदी-गोपाळ', 'दुर्दम्य', 'गोपाळराव हरी' अशा लेखनाने या युगप्रवृत्तीविषयी लेखकांमध्ये आणि

जाणकारांमध्ये कुतूहल निर्माण केले होते. जयवंत दळवी यांनी कृष्णराव गोपाळच्या शोकात्म जीवनात एका पिढीच्या तरुणांची आणि विशेषत: जे शिक्षणासाठी विलायतेला जात होते अशा तरुणांची होणारी मानसिक कोंडी नेमकी हेरली होती. त्यामुळे त्यांनी एकट्या कृष्णरावाचे चरित्रनाट्य उभे करण्यापेक्षा एक युगाचे चरित्रनाट्य 'बॅरिस्टर' नाटकात उभे केले. महाराष्ट्रीय जीवनाचा एक संपूर्ण कालपटच त्यांनी चरित्रनाट्याचा विषय बनवला.

एकदा नाट्यविषय निश्चित झाल्यावर बॅरिस्टरचा वाडा, आऊटहाऊस, विकेशा मावशी, आऊटहाऊसमधील तरुण राधाक्का, विलायतेत भेटलेली ग्लोरिया, बॅरिस्टरच्या कुटुंबातच अनुवंशिकतेनं आलेलं वेडेपण, 'दत्त दत्त दत्ताची गाय' म्हणणारा 'बॅरिस्टर'चा वेडसर भाऊ, घोडा हे पौरुषत्वाचे प्रतीक, त्याचा आणि एका हलणाऱ्या आरामखुर्चीचा केलेला परिणामकारक वापर, बॅरिस्टरची मानसिक चलबिचलता दळवी यांनी फार ताकदीने उभी केली आहे.

समकालीन स्खलनशील राजकारण आणि जुन्या मूल्यांचे होत चाललेले पतन, त्याच्याशी परिस्थितीवशात मूल्यांशी तडजोड न करता संघर्ष करणारी, हळूहळू नामशेष होणारी एक पिढी जयवंत दळवी यांनी 'पुरुष' या नाटकात मांडली आहे.

नाटककार म्हणून दळवी यशस्वी होत असताना वसंत कानेटकर, वि.वा. शिरवाडकर, प्रेमानंद गज्वी हे नाटककार लिहीत होते. दलित आत्मचरित्र, दलित कविता, दलित पँथर, औरंगाबाद विद्यापीठाचा नामांतराचा लढा या घटना आजूबाजूला घडत होत्या. वातावरणात एक प्रकारची अस्वस्थता होती. शिवाय प्रारंभीच्या काळात गांधीहत्येनंतर महाराष्ट्रात झालेली जाळपोळ याचे ते साक्षीदार होते. पुढील काळातील मदांध नि लिंगपिसाट राजकीय नेतृत्वाचं चित्रण दळवींनी 'पुरुष'मध्ये केले आहे.

१९५५च्या सुमारास दळवी 'प्रभात' दैनिकाचे वार्ताहर म्हणून काम करत होते. राष्ट्रसेवादल, 'लोकमान्य', 'प्रभात'-मधील वार्ताहर म्हणून काम यामुळे दळवींनी केलेल्या भटकंतीमधून समाजमनाची स्पंदने जाणून घेतलेली होती.

या विषयी त्यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले आहे-

''चक्र ही माझी पहिली कादंबरी. ती मी १९६२ मध्ये लिहिली, पण त्या आधीच्या आठ-दहा वर्षांत त्या विषयावर कादंबरीसारखे काहीतरी लिहिण्याचा मी दोन-चार वेळा प्रयत्न केला आणि लिहिलेली पाने फाडून टाकली. १९४८ ते १९५० ही तीन वर्षे मी 'प्रभात' आणि 'लोकमान्य' या मुंबईतील दोन दैनिकांत वार्ताहर म्हणून कामाला होतो. इतर कामांबरोबर कामगारांच्या प्रश्नांचे काम पूर्णपणे माझ्याकडे होते. त्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांचा उदय झाला नव्हता. त्या काळात संपाचा बादशहा होता पी. डिमेलो. तो गोदी कामगारांचा नेता होता आणि त्याच्या वारंवार संपाच्या धमक्या असायच्या. संपाचा निर्णय घेण्यासाठी त्याच्या युनियनच्या बैठका रात्री सुरू व्हायच्या आणि संपायच्या मध्यरात्रीनंतर. त्याच्या युनियनची कचेरी वाडीबंदरला होती. त्यामुळे संपाची धमकी आली की मी रात्री-अपरात्री वाडीबंदरला फिरत असे. त्या काळात मला वाटते मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी वाडीबंदर, शिवडी या भागात होती. ती दुतर्फा रस्त्याच्या फूटपायरीवर होती आणि ती गोद्यांच्या आश्रयाने होती. पुढल्या आठ-दहा वर्षांत झोपडपट्ट्यांचा मुंबईभर बेसुमार प्रसार झाला.

''मी मुंबईत गिरगावात राहणारा माणूस. मी गिरगावात वाढलो नव्हतो. माझी पहिली सोळा वर्षे कोकणातल्या माझ्या खेड्यात गेली होती. त्यानंतर सात-आठ वर्षे मी गिरगावात मध्यमवर्गीय वस्तीत राहात होतो. दोन्ही ठिकाणचे दारिद्र्य मी पाहिले होते. १९४८ साली मी वाडीबंदर-शिवडी भागात फिरू लागलो आणि माथे फिरल्यासारखे झाले! फूटपाथवरच्या झोपड्या आणि त्यातून वळवळणारे जीवन पाहून मी अस्वस्थ झालो. मग मला एक प्रकारचे व्यसनच जडले. मी सकाळी, कधी दुपारी, कधी रात्री, कधी मध्यरात्री असा या वस्त्यांतून फिरू लागलो. ते सर्व पाहता पाहता माझ्या मनावर जे ठसे उमटत गेले त्यातून 'चक्र' कादंबरी लिहून झाली.''

'चक्र'मध्ये दळवींनी घडवलेले मुंबईच्या झोपडपट्टी-जीवनाचे चित्र नवे होते. त्यापूर्वी मर्ढेकरांनी कवितेमधून, श्री.ना. पेंडसे यांनी 'राजेमास्तर' कादंबरीतून चित्रित केलेल्या मुंबईच्या चित्रणापेक्षा हे वेगळे आणि चटकादायक होते.

**ठणठणपाळ**

दळवींचा लोकसंग्रह मोठा होता. अनेक तरुण, होतकरू लेखकांना त्यांनी लेखनाला प्रवृत्त केले होते. त्याचबरोबर त्यांचा प्रकाशकांशीही मैत्रभाव होता. केशवराव कोठावळे यांच्या 'मॅजेस्टिक प्रकाशना'ला आकार देण्यात पुरुषोत्तम धाक्रस, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक ही मंडळी होती. त्यातही 'ललित' मासिक सुरू करण्यात आणि त्याला आकार देण्यात, त्यातील सदरांची निश्चिती करण्यात, त्यात येणाऱ्या साहित्याचे संपादन करण्यात, दिवाळी अंकांचे स्वरूप ठरवण्यात दळवी यांचा सहभाग महत्त्वाचा होता. 'ललित' मासिकातील 'घटका गेली पळे गेली' हे स्थूलमानाने वाङ्मयीन विश्वाशी निगडित असे हलकेपुलके सदर सुरू करण्यात, त्यातील प्रसन्नता आणि ताजेपणा टिकवून धरण्यात दळवींची भूमिका मोलाची होती. 'ठणठणपाळ' या सदराच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी त्यांनी पुढील शब्दांत मांडली आहे -

''...या दरम्यान एक अनाहूत अशी घटना घडली.

प्रकाशक परत्रे यांनी 'परचुरे' नावाचं एक मासिक काढलं होतं. त्यात एक वाङ्मयीन सदर 'धुंडिराज' या टोपणनावानं मो.ग. रांगणेकर लिहीत असत. पण ते प्रत्येक महिन्याला याला फटके मारले पाहिजेत, त्याला जोड्यानं मारलं पाहिजे असं लिहून साहित्यिकांना दुखवू लागले आणि ते सर्व साहित्यिक परचुऱ्यांचे मित्र. परचुऱ्यांना तोंड लपवण्याची पाळी आली, तेव्हा त्यांनी ते सदरच बंद केलं. मग परचुरे माझ्यामागे लागले. म्हणाले, हे सदर तुम्ही लिहा! मला आत्मविश्वास नव्हता. परचुरे फार मागे लागले तसा मी विचार केला. व 'धुंडीराज' नाव बदलून 'ठणठणपाळ' हे नाव दिलं. वर्षभर 'परचुरे' मासिकात ते सदर मी लिहिलं. ते सदर वाङ्मयप्रेमी लोकांत खूप लोकप्रिय झालं आणि मला नाव मिळालं. त्या सदराच्या संदर्भात पत्रं मला आली– सदर बंद करू नका अशी विनंती करणारी. कुठल्या कुठल्या गावच्या प्राथमिक शिक्षकांपासून तो सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तीपर्यंत!''

कित्येक वर्षं सदराचे लेखन करणारे 'ठणठणपाळ' नेमके आहेत तरी कोण कुतूहल ही त्यांनी कौशल्याने टिकवून धरले होते. केशवरावांच्या मृत्यूनंतर दळवींनी लोकप्रियतेच्या शिखरावर असतानादेखील ते सदर बंद केले. मराठी विनोदी लेखनाचा एक मानदंड दळवींनी निर्माण केला. त्यानंतर त्यांनी 'अलाणे–फलाणे' हे सदर चालवले, पण 'ठणठणपाळ'ची लज्जत औरच होती.

ग्रंथ, ग्रंथकार, प्रकाशक, ग्रंथव्यवहार, साहित्यिक संस्था, पुरस्कार, वृत्तपत्रे–नियतकालिकांचे संपादक, साहित्य संमेलने असे प्राय: वाङ्मयीन विषय दळवींनी या सदरामधून सातत्याने मांडले, त्या लेखनाचा बाज नेहमीच हलकाफुलका ठेवला. म्हणजे ज्याच्यावर त्यांनी टीका केली त्याही व्यक्ती दुखावल्या जाणार नाहीत याची त्यांनी काळजी घेतली. आपला विनोद 'निर्विष' असल्याचे त्यांनी खुबीदारपणे वाङ्मयीन वातावरणात पेरले. दळवी यांचे आणखी एक वैशिष्ट्य राहिले. 'मौज–सत्यकथा' ग्रूपला त्यांनी सातत्याने आपले टीकालक्ष्य केले. त्यामुळे 'मौज–सत्यकथे'चे साहित्यजगतात महत्त्व अधोरेखित व्हायला मदतच झाली, असे मार्मिक निरीक्षण सुनील कर्णिक यांनी अलिकडेच नोंदवले आहे. काही असले तरी दळवी यांनी मराठी सारस्वतांना चिमटे काढून वाचकांना हसवले असले तरी आज 'ठणठणपाळ'चे लेखन वाचताना तत्कालीन कित्येक वाङ्मयीन घटनांच्या नोंदी त्यात कळत–नकळत व्यक्त झाल्या आहेत आणि उद्याच्या वाङ्मयेतिहासकाराला त्या उपयुक्त ठरणाऱ्या आहेत हे जाणवते हे नक्की.

दळवींनी व्यक्तिचित्रे लिहिली. त्यातील मला जाणवलेले वैशिष्ट्य असे की त्यांनी ज्या व्यक्तींच्या ते निकट गेले होते, ज्यांचे व्यक्तित्व, विचार आणि वागणे त्यांना विशेष भावले होती अशांवरच त्यांनी लिहिले. रॉय किणीकर, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, केशवराव कोठावळे यांच्यासंबंधीच्या लेखनात कमालीची पारदर्शकता जाणवते. आरवलीत खांडेकर काही वर्षे राहिलेले. दळवींनी ते त्यांच्या विहिरीवर अंघोळीला येत तेव्हा पाठही चोळून दिलेली; पण खांडेकरांच्या व्यक्तित्वाच्या मर्यादा थेट चित्रित करताना ते कचरले नाहीत. खांडेकर काहीसे रुक्ष वाटावेत असे तर माडखोलकर कमालीचे स्त्रैण. त्यांच्या वागण्या–बोलण्यात धरबंध नसायचा हे स्पष्ट करत असतानाच खांडेकरांच्या तुलनेत त्यांना माडखोलकर अधिक जवळचे वाटायचे हे ते सांगतात. एरवी कोणी फारसे धजावले नसते असे तपशील दळवीच लिहू जाणेत. रॉय किणीकरांचा दुसऱ्याला बनवण्याचा सहजस्वभाव ते विशद करतात. 'अपूर्णांक' या नाटकातील अनंत आत्माराम ब्रह्मे हे पात्र आनंद साधले या मित्रावरून सुचल्याने प्रत्यक्ष नाटक रंगमंचावर येण्यापूर्वी दळवी त्याची झेरॉक्स प्रत साधले यांना पाठवतात आणि ललित लेखनातील पात्रे प्रत्यक्षातल्या माणसांवरून सुचली तरी तो माणूस आणि लेखकाला सुचलेले पात्र एक नव्हे, यासंबंधीची मीमांसा साधले ते यांना सांगतात.

ग्रंथांसोबत त्यांची वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी प्रस्तावना घेण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. कुणा नवोदित लेखकाने दळवी यांच्याकडे तशी मागणी केल्यावर दळवी यांनी अशा प्रस्तावनालेखनातील व्यर्थता स्पष्ट करणारे लिहिलेले पत्र वाचकांना विचार करायला प्रवृत्त करणारे आहे.

राजाराम हुमणे हे 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'च्या सांस्कृतिक विभागात कार्यरत असत, राज्य नाट्यस्पर्धांसारखे कार्यक्रम त्यांनी गावोगावी राबवले आणि यशस्वी करून दाखवले. त्या हुमणेंवर मानहानीची पाळी आली तेव्हा दळवी यांनी त्यांना अत्यंत सहृदयतेने पत्र लिहिले आहे.

दळवींच्या लेखनात वैविधता आढळते. व्यक्तिचित्रे, कथा, कादंबरी, नाटक या प्रकारांमध्ये त्यांनी लेखन केले. पण तिथेही ते केवळ एकच अनुभव कथेमध्ये ते चित्रित करतात आणि त्यावर त्यांचे समाधान होत नाही. त्यात त्यांना अधिक नाट्यात्मकता दिसते. अधिक तपशील त्यांना खुणावू लागतात. मग ते त्याच अनुभवाचे विस्तारीत रूप कादंबरीत आविष्कृत करतात. काही वेळेला लिहिलेल्या कादंबरीतील नाट्यात्म अंश इतका जोरकस असतो की त्यांना त्याला नाट्यरूप दिल्याशिवाय राहावत नाही. कधीतर ते आधी नाटक लिहितात आणि मग तिची कादंबरी करतात. एक सर्जनशील लेखक म्हणून ती दळवी यांची निकड असते.

'मी मुख्यत: कादंबरीकार आहे. म्हणजे मला काही सुचू लागले की मी कादंबरीच्या आवाक्यात त्याचा विचार करू लागतो. विचार करता करता एखादा विषय मनात येतो. त्याला अनुरूप असा परिसर दिसू लागतो, त्यातली काही पात्रं दिसू लागतात. ती पात्रं कशी वाढत जातील याचे अंदाज मनात येतात. प्रक्रिया मनातल्या मनात दीर्घकाळ चालू असते. परंतु गर्भात मूल वाढते आणि नऊ महिन्यांनी मुलाचा जन्म होतो या

प्रक्रियेशी लेखनाची तुलना करता येणार नाही. मूल जन्मते तेव्हा ते पूर्णावस्था घेऊन जन्मते. कादंबरीचे किंवा नाटकाचे तसे होत नाही. उलट अनेकदा उलटच होते. कागदावर उतरते ती कादंबरी किंवा ते नाटक सांगाड्याच्या अवस्थेत असते. मग दीर्घकाळ भरणी चालू असते. पुनर्लेखनाच्या कितीतरी अवस्था असतात. लिहिलेले खोडणं, काही भाग संपूर्ण गाळणं, संपूर्ण नवीन भाग लिहून योग्य ठिकाणी जोडणं हे सतत चालू असतं. म्हणजे सर्जनाचं कार्य सतत चालू असते. ज्यांच्या मनाची सुचण्याची क्रिया तीव्र असते त्यांना काही ना काही सतत सुचत असतं. कुणाला काय सुचले आणि किती सुचेल हा भाग वेगळा!'

वाङ्मयप्रकारातील अनुभवांतराच्या संदर्भात, निर्मिती-प्रक्रियेसंदर्भात आणि प्रत्यक्ष लेखनात दळवी यांच्यासारखा असा अत्यंत गांभीर्याने विचार कोणी केला आहे, असे आढळत नाही.

मात्र त्याने अभ्यासकांचे लक्ष वेळीच वेधून घेतले आणि हैदराबादच्या उमा दादेगावकर यांनी त्या विषयावर शोधनिबंध लिहिला. या प्रकारातील अनुभवांतराच्या प्रक्रियेमागील सर्जनशील कलावंताची आच नेमकी काय असते यावर प्रकाश टाकण्याचा दादेगावकर यांचा प्रयत्न दिसतो.

साहित्यिकांच्या मुलाखती घेऊन त्या प्रसिद्ध करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केल्याने वेगवेगळ्या लेखकांचे वैयक्तिक आणि वाङ्मयीन चरित्र वाचकांना सहज उपलब्ध झाले.

दळवींचे आरवलीतले घर, तिथले बालपण, त्यांचे आई-वडील, काका, काकी असे आप्त यांच्यासंबंधी त्यांनी मनःपूत लिहिले आहे. आपली आई अतिशय रूपवान होती तर वडील तुलनेने सामान्य हे ते पुनःपुन्हा लिहितात. आपले आईवडील विसंवादी जोडपे होते त्यामुळे आपल्या लेखनात तशी जोडपी आपण चितारली, आपल्या काकी आपल्याला आईप्रमाणेच होत्या, आपल्या कुटुंबात वेडसर माणसे होती, काही पळून गेली होती.. हे सारे ते लिहितात तेव्हा ते आपल्या लेखनाची सूत्रेच जणू सांगत असतात.

दळवींचे लेखन सहजसिद्ध असते. चित्रात्मकता आणि नाट्यात्मकता टिपायला जी नजर लागते ती त्यांच्यापाशी पुरेपूर आहे. इतकेच नव्हे तर साऱ्या लेखनाला एक सांस्कृतिक संदर्भ असल्याचे भानही ते व्यक्त करतात. त्यामुळे काही महत्त्वाच्या आणि तरीही अस्पर्शित राहिलेल्या विषयांना ते अधिकारवाणीने आणि सबळ पुराव्यानिशी सादर करतात. एरवी हॉटेले - मग ती कोकणातील असो वा मुंबईतील, सारस्वताची असो वा भंडाऱ्याची इतक्या तपशीलवार वर्णन करण्यात त्यांच्यासारखा दुसरा वाक्‌बगार लेखक माझ्या पाहण्यात नाही. प्रबोधनकार के. सी. ठाकरे यांच्यानंतर मुंबईतल्या खानावळी दळवींनी समर्थपणे चित्रित केल्या आहेत. यादृष्टीने 'दादरचे दिवस', 'अनंताश्रम : ब्रह्मानंदी टाळी', 'भंडारी हॉटेल : मुंबईचे वैशिष्ट्य' हे त्यांनी लिहिलेले लेख अप्रतिम आहेत. या लेखांमध्ये दळवींच्या हातात लेखणी नसून कॅमेरा आहे आणि तो ज्या वस्तुजातावर फिरत आहे ते चित्रित करणाऱ्याची 'नजर' अस्सल रसिकाची आहे असे वाचकाला मनोमन पटावे.

सन १९५६च्या सुमारास दळवी यांनी अमेरिकेचा प्रवास केला. त्यावर त्यांनी 'लोक आणि लौकिक' या नावाचे प्रवासवर्णन लिहिले. त्यात आलेले विमानप्रवासातील अनुभव तेव्हातरी अनोखे होते असे म्हणावेसे वाटते. पहिल्या विमान-प्रवासात प्रवाशाच्या मनाची उलाघाल अवस्था, एअरहोस्टेसशी प्रवाशांचे वर्तन तेव्हातरी वाचकाला आश्चर्यवत वाटावे असे होते. वॉशिंग्टन, सॅन फ्रान्सिस्कोचे दर्शन, सॅन फ्रान्सिस्कोच्या दुकानात संत तुकारामांची मूर्ती indian saint म्हणून विक्रीला असल्याचे दिसणे, तीन व्यक्तींच्या कुटुंबाने दीडशे एकर शेती मशिनच्या साहाय्याने करणे, लासवेगासमधले जुगार, लॉस एन्जलीसमधले दिखाऊपण आणि विक्रीच्या दुकानांचे वर्णन आणि शेवटी प्रेसिडेंट आयसेनहावर यांचा पायउतार आणि सामान्य नागरिकासारखे जगणे आणि दळवींनी केलेले चित्रण मनाला भावते.

'दादरचे दिवस', 'दि वर्ल्ड ईज लाईक धिस!', 'अनंताश्रम : ब्रह्मानंदी टाळी', 'भंडारी हॉटेल : मुंबईचे वैशिष्ट्य' आणि 'आठवणीतील वास्तू : खटाववाडी' हे दळवींनी लिहिलेले लेख त्यांच्यातील सूक्ष्म निरीक्षणशक्ती, समकालीन सांस्कृतिक संदर्भांचे भान आणि मुंबईचे स्थानमाहात्म्य हेरणारी तीक्ष्ण नजर स्पष्ट करणारे आहेत. 'प्रभात' दैनिक, 'सत्यकथा' मासिक, 'मौज' साप्ताहिक आणि 'मौज प्रकाशन' हे जिथून प्रसिद्ध होत, त्या खटाववाडीसंबंधीचा त्यांचा लेख असाधारणच म्हणायला हवा. त्यात दळवी यांनी स्पष्ट केलेले श्री.शं. नवरे, काकतकर, त्र्यंबक कृष्ण तरटे, वि. गं. देशपांडे, अंबादास अग्निहोत्री, ग. रा. कामत, वि. पु. भागवत, श्री. पु. भगवत, राम पटवर्धन यांचे योगदान निश्चितच वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांना मोलाचे वाटणारे आहे.

जयवंत दळवी यांनी बराच काळ युसिसमध्ये नोकरी केली. त्याचा लाभ त्यांनी आपल्या लेखकमित्रांना करून दिला. प्रसिद्ध अमेरिकन नाटकांची रूपांतरे करवून घेण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली आणि 'पॉप्युलर प्रकाशना'ने ती प्रकाशित केली.

जी. ए. कुलकर्णी यांचा सुनीता देशपांडे, श्री. पु. भागवत, मिथिला (कवी ग्रेस यांची कन्या), म. द. हातकणंगलेकर आणि हेमा अंतरकर यांच्याशी पत्रव्यवहार होता. तसाच जयवंत दळवी यांच्याही. मात्र दळवींशी असलेला पत्रव्यवहार काहीसा विनोदी बाजाचा असल्याचे स्वतः जी. ए. कुलकर्णी यांनी लिहिले आहे.

तात्पर्य, जयवंत दळवी यांनी १९४५ नंतरच्या मराठी वाङ्मयाच्या भिन्न भिन्न प्रवाहात महत्त्वाचे लेखन केले असून त्या त्या प्रकारांवर आपली ठसठशीत नाममुद्रा उमटवली आहे.

**- अनंत देशमुख**
dranantdeshmukh@gmail.com

# दुवा

**कौसल्यात व माझ्यात काहीच फरक नाही? कौसल्याच्या त्यावेळच्या गप्प बसण्यावर मी हळहळते. वकिलांनी तिला एवढे फसवेपर्यंत ही काय करत होती असं वाटते. परंतु माझ्या गप्प बसण्यावर काय? माझ्या आईनं माझ्याशी खेळलेल्या खेळांचे काय? कौसल्या व मी एका पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या बळी ठरलो.**



**वृषाली मगदूम**

***आज*** सुट्टी असूनही कौसल्याने येऊ का विचारले व मी तिला घरीच ये असे सांगितले. संध्याकाळची हुरहुर लावणारी कातरवेळ अंगावर घेत कौसल्या घरात शिरली. मी काहीशी मूकबधिर, सुन्न होऊन मागील व्हरांड्यातील झुलत्या खुर्चीवर झुलत होते. आज सविताने सुट्टी घेतली होती. सकाळपासून मी एकही शब्द उच्चारला नव्हता. मनात मात्र असंख्य शब्द धबधब्यासारखे कोसळत होते. भूतकाळ घिरट्या घालत होता. असह्य झाले होते सारे. मोठ्याने किंचाळावे, ओरडावे, स्वतःला व्यक्त करावे व या घुसमटीतून मुक्त व्हावे असे वाटत होते. खोल खोल आत मी खेचली जात होते. खोल गुहेतून शब्दांचे बुडबुडे वर येण्यासाठी धडपड करत होते. अन् शक्तिपात झाल्यासारखी विकलांग अशी मी या खुर्चीत पहुडले होते.

''ताई येऊ का?'' कौसल्याचे खणखणीत शब्द. मी खडकन् जागृतावस्थेत आले.

''ये ग. मागे व्हरांडयात ये.''

माझ्याच शब्दांनी मला ऊर्जा दिली. ''ताई, दार नुसतेच लोटलेत. घरभर अंधार, घरात चोरबीर शिरला तर जणू.'' सगळे दिवे लावत कौसल्या घरात शिरली. घर उजळून गेले. माझ्या मनातला अंधार घालवायला एवढा सोपा उपाय मला सुचला नाही.

सडसडीत, ताडमाड उंच, उभ्या चेहऱ्याची, काळीभोर कौसल्या समोर उभी होती. सावित्रीबाईसारखी कपाळावर लाल कुंकवाची चिर रेखली होती. गडद शेवाळी रंगाची साडी, साडीभर लाल टिकल्या व काठाला जरतारी भडक बॉर्डर असलेली आजकाल चालणाऱ्या फॅशनची साडी कौसल्याने नेसली होती. कौसल्या तोंडभरून हसली. पांढरेशुभ्र दात तिच्या रंगामुळे जास्तच चमकत होते.

''बसा, चहा करते.'' मी.

''तुमीच बसा, मी बघा कसा फक्कड् चहा करते.'' उठणाऱ्या मला कौसल्याने दामटून बसवले.

कौसल्या बारामती तालुक्यातील इंदापूर गावातील पोर. आईवडिलांच्या मागून शेतात खुरपणी करायला जायची. शाळेचे तोंडही कधी पाहिले नाही. बालपण सारे भावंडांना सांभाळण्यात, घरकाम करण्यात गेले. चार बहिणींवर भाऊ झाला. कौसल्या सगळ्यात थोरली होती. आठ वर्षांच्या कौसल्याला निगुतीने साऱ्यांच्या लाडक्या असलेल्या भावाचा

सांभाळ करावा लागायचा. कुचराई झाली की मार बसायचा. धुणे, भांडी, पाणी आणणे, चुलीवर भाकऱ्या बडवणे. कौसल्या मेटाकुटीला यायची. त्यातच घरातल्या पोरांची माराम ारी सोडवता सोडवता हैराण व्हायची.

एके मामा दिवशी सोलापूर जवळच्या बोकडवाडीतल्या काळभोरांच्या रवीला व त्याच्या बापाला घेऊन आला. आईचे लुगडे काठीला गुंडाळतात तसे गुंडाळून कौसल्याने दाखवून घेतले. लगीन ठरले. सुपारी फुटली. बारा वर्षांच्या कौसल्याला लगीन म्हणजे नवीन साडी, हिरवाकंच चुडा व सगळ्याचे कवतिक एवढेच माहीत होते. माहेराला कंटाळलेली कौसल्या बोकडवाडीला आली अन् एक यातनांचा प्रवास सुरू झाला. नवरा म्हणणारा प्राणी मुंबईत कंपनीत नोकरीला चालता झाला. सासू भल्या पहाटे अक्षरशः लाथा घालून उठवायची. नदीवरून पाणी आणायचे. कंबरेला एक व डोक्यावर दोन घागरी घेऊन कौसल्या पाणी आणायची. सासू घरातील सर्व छोटेछोटे लोटेसुद्धा पाण्याने भरून ठेवायची. चिंचोळ्याशा पांदीतून नदीकडे जाताना कौसल्याच्या उरात प्रचंड उलथापालथ व्हायची. घाबरून जीव उडून जाईल का वाटायचे. फटफटताना ती गोठ्यात शिरायची. दोन बैल, एक म्हैस व एक गाय यांच्यापुढे कडबा टाकून गोठ्यातले शेण, मूत बाजूला सारून खराटा फिरवून गोठ्यातला एक उग्र दर्प सहन करत ती न्हाणीघरात शिरायची. कंबर हुळहुळायची. दोन तांबे पाणी अंगावर ओतून ती चुलीपुढे यायची. चहा, न्याहरी, भाकरी बडवणे, ताक घुसळणे अन् काय काय. दुपारचे जनावरामागे तरी जायचे नाहीतर शेतावर गवत खुरपायला तरी जायचे. सांजच्याला परत रांधावाढा, भांडी घासून फडताळात लावा. कितीही यातायात करा. रातच्याला अकराशिवाय जमिनीला पाठ टेकायची नाही. अपुरी झोप, आंबलेलं अंग, चुरचुरणारे डोळे, अन्नावरची वासना उडालेली होती. एवढ्या लहान वयात घाण्याला जुंपल्यासारखी ती कशी गरगरत होती तीच जाणे. दुधदुभत्या शेतीवाडी असलेल्या, नोकरदार नवऱ्याच्या घरात ती पडली याचेच तिच्या बापाला कवतिक होते. काम करून करून तिचे चिपाड झाले तरी कोणाला तिची दयामाया नाही. एवढे करून दिवसभर सासूच्या तोंडाचा पट्टा कारखान्यातल्या पट्ट्यासारखा मागेपुढे एका लयीत भक् भक् करत राहायचा. नवरा सुट्टीवर यायचा. वसवस करायचा. शरीर ओरबाडायचा व निघून जायचा. सणासुदीला ती माहेरी यायची. तिच्या आयुष्याचे वाटोळे झाले म्हणून आईवर तोंडसुख घ्यायची. परत जाणार नाही म्हणून हटून बसायची. मात्र बापापुढे काही चालायचे नाही. दोन दिवसांतच सांगावा यायचा. बाप परत धाडायचा. आईला दुःख व्हायचे. तिला औषधपाणी करून खाऊपिऊ घालून आई पाठवायची. माहेरी गेले की ती अंथरूण धरायची. दिवसरात्र कण्हायची. तिच्या डोळ्याचे पाणी खळायचे नाही.

या साऱ्यांचीही सवय झाली. शरीर, मन बधिर झाले. किटलेले कान बहिरे झाले. साऱ्यांचा निमूटपणे स्वीकार केला. माहेरी जाणेही कमी केले. कशाला हवाय क्षणभरचा तरी विसावा असा विचार तिने केला. अचानक वाऱ्याची झुळुक आली. सारे शरीर मोहरून गेले. सक्तीच्या संभोगातूनही बीज रुजले अन् कौसल्याला परत एकदा जगावेसे वाटायला लागले. उभारी आली, मनमोराचा पिसारा फुलला. परंतु इथेसुद्धा नशिबाने डाव साधला. उलट्यांनी हैराण झालेल्या तिच्या पोटात काही ठरत नव्हते. तरीही नदीवर गेली. डोक्यावर दोन व कंबरेला एक घागर भरलेली होती. डोळ्यांसमोर काजवे चमकायला लागले. आधल्या रात्रीच्या पावसाने रस्ता निसरडा झाला होता. ती घसरली, पडली. अंधाराने कवेत घेतलं. असा किती वेळ गेला कोण जाणे. अजून का आली नाही म्हणून सासू आली. तोंडावर पाणी मारून घरी घेऊन आली. पोटातल्या असह्य वेदनांनी ती दिवसभर तळमळत होती. कातरवेळेने डाव साधला. तिची कूस रिती झाली. शक्तिपात होऊन ती भुईला खिळली होती. नवरा आला. पहिल्यांदाच त्याने आईला टोकले. खूप बडबड केली. तिला घेऊन जातो व मुंबईला चांगल्या डॉक्टरला दाखवतो म्हणताच सासूने फणा काढला. तिचे ते फुत्कार नवऱ्याने झेलले व तिला घेऊन उल्हासनगरला आला.

''ताई चहा.''

मी भानावर आले.

''हे काय?''

''हा उपमा. मला माहीत आहे तुम्ही दिवसभर बुकात डोकं खुपसून बसला असाल. गुमान हे संपवायचं.'' कौसल्याची प्रेमाची दटावणी टाळता यायची नाही.

''तू फक्त एक बोट पुढे कर पुढचं मी पाहतो.'' शंतनू म्हणायचा. पण मला धाडस झाले नाही. अख्खे आयुष्य बलीवेदीवर चढले. फिनिक्स पक्ष्यासारखी मी आगीत होरपळतेय. माझी राख होतेय. त्या राखेतून मी परत उठतेय, जगतेय. आयुष्याला आकार देण्याचा, अर्थ देण्याचा निकराने प्रयत्न करतेय. दुसऱ्यासाठी जगण्याचा मंत्र घेऊन शरीर व मनाला इतकी तिंबतेय की त्यांना मागे वळून पाहायचा अवसरच देत नाही. पण आजच्यासारखा एखादा चुकार दिवस येतो व माझा ताबा घेतो. भरकटलेल्या मला पतंगाच्या दोरीसारखे कोणीतरी मागे मागे खेचत राहतेय.

आयुष्याची दिशा ठरवण्याच्या स्वप्निल वळणावर शंतनू भेटला. आमची वेव्हलेन्थ जुळते म्हणजे काय याचे प्रत्यंतर आले. कायद्याच्या किचकट पुस्तकाचा काथ्याकूट

पाडता पाडता आम्ही समाजकारण, राजकारण यावर कधी वाद घालू लागलो उमजलेच नाही. हळूहळू मैत्रिणींची साथ सुटली व कॉलेजच्या आवारात शंतनू व मी ही जोडी जिथेतिथे साऱ्यांच्या नजरेत भरू लागली. लायब्ररी, कॅन्टिन, कॉलेजकट्टा, लेडिज हॉस्टेल कॉर्नर, बस स्टॉप सगळीकडे मोठमोठ्याने वाद घालताना, चर्चा करताना दिसू लागलो. बस येतेय जातेय. साऱ्यांना आमच्याकडे विचित्र नजरेने बघत सारे बसमध्ये चढतात. एखादी मैत्रीण हाकारते. 'अग क्रांती, चढ आता, बस झालं.'

'हो पुढं आलेच पुढच्या बसनं.' मी.

'काय ग एवढं चर्वितचर्वण चालू असतं. कंटाळा नाही येत!' नेहा.

'काय?' मी ओरडले.

नेहाला उत्तर दिले नाही तरी मी विचार करू लागले. अन् लक्षात आले आम्हाला एकमेकांचा सहवास आवडतोय. शंतनू भेटला नाही तर अस्वस्थ वाटते, जीवघेणी हुरहुर लागते. भेटला की त्याला ताब्यात घ्यावे, त्याच्यावर हुकमत गाजवावी. तो फक्त आपला एकटीचाच असला पाहिजे. त्याने इतर कोणाशीही बोलू नये असे काहीबाही वाटत राहायचे. अन् हे चुकीचे आहे असे मी मनाला फटकारयची. कायद्याची डिग्री हातात मिळेपर्यंत आम्ही प्रेमाची भाषा कधी केली नाही. प्रेमपत्रे लिहिली नाहीत. व्हॅलेन्टाइन कार्डही दिली नाहीत.

परीक्षा झाली. निरोपाचा हृद्य कार्यक्रम झाला. सगळे आपापल्या गावी परतले. मी कोल्हापूरला आले. शंतनू औरंगाबादला गेला. अन् मग एकमेकांची किती सवय झालीय याचा साक्षात्कार झाला. रात्रीच्या अंधारात सारे घर चिडीचूप झाल्यानंतर माझ्या खोलीला कडी लावून मी मोबाइल तापून आता फुटतोय की काय असे वाटेपर्यंत गप्पा मारत राहायची. गप्पांना आता सोनेरी किनार होती. तुझी खूप आठवण येते. तुझ्याशिवाय गमत नाही ते रात्री तू स्वप्नात आलीसपर्यंत बडबड व्हायची. स्वप्ननगरीत शिरून अवकाशातील अबलख घोड्यावर आरूढ होऊन फेरफटका मारताना आम्ही दोघे इतके खिदळायचो की आई दारावर टकटक करायची.

'क्रांती अग, काय चाललेय. झोप आता. कोणाशी बोलतेस एवढे.'

'अग, नेहा जोक सांगतेय.''

'बस म्हणावं.' आई काहीतरी वटवट करत परत जायची.

निकाल लागला. एकत्र अभ्यासाची व चर्चेची फलश्रुती दोघांनाही चांगले मार्क मिळण्यात झाली. मुंबईतच परत यायचे व सुप्रसिद्ध ॲड. जितेंद्र फेमानीच्या हाताखाली काम करायचे आम्ही दोघांनी पक्के केले. ...आणि माझ्या आयुष्यातील तो घातवार आला. दुःस्वप्नाची मालिका सुरू झाली. माझ्या स्वप्नाच्या सात मजल्यांतील एकेक इमला माझ्याच पायाशी कोसळत आहे हे मला उमगले नाही. बाबांनी मला अर्जंट बोलावून घेतले. कोल्हापुरातील एका डॉक्टर मुलाचे स्थळ पाहायचे होते. अख्खा दिवस घरात वादावादी, धुसफूस, प्रचंड हंगामा झाला. मला माझ्या व्यवसायातला वकील मुलगाच हवा यावर मी ठाम राहिले.

'अग, पण या मुलाकडे निरोप दिलाय बघून तर घे, लगेच काही ठरत नाही.' आई.

'पण करायचेच नाहीतर का बघायचे.' मी.

'मी आता त्या लोकांना काय सांगू.' बाबा.

'मुलीला वकीलच मुलगा हवाय सांगा ना.' मी.


'थोबाड फोडून टाकेन कार्टे.' बाबा ओरडले.

मुलगा न बघताच आईबाबांचा प्रचंड रोष घेऊन मी परतले.

''अग बया, उपमा थंडगार व चहा गारढोण झाला की'' कौसल्या एवढ्या जोरात किंचाळली की मी एकदम खडबडून भानावर आले.

कौसल्या माझ्याकडे आली तेव्हा वकिली व्यवसायाला काळिमा फासणाऱ्या तिच्या वकिलांनी तिच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन तिची पुरी फसगत केली होती.

उल्हासनगरला कौसल्या आली आणि काही काळ तरी तिच्या आयुष्यात वसंतऋतू आला. मुंबईच्या डॉक्टरांनी ताकदीची औषधे दिली. मुंबईतल्या नवऱ्याच्या त्या छोटाशा खोलीचा तिने कायापालट केला. घर म्हणजे उकिरडा झाला होता. त्याची साफसफाई केली. तेल, मीठ, पीठ, साबण सारं सामान भरले. संध्याकाळी नवऱ्याच्या वाटेकडे ती चातकासारखे डोळे लावून बसायची. मग रोजची खरेदी व्हायची भांडी, स्टोव्ह, काहीबाही. कौसल्या म्हणजे अन्नपूर्णाच होती. शंकराला तिच्या नवऱ्यालाही घरचे जेवण, त्याची कौसल्याने केलेली सरबराई आवडायला लागली. कौसल्याच्या आयुष्यात निवांतपणा आला. हा निवांतपणा आणणाऱ्या नवऱ्याला त्या बदल्यात ती त्याचे पायातले बूट काढण्यापर्यंत सेवा करू लागली. नवराही तिच्यावर उपकार करतोय या भावनेने कृतकृत्य होऊ लागला. मग सुट्टीच्या दिवशी मुंबईच्या रस्त्यावरून मनसोक्त भटकणे, भेळ खाणे, चावट सिनेमे पाहणे म्हणजे कौसल्याच्या आयुष्यात सुखाची परिसीमा होती. नवरा कामावर गेला की उंबऱ्यावर बसून रस्त्यावरची गर्दी न्याहाळणे, येणाऱ्याजाणाऱ्या बायकांशी चकाट्या पिटणे. अनेक दिवस तोंडाला कुलूप असलेल्या कौसल्याचा तोंडाचा पट्टा अव्याहत चालू राहिला. या काळातच नळावरची भांडणे, चुगल्या अशा अनेक गोष्टी करत ती बोलभांड झाली ती आजतागायत. गावाकडून नवऱ्याला



सासूचा सारखा कौसल्याला पाठव म्हणून निरोप यायचा. पत्रावर पत्रे यायची. पण नवरा काणाडोळा करायचा.

ते सुखासीन दिवस आठवले की कौसल्याचे मन व शरीर हुळहुळते. तो आनंद, विसावा मुठीत गच्च पकडून ठेवायला हवा होता व निर्दयपणे मूठ उघडण्यासाठी धडपडणाऱ्या सासूच्या नाकावर एक ठोसा द्यायला हवा होता. कौसल्याचा तो छोटासा राजमहाल, त्याला असणारा हस्तिदंती मनोरा. कौसल्या जिवापाड निगुतीने त्याची देखभाल करायची. राजमहालातील राजाला आपल्या प्रेमात तिने करकचून बांधलेय असा तिला विश्वास होता. पण शंकऱ्या फितूर झाला. तिला न सांगता गावी जाऊ लागला. तिच्या मनोऱ्याला पडणाऱ्या चिरांकडे तिचे लक्षच नव्हते. ती तिच्या आयुष्यात मस्त, धुंद होती. हे दिवस संपूच नयेत असे तिला वाटायचे. ती गाफील राहिली. नवऱ्याच्या गावी वाढलेल्या फेऱ्या तिच्या ध्यानातच आल्या नाहीत. अन् तो क्षण आला. प्रपात कोसळला. ती उन्मळून गेली. होत्याचे नव्हते झाले. दुष्ट सासूने दावा साधला. तिला मूल होणारच नाही असे नवऱ्याचे कान भरत गावीच त्याचे दुसरे लग्न लावून दिले. कौसल्याला नवरा तिच्या माहेरी सोडून आला व ती निमूटपणे माहेरी आली.

आजकाल मी व शंतनू घरी कसे सांगायचे याच्या क्लृप्त्या लढवत होतो. शंतनूच्या सुधारक घरात फारसा विरोध होणार नव्हता. परंतु माझ्या घराची चौकट किती बुरसटलेली व परंपरेच्या जोखडाखाली जखडलेली आहे हे मला ज्ञात होते. त्या रात्री बारा वाजता माझा मोबाइल खणखणला. गाढ झोपेतली मी दचकून जागी झाले. आई रडत होती. बाबांना छातीत दुखतेय म्हणून सिटी हॉस्पीटलमध्ये शेजाऱ्यांच्या मदतीने भरती केले होते. आई खूप घाबरली होती.

'आई मी निघतेय.' म्हणत मी फोन बंद केला.

अचानक मी इतकी गळून गेले की माझ्या हातापायातून ताकदच गेली. मी शंतनूला फोन केला. तो टॅक्सी घेऊनच आला. मला घराशी सोडून तो माघारी परतला. हॉस्पिटलमधून बाबा घरी आले. मी इथल्या कोर्टातच प्रॅक्टिस करावी असे आईने टुमणे लावले. त्या परिस्थितीत मला दुसरा पर्याय दिसेना. मी कोल्हापूरच्या कोर्टात जाऊ लागले. घरात माझ्या लग्नाचा विषय सारखाच निघू लागला. गेल्या चार दिवसांपासून आई माझ्यासमोर वधूवर सूचक मंडळाचा फॉर्म भर म्हणून समोर ठेवत होती. मी टंगळमंगळ करत होते.

कोर्टाला सुट्टी होती. दुपारची बाराची टळटळीत दुपार होती. घरात बसूनही भगभगत होते. उघड्या खिडकीतूनही

गरम झळा असह्य करत होत्या. मी खिडकी बंद करून पडदा ओढून घेतला. शरीर व मन इतके आळसटले होते की नुसती सुंद होऊन मी बसून होते.

‘‘क्रांती आलीस का?’’ आई.

मी बाहेर आले. आई फॉर्म भरत होती.

‘‘मला थोडी माहिती दे.’’ आई

मी कोरडेपणाने बोलत होते. फॉर्म भरून झाला. मी हातात घेतला.

‘‘आई. मला काही सांगायचंय.’’

‘‘सांग ना.’’

शंतनू व मी वर्गमित्र, मैत्री, प्रेम व लग्न करण्याचा दृढनिश्चय इथपर्यंत मी मन लावून सांगत होते. आईच्या चेहऱ्यावरील रेषन्‌रेष निरखून होते. माझे सांगून संपले. प्रतिक्रियेची वाट पाहणे होते. आईने मोठा आवंढा गिळला. काही क्षण थांबली. शंतनूचा स्वभाव, त्याचे दिसणे, त्याची आर्थिक पार्श्वभूमी याबद्दल काहीही न विचारता तिने जातीलाच हात घातला.

‘‘हे शक्य नाही. तुझ्या बाबांना कळलं तर...’’ म्हणत ती ताडताड आत निघून गेली.

शंतनूच्या घरी त्याच्या आईबाबांनी संमती दिली. त्याचं सुख तेच त्यांचं सुख होतं. आयुष्यभर तिच्याशी तुला संसार करायचा आहे अस्सं त्यांचं म्हणणं होतं. आईची धुसफूस, रागराग, अबोला, सतत...

वडिलांना कळले तर काय होईल हे भावनिक ब्लॅकमेलिंग. मी एका भयानक चक्रव्यूहात गरगरत होते. बाहेर येण्यासाठी धडपडत होते. शंतनू समजूत काढत होता. तो मला, तू बोलत राहा. समजावून सांगत राहा म्हणायचा. मलाही आईला कधीतरी माझे सुख, हित कळेल अशी आशा होती.

कौसल्या निमूटपणे माहेरी का गेली? तिने शंकरच्या लग्नाला विरोध का केला नाही. ती लग्नाची बायको होती. दुसरीबाई तर बायको होऊच शकत नाही. पोलिस व कायदा त्यावेळीच वापरला असता तर ही एकटीची वणवण वाट्याला आलीच नसती. शंकर कदाचित निवळला असता. तिला स्वीकारले असते. कदाचित मूलही झाले असते. आज कौसल्याची चिडचिड होतेय. परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेली ती खूप बोलतेय. भांडतेय. पण, एकटेपण काही संपत नाही. माझे एकटेपण मी आतल्या आत शोषून घेतेय. पूर्वीची बडबडी मी अबोल झालेय. आतल्या आत मिटून गेलेय. समोरच्या माणसाशी बोलताना मला शब्द शोधावे लागतात. शब्द सापडले नाहीत की मी अबोल होऊन जाते. समोरच्या माणसाचे बोलणे सहन करत राहते. शंतनू एवढा हाकारत असताना मी का गेले नाही. मी निमूटपणे आईचे दडपण सहन का करत राहिले. कौसल्यात व माझ्यात काहीच फरक नाही? कौसल्याच्या त्यावेळच्या गप्प बसण्यावर मी हळहळते. वकिलांनी तिला एवढे फसवेपर्यंत ही काय करत होती असं वाटते. परंतु माझ्या गप्प बसण्यावर काय? माझ्या आईनं माझ्याशी खेळलेल्या खेळांचे काय? कौसल्या व मी एका पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या बळी ठरलो.

कौसल्या परत एकदा घाण्याला जुंपली गेली. आईवडील, भाऊवहिनी, शेजारीपाजारी या साऱ्यांच्या बोचऱ्या नजरा तिला वांझ व परित्यक्ता म्हणून हिणवत होत्या. कौसल्या दिवस दिवस दुसऱ्याच्या शेतावर काम करून पैसा कमावायची. तरी सुखाचा घास मिळत नव्हता. घरात सतत भांडणे व्हायची. सगळेच एका बाजूला व्हायचे व तिला एकटी पाडायचे. यातूनच ती भांडकुदळ झाली. धाकटी बहीण मुंबईत दिली होती. ती एकदा माहेरी आली होती. कौसल्याला म्हणाली, ‘कशाला राहतेस यांच्या जाचात, चल मुंबईत.’ अन्‌ बहिणीबरोबर कौसल्या मानखुर्दला आली. बहिणीच्या शेजारीच झोपडे भाड्याने घेतले. बहिणीने लगेच कंपनीत कामाला लावले. वाशीला ए.पी.एम.सी. मार्केटमध्ये पॅकिंगचे काम मिळाले. तीन हजार पगार होता. त्यापेक्षा अनेक मैत्रिणी मिळाल्या. पॅकिंग करताना गप्पांना ऊत यायचा. वनितामॅडम त्यांचा पगार करायच्या. एकदा कौसल्याला म्हणाल्या,

‘‘कौसल्या मला घरकामाला बाई हवीय.’’

‘‘काय काम आहे.’’

‘‘अग, सगळंच काम आहे. भांडी, लादी, भाजी निवडणं, पोळ्या... बघ ना एखादी विश्वासातली बाई.’’

‘‘किती वाजता.’’

‘‘सकाळी लवकरच. मी इकडं यायच्या आधी काम उरकलं पाहिजे.’’

‘‘मी आहे की मग. सकाळी लवकर येईन, तुमचं काम उरकीन अन्‌ इकडं येईन. तुम्हाला चालत असेल तर बघा.’’

‘‘अग, असं काय बोलतेस. तूच माझ्या डोक्यात होतीस, परंतु विचारायचं कसं ते कळेना.’’

कौसल्या वनितामॅडमच्या घरात छानच रुळली. कौसल्याचा भूतकाळ ऐकून त्या अस्वस्थ झाल्याच. तिला त्यांच्या ओळखीतल्या एका वकील बाईकडेही पाठवले. कौसल्या ॲड. नंदिताला भेटायला गेली. वनिताने फोनवरून कौसल्याविषयी सर्व सांगितले होतेच. कौसल्याला नवऱ्याकडून पोटगी मिळेल असे नंदिताने सांगितले. नंदिता नेरूळला राहत होती. बेलापूर कोर्टात केस टाकायचे ठरले. कौसल्याने मानखुर्द सोडले. वाशीला उच्चदाबाच्या विजेच्या तारांखाली खूप झोपड्या होत्या. सुमनबाईच्या मदतीने कौसल्या तिथे राहायला आली. महिन्याला कौसल्या कामाचे खाडे करून कोर्टात जायची.

अडाणी कौसल्याला नंदिताने किती फसवावे याला सीमाच नाही. दुर्दैवाने वनिता खारघरला राहायला गेली. कौसल्या कोर्टाच्या चकरा घालत होती. वनिताने एकदा कौसल्याला गाठून केस कोठपर्यंत आलीय असे विचारले तर कौसल्या म्हणाली, 'नवरा एकदाच कोर्टात आला व तू घरी चल परत. तुला सांभाळतो म्हणतोय.' कौसल्याला माहीत होते. पैसे द्यायचे नसल्याने तो हे सगळे बोलतोय. परत जाऊन सवत व तिची मुले यांच्या धबडग्यात तिचे पोतेरे होणार. कौसल्याने नाही म्हणून सांगितले. नंदिता हॉस्पिटलमध्ये होती. ब्लड कॅन्सर झालाय व उपचार चालू आहेत असे तिने सांगितले. पण कौसल्याची केस तिचा नवरा व्यवस्थित बघेल, वनिताने बिनधास्त राहावे असे म्हणाली. वनितालाही खरे वाटले. तिच्या हस्तक्षेपानंतर आठ महिन्यांची चार हजार रुपये पोटगी कौसल्याला मिळाली. कौसल्या खुश होती. वनिताला प्रमोशन मिळाले, ती मार्केटिंगला गेली. तिची व कौसल्याची भेट क्वचित व्हायची. असाच जवळजवळ चार वर्षांचा कालावधी गेला. अन् अचानक कौसल्याचा फोन खणखणला. फोनवर ती रडत होती. वनिताने तिला भेटायला बोलावले. रजिस्टर ए.डी.ने आलेले ते पत्र पाहून वनिताही चक्रावली. एक्सपार्टी घटस्फोट झाला होता.

''नंदिताला भेटलीस?'' वनिता.

''अवो, त्या भेटतच नाहीत. त्यांच्या नवऱ्याला भेटले तर तो म्हणाला, 'घटस्फोट झाल्यावर आता कोठली पोटगी मिळणार. केस संपली की तुझी आता.' अन् तरातरा निघूनच गेला.'' वनिताला कायद्याची भाषा कळत नव्हती. पण काहीतरी भयंकर गडबड आहे हे मात्र तिच्या लक्षात आले. गेल्या पाच वर्षांत चार हजार मिळाले. त्यातलेही दोन हजार वकिलांनी घेतले. कामाचे खाडे करून कौसल्या कोर्टात जायची. पाच वर्षांत किती पैसा खर्च झाला याला गणतीच नाही. एका निष्पाप जिवाला या चक्रात आपण उगीचच अडकवले या भावनेने घेरलेल्या वनिताने एका होतकरू, नुकतीच कायद्याची परीक्षा पास झालेल्या मुलीला– मोहिनीला – गाठले. ती म्हणाली, 'वकिलाकडून सर्व पेपर आणून द्या मी काहीही पैसे न घेता केस चालवते.'

शंतनू मुंबईत आला होता. त्याचा चांगलाच जम बसला होता. मी कोल्हापुरात नुसतीच भरकटत होते. आईबाबांनी आणलेली मुले नाकारत होते. आईला उपरती होईल व ती लग्नाला संमती देईल ही वेडी आशा होती. एकुलत्या एक मुलीची आयुष्याची विखुरलेली ही लक्तरे आज आईबाबा उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. हतबल आहेत, पण त्यावेळी पोटच्या मुलीशी खोट्या प्रतिष्ठेपायी जे खेळ खेळले ते मी कशी विसरू.

एकदा तरी शंतनूला भेट; या माझ्या आग्रहाला आई तयार झाली. परंतु तिच्या मनात काय शिजत होते याचा थांगपत्ता लागू दिला नाही. शंतनू व त्याचे आईबाबा आले तो दिवस माझ्या आयुष्यातील आगीत होरपळणाऱ्या फिनिक्स पक्ष्याचा होता. मी खूप आनंदात होते. रुबाबदार, बोलघेवडा शंतनू आईबाबांना नक्की आवडेल असे मला वाटले. तो दिवस आठवला तरी मला मनाच्या खोल देठापासून डचमळून येते. डोके भिरभिरायला लागते. प्रचंड अशा अस्वस्थेच्या भोवऱ्यात मी गरगरायला लागते. एक तासाच्या भेटीत इतका अपमान, इतकी अवहेलना झाली की मला मिटून जावे वाटले. शंतनूशी आईबाबा एक शब्दही बोलले नाहीत. त्याच्याकडे बघायलाच तयार नाहीत. त्याच्या आईला इतक्या तिरकस, विचित्र प्रश्नांचा सामना करावा लागला. शंतनूच्या आईने पेढ्याचा पुडा माझ्या हातात देऊन देवापुढे ठेवायला सांगितला. आई म्हणाली, 'तुम्ही लग्न ठरले असं समजू नका हं.'

शंतनूच्या आईचा चेहरा खर्रकन उतरला.

'छे छे, आमच्याकडे ही पद्धतच आहे.' असे काहीसे गुळमुळीत बोलून ती हॉलमध्ये आली. त्यानंतर हॉलमध्ये एक सन्नाटा भरून राहिला. शंतनु खाणाखुणा करून आईला 'काय झालं?' असे विचारू लागला. त्याचे आईबाबा घरातून बाहेर पडले त्यावेळी आईचे डोळे पाण्याने डबडबले होते. शंतनूने पाठ फिरवली ती फिरवली. त्याआधी माझी आर्त आळवणीही केली. 'तू ये. माझ्या घराचा कणकण तुझ्या स्वागताला आसुसलेला आहे. येताना मात्र मागील पानं मिटून यावी लागतील.' पण मला आईने आखलेली लक्ष्मणरेषा ओलांडायचे धाडस झाले नाही.

वनिता अन् मी या टप्प्यावर भेटलो. वनिता तशी धाडसीच म्हणायची. तिने कोर्टात नंदिताच्या नवऱ्याला गाठून पेपर मागितले. त्याने थातुरमातूर काहीतरी पेपर दिले. मोहिनीनेही बऱ्यापैकी वनिताला घुमवले. कौसल्याकडून वनिताच्या अपरोक्ष २००० रुपये घेतले ते वेगळेच. मोहिनीने वनिताला उल्हासनगर कोर्टात गेल्यास सर्व चित्र स्पष्ट होईल असे सांगितले. बिचारी वनिता रजा काढून कौसल्याला घेऊन उल्हासनगरलाही गेली. अन् धक्क्यावर धक्के बसत गेले.

कौसल्याचा एक्सपार्टी घटस्फोट झाला होता. ती आता पोटगी मागू शकत नव्हती. त्यासाठी या कोर्टातून दोन पत्रे पाठवण्यात आली होती. परंतु ती परत आली होती. मागील महिन्यात कौसल्याच्या वकिलांना पत्र पाठवले होते. ज्यावर कौसल्याचा अंगठा होता. त्यानंतरही उल्हासनगरच्या एका पेपरमध्ये घटस्फोटाची नोटिस छापली होती. जिला कौसल्याने पंधरा दिवसांच्या आत विरोध करायचा होता. तो विरोध न

झाल्याने एक्सपार्टी घटस्फोटाची ऑर्डर काढण्यात आली. जी कौसल्याला मिळेल याची सर्व तरतूद करण्यात आली होती.

कायद्याबाबत अनभिज्ञ असलेली वनिता चक्रावली, चिडली. अंगठाबहाद्दर कौसल्या पेपर कशी वाचेल, तोही उल्हासनगरचा! पत्रे परत गेलीच कशी? कौसल्याचे वकील असे का वागले? कौसल्याकडून संमती अंगठा घेताना एका अडाणी बाईला फसवले यासाठी त्यांचा जीव कळवळला नाही का? हे सारं दोन वकिलांच्या संगनमताने झाले. या साऱ्या कुटील कारस्थानात नंदिताच्या मिस्टरांनी किती पैशांची उलाढाल केली. कौसल्याच्या बनेल नवऱ्याने दोन्ही वकील विकत घेतले.

वनिता चार मैत्रिणींना घेऊन नंदिताच्या घरी धडकली. इतके दिवस धुमसत असलेला सारा आगलोळ रिता केला. मुर्दाड अशा त्याच्या चेहऱ्यावरची रेषही हलली नाही. उलट कौसल्याला पत्र वाचून दाखवल्याचा कांगावा त्यानं केला. खूप दंगा, आरडाओरडा करून, शिव्याशाप देऊन सारे बाहेर पडले. झालेले नुकसान भरून येणार नव्हते. वनिता आता सावध झाली.

मोहिनी सारखे नवनवीन पेपर मागायची व आता केसमध्ये काहीच करता येणार नाही म्हणायची. मोहिनीकडून सर्व पेपर काढून घेतले व ती कौसल्याला घेऊन माझ्याकडे आली.

''घटस्फोट झाला म्हणून काय झालं. पोटगीसाठी अर्ज करू या ना. चार वर्षांपूर्वी आठ महिन्यांची पोटगी दिलीय. त्यानंतर दिलीच नाहीय ना. तेव्हापासूनच वसूल करू. तत्काळ पोटगीसाठी लगेच अर्ज करते.'' मी.

वनिताच्या डोळ्यांत टचकन पाणी आले. तिने माझा हात हातात घेतला. अन् मग समविचारी न्यायासाठी झटणाऱ्या आमच्या दोघींची दाट मैत्री झाली. कौसल्या आमच्यातला दुवा होती.

मी, आई व बाबा यांच्यातली दरी आता न मिटणारी आहे. आईची जरब, भावनिक दबाव या साऱ्यांतून मी वयाच्या बत्तिसाव्या वर्षी पळ काढला. आज चाळिशीच्या टप्प्यावर उभी आहे. मी मुंबईत. आई-बाबा कोल्हापुरात. एक रुक्ष, ओलावा नसलेले नाते निभावतोय. आज वाटतेय मी अल्लड षोडशा असते तर नक्कीच शंतनूच्या हाकेला प्रतिसाद दिला असता. घर सोडले असते. पण, वयाच्या पंचविसाव्या वर्षी आलेला समजूतदारपणा मला नडला. आईवडिलांच्या प्रतिष्ठेचे पारडे जड झाले. केवळ जातीसाठी तिने माझ्या आयुष्याची होळी केली. मी बिनलग्नाची राहिलेय याचे तिला फारसे दुःख नाही. मी तिचा धर्म बुडवला नाही याचा मात्र आनंद आहे!

''ताई, मी जाऊ का आता.'' कौसल्या.

''का ग?''

''आणखी काय काम आहे का? ओट्यावरचं सारं आवरलं. भांडी घासलीत. तुमचे बाथरूममध्ये पडलेले कपडेबी धुऊन टाकले. झाडलोट फरशीबी झालीय. महत्त्वाचं म्हणजे ओट्यावर चपाती, भात व बटाट्याचा रस्सा करून ठेवलाय. ते सारं खायचं आहे.''

''अग, तुला कोणी सांगितलं या उचापती करायला,'' मी कातावलेच.

''मला कशाला कोण सांगायला पाहिजे. मी करणार!'' कौसल्या माझ्या अंगावरच ओरडली.

''ताई, आरशात बघा एकदा, कशा झालात. वाळलेली काकडी जणू. कसला एवढा घोर आहे. जिवाला खावं, प्यावं, आनंदात राहावं. एवढं पुण्यकर्म करताय. देवाचं काम करताय, माझ्यासारख्या किती जणींचे आसू पुसलेत. अन् तुम्हीच सारख्या अशा सुकलेल्या राहिलात तर माझ्या जिवाला बरं वाटत नाही. ताईचं दुःख कसं वाटून घेऊ, तिला कसं हसवू, आनंदात पाहू असं वाटतं बघा. ताई, सगळ्या जगाला धडे देता अन् तुम्हाला कोण शिकवणार, चला उठा बघू आता. तोंड धुवा. मी जेवायला वाढते.'' कौसल्याने मला हाताला धरून उठवले. कौसल्याच्या शब्दांनी मन आतून भरून आले. किती छोट्या ओलाव्याची आपणाला गरज असते. खूप उत्साह मनात दाटून आला. मी दोघींसाठी ताटे घेतली. लोणचे, पापड काहीन् बाही काढले. खूप बडबड करत जेवू लागलो. कौसल्याला कोर्टातले किस्से सांगून हसवत होते. तिचे ते गडगडाटी हास्य बघूनच मला हसू फुटत होते. आम्ही दोघी बाहेर आलो. जादूच झाली जणू. मनाचा सारा थकवा दूर झाला. खूप काही करायचे आहे या आठवणींची लड उलगडत गेली. मी वनिताला फोन केला. माझा आनंद तिच्यापर्यंत पोचला.

''बोल तू, क्रांती बोल. तुला ऐकायला माझे कान उत्सुक आहेत. तू बोलायला लागलीस की मला बूस्टर डोस मिळतो.''

''माझं व कौसल्याचं आयुष्य समांतर आहे ना? अतिशय जिवाभावाच्या रक्ताच्या माणसांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आम्हाला वापरलं. आमचा बळी घेतला. आयुष्य वैराण वाळवंट करून टाकलं. जीवन जगण्याचा रसच शोषून घेतला. खूप सारं नीरस वाटतं. एकाकी संघर्ष वाटतो. कामात असते तेव्हा सारं खोलवर एका मनाच्या कप्प्यात दबून बसतं ग? आजचा दिवस फार भयानक होता ग! कौसल्या नसती तर मी माझ्या जिवाचं काय केलं असतं माहीत नाही. एकटेपणा घेरून टाकतो. मी खूप आत आत जाते. अपमान, फसवणूक, राग, स्वतःची चीड अनेक अनेक भावना एकत्र येऊन क्षोभ

होत राहतो. पण खरं सांगू, आज शेवटचं मनाला शुद्ध करून घेतलं. कौसल्यानं जो यातनांचा प्रवास केलाय, जी वंचना तिच्या वाट्याला आलीय ती फार खडतर आहे. हे सारं गिळून ती ज्या हिमतीनं प्रवास करतीय तो शिकण्यासारखा आहे. माझ्याकडे पैसा आहे. घर आहे, प्रतिष्ठा आहे तरी मी सारखी मिटलेली असते. कौसल्याला काय सुरक्षितता आहे, कोणाचा आधार आहे, पण चेहऱ्यावर सतत हसू असतं. वनिता, एक सांगू, आता या वळणावर मी साऱ्यांना क्षमा केलीय. माझी आता आयुष्याबद्दल काहीच तक्रार नाही. कौसल्या व तुझ्यासारखी मैत्रीण हे माझं फार मोठं संचित आहे. माझे संकल्प मला आता सिद्धीला न्यायचे आहेत. तू, मी, कौसल्या आपण एक 'आर्त' नावाची चळवळ उभी करू. कौसल्यासारखे अनेक हात येऊन मदत करतील. कौसल्या अडाणी असेल पण विचारांची पक्की आहे. जीवनावर तिचे प्रेम आहे. विश्वास आहे. या क्षणी मलाही जीवन खूप सुंदर वाटतंय. हा क्षण मला तुझ्याशी वाटून घ्यायचा आहे. आता मी भूतकाळ पुसून टाकतीय.''

''अग, हो हो, दम घेतेस की नाही.'

वनिता जोराजोरात हसत म्हणाली.

''घेतला, थांबले. पण तू उद्या सकाळी ऑफिसला जाण्यापूर्वी ये. कौसल्याला पण थांबून घेते.'' मी.

कौसल्या मांडी ठोकून हनुवटीवर दोन्ही हातांची घडी टेकवून एकटक माझ्याकडे पाहत अचंब्यात माझं संभाषण ऐकत होती. डोळ्यांत कौतुक होते.

''कौसल्या.''

''कळलं. घालते माझी पथारी इथं. निवांत झोपा आता. सहाच्या ठोक्याला तोंडावर पाणी मारून उठवणार बघा. वनिताताई लई कडक आहेत. त्या यायच्या आत एकदम तयार हवं.''

मी खळखळून हसले. मऊशार दुलई तोंडावर ओढून घेतली. खोल, खोल, शांत, शांत झोपेच्या अधीन झाले.

– वृषाली मगदूम
vamagdum@gmail.com

ग्रंथाली

## क्लाउड डायरी

### सुलक्षणा जोगळेकर





हवाईसुंदरी बनण्याचे एका मुलीचे स्वप्न, तिचे अथक प्रयत्न आणि इच्छाशक्ती, अभिनयाच्या नव्या धावपट्टीवरून झेप घेण्याची तयारी... चौदा वर्षांच्या कारकिर्दीतल्या अनुभवांना ती कागदावर उतरवते आणि त्यातून आकाराला येतो 'ढगातल्या आठवणींचा' हा संग्रह!

**मूल्य ३०० रु. । सवलतीत १८० रु.**

## ग्रंथदूत

### जॉन गोन्सालविस




'ग्रंथदूत' हे जॉन गोन्सालविस यांचे नवीन पुस्तक. या पुस्तकाचे वाचन केल्याने वाचनसंस्कारासाठी आपण काहीतरी करावे, ही जाणीव वाचकांच्या मनात निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

– श्री. सुशीलकुमार शिंदे

**मूल्य २५० रु. । सवलतीत १५० रु.**



माधव ज. जोशी

# औद्योगिक क्षेत्रातील बदलते नातेसंबंध

**हे बदलते नातेसंबंध उद्योगजगतातील एका नव्या पहाटेची नांदी आहे – जिथे मानवी मूल्ये आणि तांत्रिक प्रगती यांचा सुंदर मेळ साधला जाईल, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतांना पूर्ण वाव मिळेल, आणि जिथे आपण सर्व जण एकमेकांना समजून घेऊन, एकमेकांशी सहकार्य करत, एका उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करू.**



***वेगाने*** बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे उद्योगांतील मानवी नातेसंबंध झपाट्याने बदलत आहेत. गेल्या दीड शतकातील स्थित्यंतराचा धावता आढावा आपण घेणार आहोत.

### शोषणयुग

इसवीसन १८५० ते १८९० या काळात औद्योगिकीकरणामुळे रेल्वे बांधकाम, कोळसा, कापूस आणि ज्यूट उद्योग आले, परंतु ब्रिटिश आणि भांडवलदार वर्गाकडून तीव्र शोषणही झाले. स्वस्त ब्रिटिश औद्योगिक वस्तूंच्या आगमनामुळे स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पारंपरिक उपजीविका व्यवस्था विस्कळीत झाली आणि अनेक कारागीर आणि विणकर भूमिहीन मजुरीकडे ढकलले गेले.

भारतातील शेती त्या काळी समृद्ध होती. देशाच्या अन्नधान्याची गरज भागवत होती. मात्र ब्रिटिश उद्योगांना लागणाऱ्या नीळ, अफू आणि कापूस या नगदी पिकांवर शेतकऱ्यांनी लक्ष केंद्रित केल्यामुळे देशाचे नुकसान झाले. अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला. १८६८ ते १८९९ या काळातील अनेक दुष्काळ; तसेच, प्लेग, स्पॅनिश फ्लू, मलेरिया आणि कॉलरा यांच्या लागोपाठच्या साथींमुळे या तीन दशकांत अंदाजे पाच कोटी भारतीय मृत्यू पडले, तेवढेच देशोधडीला लागले. मिळेल ते काम करू लागले. स्त्रिया आणि मुलेदेखील बारा, चौदा तास काम करत, कमी पगार मिळे, आणि त्यांना असुरक्षित परिस्थितीला सामोरे जावे लागत होते. 'कामगारहक्क' ही संकल्पना जवळजवळ अस्तित्वातच नव्हती. मालक आणि कामगारसंबंध फक्त शोषणावर आधारीत होते.

याला एकमेव अपवाद जमशेटजी टाटा यांची नागपूरमधील एम्प्रेस मिल्स होती. आठ तास काम, भविष्यनिर्वाह निधी, अपघात नुकसानभरपाई, पूर्ण हजेरीसाठी वेगळी रक्कम आणि सुखदायी कारखाना वातावरण या बाबी कोणतेही बंधनकारक कायदे नसताना जमशेटजी देत असत.

तत्कालीन शोषण परिस्थितीला विरोध म्हणून, कामगारांनी चांगला पगार, मर्यादित कामाचे तास आणि कारखान्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी एकत्र येणे सुरू केले. या काळात महत्त्वपूर्ण कामगार चळवळी आणि संप झाले, ज्यामुळे हळूहळू श्रम कायदे आणि नियम सुधारले.

### युद्धोत्तर काळ

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात (१९४५ नंतर) अनेक बदल झाले. अनेक देशांनी, विशेषत: पाश्चिमात्य देशांनी, समाजसुरक्षा, आरोग्यसेवा आणि बेरोजगारी लाभ यांचा समावेश असलेल्या कल्याणकारी धोरणांचा अवलंब केला, ज्यामुळे तेथील कामगारांचे जीवनमान सुधारले. हळूहळू तो परिणाम भारतापर्यंत पोचला. श्रमिक संघटनांची ताकद वाढली. ज्यामुळे चांगले पगार, लाभ आणि नोकरीची सुरक्षा यांची खात्री पुरवणाऱ्या सामूहिक करारांना (collective bargaining) मान्यता मिळाली आणि कामगारांचे जीवनमान थोडेफार सुधारले.

### कौटुंबिक नातेसंबंध

स्वातंत्र्यानंतर पुढच्या तीन दशकांमध्ये भारतात अनेक लघु, मध्यम आणि मोठे उद्योग निर्माण झाले. लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये मालक आणि कर्मचारी यांचा घनिष्ठ संबंध येत असे. अनेक उद्योगांमध्ये उपाहारगृहात एकाच प्रकारचे जेवण बनवले जाई आणि मालकसुद्धा अनेकदा तिथे जेवत असे. दसऱ्याच्या आदल्या दिवशी कारखान्यात सत्यनारायणाची पूजा असे. नवीन लग्न झालेला कामगार पत्नीसह पूजेला बसे आणि मालक स्वतः देवदर्शनाला येत असे. सांस्कृतिक कार्यक्रम असत त्यांनाही कामगार आणि मालक यांचे कुटुंबीय हजर असत. कंपनीच्या खर्चाने कर्मचाऱ्यांच्या वार्षिक सहली असत. मालक थोडा वेळ तरी उपस्थित असत. कठीण प्रसंगी अनेक कामगार मालकाला साथ देत असत. कंपनी लहान असताना लहानसहान गैरसोयींकडे काणाडोळा करत असत. मीदेखील एक कनिष्ठ कर्मचारी आणि नंतर वरिष्ठ अधिकारी म्हणून हे सौहार्दपूर्ण वातावरण तब्बल सतरा वर्षे (१९७३ ते १९९०) अनुभवले आहे.

काळाबरोबर आज या सर्व बाबी स्मृतींचा भाग बनल्या आहेत.

### बदल

उद्योगांचा विस्तार झाला तसतसा व्यावसायिक व्यवस्थापकाच्या अनेक श्रेणी (प्रेसिडेंट, व्हाइस प्रेसिडेंट) कंपनीतील विविध कार्ये (function) सांभाळू लागल्या आणि ते व्यवस्थापकच कंपनीचा दृश्य चेहरा बनले. मालक आणि कामगार यांच्यामध्ये हा एक थर किंवा अडथळा तयार झाला. भर म्हणून विदेशात उच्च शिक्षण घेतलेली मालकांची नवीन पिढी सत्तेवर आली आणि कर्मचारी हे विस्तारीत कुटुंबाचा घटक आहेत या कल्पना त्यांना खुळचट वाटू लागल्या. नवीन पिढीतील कर्मचारीसुद्धा नोकरी हे पोट भरण्याचे साधन आहे, आस्थापनेबद्दल जिव्हाळा किंवा निष्ठा बाळगण्याचे काही कारण नाही, तो एक व्यवहार आहे, या भावनेने वागू लागले. याला काही अपवाद आजही आहेत, जिथे कर्मचाऱ्यांना आस्थापनेबद्दल किंवा समूहाबद्दल अभिमान आणि आपुलकी वाटते. पूर्वीच्या काळी कर्मचाऱ्यांना असा अभिमान आणि आपुलकी कोणतेही प्रशिक्षण दिल्याशिवाय जात्याच वाटत असे.

### युनियन आणि नातेसंबंध

या नातेसंबंधांत युनियनचा मोठा वाटा होता. भारतात १८८०पासून युनियन आहेत, पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत बहुतेक युनियन पुढारी स्वातंत्र्यचळवळीशी जोडलेले होते. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस (नऊ वर्षे टाटा स्टील युनियनचे अध्यक्ष), सरदार पटेल हेही कामगार पुढारी होते.

स्वातंत्र्यानंतर १९७०पर्यंत कामगार पुढारी सामूहिक वेतन करार, कामगार बडतर्फी किंवा टाळेबंदी यांसारख्या अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर इतर बाबतीत ढवळाढवळ करत नसत. मात्र १९७० ते १९८० या दशकात दहशत निर्माण करून युनियन ताब्यात घेण्याचे प्रकार सुरू झाले आणि मालक आणि कामगार यांच्यातील कौटुंबिक संबंध कमी होत गेले. मालकवर्ग कामगारांपासून दूर गेला.

### मुक्त अर्थव्यवस्था

१९९१ साली भारतात सुरू झालेल्या उदारीकरण (Liberalisation), खाजगीकरण (Privatisation), आणि जागतिकीकरण (Globalisation) म्हणजे LPG धोरणांनी, तंत्रज्ञानातील प्रगती आणि देशातील आर्थिक व सामाजिक धोरणांतील बदलांनी उद्योगातील नातेसंबंधांचे व्यापारीकरण केले.

जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून, महत्त्वपूर्ण बदल झाले.

जागतिकीकरण : जागतिक व्यापार आणि गुंतवणुकीच्या विस्तारामुळे उत्पादन नोकऱ्या कमी खर्चाच्या देशांमध्ये हलवण्यात आल्या. यामुळे विकसित देशांमध्ये नोकऱ्या कमी झाल्या आणि पगार स्थिर झाला, तर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये औद्योगिक विकास झाला.

तंत्रज्ञानातील प्रगती : ऑटोमेशन आणि डिजिटलायझेशन यांनी उद्योगांमध्ये बदल घडवून आणला, ज्यामुळे शारीरिक श्रमाची मागणी कमी झाली आणि कुशल कामगारांची गरज



नरसिंहराव आणि मनमोहनसिंग (१९९१)

वाढली. या बदलामुळे कुशल आणि अकुशल कामगारांमध्ये दरी निर्माण झाली, उत्पन्नविषमता वाढली.

या बदलांमुळे गेल्या तीन ते चार दशकांमध्ये, श्रमिक-मालक यांच्यातील संबंध झपाट्याने बदलले आहेत.

नवउदार आर्थिक धोरणे : उद्योगवाढीसाठी कमी नियमन, खासगीकरण आणि कमी सरकारी हस्तक्षेप ह्या बाबी आवश्यक आहेत यांचा प्रचार आणि पुरस्कार करण्यात आला, ज्यामुळे श्रमिक संघटना आणि सामूहिक करार कमी झाले. त्यामुळे नोकरीची असुरक्षा वाढली आणि कामगारांचे लाभ कमी झाले.

गिग अर्थव्यवस्थेचा उदय : गिग अर्थव्यवस्था, जिच्यात अल्पकालीन करार आणि फ्रीलान्स काम हे सर्रास चालते, उदयास आली, ज्यामुळे लवचीकता मिळाली परंतु कामगारांसाठी नोकरीची सुरक्षा, लाभ आणि संरक्षण कमी झाले.

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे औद्योगिक क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. ऑटोमेशन आणि रोबोटिक्समुळे अनेक हातमजूरीच्या अकुशल नोकऱ्या कमी झाल्या आहेत, परंतु यामुळे उच्च-तंत्रज्ञान व विशेष कौशल्य क्षेत्रांत नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. डिजिटल क्रांतीमुळे व्यापार प्रक्रियांमध्ये मोठा बदल घडला आहे.

कामाच्या पर्यावरणातील बदल : कामाचे स्वरूप अधिक अस्थिर स्वरूपाच्या रोजगाराकडे वळले आहे, ज्यामध्ये अर्धवेळ, तात्पुरते आणि कंत्राटी काम समाविष्ट आहे. यामुळे अनेक कामगारांसाठी नोकरीची सुरक्षा आणि लाभांचा अभाव निर्माण झाला आहे.

शेअरहोल्डर मूल्यावर लक्ष केंद्रित करणे : अनेक कंपन्यांनी शेअरहोल्डर मूल्य वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले. यामुळे नफा वाढवण्यासाठी खर्च कमी करण्याच्या उपायांमध्ये श्रमिकांवरील खर्च कमी करणे आणि कामाचे आउटसोर्सिंग करणे यांचा समावेश आहे.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उद्योग क्षेत्रातील संबंध मोठ्या प्रमाणावर बदलले आहेत. अनेक कंपन्यांनी उत्पादन व सेवांचे पुरवठादार राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे शोधले आहेत. यामुळे उत्पादनखर्च कमी झाला आणि नफ्यात वाढ झाली. उत्पादनखर्च कमी झाल्याने ग्राहकांना ते फायद्याचे ठरले, परंतु उत्पादनासारख्या उच्च खर्चाच्या क्षेत्रांतील नोकऱ्या कमी झाल्या.

**आजच्या उद्योगांतील बदललेले नातेसंबंध**

कालच्या कारखान्यांच्या धुरातून आजचे डिजिटल युग उदयाला आले आहे. या बदलत्या परिस्थितीत, मानवी नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत चालले आहे.

१. डिजिटलयुगातील नवे बंध : डिजिटल क्रांतीने उद्योगांमध्ये नव्या संबंधांना जन्म दिला आहे. व्हर्च्युअल टीम, रिमोट वर्क, आणि ग्लोबल कोलॅबोरेशन यांनी जगभरातील कर्मचाऱ्यांना एकाच डिजिटल छताखाली आणले आहे. आता कार्यालयीन मैत्री केवळ कॉफी

मशीनभोवती नव्हे, तर व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून फुलत आहे.

२. विरघळणाऱ्या श्रेणी : कार्यालयीन श्रेणींचा धाक नाहीसा होत आहे. वरिष्ठ आणि कर्मचारी यांच्यातील अंतर कमी होत असून, सहकार्य आणि खुल्या संवादाचे वातावरण निर्माण होत आहे.

३. तंत्रज्ञान आणि मानवी स्पर्श यांचा संगम : तंत्रज्ञान आणि मानवी कौशल्ये एकत्र येऊन उद्योगांमध्ये नवीन चमत्कार घडवत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मानवी बुद्धिमत्ता यांच्या सहकार्यातून नवनवीन शक्यता उदयाला येत आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांमधील नातेसंबंध अधिक गुंतागुंतीचे, तरी त्याचबरोबर अधिक रोमांचक आणि फलदायीदेखील होत आहेत.

४. कौशल्यांची नवी परिभाषा : उद्योगांमध्ये कौशल्यांची व्याख्या बदलत आहे. तांत्रिक ज्ञानाबरोबरच भावनिक बुद्धिमत्ता, अनुकूलनक्षमता (adaptability), आणि जीवनभर शिकण्याची क्षमता या गुणांना महत्त्व प्राप्त होत आहे. या नव्या कौशल्यांमुळे कर्मचाऱ्यांमधील नातेसंबंध अधिक सखोल आणि अर्थपूर्ण होत आहेत.

५. कार्यसंस्कृतीचे नवे आयाम : आधुनिक कार्यसंस्कृतीत विविध विचार, संस्कृती आणि दृष्टिकोन एकत्र येत आहेत. विविधतेला प्रोत्साहन, समावेशकता, आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांना महत्त्व दिले जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकमेकांबद्दल आदर आणि समजूतदारपणा वाढत आहे.

६. कामाच्या वेळेची लवचीकता : फ्लेक्सी टायमिंग, वर्क फ्रॉम होम, आणि कॉम्प्रेस्ड वर्क वीक यांसारख्या संकल्पनांमुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात समतोल साधण्यास मदत होत आहे. यामुळे कुटुंब आणि कार्यालय यांच्यातील सीमारेषा अधिक पारदर्शक होत आहे.

७. नेतृत्वशैलीतील परिवर्तन : आधुनिक नेतृत्वशैली कर्मचाऱ्यांच्या क्षमतांवर विश्वास ठेवून त्या वाढण्यास प्रोत्साहन देते. आज्ञाधारक नेतृत्वाऐवजी सहभागी नेतृत्व, मेंटरिंग, आणि कोचिंग यांना महत्त्व दिले जात आहे. यामुळे बॉस आणि कर्मचारी यांच्यातील नातेसंबंध अधिक सौहार्दपूर्ण आणि उत्पादक होत आहेत.

८. मुक्त ज्ञानगंगा : ज्ञान व्यवस्थापन प्रणाली, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म, आणि इंटरनल सोशल नेटवर्क यांच्या माध्यमातून कर्मचारी सहजपणे माहिती आणि अनुभव शेअर करू शकतात. यामुळे सहकाऱ्यांमध्ये परस्परांकडून शिकण्याची आणि एकमेकांना मदत करण्याची संस्कृती वाढीस लागली आहे.

९. कर्मचारी कल्याणाचे नवे आयाम : आधुनिक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेत आहेत. वेलनेस प्रोग्राम, स्ट्रेस मॅनेजमेंट वर्कशॉप, आणि काउन्सेलिंग सेवा यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या एकूण कल्याणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आपुलकी आणि एकमेकांबद्दल काळजी वाढत आहे.

१०. ग्लोबल टीमचे आव्हान आणि संधी : जगाच्या विविध कोपऱ्यांतून एकत्र आलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यसंघ असतात त्यामुळे सांस्कृतिक विविधता, भाषिक आव्हाने, आणि वेळेच्या फरकामुळे येणाऱ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. परंतु याच विविधतेतून नवनवीन कल्पना आणि दृष्टिकोन जन्माला येत आहेत, जे कंपनीच्या वाढीसाठी उपयुक्त ठरत आहेत.

११. फीडबॅक संस्कृतीचा उदय : पूर्वी फीडबॅक हा वार्षिक कर्मचारी मूल्यांकनापुरता मर्यादित होता. आता तो सतत चालणाऱ्या संवादाचा भाग बनला आहे. ३६० डिग्री फीडबॅक, पीअर रिव्ह्यू, आणि रियल-टाइम परफॉर्मन्स ॲनालिटिक्स यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल वेळोवेळी माहिती मिळते. यामुळे कर्मचारी आणि मॅनेजर यांच्यात अधिक खुला संवाद होतो.

१२. उद्योजकता : आधुनिक कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना केवळ कामगार म्हणून न पाहता, त्यांच्यातील उद्योजक वृत्तीला प्रोत्साहन दिले जात आहे. इंट्राप्रेन्योरशिप प्रोग्राम, इनोव्हेशन लॅब, आणि हॅकाथॉन्स यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मालकीची भावना वाढत आहे आणि त्यांचे कंपनीशी असलेले नाते अधिक दृढ होत आहे.

१३. सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवेदनशीलता : आधुनिक उद्योगांमध्ये नफा कमावणे हे एकमेव ध्येय राहिलेले नाही. आता कंपन्या सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संरक्षण यांकडेही लक्ष देत आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आपल्या कंपनीबद्दल अभिमान वाढत आहे आणि ते समाजासाठी काहीतरी चांगले करण्याच्या भावनेने प्रेरित होत आहेत.

१४. शास्त्रशुद्ध निर्णयप्रक्रिया : पूर्वी निर्णय घेताना अनुभव आणि अंतःप्रेरणा यांवर अवलंबून राहावे लागायचे.

आता डेटा ॲनालिटिक्स आणि बिग डेटाच्या युगात, निर्णयप्रक्रिया अधिक वैज्ञानिक आणि पारदर्शक झाली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यास आणि डेटावर आधारित सूचना देण्यास प्रोत्साहन मिळत आहे.

१५. गिग इकॉनॉमी आणि फ्रीलान्सिंग : पारंपरिक नोकरीच्या संकल्पनेला आव्हान देत, गिग इकॉनॉमी आणि फ्रीलान्सिंगचा उदय झाला आहे. यामुळे कंपन्या आणि कर्मचारी यांच्यातील संबंध अधिक लवचीक झाले आहेत, परंतु त्याचबरोबर अधिक अस्थिरदेखील.

१६. मानवी संसाधन विभागाची बदलती भूमिका : मानवी संसाधन विभाग हा केवळ प्रशासकीय कामांपुरता मर्यादित होता. आता तो कंपनीच्या रणनीतीच्या निर्णयप्रक्रियेचा महत्त्वाचा भाग बनला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या विकासावर, त्यांच्या कल्याणावर आणि कंपनीच्या संस्कृतीवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे.

१७. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सचा प्रभाव : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सच्या वाढत्या वापरामुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. हे जणू मानवी कामगारांना यंत्रांच्या रूपाने नवे सहकारी मिळाल्यासारखे आहे. यामुळे काही नोकऱ्या धोक्यात आल्या असल्या, तरी नव्या संधीही निर्माण होत आहेत. कर्मचाऱ्यांना आता या नव्या तंत्रज्ञानासोबत काम करण्याचे कौशल्य आत्मसात करावे लागत आहे, जे त्यांच्यातील नातेसंबंधांवर परिणाम करत आहे.

१८. कार्यस्थळावरील तणाव व्यवस्थापन : वाढत्या स्पर्धेच्या युगात, कार्यस्थळावरील तणाव हा एक मोठा आव्हान बनला आहे. कंपन्या आता या समस्येकडे गांभीर्याने पाहत आहेत. माइंडफुलनेस सेशन, योगासने क्लास, आणि कार्यस्थळावरील मनोरंजक उपक्रम यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमधील नातेसंबंध अधिक सकारात्मक आणि सहकार्यपूर्ण होत आहेत.

१९. कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे समर्थन : आधुनिक कंपन्या कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या समजून घेत आहेत आणि त्यांना पाठिंबा देत आहेत. मातृत्व आणि पितृत्व रजा, बालसंगोपन सुविधा आणि वृद्ध पालकांच्या काळजीसाठी सवलती यांसारख्या उपायांमुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात समतोल साधण्यास मदत होत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे कंपनीप्रती असलेले नाते अधिक दृढ होत आहे.

२०. नैतिकता आणि पारदर्शकतेचे महत्त्व : उद्योगजगतातील अनेक घोटाळ्यांनंतर, नैतिकता आणि पारदर्शकता यांचे महत्त्व वाढले आहे. कंपन्या आता नैतिक आचारसंहिता, व्हिसलब्लोअर संरक्षण, आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या उच्च मानकांवर भर देत आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना वाढत आहे.

उद्योगांमधील बदलते नातेसंबंध हे एका रंगीबेरंगी चित्रपटासारखे आहेत, ज्यात प्रत्येक फ्रेम नवीन आणि रोमांचक आहे. ऋतुचक्र फिरत राहते आणि निसर्ग नवनवीन रूपे धारण करतो, तसेच उद्योगजगतातील नातेसंबंधही सतत बदलत आणि विकसित होत आहेत. या बदलांमध्ये आव्हाने असली तरी त्यात अनेक संधीही दडलेल्या आहेत.

या नव्या युगात, मानवी संबंधांचे महत्त्व कमी झालेले नाही, तर त्यांचे स्वरूप बदलले आहे. तंत्रज्ञान आणि मानवी कौशल्ये यांच्या संगमातून एक नवीन कार्यसंस्कृती उदयाला येत आहे, जी अधिक समावेशक, लवचीक आणि मानवतावादी आहे. प्रत्येक कर्मचारी हा आता केवळ एक चाक नसून, संपूर्ण यंत्रणेचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

शेवटी, उद्योगांमधील हे बदलते नातेसंबंध म्हणजे एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. नदीचे पाणी सतत वाहत राहते आणि त्याच्या प्रवाहासोबत नवनवीन आकार घेत जाते, तसेच हे नातेसंबंधही सतत विकसित होत राहतील. या बदलांना सामोरे जाताना, आपल्याला लवचीकता, सहानुभूती आणि नवकल्पनाशीलता या गुणांची गरज भासेल. कारण शेवटी, उद्योग चालवणारी यंत्रे नाहीत, तर माणसे आहेत – त्यांच्या भावना, आकांक्षा आणि स्वप्नांसह.

या नव्या युगात, आपण सर्व जण एकमेकांशी जोडलेले आहोत – एका अदृश्य पण मजबूत धाग्याने. हा धागा म्हणजे आपल्या सामूहिक यशाची, प्रगतीची आणि मानवतेची कहाणी आहे. या धाग्याला बळकट करणे, त्याला नवनवीन रंग देणे, हेच आजच्या उद्योगजगतातील नातेसंबंधांचे सार आहे.

सूर्योदय होताना आकाशात विविध रंगच्छटा उमटतात आणि नव्या दिवसाच्या आगमनाची घोषणा करतात, तसेच हे बदलते नातेसंबंध उद्योगजगतातील एका नव्या पहाटेची नांदी आहे – जिथे मानवी मूल्ये आणि तांत्रिक प्रगती यांचा सुंदर मेळ साधला जाईल, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतांना पूर्ण वाव मिळेल, आणि जिथे आपण सर्व जण एकमेकांना समजून घेऊन, एकमेकांशी सहकार्य करत, एका उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करू.

**– माधव ज जोशी**
joshimj2002@gmail.com

शिक्षणविचार (१०)



**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**

# तमसो मा ज्योतिर्गमय : नाते विद्यार्थी-शिक्षकांचे

**एखाद्या शिक्षकाला, जो खरे तर या सर्व आदर्श, गुणवंतांना घडवत असतो, विचारण्यात आल्याचे ऐकिवात नाही की तुम्ही शिक्षक का झालात? त्यांच्या शिक्षक होण्याच्या कारणांमध्येच त्यांच्या यशाचे रहस्य दडलेले सापडते.**



**दरवर्षी** जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आमच्या गोखले एज्युकेशनच्या, बोर्डी शिक्षण संकुलाचे चित्र थोड्याफार फरकाने सारखेच असते. नवीन विद्यार्थी शिशू वर्गात, बालवाडीत छोट्या गटात किंवा पहिलीत दाखल होतात. मार्च, एप्रिलमध्ये अॅडमिशनसाठी येतात तेव्हा थोड्याच वेळात आईवडिलांच्या सोबत घरी परतलेले असतात. आपल्याला शाळेत घातले म्हणजे नेमके काय हे त्यांना कळलेले नसते. घरात मोठी भावंडे असतील तर थोडी कल्पना असते, पण एकुलत्या एकांची परिस्थिती जरा वेगळी असते. मात्र शाळा सुरू झाली की आईवडील, घरच्या सदस्यांना सोडून अपरिचित व्यक्तींच्या सोबत काही वेळ घराबाहेर राहण्याचा या बालकांचा पहिलाच प्रसंग! बऱ्याचदा मुलांच्या आई आणि काही वेळा हौशी बाबा मुलांना नटवून, छान खाऊचा डबा देऊन शाळेत सोडायला येतात. ते सोडून निघाले म्हटल्याबरोबर मुले रडून गोंधळ घालतात, आरडाओरड करतात, काही तर पळून जाण्याचाही प्रयत्न करतात. त्यांचे बावरलेले, हिरमुसलेले चेहरे, अश्रूंनी ओथंबलेले डोळे, मनातली अपरिचित व्यक्ती आणि जागेबद्दल वाटणारी भीती आणि घालमेल - मुलांची ही अवस्था बघून पालक कासावीस होऊन मदत करायच्या हेतूने तिथेच रेंगाळतात. मग त्यांना पाहून त्यांच्या मुलांना आणखी रडू फुटते व मुलांना वर्गात बसवणे शिक्षकांना मुश्कील होते. शेवटी अत्यंत निर्मम पद्धतीने शाळेचे गेट बंद करून घेऊन पालकांना तीन तासांनी पाल्याला घ्यायला या असे सांगून बोळवण केली जाते. प्रचंड कल्लोळ माजलेला असतो, मात्र अर्ध्या-एक तासात सगळे शांत होते. मुले आधी थोडे घाबरून, नाखुशीने पण नंतर त्यांच्या समोर ठेवलेल्या खेळांमध्ये रमायला सुरुवात होते. वर्गात असलेल्या समवयस्क मुलांकडे कुतूहलाने बघणे, आजमावणे सुरू होते, डब्यातला खाऊ शाळेत मिळालेला खाऊ, इतरांसोबत वाटून खाणे, याचेही आकर्षण असतेच. रंगीत खडू, नवीन खेळणी, शाळेच्या चित्रमय भिंती, स्मार्ट बोर्डावर दिसणारे परिचित कार्टून यामुळे मन जरा रमायला लागते. सामाजीकरणाचे धडे सुरू झालेले असतात. घरात टॉयलेट एटिकेट शिकवल्या असतील, पाळणाघराचा अनुभव असेल, तर ठीक, नाहीतर शाळेतल्या मावशींच्या मदतीने तेही शिकणे सुरू होते. काही दिवस शाळेत येताना रडण्याचा परिपाठ सुरू राहतो, पण ओसरत्या पावसाबरोबर या रडण्याचा भर कमी होत जातो. या दरम्यान मित्र, मैत्रिणी मिळतात, शिक्षिकांशी गट्टी होते, कर्मचाऱ्यांशी मावशी, काका अशी नवी नाती निर्माण होतात. घरातून बाहेर पडलेल्या या पिल्लांचा मोठे होण्याचा, शिकण्याचा, कौशल्ये आत्मसात करून प्रत्यक्ष जीवनात यशस्वी होण्यासाठीचा प्रवास सुरू झालेला असतो. त्यांचे जग विस्तारायला लागते. हे शिक्षण योग्य मार्गावरून सुरू आहे याचे

प्रत्यंतर १५ ऑगस्टला जेव्हा ही मुले शाळेच्या मैदानावर इतर मोठ्या मुलांच्या सोबत जोशात राष्ट्रगीत सादर करतात तेव्हा येते. अवघ्या दोन महिन्यांत ही मुले शिस्तीने रांगेत उभी राहून, एका सुरात राष्ट्रगीत म्हणताना ऐकणे ही एक समाधानाची बाब असते आणि पुढची पिढी घडवणाऱ्या शिक्षकांच्या श्रमाला मिळालेली कौतुकाची थाप असते. इथून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या नात्याची झालेली सुरुवात ही शिक्षण संपेपर्यंत आणि त्यानंतरही अबाधित राहते. शाळेची आवड निर्माण करण्याची मोठी जबाबदारी व श्रेय दोन्हीही या बालवाडी ते प्राथमिक शाळेतल्या शिक्षकांचे असते. मोठे झाल्यावर विद्यार्थ्याला सहसा महाविद्यालयातले शिक्षक फारसे आठवत नाहीत, पण शाळेतल्या शिक्षकांना विसरणे शक्य नसते. कारण विद्यार्थ्याच्या जडणघडणीतले त्यांचे योगदान फार मोलाचे असते. लहानपणी तर विद्यार्थी 'शिक्षक वाक्यम् प्रमाणम' मानून घरातल्या लोकांशी वाद घालू शकतात. शिक्षक विद्यार्थ्याच्या मनावर प्रचंड प्रभाव पाडू शकतात. त्यातूनच विद्यार्थी त्यांना रोल मॉडेल मानून त्यांचे अनुकरण करण्यास प्रेरित होतात. बाई, हा किंवा ही आमचे काहीही ऐकत नाही. मुले फक्त तुमचेच ऐकतात, आता तुम्हीच समजावून सांगा, असे पालकांनी म्हटले तर बाईंना कृतकृत्य वाटणारच! जसजशी ही मुले वरच्या वर्गात जातात तसतसे या शिक्षकांशी त्यांचे नाते अधिक सहज आणि अकृत्रिम होत जाते. शाळा, महाविद्यालयांतील औपचारिक शिक्षण संपले तरी विद्यार्थ्यांची नाळ शिक्षकांच्या माध्यमातून शाळेशी जोडलेली राहते. काहींना गुरुपौर्णिमा, शिक्षकदिन, संमेलने, इत्यादी निमित्ते लागतात, पण काही विद्यार्थी नियमित शिक्षकांशी संवाद साधत असतात, स्वतःच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटना, निर्णय याबद्दल चर्चा करून मार्गदर्शन मिळवत असतात. पुढे पालकांशी जसे नाते बदलते आणि मोठे झालेले मूल हे वृद्ध पालकांचे पालक बनते, तसेच करतेसावरते झालेले विद्यार्थीही शिक्षकांच्या मदतीसाठी तत्पर असतात. आपले विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत आहेत व हाकेसरशी धावून येतील हा विश्वास, हीच तर शिक्षकाची खरी संपत्ती असते.

कवी उमेश घेवरीकर म्हणतात तसे,

'सुटते जरी ही शाळा, मनामनांत पुन्हा भरते
जीवननौका वादळातही, या शाळेमुळेच तरते'
'वाट शाळेची चालता मला ती वाटावी पंढरीची,
मी या कोवळ्या निरागस लेकरांमध्ये पाहावी विठूमाऊली'

शिक्षकाची भूमिका घेवरीकर म्हणतात तशी असेल तर विद्यार्थी-शिक्षकांचे कायमस्वरूपी बंध निर्माण होतात, टिकतात.

सन २०१२ मध्ये हार्वर्ड विद्यापीठाने केलेल्या एका अभ्यासात एका शैक्षणिक वर्षात शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील परस्परनात्यातल्या बदलांचा आढावा घेतला होता. ११९ विद्यार्थी आणि ३० शिक्षकांचा या पाहणीत समावेश केला होता. विद्यार्थी आणि शिक्षक या महत्त्वाच्या नात्याच्या मुळाशी असलेल्या तीन बाबी अभ्यासल्या गेल्या. एक, एका शालेय वर्षाच्या सुरुवातीपासून ते शेवटापर्यंत शिक्षक-विद्यार्थी नाते किती प्रमाणात बदलते? दोन, हे बदल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक परिणामांशी अथवा प्रेरक अनुभवांशी निगडित असतात का? तीन, प्रवाहाविरुद्ध जाणारे काही घटक या नात्यावर परिणाम करतात का? अभ्यासाच्या निष्कर्षात असे लक्षात आले की सतत प्रोत्साहन देणारे, प्रेरित करणारे, सकारात्मक वागणारे आणि बोलणारे शिक्षक यांच्यात व त्यांच्या विद्यार्थ्यांत अतूट बंध निर्माण होतात. असे शिक्षक जे शिकवतात ते विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आत्मसात करतात. त्यांचा अशा शिक्षकांप्रती अढळ विश्वास निर्माण होतो. अकरावी-बारावीच्या वर्षात पौगंडावस्थेतील ही मुले पालकांपेक्षा शिक्षकांशी मोकळा संवाद साधू शकतात. त्यातूनही त्यांचा सकारात्मक विकास घडत असतो. टेड टॉकमध्ये कनेडीयन-अमेरिकन निरीक्षक आणि शैक्षणिक धोरणाचे जाणकार डेव्हिड ब्रूक्स, जे म्हणाले ते खरेच महत्त्वाचे आहे...

For 30 years, I've been covering school reform and we've basically reorganized the bureaucratic boxes - charters, private schools, vouchers - but we've had disappointing results year after year. And the fact is, people learn from people they love. And if you're not talking about the individual relationship between a teacher and a student, you're not talking about that reality. But that reality is expunged from our policy-making process. - David Brooks, March 2011 TED

यामुळे, शिक्षणासंबंधी धोरणे आखताना शिक्षक-विद्यार्थीसंबंध आणि शैक्षणिक उपक्रमांचे यश यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. अनेक यशस्वी खेळाडू, उद्योजक, डॉक्टर, इंजिनीयर, नट, पुढारी, अशा विविध स्तरांतल्या व्यक्तींना त्यांच्या यशाचे गमक विचारले जाते. ते याच व्यवसायात का आले त्याची कारणे विचारली जातात. पण एखाद्या शिक्षकाला, जो खरे तर या सर्व आदर्श, गुणवंतांना घडवत असतो, विचारण्यात आल्याचे ऐकिवात नाही की तुम्ही शिक्षक का झाला? त्यांच्या शिक्षक होण्याच्या कारणांमध्येच त्यांच्या यशाचे रहस्य दडलेले सापडते.

आताच्या काळात शिक्षक-विद्यार्थी नाते बदलत चालले आहे अशी खंत अनेक जण व्यक्त करतात. पूर्वी शिक्षकांबद्दल किती आदर वाटायचा, धाक असायचा आता तसे राहिले नाही अशासारख्या प्रतिक्रिया ऐकू येतात. म्हणजे हे नाते भीती, दरारा, शिस्त याच्या आधारावरच निर्माण झालेले होते. आताचे नाते हे जास्त मैत्रभावनेवर आधारलेले असते. परिस्थितीतला बदल जसा आपण स्वीकारतो तसेच काहीसे या नात्यातील बदलाकडे बघणे आवश्यक ठरते. शैक्षणिक धोरणांतर्गतही खूप बदल झाले आहेत. विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचा पाया घालण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षकाची भूमिका बदलली आहे. शिक्षक हा सर्वज्ञानी आहे आणि विद्यार्थ्याची पाटी कोरी

असते या गृहितामुळे विद्यार्थ्याच्या रिकाम्या डोक्यात शिक्षकाने ज्ञान भरायचे असते असा विचार आधीच्या व्यवस्थेत केला होता. मात्र आता हा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून विद्यार्थी आणि शिक्षक हे समपातळीवर आले आहेत. शिक्षकाने मार्गदर्शक, फॅसिलिटेटर-शिक्षणाची सुविधा प्राप्त करून देणारा, मेंटर या भूमिकेत काम करणे अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थीसुद्धा सजग, बऱ्यापैकी माहिती असलेला, स्वतःच्या आवडी ओळखून शिक्षणाची दिशा ठरवणारा असायला हवा. आताचा विद्यार्थी हा तंत्रज्ञानप्रेमी आहे, त्यामुळे शिक्षकाचीही तंत्रज्ञानावर पुरेशी पकड असणे गरजेचे आहे. नव्वदच्या दशकामध्ये, मी कॉलेजच्या अभ्यासिकेत हाताने नोट्स काढताना बघितल्यावर न राहून एक विद्यार्थी म्हणाला होता, मॅडम, हे सगळे लिहीत बसू नका. मी तुम्हाला याच्या झेरॉक्स आणून देतो. तेव्हाही जॉर्ज बर्नाड शॉ आठवून मी त्याला म्हटले होते, अरे, झेरॉक्स करून माझ्याकडे ही प्रत राहील, पण डोक्यात काहीच राहणार नाही ना. माझी नोट्स काढण्याचे कसबही विसरून जायला होईल. कदाचित एके दिवशी इतके सगळे कॉपी करून करून ते झेरॉक्स मशीनच जास्त हुशार होईल आपल्यापेक्षा. आणि आपण ढ राहू! पण पुढे तोही पर्याय स्वीकारावा लागलाच. तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये अनेकदा विद्यार्थी जास्त निष्णात असल्याचेही अनुभवाला येते. तेव्हा 'शिष्यात इच्छेत पराजयम'! असा विचार करणारा शिक्षकच श्रेष्ठ गुरू ठरतो. शिक्षकांच्या आज्ञांचे विद्यार्थ्यांनी अंध पालन करण्याचे आणि स्वीकृतीचे दिवस गेले. आधुनिक काळातील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या नातेसंबंधात मुक्तसंवाद, परस्परविश्वास, आदर आणि वैचारिक देवाणघेवाण असणे अपेक्षित आहे. आजचा शिक्षक माहिती पुरवणारा नसून उपलब्ध माहिती विद्यार्थ्यांनी योग्य पद्धतीने कशी वापरावी याचे मार्गदर्शन करणारा आहे.

विद्यार्थ्यांना घडवण्याचे अत्यंत महान पण अवघड कार्य शिक्षक करत असतात. जे शिक्षक या कार्याचा गंभीरपणे विचार करून, त्याचे महत्त्व समजून घेऊन विद्यार्थ्यांशी वागतात ते शिक्षक विद्यार्थिप्रिय बनतात. परमपूज्य सानेगुरुजी हे विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. त्यांनी शिक्षकी पेशाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनाचा किती कोमल, मातृहृदयी पद्धतीने विचार करू शकतो याचे सानेगुरुजी एक अतुलनीय उदाहरण आहेत.

यशस्वी गुरू-शिष्य, शिक्षक-विद्यार्थी यांच्या अनेक जोड्या प्रसिद्ध आहेत-

सॉक्रेटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल ही गुरुशिष्य त्रयी; संत निवृत्तीनाथ-संत ज्ञानेश्वरमाउली; आर्य चाणक्य-चंद्रगुप्त; रामकृष्ण परमहंस-स्वामी विवेकानंद; रमाकांत आचरेकर-सचिन तेंडुलकर; पंडित बिरजू महाराज-माधुरी दीक्षित; पुल्लेला गोपीचंद-पी.व्ही. सिंधू; श्रीनिवास खळे-शंकर महादेवन; नीम करोरी बाबा-मार्क झुकरबर्ग; पदार्थविज्ञानाचे गाढे अभ्यासक इलेक्ट्रॉनचा शोध लावणारे शास्त्रज्ञ थॉमसन-अर्नेस्ट रुदरफोर्ड; ॲन सलवन- हेलन केलर आणि श्री. सिवा सुब्रमनिया अय्यर- राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलामांचे शिक्षक, अशा कित्येक प्रसिद्ध शिक्षक-विद्यार्थी जोड्या सांगता येतील.

पु.ल. देशपांडेंनी 'चितळेमास्तर'मध्ये तर या शिक्षक-विद्यार्थी नात्याच्या सर्व बदलांचा आलेखच रेखाटला आहे. चितळेमास्तरांनी अनेक पिढ्या घडवल्या, पण सर्व विद्यार्थ्यांची नावे अगदी तोंडपाठ! कवी कुसुमाग्रजांची 'कणा' कविता ही तर शिक्षक-विद्यार्थी नातेसंबंधाचे अत्यंत प्रेरणादायक उदाहरण आहे. पुरात सगळे काही गमावलेल्या विद्यार्थ्याला अश्या रित्या, उदास क्षणी त्याच्या सरांना भेटावेसे वाटणे हाच मुळी त्या शिक्षकाचा सन्मान आहे. विद्यार्थी कोणत्याही मदतीच्या अपेक्षेने आलेला नाही. फक्त सरांनी आशीर्वाद द्यावा, प्रेरणा द्यावी, आत्मविश्वास वाढवावा. त्याचे मागणे फक्त एकच,

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा,
पाठीवरती हात ठेवून, तुम्ही फक्त लढ म्हणा!

जग जसे वेगाने बदलत आहे तशीच नातीही. २०१६मध्ये मायक्रोसॉफ्टने नोकिया कंपनी विकत घेतली तेव्हा निरोपाच्या भाषणात नोकियाचे तेव्हाचे सी.ई.ओ. स्टीफन एलोप भावनाविवश होत म्हणाले होते, आम्ही काहीच चुकीचे केले नाही तरीपण आम्ही हरलो. नोकियाची पीछेहाट केवळ त्यांनी बदल स्वीकारला नाही म्हणून झाली हे सर्वश्रुत आहे. अँड्रॉइडचा उदय होत होता आणि इतर कंपन्या त्या ऑपरेटिंग सिस्टमचे मोबाइल बाजारात आणत होते तेव्हा नोकिया त्यांच्या सिम्बिअन ऑपरेटिंग सिस्टिमवर अडून बसली आणि हे त्यांचे कालानुरूप न बदलणे त्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरले. झपाट्याने बदलणाऱ्या जगात समाजमाध्यमे, आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे अनेक पारंपरिक व्यवसायांना बदलाचे आव्हान स्वीकारणे भाग पडणार आहे. त्यातला एक म्हणजे शिक्षकाचा पेशा. शिक्षकांना येणाऱ्या काळातल्या बदलांशी जुळवून घ्यावे लागेल. तरच त्यांचे आणि विद्यार्थ्यांचे नाते टिकू शकेल. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या परस्परांकडून असलेल्या अपेक्षा बदलल्या, त्यांच्या भूमिका बदलल्या, तरी त्यांच्यातील विश्वासाचे आणि ममत्वाचे नाते कायम राहील. शिक्षक-विद्यार्थी नात्याची अभिव्यक्ती बदलेल, मात्र आत्मा तोच असेल. तमसो मा ज्योतीर्गमय!

संदर्भ :

१) 'शिक्षणाच्या कविता' (कवितासंग्रह) - कवी उमेश घेवरीकर, प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई.

२) Changes in Teacher-Student Relationships-Hunter Gehlbach, Maureen E. Brinkworth, nna D. Harris, Harvard University

**- डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com



माधुरी अरुण शेवते

# शब्द जपून ठेवताना

**...मी अंतर्मुख झाले. त्या क्षणापासून मी ठरवले कंटाळा आला, कंटाळा येतो असे कधी म्हणायचे नाही. माझ्या आयुष्यातून कंटाळा हा शब्द, हा स्वभाव, ही वृत्ती मी हद्दपार केली. माझ्यात त्या क्षणापासून चांगला बदल झाला. आपण प्रत्येक माणसाकडून काहीना काही शिकत असतो. गोष्ट साधीच असते, पण आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक वळणावर ती आपल्याला आठवते आणि आपला प्रवास सुखकर होतो.**



***पुस्तकातील*** एखादी ओळ, एखादा शब्द आपल्या वागण्याबोलण्यात बदल करत असतो. ती ओळ, तो शब्द अंतरंगात जपून ठेवत असताना त्या शब्दाचे सोने होते. आपले आयुष्य बदलते. निदान माझ्यापुरते तरी हे खरे ठरले आहे. शब्द जपून वापरावा आणि तो खरा करून दाखवावा, हे वाटते तेवढे सोपे नाही. मला एकनाथमहाराजांची एक गोष्ट पूर्वी वाचली होती ती आठवते.

एकनाथमहाराजांकडे एक आई आपल्या मुलाची तक्रार घेऊन आली व नाथांना म्हणाली, माझा मुलगा खूप गूळ खातो. त्याला काहीतरी सांगा. उपदेश करा. नाथ महाराज त्या आईला म्हणाले, महिन्याभराने माझ्याकडे ये. मग मी तुला सांगतो. महिन्याभराने आई नाथमहाराजांकडे गेली. तेव्हा नाथांनी त्या मुलाला सांगितले गूळ खाऊ नकोस. आईने नाथांना विचारले, तुम्ही हे तेव्हाच का नाही सांगितले? तेव्हा नाथमहाराज म्हणाले, मी अगोदर गूळ खाण्याचे बंद केले. मग त्याला सांगितले. जोपर्यंत आपण एखादी गोष्ट स्वतः आचरणात आणत नाही तोपर्यंत दुसऱ्याला काही सांगण्याचा, उपदेश करण्याचा अधिकार आपल्याला नसतो म्हणून मी तुम्हाला सांगितले एक महिन्याने या.

पुस्तकात वाचलेली एखादी आठवण, एखादी ओळ, एखादा शब्द किती महत्त्वाचा असतो हे नाथांच्या उदाहरणावरून लक्षात येते.

मला पुस्तक वाचण्याची आवड असल्यामुळे आपले अनुभवविश्व विस्तारत जाते याचा प्रत्यय मला अनेकदा आला. प्रसिद्ध गायिका, लावणीसम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांचे 'माझं गाणं, माझं जगणं' हे आत्मचरित्र वाचले. सविता दामले या लेखिकेने उत्तम शब्दांकन केले आहे. आपल्याशी सुलोचनाबाई समक्ष बोलताहेत असेच वाटते. सुलोचनाबाईंना घरात सगळे माईच म्हणत. माईंनी नवव्या-दहाव्या वर्षापासून आपल्या गाण्याचा प्रवास या पुस्तकात मांडला आहे. पुस्तक वाचत असताना आपण त्या जुन्या काळात जातो. खूप जुन्या गोष्टी, त्याकाळचे वातावरण आपण अनुभवतो आहोत असेच वाटते. अनेक कलावंतांचे अनुभव, आपल्या गाण्याचा आणि आयुष्याचा प्रवास त्यांनी सुरेख पद्धतीने मांडला आहे.

पुस्तक वाचत असताना एका पॅरेग्राॅफपाशी मी थांबून

राहिले. त्याने मी खूप प्रभावित झाले.

माईंनी लिहिले आहे, ''सुमारे तीन-चार वर्षांपूर्वी मला ठाण्याच्या कॉलेजात प्रकट मुलाखत घेण्यासाठी बोलावलं होतं. माझी मुलाखत घेतली प्रवीण दवणे ह्यांनी! प्रवीण दवणे बोलण्यात अतिशय हुशार! त्यांचं शब्दप्रभुत्व प्रेक्षकांना बसल्या जागी खिळवून ठेवतं, पण त्या दिवशी मी त्यांनाही बोलण्यात हार गेले नाही.

''मी तिथल्या मुलांना म्हटलं, 'मी केवळ चौथी पास बाई आहे. आणि तरीही आज तुमच्या कॉलेजात मला मुलाखत घ्यायला बोलावलं जातं. ह्याचाच अर्थ असा, की मी कुठल्यातरी क्षेत्रात प्रावीण्य मिळवलं म्हणून तुम्ही मला हा मान दिलात. त्या मानाला अनुसरूनच मी तुम्हाला हा सल्ला देईन, की कॉलेजचं नुसतं सर्टिफिकेट मिळवून उपयोग नाही. शिक्षण हवंच. त्याचबरोबर जिद्द हवी, महत्त्वाकांक्षा हवी की, मीदेखील आयुष्यात कोणीतरी बनणारच. तुमच्या शिक्षणासाठी तुमच्या वडिलांबरोबरच तुमची आईसुद्धा आज बाहेर पडते. शिक्षण, इतर वस्तू हा सगळा खर्च भागवायला तीसुद्धा कष्ट करते. त्या कष्टाचं चीज तुम्ही करायला हवं.''

''मुलं अक्षरशः पाया पडली हो त्या दिवशी! मलाही अगदी गहिवरून आलं. माझ्या मुलांची मला आठवण आली. ती तान्ही असल्यापासून मी गाण्यासाठी प्रवासाला बाहेर पडत आले आहे. आयुष्यभर प्रवासात मी एवढ्या खस्ता काढल्या आहेत की काही विचारू नका. पण मीच जर तेच सारखं मुलांना बोलून दाखवू लागले तर चालेल का? केलेलं कधी उगाळून दाखवू नये, किंमत कमी होते, अशा मताची मी आहे. पुन्हा आम च्यावेळी जमाना वेगळा होता. आताची मुलं सरळ म्हणतील, ''तुम्हाला कुणी सांगितलं होतं करायला? नव्हतं करायचं.''

''त्यामुळेच आपण आपल्या संसारासाठी कष्ट केले तर ते आपलं कर्तव्यच आहे असं मी मानते. तो दोष मुलांचा नाही. तरुण तरुण पोरं जेव्हा म्हणतात, की 'कंटाळा आला!' तेव्हा मला तर त्यांच्या एक कानाखाली वाजवावीशी वाटते. 'अरे करण्यासारखं चांगलं पुष्कळ काही आहे जगात! तुम्हाला कंटाळा येतोच कसा?''

हे वाचल्यानंतर मी अंतर्मुख झाले. त्या क्षणापासून मी ठरवले कंटाळा आला, कंटाळा येतो असे कधी म्हणायचे नाही. माझ्या आयुष्यातून कंटाळा हा शब्द, हा स्वभाव, ही वृत्ती मी हद्दपार केली. माझ्यात त्या क्षणापासून चांगला बदल झाला. जे काम आपल्याला करायचे ते आजच करा. उद्यावर ढकलू नका. ते काम करताना आनंदाने करा. आपल्या आणि घरातल्या माणसांचाही दिवस आनंदात जातो. कंटाळा न करता आपल्या दैनंदिन आयुष्यातल्या लहानसहान गोष्टी आपण करत राहिलो तर मनाला समाधान लाभते. घरातल्या माणसांनाही याचा आनंद वाटतो. माईंचे हे ऋण मी कधीही विसरणार नाही.



**सुलोचना चव्हाण**

त्यांचे शब्द, त्यांच्या भावना मी मनात जपून ठेवल्या आहेत. कंटाळा न म्हणणे हा शब्द आणि तो न वापरण्याची शपथ मी जन्मभरासाठीच घेतली आहे.

माईंनी पुस्तकाच्या पानापानात काही ना काही शिकवणीचे धडे दिले आहेत. माईंनी एक आठवण लिहिली आहे. त्या म्हणतात –

''गाण्यानिमित्त प्रवास खूप झाला. त्या प्रवासात मी स्वेटर इत्यादी खूप विणकाम केलं. चष्म्याची पेटी ती लोकरीचीच विणली. पानसुपारीची चंची, पिशव्या अशा कितीतरी वस्तू क्रोशाच्या विणल्या. मला त्याची आवड होती. शिवाय प्रवासात मोकळा वेळही केवळ माझा असा मिळत असे. गाणं गुणगुणत ह्या आवडीच्या छंदात तासन्‌तास आगगाडीतला प्रवास कसा संपत असे ते समजतही नसे.

''घरीसुद्धा रिकामं बसणं मला मंजूर नाही. साबणसुद्धा मी घरीच स्वतः तयार करते. मग त्यात तुम्ही दोन हजार रुपयांची साडी धुतलीत तरी काही बिघडत नाही. मोठ्या सुनेचा- प्रफुल्लचा मालाडहून फोन येतो, 'माई, साबण संपलाय, पाठवाल का?' मग तिच्यासाठीही करून पाठवते.

''कारण नसताना शेजारीपाजारी जाऊन चकाट्या पिटणं मला नको वाटतं. एकदा का घरातली बाई शेजारी शिरली की, घराची शिस्त बिघडलीच म्हणून समजा.

''माझा स्वभाव तसा स्पष्टवक्ताच आहे. शेजारीपाजारी मदत करायला ताबडतोब जाईन, पण उगाच जा म्हटलं तर जाणार नाही.

''आमच्या जुन्या चाळीत एक बिऱ्हाड होतं. लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून गावाला वस्तू वाटत सुटायचं. कोंबडी

आणली की मसाल्यासकट कच्ची वाटायची. उपवास असला की किलो दीड किलोची खिचडी करायची आणि दारात उभं राहायचं. लोकांना येताजाता विचारायचं, ‘उपास आहे का? मग या ना, मी खिचडी केलीय. ती खा ना!’ असा आग्रह करायचा. आता तुम्ही दिलं म्हणजे तुम्ही चांगले? मग घरी पोराबाळांना उरतंय की नाही ते कोण बघणार? असला शेजारधर्म आम्ही कधी केला नाही. अती तिथं मातीच होते, हे जाणूनच वागले.’’

मलासुद्धा काहीही कारण नसताना शेजारीपाजारी बसून गप्पा मारणे आवडत नाही. माई म्हणतात, ते खरे आहे त्यामुळे आपल्या जगण्याची घराची शिस्त बिघडते. दुसऱ्याच्या घरी गेले की आपला आणि त्यांचाही वेळ जातो. निष्कारण इकडच्यातिकडच्या वायफळ गप्पा होतात. त्यातून काहीच निष्पन्न होत नाही. माईची ही शिकवण मी पूर्वीपासून तंतोतंत पाळत आले आहे. आणि ही शिकवण मी संबंधितांनाही देत असते. त्याचा त्यांना फायदाही होतो.

माझ्याकडे दहा-पंधरा वर्षांपूर्वी चंदा नावाची मुलगी घरकाम करायला होती. तिचे आता लग्न झाले आहे. तिला दोन मुले आहेत. ती चेन्नईला असते. तिचे लग्न ठरले तेव्हा मी तिला काही गोष्टी समजावून सांगितल्या. लग्नाच्या आहेराबरोबरच काही गोष्टींचे धडेही तिला प्रेमाने दिले. ती समजूतदार स्वभावाची आहे. मी तिला ज्या अनेक गोष्टी सांगितल्या. त्याबरोबर हेही सांगितले की काही कारण नसताना शेजारीपाजारी जायचे नाही. उगाच गप्पा मारत बसायचे नाही. तुला काही काम नसेल तर स्वत:त मन रमव. पण कामाशिवाय उगाच कुठे जात जाऊ नकोस. त्या मुलीची मला कमाल वाटते. ती जिथे राहाते त्या ठिकाणाहून दोन घरे सोडून तिची आत्या राहाते. पण ती आत्याच्या घरीच काय, कामाशिवाय त्यांच्याकडेच आणि शेजारीपाजारी कुणाकडेही जात नाही. मुंबईला ती माझ्या घरी आली की सांगते, ताई आपने बोलाना किसी के घर काम के सिवाय जाना नहीं. मैं किसी के घर नहीं जाती हूँ। अपनेही घर खुश हूँ। नहीं तो आत्यासे घर जा के मुझे बहोत तकलीफ उठानी पडती थी। आत्याभी खुश और मैं भी खुश।

चंदाला आहेराबरोबर दिलेली माईंची शिकवण चेन्नईच्या घरापर्यंत कामाला आली. मला ‘का’ या शब्दापासूनचे वाक्य कधीच आवडत नाही.


कधी जाणार?

कुठे जाणार?

कसे जाणार?

किती वाजता जाणार?

असे ‘का’ या प्रश्नचिन्हात अडकलेले मला आवडत नाही. प्रश्न पाडून द्यायचे नाहीत आणि दुसऱ्यालाही कधी असे ‘का’चे प्रश्न विचारायचे नाही. त्यामुळे ‘का’चे प्रश्न कुणाला न विचारलेले बरे. ज्याच्याशी संवाद असतो. ते आपल्याला सगळे



टी.एन. धुवाळी, अरुण शेवते, कमलाकर म्हेत्रे आणि शर्वरी

सांगतोच ना? मग प्रश्न ‘का’ची प्रश्नावली कशासाठी?

आपल्याला जे छंद आहेत. त्या छंदांत मन रमवलेले बरे. आपला वेळ कसा जातो हे आपल्यालाही कळत नाही. मला क्रोशाच्या गोष्टी विणायची आवड आहे. माझा तो छंद आहे. विण सोपी असती तरी त्यात रमता येते. टाके घालत असताना गाण्याची ओळ ओठांवर येते. आणि आपल्या दुनियेत आपण राजे असतो.

‘स्त्री’ला एक तरी छंद असावा. तो असेल तर तिचा संसारातील ताणतणाव थोडा कमी होतो. असे आमचे कमलाकर म्हेत्रेकाका नेहमी म्हणायचे. काही वर्षांपूर्वीच त्यांचे निधन झाले. ते आपल्यात नाहीत, पण घरी आले की ते मला म्हणायचे ‘स्त्री’ छंदात रमणारी असेल तर तिच्याशी निगडित असलेल्या अनेक गोष्टी ती कमी करते. तेव्हा ‘स्त्री’ला एखादा तरी आपल्या आवडीचा छंद असलाच पाहिजे.

‘स्त्री’ला चाळिशी ओलांडल्यावर अनेक गोष्टींचा त्रास होतो. पण मला विणकाम, वाचन या छंदामुळे कुठलाच त्रास झाला नाही. म्हेत्रेकाकांच्या एका वाक्यामुळे मी आजही माझे छंद जोपासते. म्हेत्रेकाका नेहमी हसतमुख असत. आम्ही साईनिवासमध्ये चौथ्या मजल्यावर राहात होतो. पण म्हेत्रेकाका पंचाहत्तर पायऱ्या चढून आम्हाला भेटायला येत असत. आमची मुलगी शर्वरीसाठी भरपूर फळे आणत असत. खूप प्रेमळ स्वभाव. आम्ही नवीन घर घेतले तेव्हा म्हेत्रेकाका अरुणला



**अरुण शेवते आणि माधुरी शेवते**

म्हणाले, ज्यांच्याकडून घर घेतले आहे. ॲग्रिमेंट झाले आहे तर चावी लगेच घे. अरुण म्हणाला, तसे काही नाही. चांगली माणसे आहेत. म्हेत्रेकाका कुणावर रागावत नसत, पण अरुणला म्हणाले, 'असं करू नकोस. आताच्या आता घराचा ताबा घे. मी तुला अनुभवातून सांगतो आहे. माणसं चांगलीच असतात. पण वाईटही असतात हे लक्षात ठेव.' अरुणने दुसऱ्या क्षणाला घराचा ताबा घेतला. अरुण आणि धुवाळीआजोबा, म्हेत्रेकाका यांची चांगली मैत्री. त्यांच्या अनेक मैत्रीच्या सुखद आठवणी आमच्याकडे आहेत. म्हेत्रेकाकांनी अरुणला अनेक गोष्टी समजावून सांगितल्या.

आपण प्रत्येक माणसाकडून काहीना काही शिकत असतो. गोष्ट साधीच असते, पण आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक वळणावर ती आपल्याला आठवते आणि आपला प्रवास सुखकर होतो.

म्हेत्रेकाकांचे अचानक निधन झाले. तेव्हा आम्ही एका कार्यक्रमात होतो. अरुणचा फोन स्वीच ऑफ होता. त्यामुळे आम्हाला कळलेच नाही. आम्ही त्यांच्या घराच्या रस्त्यावरून आलो होतो. घरी आल्यावर रात्री उशिरा आम्हाला समजले म्हेत्रेकाका गेले. आपल्याजवळ असूनही जाता आले नाही, ही खंत बोचत होती. त्यांच्या 'विटा' या जन्मगावी त्यांचे अंत्यसंस्कार होणार होते. नियतीला हे मान्य नसावे की त्यांचे शांत झालेले कलेवर पाहावे, तुमच्या मनात असलेली त्यांची सदैव हसरी प्रतिमा असावी. म्हणूनच की काय जवळ असूनही जाता आले नाही.

आजही म्हेत्रेकाकांची आठवण क्रोशाचे काम करत असताना येते. क्रोशा म्हणजे तरी काय असते? प्रत्येक साखळीतील विण सुंदर असते. ती विण सुंदर करणे आपल्या हातात असते. काकांनी दिलेली 'प्रत्येक स्त्रीला कुठलातरी छंद असला पाहिजे' ही शिकवण क्रोशाची विण विणताना आठवत राहाते.

आपण ज्याच्याबरोबर राहतो त्याच्यासमवेत राहताना गाण्याच्या ओळी आठवत राहतात.

ओ मेरे हमराही
मेरी बाँह थामे चलना
बदले दुनिया सारी
तुम ना बदलना

माझ्या हमसफरबरोबर राहताना या ओळी डोळ्यांसमोर येतात. ज्यांच्याबरोबर आपण दिवसरात्र राहातो. त्या शाळेतील विद्यार्थी आपण असतो.


हमसफर या शब्दातच अरुण सामावलेला असतो. माझ्या घरात माझी दररोज शाळा भरते. या शाळेला कुठलेही बंधन नाही. कधीही या, कधीही जा. तेव्हा आमचे हमसफर अरुणगुरुजी हजर असतात. पेपर सोपा कसा लिहायचा, याचे सारे आराखडे त्याच्याकडे असतात. मला पडलेला प्रश्न लगेच सोपा होतो. हातात कुठलीही पाटी-पेन्सिल नाही, पण घडत असलेला संवाद माझ्याबरोबर असतो. तो माझा हमसफर नवरा अरुण मला सतत सांगत असतो, 'जगणे खूप सोपे आहे. तुम्हीच उगीचच ते अवघड करून ठेवता. एखादी गोष्ट मनाला लागली तर लगेच डिलिट करत जा. आकाश खूप मोठे आहे. आकाशात शब्द सोडून द्या. उगीचच नकोसा शब्दांना जवळ करू नका. आपली डायजेस्टिव्ह सिस्टिम स्ट्राँग करा. मनात काही किल्मिष ठेवू नकोस. असे तू वागलीस तर तुला त्रास होणार नाही.' मला वाचनाची आवड अरुणमुळेच लागली. नुसती आवड लागली नाही तर ती जोपासली. माझ्यावर त्यांच्या वागण्याचा खूप प्रभाव आहे.

अरुण घरात असताना इतरांशी त्यांचा फोनवर जो संवाद घडतो. तो मला खूप काही शिकवून जातो. त्यांची फोनवर बोलण्याची ढब उत्कट असते. कुणाचा जरी फोन असला तरी ते उत्कटपणे बोलतात.

त्यांचा आवाज सुंदर आणि खर्जातला आहे. मी अरुण नावाच्या हमराहीचे शब्द शब्द जपून ठेवते. जगण्यातला रस्ता सुंदर होऊन जातो. म्हणूनच विणकाम करताना माझ्या ओठांवर नेहमी ओळी येतात.

ओ मेरे हमराही
मेरी बाँह थामे चलना
बदले दुनिया सारी
तुम ना बदलना

**– माधुरी अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२५१३६३५



सुनंदा भोसेकर

# बदलती दैवतकल्पना

**शास्त्रीय ज्ञानाची जशी प्रगती होईल तशी प्रत्येक घटनेमागे दैवी कारणे शोधण्याची प्रवृत्ती कमी होईल, कृतक धर्मांचा, देवांचा पगडा कमी होईल, अशी समजूत होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. अंधश्रद्धांचे दुकान नुसते चालू राहिले नाही तर भरभराटीला आले.**



***निसर्गातील*** घटितांविषयी आदिम माणसाला वाटणाऱ्या भीतीमधून देवकल्पनेचा उगम झाला. वादळी वारे, ढगांचा गडगडाट, विजांचा चमचमाट, हेलपाटणारी झाडे हे दृश्य खचितच धडकी भरवणारे होते. नद्यांना येणारे पूर, समुद्राची भरतीओहोटी, पर्वतांचे ढासळणे अशा घटनांचा आदिमानवाने आपल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. माणसापेक्षा अधिक प्रबळ असणाऱ्या श्वापदांचे भय वेगळे होते. ती समोर दिसत होती आणि त्यांच्यापासून स्वत:चे संरक्षण करणे, त्या संघर्षात टिकून रहाणे जरुरीचे होते. त्यासाठी माणसाने सामूहिक शिकारीचे तंत्र विकसित केले. जंगली श्वापदाला संमोहित करण्यासाठी एकत्रितपणे काही ध्वनी वारंवार करायला सुरुवात केली, मग ते माणसांनी सामूहिकरीत्या स्वत:च्या स्वरयंत्रातून काढलेले असोत की कातड्याच्या तालावाद्यातून काढलेले असोत. एकाच एका ध्वनीचा उद्घोष शिकार करताना उपयोगी पडतो हे लक्षात आले. जनावर दचकून थांबते, त्याला घेरता येते आणि त्याची शिकार करता येते हे समजले. शिकार साधल्यानंतर मृत जनावराच्या भोवती आरोळ्या ठोकत उन्मादाने नाचणे आले. विधींची ही सुरुवात होती. विधी आधी आले आणि त्यानंतर देवाची कल्पना आली आणि त्यानंतर धर्मकल्पना आली. सामूहिक शिकार करण्याची शक्यता, प्रत्यक्ष कृती आणि त्या भोवतालचे विधी ही मानवी संस्कृतीच्या प्रगतीची सुरुवात आहे. शिकार करण्यामुळे मानवी शरीराची रचना बदलली. शिकार करण्यासाठी त्याने हत्यारे तयार केली. ज्या प्राण्याची शिकार करायची असेल त्याची चित्रे काढली. विधींचे स्वरूप गुंतागुंतीचे होत गेले. विधी करणारा हाच देवाचा प्रतिनिधी आहे आणि म्हणून तो पूजनीय आहे अशी समजूत तयार झाली. विधी करणाऱ्यांची सत्ता यातून प्रस्थापित होऊ लागली. जादूटोण्याचा आणि नंतर धर्माचा उगम येथूनच झाला. भीमबेटकासारख्या गुहांमधून काढलेल्या सुरुवातीच्या चित्रांमध्ये प्राण्याचा मुखवटा घालून नृत्य करणाऱ्या माणसाची चित्रे आहेत. प्राण्यांची चित्रे मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांचे आकारही, प्राण्याच्या शरीररचनेचा अभ्यास करावा असे प्रमाणापेक्षा मोठे आहेत. एकाच प्राण्याच्या मागे अनेक माणसे भाल्यासदृश हत्यारे घेऊन धावत असतानाचीही चित्रे आहेत. तसेच, हातात हात घालून



नाचणाऱ्या माणसांची, ढोल वाजवणाऱ्या माणसांची चित्रे आहेत.

माणूसविरुद्ध निसर्ग या संघर्षात पंचमहाभूते आणि हिंस्र पशूंचा अंतर्भाव होता. या संघर्षात धीर देणाऱ्या शूर, पराक्रमी माणसांचा आधार वाटत असेल. त्यांच्या पराक्रमाविषयी, समूहाचे रक्षण करण्याविषयी दंतकथा तयार झाल्या. माणसांच्या मनातली भीती दूर करणारा समूहाचा रक्षक देवत्वाला पोहोचला. त्याच्यापाशी काही विशेष गुण आहेत अशी समजूत पसरली आणि दृढ झाली. हे विशेष गुण म्हणजेच दैवी शक्ती असल्याचा समज माणसांनी करून घेतला. प्राण्यांसारखी शारीरिक शक्ती, सुळे, नखे, धावण्याची क्षमता नसलेल्या माणसांनी प्राण्यांना ठार मारणाऱ्याला देव म्हटले नसते तरच नवल होते. जगभरातल्या आदिम समाजांमध्ये पशुपतीची कल्पना अस्तित्वात होती. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे या शूर, पराक्रमी माणसांच्या कथा संक्रमित होत राहिल्या. त्यायोगे त्यांना अमरत्व प्राप्त झाले. कथांना आणि कथानायकांनाही अमरत्व प्राप्त झाले. यातून देव अमर असण्याची कल्पना पुढे आली. शूर, पराक्रमी माणसांप्रमाणेच आपल्या मृत पूर्वजांचे आत्मे आपले संरक्षण करतात अशा समजुतीतून पूर्वजांच्या पूजेची प्रथा सुरू झाली. आजही अनेक गावांमधून कुळाच्या मूळ पुरुषांची देवळे आढळतात आणि कुळातल्या लग्नसमारंभांना त्यांना आवर्जून आमंत्रण दिले जाते किंवा संकटकाळी गाऱ्हाणे घातले जाते. इतकेच नाही तर भोवतालचे प्राणी, पक्षी, झाडे यांना देवत्व बहाल केले जाते. गाय, बैल, हत्ती, गरूड, वडाचे-पिंपळाचे-पारिजातकाचे-आवळ्याचे झाड ही यादी कितीही लांब होऊ शकते. या सर्वांविषयी कथा अस्तित्वात आहेत. ह्या प्रथमिक अवस्थेतल्या देवकल्पना होत्या.

माणसांनी आपले सर्व गुण-अवगुण देवांना बहाल केले. माणूस शिकार करून जगत होता. देवालाही प्राण्यांचे मांस अर्पण करत होता. समूहापरत्वे देवांची रूपे बदलत गेली. त्यांची संख्या वाढली. आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर आपल्याच मनातल्या भीतीवर ताबा मिळवण्यासाठी आणि


आपल्याला जे श्रेयस, प्रेयस वाटते आहे त्याची कल्पना अधोरेखीत करण्यासाठी, ठळक करण्यासाठी; माणसांनी देवांची एक समांतर वसाहत तयार केली. देव हा एक मानसिक आधार झाला. अजूनही आहे. प्रत्येक माणसाच्या इच्छा, आकांक्षांचे प्रतिबिंब त्याच्या देवकल्पनेमध्ये पडते. एखाद्या सार्वजनिक देवाला एखादा माणूस भजत असेल तेव्हाही त्याच्या मनातला देव हा त्याचा वैयक्तिक असतो.

ज्या पंचमहाभूतांचे भय वाटत होते, त्यांनाच वश करण्यासाठी त्यांना देवत्व बहाल करावेसे वाटणे ही एक अगदी सहज प्रक्रिया होती. रुद्र, मरुत्, वायू, इंद्र हे देव या श्रेणीतले आहेत. या ऋग्वेदातल्या देवता ही पंचमहाभूतांचीच रूपे आहेत. या निसर्गशक्तींचे नियंत्रण करणाऱ्याही काही शक्ती असतील असे गृहीत धरून वरुण, बृहस्पती, प्रजापती, अग्नी, उषा, सोम या दैवतांची कल्पना केली गेली. यज्ञामध्ये त्या देवांना समंत्रक अवाहन करून त्यांना आहुती देत असत. यात तांदूळ, सातू ही धान्ये शिजवून तुपासह अर्पण करत. 'पुरोडाश' नावाचा इडलीसदृश पदार्थही असे. सोमरस नावाचे द्रव्य, दूध, दही असे पळसासारख्या झाडांच्या फांद्या तासून त्याच्या समिधा तयार केल्या जात असत. या द्रव्यांनी प्रज्वलित झालेला अग्नी अर्पण केलेल्या वस्तू स्वर्गातल्या विशिष्ट देवतांपर्यंत पोहोचवतो अशी समजूत होती. या सर्वांच्या जोडीला पशुबळीही होते. वैदिकांचे देव निराकार नव्हते. त्यांच्या रूपागुणांची वर्णने वैदिक वाङ्मयात सर्वत्र आढळतात. परंतु ह्या देवांच्या मूर्ती बनवून त्यांची पूजा करायला सुरुवात झाली नव्हती. भारतात आलेले आर्य हे भटक्या पशुपालक जमातीचे लोक होते. इंद्र हा ऋग्वेदातील आर्यांचा सर्वात महत्त्वाचा देव. तो पराक्रमी, आक्रमक आहे. त्याने सिंधू नदीच्या खोऱ्यातील दस्यूंची 'पुरे' म्हणजे नगरे उद्ध्वस्त केली म्हणून त्याल 'पुरंदर' असे नाव मिळाले. ह्या पराक्रमी माणसाला पर्जन्यदेवतेचे गुण चिकटले आणि त्याने मूळच्या आर्यांच्या पर्जन्यदेवतेला मागे टाकले. इंद्रामध्ये मानवी प्रवृत्ती शिल्लक राहिल्या. आपले इंद्रपद जाईल या भयामुळे त्याला इतर पराक्रमी वीरांबद्दल, तपस्वी पुरुषांबद्दल असूया वाटे. त्यांना स्थानभ्रष्ट करण्यासाठी तो आपल्या दरबारातल्या अप्सरांना कामाला लावी. पुढे कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून इंद्राच्या पर्जन्यदेव असण्याला आव्हान दिले.

वैदिक आर्यांचा भारतात राहणाऱ्या जमातींशी सुरुवातीला संघर्ष झाला. परंतु काही काळाने वैदिक आणि अवैदिक जमातींमध्ये शांतता प्रस्थापित झाली. स्थानिक द्रविड जमाती आणि वैदिक आर्यांमध्ये समन्वयाचा काळ सुरू झाल्यावर आर्यांनी द्रविडांची पूजापद्धती आणि त्यांचे देव आत्मसात केले. वैदिकांचे देवतापूजन हे यज्ञ, होम आणि स्तोत्ररचनेच्या स्वरूपात होते. यज्ञामध्ये पशूंचे बळी देणे हादेखील देवतांच्या अर्चनेचा भाग होता. बळी देण्याची प्रथा ही अप्रगत समाजाचे लक्षण आहे; तर फुले, पाने, फळे इत्यादी वस्तू अर्पण करून देवतांची पूजा करणे हे प्रगत संस्कृतीचे लक्षण होते. तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे, की पूजा हा शब्द किंवा पूजाविधी चारी वेदांमध्ये किंवा नंतरच्या ब्राह्मण ग्रंथांमध्ये आढळत नाही. पूजा हा शब्दच तमीळ शब्द 'पू' म्हणजे फूल या शब्दावरून आला आहे. वैदिक आणि अवैदिक धर्माची सरमिसळ झाल्यावर यज्ञसंस्थेचे महत्त्व कमी झाले. तिचे रूपांतर देवळांमध्ये झाले. उपनिषदांच्या काळात यज्ञांच्या कर्मकांडाविषयी पुनर्विचार झाला. आज जे लोक यज्ञांचे वगैरे आयोजन करतात आणि आपण काहीतरी प्रचंड महत्त्वाचे धार्मिक कार्य करत आहोत, परंपरांचे जतन करत आहोत असे समजतात त्यांना आपल्याच पूर्वजांनी शहाणपणाने स्वीकारलेला प्रगतीचा मार्ग पसंत नाही असे दिसते. आर्य हे पुढारलेले आणि मूळ रहिवासी हे मागासलेले होते हाही एक गैरसमज. प्रत्यक्षात आर्य भटके आणि ग्रामीण संस्कृतीचे होते. नॉर्डिक वंशाच्या म्हणजे आर्यांच्या टोळ्या ऋग्वेदाच्या काळी भारतात आल्या. हडप्पा आणि मोहेंजोदाडो इथे सापडलेल्या सांगाड्यांमध्ये नॉर्डिक वंशाच्या खुणा दिसत नाहीत. सिंधू संस्कृती ही नागर होती.

पंचनद्यांच्या खोऱ्यात वस्ती केल्यावर आर्यांना स्थैर्य आले. त्यानंतर त्यांनी धर्म, शास्त्र, तत्त्वज्ञान आणि त्या योगाने साहित्य, अशी निर्मिती केली. असे करताना अवैदिकांच्या अनेक देव-देवता, कथा, समजुती, जीवनपद्धती, पूजाविधी इत्यादी आत्मसात केले. त्यांना नवे रूप दिले. उपनिषदांच्या भव्य तत्त्वज्ञानाची निर्मितीही वैदिक आणि अवैदिक संस्कृतींच्या साहचर्यामुळे झाली. पूजा-अर्चा असा शब्द वापरला जातो. यातल्या अर्चनेचा अर्थ मंत्रोच्चाराने स्तुती करणे असा आहे. पूजेचा भाग हा अवैदिकांकडून आला आहे तर अर्चनेचा भाग वैदिकांकडून आलेला आहे.

आर्य आणि अनार्य यांच्या दैवतांचे जसे एकत्रीकरण झाले तसे उत्तर वैदिक काळात आर्यांचे इंद्र, अग्नी, वरुण, सविता, ब्रह्मा इत्यादी मूळ देव मागे पडले. त्यांची गुणवैशिष्ट्ये नव्या दैवतांमध्ये सामावली गेली. वेदातील रुद्र शंकराच्या रूपात सामावला. शंकराने दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस केला होता अशी कथा प्रसिद्ध आहेच. विष्णू आणि नंतर त्याचे अवतार गणले गेलेले कृष्ण आणि राम 'हे रंगाने आकाशासमान निळे किंवा मेघासमान काळे आहेत. त्यांचा वर्ण गोऱ्या मूळ आर्यांचा नाही यावरून ते द्रविडांचे मूळ देव असावेत असे अनुमान सहज निघते' असे लक्ष्मणशास्त्री जोशींनी त्यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथात म्हटले आहे. शंकराचे मुलगे स्कंद आणि गणेश हे तर नक्कीच मूळचे द्रविड देव. गणेश किंवा गणपती यामध्ये तो गणांचा नेता आहे हे उघड आहेच. आर्यांच्या यज्ञांमध्ये विघ्न आणणारा म्हणून तो आधी विघ्नकर्ता होता. नंतर तो विघ्नहर्ता, विद्येची देवता झाला. आर्यांच्या देवांना



असुर आटपेनासे झाले म्हणून स्कंद म्हणजेच कार्तिकेय याला देवांचा सेनापती करण्यात आले.

बौद्ध धर्माने वैदिकांसमोर मोठेच आव्हान उभे केले होते. इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकापासून इसवीसनाच्या सातव्या शतकापर्यंत बौद्ध धर्माला राजाश्रय लाभला. अनेक विद्वान ब्राह्मणांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि ते बौद्ध धर्माचे प्रचारक बनले. बहुजन समाजातही बौद्ध धर्माचा प्रचार झाला. इसवी सनाच्या सुरुवातीपासून सातव्या शतकापर्यंत भारत बौद्धमय होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. गौतम बुद्धच्या महापरिनिर्वाणानंतर त्याच्या अस्थी, केस, दात इत्यादी अवशेषांवर त्याच्या शिष्यांनी स्तूप उभे केले. सुरुवातीच्या काळात बुद्धाची पूजाही प्रतीकाच्या रूपात होत असे. सांचीच्या स्तूपावर पावलाच्या प्रतिमा किंवा बोधिवृक्षाची प्रतिमा या स्वरूपात बुद्धाची पूजा होत असे. इसवी सनपूर्व चौथ्या शतकात बुद्धाच्या मूर्ती घडवायला प्रारंभ झाला असे मानले जाते. याच सुमारास जैन धर्मातही मूर्तिपूजेला प्रारंभ झाला.

जैन आणि बौद्ध धर्माने उभ्या केलेल्या आव्हानाला तोंड देण्यासाठी पारंपरिक वैदिक धर्माने स्वत:मध्ये बदल घडवून आणला. अवैदिकांच्या देवतांचा, त्यांच्याशी संबंधित असलेल्या पूजाविधींचा स्वीकार केला. वैदिक देवांच्या ऐवजी ब्रह्मा, विष्णू, महेश ही त्रिमूर्ती पुढे आली. याच काळात शैव आणि वैष्णव पंथांची वाढ झाली. वैष्णव पंथाला राजाश्रय मिळाला. भारतभर शिवाच्या आणि विष्णूच्या, त्यांच्या भोवतालच्या गोतावळ्याच्या मूर्ती घडवल्या गेल्या. देव, देवी, त्यांची मुलेबाळे, भक्तगण, अप्सरा, गंधर्व, यक्ष यांच्या मूर्ती घडवताना मानवी प्रतिभेने आणि कौशल्याने शिखर गाठले. सुरुवातीला लेण्यांमध्ये असणारे विविध धर्मांचे-पंथांचे देव देवळांमधून राहायला लागले. मंदिरे बांधली गेली. अर्थात कालांतराने मूर्तिपूजेभोवती कर्मकांडाचे अवडंबर उभे राहिले आणि देव पुरोहितांच्या ताब्यात गेले. मंदिरांजवळ प्रचंड संपत्ती जमा झाली. परकीय आक्रमकांना भारताचे आकर्षण वाटण्याचे हेही एक कारण होते.

नव्या दैवतांचे सामिलीकरण करण्याकरता अवतार कल्पना अस्तित्वात आली. निर्गुण उपासनेबरोबरच सगुण उपासना सुरू झाली. भक्तिमार्गावर आधारित वैष्णव पंथ समाजाच्या सर्व थरांमध्ये लोकप्रिय झाला. विष्णूचे अवतार असलेल्या कृष्णाच्या आणि रामाच्या भक्तीचे संप्रदाय उभे राहिले. वेगवेगळ्या प्रातांमध्ये भक्तिसंप्रदायही अस्तित्वात आले. सर्वसामान्य माणसांना गूढ तत्त्वचर्चेपेक्षा सगुण रूपात उभा असलेला देव अधिक जवळचा वाटला यात नवल ते काय! भक्तिमार्गी चळवळींनी माणसामाणसांमधल्या समतेची द्वाही फिरवून देव सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यात आणला. मात्र असे असूनही हिंदूंचा पारंपरिक जीवनक्रम हा पूर्णपणे रूढीबद्ध होता. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत, जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व बाबी रूढींनी ठरवलेल्या होत्या. रोटी-बेटी व्यवहार ही तर दूरची बाब होती. परंतु खायचे काय, प्यायचे काय, कोणाबरोबर वावरायचे, झोपताना कोणत्या दिशेला पाय करून झोपायचे, प्रवासाला कधी निघायचे, स्नान कसे कधी करायचे, इतकेच काय शौचाला कसे बसायचे याचेही यम-नियम होते. या रुढींचे पालन नीट होते आहे की नाही बघायला

जात, समाज, गाव हे समूह सज्ज होते वर देवाचे, पितरांचे भय होतेच. भक्तिमार्गाने तात्त्विक पातळीवर स्वीकारलेली समता प्रत्यक्षात उतरली नाही. या रूढीबद्ध समाजाला इंग्रजांच्या येण्यामुळे हादरे बसले. रूढीपरंपराचा, धर्मतत्त्वांचा नव्याने विचार सुरू झाला. धर्मसुधारणेच्या चळवळी उभ्या राहिल्या पण ही सर्व हालचाल समाजाच्या वरच्या थरातच मर्यादित राहिली. सर्वसामान्य माणसे कोपिष्ट देव, भुते, जखिणी आणि त्यांचे मध्यस्थ यांच्याच ताब्यात राहिली.

शास्त्रीय ज्ञानाची जशी प्रगती होईल तशी प्रत्येक घटनेमागे दैवी कारणे शोधण्याची प्रवृत्ती कमी होईल, कृतक धर्माचा, देवांचा पगडा कमी होईल, अशी समजूत होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. अंधश्रद्धांचे दुकान नुसते चालू राहिले नाही तर भरभराटीला आले. नवसाला पावणाऱ्या आणि नवस न फेडणाऱ्यांना शिक्षा करणाऱ्या, पूजेत न्यून राहिले म्हणून कोप पावणाऱ्या देवांची फौज उभी राहिली. सर्वसामान्य लोकांच्या मनातल्या भीतीचा फायदा पुरोहितशाही घेत होती आणि आहे.

समाजाच्या समजुतींचे, विचारधारणेचे प्रतिबिंब देवांच्या प्रतिमेतही पडते. अलीकडच्या काळातले देव आणि त्यांची देवळे श्रीमंत आहेत. संपत्तीच्या बाबतीत ते उद्योगपतींशी स्पर्धा करतात. खूपसे दागिने घालतात. उंची वस्त्रप्रावरणे नेसतात. माणसांचा दृष्टिकोन जसा उथळ आहे तसाच देवांचाही आहे. परिणामांची चिंता करताना किंवा माणसांच्या सद्सदविवेक बुद्धीला टोचणी लावताना ते दिसत नाहीत. काही जुनेच देव नव्या रूपात अवतरले आहेत. देव कसे अस्तित्वात येतात याविषयी संतोषीमातेचे उदाहरण प्रसिद्ध आहे. सेलिब्रिटी भक्तांमुळे देवही सेलिब्रिटी होतात. माणसांच्या मनात करुणा नाही. ती त्यांच्या देवांच्या मनातही नाही. ऋग्वेदामध्ये 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति' म्हणजे सर्वच एका ईश्वरामधून प्रकटलेले आहे असे म्हटले आहे. व्यवहारात बहुदेवतावादी असलेला हिंदू धर्म मूलत: एकेश्वरवादी आहे. त्यामुळेच तो विविध विचारधारांना सामावून घेऊन नव्या रूपात उभा राहू शकला.

आता देवांपेक्षाही देवाच्या दलालांचे बाबा-बापूंचे प्रस्थ वाढले आहे. यात स्त्रियाही मागे नाहीत. त्यांना माँ म्हणण्याची पद्धत आहे. बाबा-बापू आणि या माँ यांना बऱ्यावाईटाची चाड नाही. समाजालाही नाही. सर्व देवांशी स्पर्धा करत रामाने सर्वांना मागे सारले आहे. त्याच्या बरोबरीने परशूरामही स्पर्धेत आहे. काशीविश्वेश्वराचे प्रस्थ वाढले आहे. स्पर्धेत कृष्ण, पुरीचा जगन्नाथ, वैष्णोदेवी इत्यादी देव जरा मागे पडले आहेत. तिरुपतीचा भक्तसंप्रदाय होता तिथेच आहे. वेगवेगळ्या शंकराचार्यांनी कितीही आगपाखड केली तरी साईबाबांचे महत्त्व वाढतच आहे. महाराष्ट्रापुरता विठ्ठल 'कटीवरी कर ठेवूनी विटेवरी उभा' आहे, पण त्याच्या भक्तमंडळींमध्ये आक्रमक प्रवृत्तींचा शिरकाव झाला आहे. देवांचे शांत, सोज्वळ रूप, समाधानी चेहरे जाऊन आता ते युद्धमान दिसतात. ते आता बिनमिश्यांचे, थुलथुलीत पोटाचे राहिले नाहीत तर सिक्स पॅक ॲब्ज असणारे, युयुत्सू पुरुष आहेत. परंतु ह्या देवांना अनादी काळापासून जशी नव्हती तशीच सर्वसामान्य माणसांच्या हालअपेष्टांची काळजी नाही. त्यांच्याविषयी करुणा नाही. समाजांचे होते तसेच त्यांच्या देवांचही उन्नयन होते, ऱ्हास होतो. त्यांचे रूप बदलते, स्वभाववैशिष्ट्ये, कर्तृत्वात फरक पडतो. देवांविषयी विचार करताना मला नेहमी बाबूराव बागुलांची एक कविता आठवते, ती अशी-

*'वेदाआधी तू होतास,*
*वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास,*
*पंच महाभूतांचे पाहून, विराट, विक्राळ रूप*
*तू व्यथित, व्याकूळ होत होतास,*
*आणि हात उभारून तू याचना करीत होतास,*
*त्या याचना म्हणजे 'ऋचा'*
*सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव, तूच साजरे केलेस,*
*सर्व प्रेषितांचे बारसेही,*
*तूच आनंदाने साजरे केलेस*
*हे माणसा, तूच सूर्याला सूर्य म्हटलेस*
*आणि सूर्य, सूर्य झाला*
*तूच चंद्राला चंद्र म्हटलेस, आणि चंद्र, चंद्र झाला*
*अवघ्या विश्वाचे नामकरण*
*तू केलेस*
*अन् प्रत्येकाने मान्य केले, हे प्रतिभावान माणसा,*
*तूच आहेस सर्व काही,*
*तुझ्यामुळेच संजीवसुंदर*
*झाली ही मही'*
– बाबूराव बागूल

माणसाच्या कल्पनेतला पहिला देव हा प्रलयंकारी होता. माणसांच्या बरोबरच त्याचेही उन्नयन होत गेले. देवाच्या मनात करुणा उत्पन्न झाली. तो माणसांचे गाऱ्हाणे ऐकू लागला, त्याचे अपराध पोटात घालू लागला. त्याच्यावर कृपादृष्टी ठेवू लागला. माणसाच्या मनातली देवाची भीती कमी झाली. तो त्याला वडिलधारी व्यक्ती वाटू लागला. माणसाचे जग विस्तारले तशी देवांची संख्या त्यांची रूपेही विस्तारली. काळाच्या ओघात माणूस अनेक देवांमधले शाश्वत, व्यापक देवतत्त्व शोधू लागला. सर्वात्मक, सर्वेश्वर, जे जे जगी जगते तया माझे म्हणणारा करुणाकर, अशा देवाची कल्पना करणारा माणूस त्या आदर्शापर्यंत पोहोचावा इतकेच.

**– सुनंदा भोसेकर**
sunandabhosekar@gmail.com



राजीव जोशी

# नाटकातली ‘नाती’गोती

## शतकी वाटचालीचा आढावा

**बेकेटचे रूपांतर करताना मालक-मजुराचे नाते आपल्या परिप्रेक्ष्यात मांडून त्याद्वारे आपल्याकडील कामगारसंघर्षाचे केलेले चित्रण, हिराबाई पेडणेकरांना डोळ्यांसमोर ठेवून स्वतंत्रपणे उभी केलेली ‘कस्तुरीमृग’ नाटकातील नायिका व तिच्या आयुष्यात आलेले बहुढंगी पुरुष हेही स्त्री-पुरुष नात्यातील वेगळे व ठसठशीत नाट्यरूप.**



मराठी नाटकाने सर्वच प्रकारची नाती, त्यांच्यातील भावबंध-संघर्ष टिपले आहेत. ताई-भाऊ ह्यांची नाटके, उत्तुंग व्यक्तिरेखेवरील नाटके, उपेक्षित व्यक्तींच्या जीवनावरील नाटके अशी अनेकविध नाटके आजपर्यंत येऊन गेलेली आहेत. या नाट्यविश्वात अनवट -हल्लीच्या काळात OUT OF BOX प्रकारची नाती, त्यांच्यातील वाद-संवाद घडणारी नाटकेही आली आहेत. किंवा आजही काहीजण अशी वेगळी नाती एक्स्प्लोर करत आहेत. बदलत्या समाजरचनेत आणि कुटुंबव्यवस्थेत पारंपरिक नाती कसकशी बदलत गेली, नवनवीन नात्यांचा प्रवाह कसा प्रवाहित राहिला हे आपण पाहणार आहोत. काही उदाहरणे ही अपवादात्मक असू शकतील, पण त्यांची दखल घेण्याचे, त्यांच्या कथा-व्यथा मांडण्याचे काम त्या-त्या कलावंतांनी त्या अमुक कालखंडात प्रामाणिकपणे केलेले होते. हजारो नाटकांच्या या महासागरातून निवडक मोती वेचण्याचे काम तसे अवघडच. परंतु दिवाळी अंकाच्या माध्यमातूनच असा शोध-वेध घेणे शक्य होते. रंगभूमीचा एकूणच आवाका महाकाय असल्याने पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन टप्पे केलेले आहेत. जेणेकरून दोन्ही कालखंडांतील वेगळ्या नात्यांचा ऊहापोह करणारी नाटके व त्यातील व्यक्तिरेखा याबद्दल रीतसर आढावा घेता येईल.

**पूर्वार्ध–**

संगीत व पद्यनाटकातील भिन्न व्यक्तिरेखांचा नातेबंध - ब्रिटिशकाळात तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील काही अनवट नाटके - आज ह्यापैकी काही नाटके स्मरणातून बाद झालेली असल्याने गुगल-विकीपेडियातही दिसणे तसे कठीणच. परंतु काही अभ्यासक-संशोधकांनी घेतलेल्या मेहनतीमुळे आज काही नाटके -त्यांचे कथा-विषय, व्यक्तिरेखा आपल्यासमोर मांडता येत आहेत. आजचे आपण काही विषय पाहतो तर थक्क होऊन जातो, परंतु पूर्वीच्या गद्य-पद्य नाटकांतूनदेखील तेव्हाच्या काळाच्या तुलनेने धाडसी विषय व अशा अनोख्या व्यक्तिरेखांचे चित्रण केल्याचे आढळते. पौराणिक नाटकांत नाटककार ह. ना. आपटे ह्यांनी ‘संगीत सती पिंगला’मध्ये गणिकेचा भक्तिमार्गाने जाण्याचा प्रवास टिपलेला होता. द्रोणाचार्य-एकलव्य ह्यांच्यातील नात्यांवर अभिनव दृष्टिकोन

मांडलेला होता के. ना. काळे लिखित 'प्रयोजन' नाटकात. 'तोतयाचे बंड' नाटकात तोतया पेशवा कसा धुमाकूळ घालतो हे साहित्यिक नाटककार न. चिं. केळकर यांनी मांडले होते. 'संगीत वीर विडंबन' नाटकात बृहन्नडेच्या रूपातील अर्जुनाची कथा-व्यथा उभी केली होती.

राजकीय-सामाजिक नाटकांमध्ये लोकप्रिय नाटककार मधुसूदन कालेलकर ह्यांनी 'संगीत पंधरा ऑगस्ट' नाटकात फाळणी व मुसलमान कुटुंबाचा प्रश्न मांडला होता. माधव जोशी ह्यांचे 'संगीत म्युनिसिपालिटी' तर कौटुंबिक नाटककार म्हणून लोकप्रिय झालेल्या बाळ कोल्हटकरांनी 'संगीत मला निवडून द्या!' नावाचे प्रांतिक विधिमंडळ निवडणुकांचा वेगळा विषय हाताळलेला होता. 'संगीत बच्चा नवरा' असे विक्षिप्त शीर्षक असलेल्या नाटकात वयाने मोठी असलेली श्रीमंत पत्नी व लहान पतीच्या नातेसंबंधाचे चित्रण केले होते. स्त्री नाटककार मुक्ताबाई दीक्षित ह्यांनी 'संगीत जुगार' नामक नाटकात प्रथम पत्नीचा त्याग केलेल्या व्यक्तीबरोबर विवाह करणारी स्त्री दाखवली होती. 'डॉ. कैलास' असे शीर्षक असलेल्या नाटकात विनायक चिं. देवरुखकर ह्यांनी धाडसी विषय मांडलेला, ज्यात जन्मकथा माहीत नसलेले बहीण-भाऊ एकमेकांच्या प्रेमात पडल्याने कुटुंबात होणारा संघर्ष टिपलेला होता. (पुढे हाच विषय विख्यात नाटककार महेश एलकुंचवार ह्यांनी 'वासनाकांड' नाटकात अतिशय संयतपणे व संवेदनशील प्रकारे लिहिला व तितक्याच कलात्मकरीत्या अमोल पालेकर-चित्रा पालेकर ह्यांनी सादर केला होता. पण त्यावर तथाकथित संस्कृती रक्षकांनी खूप गदारोळ उठवला होता. ह्याच नाटककार देवरुखकरांनी आपल्या 'दुसरे काळीज' नाटकाद्वारे ट्यूब बेबी म्हणून जन्माला आलेल्या मुलामुळे होणारे वादळ नाट्यपूर्ण पद्धतीने उभे केले होते. श्रीकृष्णाचा नातू-अनिरुद्ध व बाणासुराची मुलगी- उषा ह्यांची अनोखी प्रेमकथा 'संगीत उषा' नाटकात दामोदर वि. नेवाळकर यांनी मांडली आणि 'संगीत दंडधारी'मध्ये टिळक-आगरकर ह्यांच्यातील वैचारिक मतभेदांना नाट्यरूप दिले होते अशी माहिती आढळते. नंतरच्या काळात विश्राम बेडेकरांचे 'टिळक आणि आगरकर' हे नाटकही आले होते, गाजले होते. आणखी एक महिला नाटककार वसुंधरा पटवर्धन यांनी 'संगीत हिरकणी' असे ऐतिहासिक वाटेल अशा नाटकांत जन्मापासून १८ वर्षे पित्यापासून दूर राहणाऱ्या एका मुलीची कहाणी मांडलेली आढळते. पुढे हाच विषय थोड्या वेगळ्या प्रकारे नाटककार वसंत सबनीस ह्यांनी 'कार्टी श्रीदेवी' अर्थात 'कार्टी काळजात घुसली' या नाटकात मांडला आणि मंगेश कुलकर्णी लिखित 'आईशप्पथ' नाटकात नाना पाटेकर पित्याच्या भूमिकेत तर कन्या म्हणून विद्या चितळे, आताच्या विद्या करंजीकर होत्या आणि दिग्दर्शन प्रकाश बुद्धिसागरचे होते. सबनीस-कुलकर्णी ह्यांच्या नाटकांना इंग्रजीतील 'I OUGHT TO BE IN THE FILM!' या नाटकाचा आधार होता. हे तेव्हा शफी इनामदार ह्यांनी हिंदीत केले होते. ज्येष्ठ समीक्षक म्हणून ख्यातनाम असलेल्या माधव मनोहरांनी काही नाटकांचा अनुवाद केला होता, त्यात 'मदर-अर्थात मदर' या नाटकांत जिचा पती व चार पुत्र मृत्युमुखी पडले असतानाही आपल्या धाकट्या मुलाला रणांगणावर पाठवण्याचा निर्णय घेते. असा आई-मुलाच्या नात्याचा वेगळा पैलू उभा केला होता. ज्यांच्या अनेक नाटकांना भरपूर लोकप्रियता मिळाली असे मो. ग. रांगणेकर ह्यांचे 'संगीत नंदनवन' एका पत्नीचा पती व्यसनी आहे हे कळल्याने ती त्याचे घर सोडून दुसऱ्या पुरुषाकडे जाते, पण पुढे ती पतीकडे परत येऊन त्याच्या व्यसनाला आळा घालण्याचा प्रयत्न करते, असे कौटुंबिक कथानक मांडले होते. चिंतामणी मराठे ह्यांनी 'संगीत होनाजी बाळा' लिहिले होते व त्यातून शाहीर होनाजी व बाळा यांच्या मैत्रीची कहाणी सांगितली होती. ह्याच नाटककाराने 'संगीत कन्यादान' नामक नाटकात दोन घरजावई दाखवले होते. पैकी एक सासुरवाडी सुखी तर दुसरा दु:खी असलेला. हे वैविध्य नक्कीच त्या काळातील वातावरणात वेगळे म्हणायला हवे.

***उत्तरार्ध–***

नाटकातील बदलत गेलेल्या नात्यांचा आढावा – १९६०पासून मराठी नाटकांत आधुनिकता दिसू लागली. परदेशातील नवतेचे वारे आपल्याकडेही वाहू लागले. विशेषत: ABSURD, अ-संगत नाटके सुरुवातीला आयात केली गेली. पुढे त्याच धर्तीवर आपली नवीन प्रायोगिक नाटके लिहिली व सादर होऊ लागली. उदाहरणे म्हणजे 'गोची', 'वेटिंग फॉर गोदो'. पुढील काही वर्षे प्रायोगिक रंगभूमी विकसित झाली, तिला छबिलदास चळवळीने बळ मिळाले. या चळवळीचा प्रभाव तत्कालीन हौशी व आंतरमहाविद्यालयीन एकांकिकस्पिर्धांवर भारतीय विद्याभवन, आयएनटी, उन्मेष या संस्थांवर पडला आणि त्यातून देशी प्रायोगिक नाटके करणारी युवा पिढी तयार झाली. तेंडुलकर-खानोलकर आणि काही प्रमाणात प्रयोगशील असलेल्या कानेटकरांच्या बरोबरीने सतीश आळेकर, अच्युत वझे हे नाटककार-दिग्दर्शक आपल्या नवनवीन नाट्यकृती घेऊन प्रायोगिक रंगभूमी समृद्ध करू लागले होते. खानोलकरांच्या 'एक शून्य बाजीराव'मधील विदूषक असलेला बाजीराव व त्याचे काठी-टोपी आणि हातातील व्हायोलिन-केसशी असलेले नाते म्हणजे आजवरच्या नाटकांतील असंगत-विसंगततेचा एक लक्षणीय दाखला. त्यांच्याच 'अवध्य' नाटकातील लेखक-गंगाधर आणि कांचन नटी ह्यांच्यातील नातेसंबंध व ह्याच नाटकातील झरोक्यातील प्रणयदृश्ये हा एक वेगळाच नाट्यानुभव होता. ह्याच नाटककाराने पुढे साहित्य संघासाठी 'कॉकेशियन चॉक सर्कल'चे 'अजब न्याय वर्तुळाचा' नावाने



'मॅड सखाराम' नाटकामधील दृश्य

चांगले रूपांतरण केले. त्यात एका मुलाच्या खऱ्या आईचा प्रश्न अगदी कलात्मक पद्धतीने सोडवलेला होता. वसंत कानेटकरांच्या 'वेड्याचे घर उन्हात' या नाटकातील दादाजी ही भूमिका म्हणजे मानसशास्त्रीय दृष्ट्या उभी केलेली सशक्त भूमिका म्हणावी लागेल. कारण दादाजींनी आपल्या सर्व भावंडाना घराबाहेर काढल्यावर त्यांना नंतर होणारा पश्चात्ताप व त्यांच्या मनातील 'गिल्ट'चा उद्रेक होतो. घर सोडून गेलेला 'दामू' त्यांना भासदृश्यातून वारंवार दिसणे व त्यातून त्यांची अस्वस्थता वाढत जाऊन अंतिमत: त्याची पर्यवसान वेडात होणे हे एका प्रभावी व्यक्तिरेखेचे व त्यांच्या नात्यातील बिघाडाचे उदाहरण आहे. पुढे कानेटकरांनी 'हिमालयाची सावली' नाटकातून उत्तुंग व्यक्तिमत्त्व, त्यांची अर्धांगी व सुनबाई ह्यांच्यातील नात्यांचा आलेख मांडलेला आढळतो. अशा थोर विभूतींची बायको म्हणून सोसण्याचे, भोगण्याचे दु:ख त्यांच्या सुनेच्या वाट्याला येत नाही हे अत्यंत सूक्ष्मपणे त्यांनी उभे केलेले आहे. समाजातील प्रभावी व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास करून त्यांच्या आयुष्याशी समांतर घटनांचा पट मांडून कानेटकर ह्यांनी अनेक नाटके लिहिली. उदाहरणार्थ –'रायगडला जेव्हा जाग येते'मध्ये शिवाजीमहाराज व संभाजीमहाराज ह्यांच्यातील बाप–लेकाच्या नात्यावर ऐतिहासिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिक–कौटुंबिक नाटकाप्रमाणे प्रसंग बेतून संघर्ष घडवला. शंभूराजे म्हणतात– आम्हाला राज्य नको, सिंहासन नको, आपल्या पायाची जोड आम्हाला हवी आहे! 'वादळ माणसाळतेय'मधील व्यक्तिरेखेचे बाबा आमटेंशी असलेले साधर्म्य, 'विषवृक्षाची छाया' नाटकातील प्रमुख व्यक्तिरेखेचे इतिहासकार राजवाडे ह्यांच्याशी असलेले काही प्रमाणातील साम्य, बेकेटचे रूपांतर करताना मालक–मजुराचे नाते आपल्या परिप्रेक्ष्यात मांडून त्याद्वारे आपल्याकडील कामगारसंघर्षाचे केलेले चित्रण. हिराबाई पेडणेकरांना डोळ्यांसमोर ठेवून स्वतंत्रपणे उभी केलेली 'कस्तुरीमृग' नाटकातील नायिका व तिच्या आयुष्यात आलेले बहुढंगी पुरुष हेही स्त्री–पुरुष नात्यातील वेगळे व ठसठशीत नाट्यरूप. कानेटकर ह्यांनी मध्यमवर्गीय दांभिकता उघडपणे मांडली 'श्रीमान' नाटकात खालच्या वर्गातील श्रीधरला गर्भार मथुराचा पती म्हणून निवडतात. त्यावरचा त्याचा उद्रेक– 'माणसे विकत घेणारे तुम्ही मध्यमयुगीन पशु आहात!' हा नायक मध्यमवर्गीय मूल्यांच्या विरोधात उभा ठाकतो. सुस्वभावी–सुसंस्कृत व कृतक नाटकांच्या भाऊगर्दीत तेंडुलकर ह्यांनी पोकळ नात्यातून कुटुंबपद्धतीतील खोटेपणा बाहेर आणला. कवी कुसुमाग्रज म्हणजे तात्यासाहेब शिरवाडकर ह्यांनी 'दुसरा पेशवा' लिहिले, 'चंद्र जिथे उगवत नाही' यासारख्या नाटकातून वेश्याजीवनाचे कलात्मक चित्रण केले. पण त्यांचे 'नटसम्राट' हे LANDMRK नाटक अप्पासाहेब बेलवलकर या नटाच्या व्यक्तिरेखेमुळे व भारदस्त भाषेतील अभिजात स्वगतांमुळे वैशिष्ट्यपूर्ण मानले जात असले तरी अप्पा व त्यांची पत्नी कावेरी ह्यांच्यातील नाते तत्कालीन समाजातील नवरा–बायकोप्रमाणे नक्कीच नव्हते. वानगीदाखल सांगायचे तर अप्पा कावेरीला विचारतात– बायको मैत्रीण असू शकत नाही का? तेव्हा कावेरीने दिलेले उत्तर– 'पण ती आई अधिक असते.' ह्यातून स्त्री ही अनंत काळाची माता असते या सार्वत्रिक समजुतीचे उदात्तीकरण केल्याचे जाणवते. आधुनिकतेचे कितीही डांगोरे पिटले तरीही स्त्रीविषयक संकुचित दृष्टिकोन बऱ्याच नाटकांतून दिसून येतो. अपवादात्मक सांगायचे तर सई परांजपे ह्यांची जास्वंदी नाटकातील 'जास्वंदी' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा, 'माझा खेळ मांडू दे'मधील भिन्न प्रवृत्ती–परिस्थितीतील स्त्रियांचा उल्लेख करावा लागेल. जयंत पवार लिखित 'अधांतर'मधील आई, संजय पवार ह्यांचे 'ठष्ट' तसेच स्त्रीवादी स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या वंदना खरे ह्यांनी 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' यासारख्या वेगळ्या वाटेच्या नाटकांतून सणसणीत सक्षम स्त्री–व्यक्तिरेखांचा गोफच पाहायला मिळाला होता. सुषमा देशपांडेनी एकपात्री आविष्कारातून –'व्हय मी सावित्रीबाई'च्या माध्यमातून सावित्रीबाई व जोतिबा फुले दांपत्याचा खडतर जीवनप्रवास व त्यांच्यातील एकरूपतेचे दर्शन घडवले होते. तेंडुलकर ह्यांच्या 'गिधाडे'मधील तथाकथित उच्चभ्रू मध्यमवर्गीय कुटुंबातील नाती तर आजवरच्या नात्यांचा, कुटुंबातील व्यक्तींमधील संबंधितांचा अगदी ३६० डिग्री म्हणतात तसा टोकाचा प्रवास दाखवण्यात आला होता. उमाकांत–रमाकांत हे भाऊ माणिकच्या पोटावर लाथ मारून त्यातील गर्भ पाडण्याच ठरवतात. तशी हिंस्र कृती बेलाशक करतात ते नात्याचा, कुटुंबसंस्थेचा अजिबात विचारही करत नाहीत. इस्टेटीवर हक्क सांगत एकमेकाचा गळा धरणे, नवऱ्यापेक्षा दिराची काळजी घेणारी रमा. अशा व्यक्तिरेखांनी 'गिधाडे' उभे राहिले. त्याकाळात वादळी गणले गेले होते. तोवरच्या मराठी नाटकांनी कुटुंबातील गोड नात्यांचा

अव्वाच्या सव्वा उदोउदो केल्याचे आपण पाहिलेले आहे. वास्तवातील माणसे, मध्यमवर्गीय समाज चैनवादी झाल्याचे चित्रण तेंडुलकरांच्या लेखणीने केले. सखारामने बायका ठेवणे व चंपा त्याला पुरून उरणे; त्याची पत्नी लक्ष्मी ही सहनशील-सोशिक असली तरी एका क्षणी चंपा ही दाउदबरोबर जाते हे कळल्यावर सखारामचा मेल इगो दुखावून तो लक्ष्मीच्या सांगण्यावरून तिची हत्या करण्यास प्रवृत्त होतो.

कोल्हटकर पठडीतील नाटके कुटुंबसंस्थेचे रम्य दर्शन घडवत होते, पण ते भ्रामक होते. एखादा 'तो मी नव्हेच'मधील काझी व्हिलन म्हणून दाखवून किंवा लाल्या -प्राध्यापक विद्यानंद अशी सत्पासून असतकडे वळलेली माणसे व त्यांच्या गुन्ह्यांकडे अप्रूप म्हणून पाहणारे आपले प्रेक्षक प्रत्यक्षात दुटप्पी होते. रंगमंचावरून त्यांना गुडीगुडी नाटके बघायला आवडत होती. परंतु अवतीभोवती बदलणारे वास्तव नाटकांत येत नव्हते. पैसे देऊन कोण पाहतील का, अशी शंका व्यक्त करणारेच आभासी जीवनात रमत होते. परंतु नवा प्रेक्षकवर्ग तयार होत होता. विशेषतः बदलते समाजभान व खोट्या खोट्या करमणुकीला कंटाळलेला प्रेक्षक कौटुंबिकचे अजीर्ण झाल्यागत सामाजिक आशयाची नाटके स्वीकारत राहिला. परिणामी जितके कानेटकर स्वीकारले गेले तितके तेंडुलकर व त्यांच्या पुढच्या पिढीतले नाटककार प्रेक्षकमान्य होत गेले. महेश एलकुंचवारांच्या एकांकिका व नाटकांनी नवे आयाम शोधले. 'वाडा चिरेबंदी' या त्रिनाट्यधारेतील एकत्र कुटुंबपद्धतीतील नात्यांत पडणारा अंतराय म्हणजे बदलत्या पिढीचा जणू आरसाच. त्यांच्याच 'वासनाकांड' नाटकातील शिल्पकार-मॉडेल ह्यांच्यातील सृजन शोधात हेमकांत व ललिता हे दोघे बहीण-भाऊ असल्याचे प्रखर वास्तव कळल्यावर होणारा उद्रेक-वणवा अपूर्व असाच म्हणता येईल. केवळ प्रक्षोभक संबंधांचे चित्रण न करता निर्मितीचा ध्यास आणि जवळ येण्यातून यातनांचा जन्मच का व्हावा, असे प्रश्न प्रेक्षक म्हणून आपल्यालाही अंतर्मुख करतात. 'गार्बो' नाटकातील लेखक-नटी संबंधाचा वेगळेपणा (तसे नटीच्या आयुष्याचा आलेख मांडणारी नाटके म्हणजे सुरेश खरे लिखित 'काचेचा चंद्र' ज्यात भाऊ तिचे आर्थिक शोषण करत असतो, 'सांगते ऐका' या एकपात्री नाट्यरूपांत हंसा वाडकरांच्या व्यक्तिगत आहुतीचे चित्रण आढळते.) एलकुंचवारांच्या 'होळी' या एकांकिकेमधील युवकांच्या ऊर्जादायी मनातील कंगोरे शोधणे असो किंवा 'आत्मकथे'तील अनुबंधांचा वेध घेणे असो. त्यांच्या एकांकिका-नाटके आव्हान देत राहिली. तेंडुलकरांच्या 'कमला' नाटकाच्या निमित्ताने शोपत्रकारिता करणाऱ्या जयसिंगनामक पत्रकाराच्या पत्नीची-सरिताची व त्याने बाजारातून विकत घेतलेल्या- कमला या अशिक्षित स्त्रीच्या येण्याने एक मध्यमवर्गीय पत्नी खडबडून भानावर येते. इतके काळ कोषातील सुखी सहजीवन भोगणारी सरिता - तिला जाणीव होते की आपणही गुलाम आहोत! या भावनेने ती अस्वस्थ होते. कमलादेखील तिला विचारते की आपको कितने मे खरीदा? तिथून तिचा आत्मशोध सुरू होतो. ती निर्धार करते की मी म्हणजे काही वापरून फेकण्याची वस्तू नाही. यापुढे जे काही करायचे ते मी माझ्या इच्छेने करेन! सतीश आळेकर हे प्रायोगिक नाटकांतील तोलामोलाचे नाटककार. त्यांच्या 'बेगम बर्वे' या संगीत नाटकात जावडेकर-बावडेकर या कारकुनी जोडीचे अनेकपेडी संबंध व त्यातून संगीत नाटकातील स्त्री पार्टी भूमिका करणाऱ्याची व्यथा बोलकी केली होती. 'महापूर'मध्ये आधीच्या पितृ-पिढीचा भंपकपणा, मानसिकदृष्ट्या अस्थिर असलेल्या युवकाच्या मनोवैज्ञानिक अवस्थेला दृश्य रूपांत जिवंत केले होते.

**दोन पात्री नाटकांतील नातेसंबंध**

अशा स्वरूपाच्या नाटकांत पती-पत्नी नात्यातील गुंते, किल्मिषांची सोडवणूक, अफेअरसंदर्भात जाबजबाब ('चाहूल' व 'कळा या लागल्या जीवा'), पूर्वीच्या मैत्री वा अफेअरचा ऋणानुबंध, नित्यपणे जपण्यासाठी दरवर्षी हॉटेलात भेटणारी कपल (संकेत मिलनाचा, विधुरांच्या मैत्रीतून नाते निर्माण होताना विवाहित मुलांची मान्यता मिळण्याचा विषय - 'यू टर्न') नाटकांत रंजकपणे मांडले गेले होते. त्याच्या यशाने रंगभूमीवरील नाटके चालण्यास सुरुवात झाली आणि पुन्हा दोन पात्री नाटकांचा ट्रेंड सुरू झाला असे म्हणता येईल. 'प्रासंगिक करार' नाटकात संचारबंदी किंवा शहर बंद असताना एका एसटीमध्ये अडकून पडलेल्या स्त्री-पुरुषांचे अवघडलेपण उभे केले होते. 'आरोप', 'समुद्र', 'फायनल ड्राफ्ट' ही काही उल्लेखनीय नाटके सांगता येतील. अलीकडे गाजत असलेले थ्रिलर पठडीतील 'मास्टर माइंड' ज्यात आदिती सारंगधर व आस्ताद काळे ही जोडी प्रेक्षकांना आवडते, पूर्वी त्यांचे 'प्रपोजल' नाटकही प्रेक्षकांना खूप आवडले होते. 'ठकीशी



**'मास्टर माइंड' नाटकामधील दृश्य**

संवाद' हे दोन पात्र नाटक नुकताच रंगमंचावर आले आहे.

दोन पुरुष पात्रांची नाटके अगदी तुरळक प्रमाणात आली, त्यात रहस्यच्या वळणाने जाणारे 'खेळीया' हे स्ल्युथ या जगप्रसिद्ध नाटकावर आधारित होते. पुढे सुयोग या सुप्रसिद्ध नाट्यसंस्थेने आणलेले 'आप्पा-बाप्पा' हे दोन दिग्गज नटांच्या स्नेहबंधावरचे नाटक आधारित होते. त्यात विक्रम गोखले व दिलीप प्रभावळकर अशा दिग्गजांनी भूमिका केल्या होत्या. सरोजिनी वैद्य ह्यांच्या पुस्तकावर आधारित दोन पात्री नाटक- 'लंडनच्या आजीबाई' लेखन-राजीव जोशी, सादरकर्ते-वेदांगी कुलकर्णी आणि ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी. ज्यात आजीबाई वनारसे ह्यांची जीवनकहाणी अभिनव पद्धतीने मांडली गेली होती. हल्लीच्या काळातील यशस्वी झालेली दोन दोन पात्री नाटके महत्त्वाची. पैकी पहिले प्राजक्त देशमुख या नव्या कसदार सर्जनशील लेखकाचे 'संगीत देवबाभळी' - ज्यात फक्त दोन स्त्री कलाकारांच्या अभिनय-गायनाने रखुमाई व आवली ह्यांच्यातील नात्यातून भक्तीचा वेध घेतला गेलाय. तसेच दुसरे दोन पात्री नाटक म्हणजे '३८, कृष्ण व्हिला' - डॉ. गिरीश ओक आणि डॉ. श्वेता पेंडसे ह्यांनी लेखक-साहित्यिक अशा गंभीर विषयावर चर्चात्मक नाटक पाहणे हा एक वेगळाच आनंद आहे. ह्यातील मराठी भाषेचे सौंदर्य व दोन्ही कलाकारांची संवादातून प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याची हातोटी कमाल आहे. प्रायोगिकवर 'अङ्लेय का?' नामक नाटक प्रायोगिक चळवळ करणाऱ्या नाट्यकर्मी अतुल पेठे व त्यांची कन्या पर्ण पेठे ह्यांनी केले आहे. नाट्यगृह विकायला काढलेले आहे हा आजचा ज्वलंत तरीही दुर्लक्षित विषय आशय-अभिनयाने आपल्याला रंगमंचाचे महत्त्व पटवून देतो. 'पत्रापत्री' हा एक नवीन आकृतिबंध. ज्यात अभिनय, अभिवाचन व सादरीकरण असा त्रियोग जुळून आलेला आहे. प्रभावळकरांच्या पत्र-लेखनसंग्रहातील निवडक पत्रांचे वाचन खुद्द प्रभावळकर व दिग्दर्शक विजय केंकरे सादर करत आहेत. हिंदीतील 'तुम्हारी



'३८, कृष्ण व्हिला' नाटकामधील दृश्य



'पत्रापत्री' नाटकातील दृश्य

अमृता'मध्ये शबाना आझमी व फारूक शेख ह्यांनी फाळणीच्या पार्श्वभूमीवर असलेल्या नाटकात पत्रवाचन करण्याचा प्रयोग केला होता, जो मराठीत 'प्रेमपत्र' नावाने सादर झाला होता. तसेच 'इंदू काळे-सरला भोळे' या प्रायोगिक नाटकात कै. चेतन दातार ह्यांनी नाट्य रचले होते. (दिग्दर्शक प्रदीप मुळ्ये)

एकपात्री नाटकातील नात्यांचा, रिलेशनशिपचा प्रवास- अगदी ठळकपणे सांगायचे झाले तर प्रा. लक्ष्मण देशपांडे अभिनित 'वऱ्हाड चाललेय लंडनला'. बहुपात्री म्हणजे चक्क ५२ पात्रांना केवळ आवाज व मोजक्या साहित्याद्वारे दाखवणे हे अवघडच. गेली अनेकवर्षे संदीप पाठकसारखा हरहुन्नरी कलावंत अगदी निष्ठेने त्याचे प्रयोग करत असल्याने आजच्या पिढीला एकपात्री प्रयोगाची जादू व ताकद अनुभवायास मिळते आहे. अलीकडे आलेल्या 'मन' हे ज्येष्ठ नाटककार चं.प्र. देशपांडे लिखित नाटकात रमेश वाणी ह्यांनी १०० मिनिटांच्या प्रवासात मनातील आंदोलने सशक्तपणे अभिनयांकित केलेले आढळते. प्रायोगिकमधील दिग्दर्शक अभिजित झुंजारराव ह्यांनी हे अवघड शिवधनुष्य लीलया पेलले असल्याने ही दर्जेदार संहिता रंगमंचावरून सादर होते आहे. नवनवीन आव्हाने पेलण्याचे काम आजचे कलाकार करत आहेत. ह्याचे दुसरे उदाहरण म्हणजे सिरियलमध्ये व्यग्र असलेली मानसी कुलकर्णी. ती 'सांगत्ये ऐका' सादर करते आहे. (निर्मिती-आविष्कार व दिग्दर्शन- विश्वास सोहोनी) एकेकाळी सुषमा देशपांडे ह्यांनी केलेले 'व्हय मी सावित्रीबाई' हे नुकतेच इंग्रजीत आले असून मराठीप्रमाणेच सावित्रीबाईंचे कार्य नाट्यमाध्यमातून अमराठी प्रेक्षकांच्या समोर पोहोचू शकणार आहे. सिनेमा-मालिकेतील नंदिता पाटकर हिने ही भूमिका करण्यासाठी आपल्या व्यावसायिक कामांकडे दुर्लक्ष केले हेही कौतुकास्पद. पुण्याच्या अपर्णा चोथे या कलावतीने



**'व्हय मी सावित्रीबाई' इंग्रजी नाटकातील दृश्य**

सावरकरबंधूंच्या तीन पत्नींची त्याग-समर्पण-देशभक्तीची कथा-व्यथा सांगणारा एकपात्री नाट्यानुभव सादर केला 'त्या तिघी'द्वारे.

**अनवट पात्रे आणि नाटकातून साधलेली नाट्यमयता**

जयवंत दळवींच्या 'पुरुष' नाटकांत अखेरीस बंडा हे पात्र गुलाबरावाचे लिंग कापतो. जणू देवाचा अवतार असल्यागत जे कोणाला जमणार नाही ते धाडस करतो. 'वर खाली दोन पाय' असे नाटक 'पुरुष' नाटकावर आधारीत होते. (लेखक-दिग्दर्शक ऋषिकेश कोळी) 'तीन पैशांचा तमाशा'मध्ये भिकारी प्रशिक्षण केंद्र चालवणारे पंचपात्रे तसेच अंडरवर्ल्ड भाई अंकुश आणि वेश्येची कहाणी, जयवंत दळवींचा 'बॅरिस्टर' वेगळीच व्यक्तिरेखा, तर त्याची विधवा मावशी सेक्सची अतृप्त इच्छा मनात दडवून जगणारी, भाऊराव-राधाक्का ह्यांच्या संसारात




**'त्या तिघी' नाटकातील दृश्य**

बॅरिस्टर गुंततो. राधाक्का विधवा होते, तेव्हा तिला फर्मावतो की केस वाढव! सदानंद रेगे ह्यांनी 'इडीपस रेक्स'मध्ये सेक्स-नात्याबाबत भयंकर-प्रलयंकर विषय हाताळला होता. त्यानंतर श्याम मनोहरांनी 'यळकोट'मध्ये तीन जोडप्यांमधील थंड पती, धसमुसळा, घायकुतीला आलेला तसेच त्यांच्या पत्नी अशा सहा अर्कचित्रात्मक व्यक्तिरेखा उभ्या केल्या व जोडप्यातील शरीरसुखाच्या फॅण्टसीवर बोल्ड नव्हे पण आशयसंपन्न नाटक लिहिले. ते चंद्रकांत कुलकर्णी ह्यांनी दिग्दर्शित केले होते. 'चिन्ह' नावाच्या नाटकामध्ये मामीचेही असेच प्रक्षोभक नाते नाटककार वामन तावडे यांनी उभे केले होते. अनवट व्यक्तिमत्त्वाचा वेध 'घाशीराम कोतवाल'मध्ये घेतला गेला. माजलेल्या घाशीरामचा उगम व ऱ्हास आणि सादरीकरण म्हणून केलेला अनेक कलांचा प्रयोग अद्वितीय म्हणता येईल. सुडाच्या भावनेने प्रेमानंद गज्वी यांची देवनवरी चक्क देवीचा मुखवटा तोडते, हातात चाकू आणि दुसऱ्या हाती देवीचे मुंडके घेऊन ती निघते आणि सवाल करते- 'कशापायी हवी तू इथे?' इतके प्रखर नाट्य व प्रत्ययकारी शेवट म राठीत क्वचितच. तेंडुलकर ह्यांनी चार दशकांपूर्वी समलिंगी प्रवृत्तीच्या सुमित्राची व्यथा 'मित्राची गोष्ट' नाटकात अतिशय संयतपणे मांडली होती. प्र.ल. मयेकरांच्या 'रातराणी'मधील ॲना व सॅली, 'अग्निपंख' नाटकातील रावसाहेब-बाईसाहेब या व्यक्तिरेखा आणि गांधीवध याची पार्श्वभूमी प्रत्ययकारी आहे. 'वाटा-पळवाटा' दत्ता भगत व 'कन्यादान' तेंडुलकर या दोन्ही नाटकांत नायक दलित तर नायिका ब्राह्मण दाखवून जातिव्यवस्थेतील काही अनोखे भावबंध शोधले गेले आहेत. पुढे संजय पवार लिखित 'कोण म्हणतो टक्का दिला?' नाटकात सरकारी योजनेद्वारे एक दलित ब्राह्मण घरात रहायला आल्यावर होणारा धार्मिक-सामाजिक कल्लोळ आणि व्यक्तिगत संघर्ष टिपलेला आहे. हे करत असताना उपरोध-उपहासात्मक संवाद हे वैशिष्ट्य. प्रशांत दळवींच्या 'चारचौघी'त आई व तिच्या मुलींचे जोडीदाराच्या संबंधातील नातेसंबंध दाखवले आहेत. या नाटकाचे अलीकडेच नव्या संचात सादरीकरण झाले. त्यातून स्त्रीविषयक प्रश्नांच्या जाणिवांचा मुद्दा अधोरेखित झाला. पूर्वी विद्या ही भूमिका वंदना गुप्तेंनी केली होती तर आता मुक्ता बर्वेने तितक्याच ताकदीने उभी केली. बत्तीस वर्षांपूर्वीचे हे नाटक तेव्हा काळाच्या पुढचे मानले गेले, पण प्रगती होऊनही स्त्रियांबाबतची प्रवृत्ती व दृष्टिकोनात बदल फारसा बदल झालेला नाही ही समाजवास्तवाची शोकांतिका म्हणायला हवी. फार पूर्वी म.बा. चितळे ह्यांनी 'मनोरमा' या नाटकातून विधवांची दु:स्थिती दाखवणाऱ्या - ठकू, गोडी, गंगू व कुशी अशा चारचौघी रंगवलेल्या होत्या. तसेच कवी पु.शि. रेगे ह्यांच्या 'रंगपांचालिका'मधील सावित्री एकपात्री नाट्य-रवींद्र लाखे व प्रिया जामकर आणि जयवंत दळवींची 'सावित्री' नाटकातील



‘अस्तित्व २’ नाटकामधील दृश्य



‘मन’ नाटकामधील दृश्य

आधुनिक सावित्री ही व्यक्तिरेखा आजच्या काळातील वाटते. सई परांजपे ह्यांनी ‘जास्वंदी’ नाटकात दोन बोके दाखवून त्यांच्या मार्फत टिपण्णीचा अनोखा प्रयोग केलेला होता. ‘शांतता कोर्ट’मधील बेणारेबाईचे स्वगत आणि ‘चारचौघी’तील टेलिफोनवरील दीर्घकालीन बोलणे ही प्रगल्भ स्वगतांची काही उदाहरणे. तसाच अनुभव डॉ. लागूंच्या ‘सूर्य पाहिलेला माणूस’मध्ये प्रभावी शैलीत उभा केला होता. राजकीयदृष्ट्या ‘उद्ध्वस्त धर्मशाळा’, शफाअत खान लिखित ‘शोभायात्रा’-मधील बोचरा उपहास तर सामाजिक नाटकाबाबतीत ‘किरवंत’-मधील क्रियाकर्म करणाऱ्या पंथातील एकाची प्रातिनिधिक व्यथा हे सारे आशय-रूपबंध म्हणून अनवटच होते. गिरणगाव व गिरणी कामगारांच्या शोषण-होरपळ ह्यावर जयंत पवारांच्या ‘अधांतर’मधून तरुण पिढी, कुटुंबातील आई ह्यांचा संघर्ष धारदारपणे मांडला होता. आजच्या पिढीतील युवा कलाकारांनी मराठीत सर्वप्रथम ‘मराठी बँड’ व तरुणाईच्या भाषेत व ढंगातील नाटक केले, ते म्हणजे ‘तोडी मिल फॅण्टसी’. ह्यात आजच्या काळातील टॉवर-संस्कृती व उद्ध्वस्त झालेली गिरणीसंस्कृती आणि ह्यात तरुणांचा होणारा गैरवापर हे आधुनिक पद्धतीने मांडलेले आहे. लोकप्रिय अभिनेता व निर्माता भरत जाधव ह्यांनी महानगरीय वातावरणात तळागाळातील कुटुंबाला घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करता येत नाही, वाढत्या श्रीमंती टॉवरबाज जगात सर्व सामन्यांचे ‘अस्तित्व’ उरणार का, हा अस्वस्थकारक प्रश्न आपल्या ‘अस्तित्व’ नाटकाने विचारलेला आहे. लेखक-दिग्दर्शक- स्वप्नील जाधव. लग्नसंस्थेची पडझड व लिव्ह इन रिलेशनशिपचा प्रारंभ अशा गोष्टी टिपून काही नाटके आली. उदाहरणार्थ, ‘डायेटलग्न’, ‘जर तरची गोष्ट’, ‘माझ्या बायकोचा नवरा’ परंतु पुरुष नायकाची लफडी-अफेअर पाहणे आपल्या प्रेक्षकांना अधिक आवडते हे पुन्हा यशस्वी प्रयोग केलेल्या ‘गेला माधव कोणीकडे’ नाटकातून सिद्ध झालेले आहे. ‘वरवरचे वधू-वर’ असे चमत्कारिक पण आकर्षक शीर्षकाचे नाटक आजच्या प्रेक्षकांना, तरुणांना भावणारे आहे. जसे काही वर्षांपूर्वी ‘अमर फोटो स्टुडिओ’ आले होते

मराठीत विडंबन प्रकारातील ठळक उदाहरणे अल्प प्रमाणात असली तरी हा प्रकार लोकांसमोर येत असतो. ‘झेंडूची फुले’सारखे विडंबन-काव्य लिहिणाऱ्या अत्रेंनी ‘बुवा तेथे बाया’, ‘बुवाबाजी’, ‘साष्टांग नमस्कार’, ‘मी मंत्री झालो’ अशी उपहासात्मक नाटके लिहिली. सत्तरीच्या दशकांत कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकांचे पेव फुटले होते, त्यावर मुकुंद टांकसाळे ह्यांनी ‘मेलो मेलो मेलो ड्रामा’ असे बोचरे नाटक लिहिले होते. तेंडुलकरांचा ‘सखाराम’ गाजत होता, तेव्हा पु.ल. देशपांडे ह्यांनी आपल्या लेखणीतून उपरोधिक शैलीत ‘मॅड सखाराम’ लिहिले, ज्याचे ग्रंथालीने तेव्हा एका वाचकदिनी अभिवाचन केले होते. ते आता प्रथमच रंगमंचावर आलेले आहे. तसेच ‘सॅड सखाराम’सुद्धा येऊन गेले.

एकूण मराठी नाटकांच्या दीर्घकालीन वाटचालीत अनेक नाटकांतून नवनवे प्रयोग झालेले आहेत. विजय तेंडुलकर आणि जयवंत दळवी या नाटककारांनी आपल्या नाट्यनिर्मिती प्रक्रियेविषयी सांगितले आहे की व्यक्तिरेखा व त्यांचे परस्परनातेसंबंध महत्त्वाचे असतात. आजही नाटक पाहून येणारा प्रेक्षक नाटकातील व्यक्तिरेखेचा, व्यक्तिमत्त्वाचा विचार करतो, त्याबद्दल बोलतो. आशय-कथानकाइतकेच नाटकातील नात्यांचा आलेख पाहणे प्रेक्षकांना आवडते. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्वकाळातील, स्वातंत्र्योत्तर कालखंड-त्यातील आर्थिक/सामाजिक व कौटुंबिक स्थित्यंतरे आणि अलीकडील दोन दशकांतील जागतिकीकरणाच्या व अर्थव्यवस्था खुली झाल्याने आलेले आर्थिक-सामाजिक खुलेपण या बदलत्या पार्श्वभूमीवर बदलत गेलेली नाती टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकूण पट खूप स्वरूपाचा आहे. त्यातून हा अंशरूप प्रयत्न.

**– राजीव जोशी**

rmjoshi52@yahoo.co.in



राजीव श्रीखंडे

# रिबेक्का

## Rebecca by Daphne Du Maurier

**रिबेक्का या कादंबरीचा उल्लेख बऱ्याचदा गॉथिक कादंबरी म्हणून केला जातो. काही लोक रिबेक्का ही रोमॅण्टिक गूढ कादंबरी आहे असंही म्हणतात. या कादंबरीत यातले काही घटक नक्की आहेत. पण खरं सांगू का, मॉरिएनं आपल्या लेखणीच्या ताकदीनं या कलाकृतीला त्याच्या पार पलीकडे नेलं आहे...**

***Daphne*** Du Maurier म्हणजेच Lady Browning ही प्रामुख्यानं कादंबऱ्या, लघुकथा आणि त्याचबरोबर चरित्रं, ललितलेख, नाटकं लिहिणारी विसाव्या शतकातील प्रसिद्ध इंग्लिश लेखिका. एकोणिसाव्या शतकात फ्रान्समधून इंग्लंडमध्ये स्थलांतरित झालेल्या कुटुंबात तिचा जन्म १९०७ साली लंडनमध्ये झाला. लहानपणी तिचं शिक्षण घरीच गव्हर्नेसच्या देखरेखीखाली आणि पुढचं शिक्षण पॅरिसमधील उच्चभ्रूंसाठी असलेल्या शाळेत झालं.

घरचं कलात्मक वातावरण आणि कुटुंबाचं समाजातील उच्च स्थान यामुळे मॉरिएच्या लहानपणापासूनच नाट्यलेखन आणि अन्य क्षेत्रांतील दिग्गजांशी संपर्क होता. घरीसुद्धा लेखनात रस असणारी मोठी बहीण आणि चित्रकलेची आवड असलेली छोटी बहीण अशा दोन्ही बहिणींबरोबरचे तिचे संबंध फार जवळचे होते. निरनिराळ्या कथा, विविध कल्पनारम्य विषय याबद्दल त्यांच्यात नेहमी गप्पागोष्टी व्हायच्या. या सर्वांचा परिणाम म्हणजे तिला लहानपणापासूनच वाचनाची आणि लिखाणाची गोडी लागली. तिच्या वडिलांचं तिच्यावर अतिशय प्रेम होतं आणि तिनं तिच्या आजोबांसारखं उत्कृष्ट लेखन करावं अशी त्यांची इच्छा होती. हे सर्व असलं तरी लहानपणीचं सुखासीन जीवन, संपूर्ण आर्थिक स्वातंत्र्य आणि स्थिरचित्तवृतीचा काहीसा अभाव यामुळे प्रत्यक्ष काही करावं अशी तिची मनोधारणा नव्हती. मग तिनं या मानसिकतेतून प्रयत्नपूर्वक बाहेर पडून लघुकथा लिहिण्यास सुरुवात केली. १९२९ मध्ये वयाच्या बाविसाव्या वर्षी And now to God The Father ही तिची पहिली कथा तिच्या काकांच्या मासिकात छापून आली. या कथेच्या एक वर्ष आधी लिहिलेली The Doll ही कथा फार उशिरा हाती लागली आणि ती २०११मध्ये प्रसिद्ध झाली. या कथेत एका मुलीला एका तांत्रिक बाहुल्याचं (बाहुलीचं नव्हे) कसं वेड होतं याचं वर्णन आहे. तिला लहानपणापासून आपण मुलगा म्हणून जन्माला यायला हवं होतं असं प्रकर्षानं वाटायचं. ही कथा म्हणजे त्याचंच एक प्रतिबिंब!

मॉरिएला पुढे कादंबरी लिहिण्याची इच्छा झाली. तिच्या आईवडिलांच्या आरामदायी निवासात राहून तिनं १९३१मध्ये 'The Loving Spirit' ही पहिली कादंबरी लिहिली. तीत तिनं


एका Cornish कुटुंबाच्या चार पिढ्यांची कहाणी सांगितली आहे. ही कादंबरी वाचल्यानंतर Major (नंतर Lt. Col.) Frederick Montaque ऊर्फ Boy Browning या नावाचा एक ३५ वर्षांचा तरुण अधिकारी खुश होऊन तिला मुद्दाम भेटायला आला. तो सैन्यात अतिशय मान्यता पावलेला अधिकारी होता. त्यावेळी झालेल्या परिचयाचं पुढच्याच वर्षी म्हणजे १९३२मध्ये लग्नात पर्यवसान झालं.

तिच्या वडिलांचा १९३४ साली मृत्यू झाला. त्याच वर्षी तिनं Gerald - Portrait हे वडिलांच्या जीवनावर लिहिलेलं पुस्तक प्रकाशित केलं. ते अतिशय यशस्वी झालं. ते ज्या पद्धतीनं आणि विशेषतः ज्या मोकळेपणानं लिहिलं होतं ते पाहून त्या पुस्तकाचे प्रकाशक Victor Gollanz यांना लेखिकेमध्ये एक प्रभावी कथनशैली असल्याचं लक्षात आलं. त्यांच्या प्रोत्साहनानं तिच्यात एक प्रकारे लिहिण्याची प्रचंड ऊर्जा निर्माण झाली आणि मग तिनं एकामागून एक कादंबऱ्या, लघुकथा, चरित्रं, नाटकं आणि इतर लेखन अशी चाळीसपेक्षा अधिक पुस्तकं पुढील जवळजवळ तितक्याच वर्षांत लिहिली. त्यातली पहिली कादंबरी Jamaica Inn (१९३६). याच नावाच्या एका खऱ्याखुऱ्या अस्तित्वात असलेल्या Inn मध्ये ती १९३० मध्ये राहिली होती. त्यावरून तिला ही कादंबरी सुचली. यात प्रेमकथा आहे, पण त्याभोवती बोटींची दिशाभूल करून खडकांवर त्या फुटल्या की त्यावर हल्ला करून त्यातील खलाश्यांचे खून करून मालाची लुटालूट करणाऱ्या एका चाचांच्या टोळीची कथा गुंफली आहे. या कादंबरीनं मॉरिएला चांगलीच कीर्ती मिळवून दिली.

या कादंबरीनंतर तिनं १९३८मध्ये Rebecca ही कादंबरी लिहिली. या कादंबरीच्या लिखाणाची पार्श्वभूमी अशी की तिचा नवरा सैन्यात अधिकारी होता आणि त्याची कामानिमित्त इजिप्तला बदली झाली. त्यामुळे तिलाही त्याच्याबरोबर तिकडं जावं लागलं. सेनाधिकाऱ्यांच्या बायकांची विशिष्ट जीवनपद्धती तिला फारशी रुचली नाही. त्यामुळे ती फार बेचैन झाली. त्यातून तिला इजिप्त अजिबात आवडलं नाही. घरची ओढ तिला सारखी सतावू लागली. अशा परिस्थितीत ती १९३७च्या ख्रिसमसमध्ये इंग्लंडला गेली आणि तिथं तिनं ही कादंबरी थोडक्या वेळात लिहिली.

या कादंबरीनंतर १९४१मध्ये लिहिलेल्या Frenchman's Creek या कादंबरीत एक इंग्लिश स्त्री आणि एक फ्रेंच चाचा (Pirate) यांची प्रेमकथा साकारली आहे आणि ती इतिहासावर आधारित आहे. यातील Dona या उच्चभ्रू कुटुंबातील स्त्रीचं बिनधास्त स्वतंत्र वृत्तीच्या धाडसी बाईमध्ये कसं परिवर्तन होतं ते दाखवलं आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांवर अधिक बंधनं असणाऱ्या समाजातील प्रथेवर आधारलेलं हे कथानक आहे आणि काहीसं स्वतःच्या आयुष्याचं प्रतिबिंब लेखिकेनं यात दाखवलं आहे.






मॉरिए (Daphne Du Maurier)

आपला नवरा युद्धात व्यग्र असताना आपल्या तीन मुलांसह ती कॉर्नवॉलमध्ये राहण्यासाठी परतली. यापैकी दोन मुली होत्या १० आणि ७ वर्षांच्या आणि मुलगा होता ४ वर्षांचा. युद्धामुळे तिचं वैवाहिक जीवन विस्कळीत झाल्याचा अनुभव तिला आला. याचं शल्य तिच्या मनात सतत होत. याच पार्श्वभूमीवर तिनं The Years Between हे नाटक १९४३ साली लिहिलं. युद्धात मारला गेला म्हणून समजलेला एक सेनाधिकारी अचानक परत येतो आणि त्यावेळी त्याची बायको ही लोकसभेची एक सदस्य झालेली असून ती एका शेतकऱ्याच्या प्रेमात पडली आहे असं त्याला समजतं, हा या नाटकाचा विषय आहे.

पुढे १९५१ साली तिनं My Causin Rachel ही कादंबरी लिहिली. यात Philip Rachel नावाच्या आपल्या नात्यातील एका स्त्रीच्या प्रेमात पडतो याची ही कथा आहे. निष्पाप मन आणि अपराधी मन यांची गुंतागुंत दाखवणारी ही कादंबरी. १९५२मध्ये तिचं The Apple Tree हे लघुकथांचं पुस्तक प्रकाशित झालं. १९५४ साली King George IIIच्या मुलाची प्रेमिका असलेल्या आपल्या पणजीवर तिनं Mary Anne ही कल्पनाधारित कादंबरी लिहिली.

१९५७मध्ये तिची The Scapegoat ही कादंबरी प्रसिद्ध झाली. फ्रेंच इतिहासाचा एक इंग्लीश अभ्यासक सुट्टीसाठी फ्रान्समध्ये गेला असता हुबेहूब त्याच्यासारखा दिसणारा, बोलणारा, एक उच्चभ्रू फ्रेंच माणूस त्याला भेटतो आणि त्याच्याकडून आलेल्या अदलाबदलीच्या प्रस्तावाचा स्वीकार करून तो त्याच्या फ्रेंच कुटुंबात राहायला जातो. साध्या इंग्लिश माणसाची उच्च वातावरणातील होणारी कुचंबणा आणि त्याचबरोबर त्या फ्रेंच माणसाची त्या वातावरणातून झालेली सुटका असे हे वेगळेच कथानक.

पुढे १९५९मध्ये प्रसिद्ध झालेल्या The Breaking Point आणि १९६३ साली प्रसिद्ध झालेल्या The Birds या

लघुकथासंग्रहांचा उल्लेख करणं आवश्यक आहे. आपल्याला माहीत असेलच की The Birds ही तिची कथा फार गाजली आणि तिच्यावर आधारलेला Alfred Hitchcock या त्याच नावाचा चित्रपट प्रचंड यशस्वी झाला.

१९६५मध्ये मॉरिएच्या नवऱ्याचा मृत्यू झाला. १९६९ साली प्रसिद्ध झालेली तिची The House on the Strand ही कादंबरी उल्लेखनीय आहे. यात कॉर्नवॉलमधील एक शोकांत प्रेमकथा मांडण्यात आली आहे. मानसिक स्थितीत बदल करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधांचे धोके आणि मानसिक काळ-प्रवास (Mental Time Travel) हा एक वेगळाच विषय तिनं हाताळला आहे. १९७२ साली प्रसिद्ध झालेली Rule Britannia ही तिची शेवटची कादंबरी. यात तिनं ब्रिटनमधील कारभारात अमेरिकेच्या वाढत चाललेल्या हस्तक्षेपाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

नवऱ्याच्या मृत्यूमुळे ती चांगलीच खचली. आपल्यातील कल्पकता आणि निर्मितीक्षमता उतरणीला लागल्याची भावना तिच्या मनात सारखी वाढत गेली. त्यामुळे तिनं पुढे फार कमी लेखन केलं. १९८१ साली तर ती मानसिक धक्क्यानं कोलमडल्यासारखी झाली. त्यानंतर ती सतत मानसिक अस्थिरतेतच राहिली. अखेरीस १९८९मध्ये तिचं निधन झालं.

Daphne Du Maurier च्या लेखनाची अनेक वैशिष्ट्यं सांगता येतील. तिच्या जवळजवळ कोणत्याच कादंबऱ्या रूढ अर्थानं सुखांतिका नाहीत. Kale Kellaway या टीकाकारानं असं म्हटलं आहे की कोणत्याही प्रश्नाची उकल न होता तो कसा अनुत्तरीत राहील याची जाणीवपूर्वक आखणी करण्यात हातखंडा असलेली ही लेखिका. कोडं उलगडलं जाऊ नये आणि वाचताना वाचकांच्या मनात सतत अस्वस्थता राहिली पाहिजे, इतकंच काय पण पुस्तक वाचून झाल्यानंतरही ही अस्वस्थता कायम राहिली पाहिजे असंच तिचं लिखाण आहे.

तिच्या अनेक कादंबऱ्यांवर, कथांवर चित्रपट निघाले आहेत आणि त्यात अत्यंत प्रतिथयश नटनट्यांनी कामं केली आहेत. तिची तिन्हीही नाटकं रंगभूमीवर गाजली.

तिचं वैयक्तिक जीवन आणि तिचं लिखाण हे नेहमीच काही ना काही कारणांमुळे सतत चर्चेत राहिलं, ती असताना आणि तिच्या मृत्यूनंतरही. George Eliot, Iris Murdoch अशा बुद्धिवंतांच्या, विचारवंतांच्या रांगेत तिला कधी स्थान मिळालं नाही. तिचं लिखाण काहीसं जुनं आहे (Old Fashioned) असं मानलं जायचं. ज्यावेळी तत्कालीन लेखक युद्ध, धर्म, मार्क्सवाद, दारिद्र्य, मानसशास्त्र या विषयांवर लिहीत होते त्यावेळी मॉरिए जुन्या पद्धतीच्या कादंबऱ्या, स्वतःच्या कुटुंबाविषयी लेख असंच लेखन करत होती अशी टीका तिच्यावर झाली. कालांतरानं तिचं स्थान एक उत्कृष्ट लेखिका म्हणून सर्वमान्य झालं. कित्येक जण तिचा उल्लेख रोमॅण्टिक नॉव्हेलिस्ट असा करत असले तरी तिला ते कधी आवडलं नाही.

Rebecca ही मॉरिएची सर्वात लोकप्रिय कादंबरी.

ही कादंबरी आपण एका इंग्लिश तरुणीच्या तोंडून ऐकतो. हे एक प्रथमपुरुषी निवेदन आहे. या कादंबरीची सुरुवात होते Monte Carlo मध्ये. ही इंग्लिश तरुणी जी निवेदक आहे आणि कथानायिकाही आहे ती एका श्रीमंत अमेरिकन बाईबरोबर तिची साहाय्यक म्हणून राहत असते. ही अमेरिकन बाई युरोपच्या सफरीवर असते. त्या दोघी ज्या हॉटेलमध्ये राहत असतात तिथं एके दिवशी Maxim De Winter हा श्रीमंत इंग्लिश जमीनदार राहायला येतो. मॅक्झिमचा कॉर्नवॉलला असलेला अत्यंत पुरातन, भव्य वाडा Mandarlay सर्वदूर प्रसिद्ध असतो. ती अमेरिकन बाई आपल्या कथानायिकेला असं सांगते की मॅक्झिमची बायको एका वर्षापूर्वीच मरण पावली आहे आणि तो अजून त्या धक्क्यातून सावरलेला नाहीये. काही दिवसांनी मॅक्झिमची आणि त्या दोघींची ओळख होते. मॅक्झिम नायिकेबरोबर बराच वेळ खर्च करू लागतो. रोज गाडीतून लांबचा फेरफटका मारण्याचा त्यांचा एक शिरस्ताच पडतो. या सहवासाच्या दरम्यान ती मॅक्झिमला आपली सगळी जीवनकथा सांगते. तशी ती जगात अगदी एकटीच असते. तिचे आई-वडील हयात नसतात, कोणी भावंडं नसतात, कोणी जवळचे नातेवाईक नसतात. या दरम्यान ती मॅक्झिमच्या प्रेमात पडते. खरं तर मॅक्झिम ४२ वर्षांचा असल्यामुळे त्या दोघांच्या वयात बऱ्यापैकी अंतर असतं. पुढे जेव्हा तिची मालकीण अमेरिकेला परत जायला निघते तेव्हा तिच्याबरोबर जाणं क्रमप्राप्त असल्यामुळे आपल्या मनावर दगड ठेवून ती मॅक्झिमचा निरोप घेण्यासाठी जाते. आश्चर्य म्हणजे तो तिला लग्नाची मागणी घालतो. प्रेमात पडलेली ही आपली नायिका आश्चर्यचकित होते पण त्याला होकार देते. Monte Carlo मध्येच साध्या पद्धतीनं त्यांचा विवाह होतो. मग मधुचंद्राच्या काळात ते युरोपभर फिरतात आणि काही महिन्यांनंतर Mandarlay ला पोचतात.

Mandarlay ही सगळ्या पंचक्रोशीची शान असलेली, अतिशय नावाजलेली पुरातन आणि भव्य वास्तू असल्यामुळे आणि त्याभोवतीचा सगळा जमीनजुमला खूपच मोठा असल्यामुळे तिथं कर्मचाऱ्यांचा ताफाच असतो. त्या कर्मचारीवर्गात Mandarlay चा कारभार पाहणारी मिसेस डॅन्व्हर्स ही प्रमुख असते. या सगळ्यांशी नायिकेचा परिचय होतो. Mandarlay चा स्वतःचा असा एक छोटा समुद्रकिनाराही असतो. तिथं एक बोट हाऊस असतं. अत्यंत सामान्य परिस्थितीतून आलेल्या आपल्या नायिकेला हे सगळंच अद्भुत असतं, स्वप्नवत असतं. मॅक्झिमबरोबरच्या तिच्या सहजीवनाला सुरुवात होते. हळूहळू काही गोष्टी तिच्या लक्षात यायला

लागतात. तिच्या आजूबाजूच्या सर्व लोकांत असलेला त्याच्या प्रथम पत्नीविषयीचा आदर, जिव्हाळा तिच्या लक्षात येतो. यात Mandarlay चे कर्मचारी असतात, तिथल्या पंचक्रोशीतील बरेच लोक असतात, अर्थातच या सर्व लोकांना Mandarlay च्या नव्या मालकिणीविषयी कुतूहल असतं. मॅक्झिमच्या प्रथम पत्नीचं नाव Rebecca होतं आणि ती नावेच्या अपघातामध्ये बुडून मरण पावली हे तिला समजतं. तिचं सडलेलं शव दोन–तीन महिन्यांनी Mandarlayपासून लांब मिळालेलं असतं, मॅक्झिम त्याची ओळख पटवायला बरं नसतानाही तिथे गेलेला असतो हेही तिला वेगवेगळ्या सूत्रांकडून कळतं. त्याच्या गतआयुष्याविषयी फारशी कल्पना नसलेल्या कथानायिकेला हे सगळं ऐकून धक्काच बसतो.

मात्र रिबेक्काविषयी तिच्या मनात कुतूहल जागृत होतं. या कुतूहलात भर पडायला अनेक घटना घडतात. Mandarlay-मध्ये जागोजागी नायिकेला रिबेक्काच्या खुणा सापडतात. जसं, तिथल्या बऱ्याच वस्तूंवर तिचं नाव लिहिलेलं असतं. Mandarlayच्या एका भागात रिबेक्का राहत असलेली दालनं ती पूर्वी होती तशीच जतन करून ठेवलेली असतात. जणू रिबेक्का तिथे राहतच आहे असं वाटतं. मिसेस डॅन्व्हर्स रिबेक्काची अतिशय निष्ठावान सेवक असते, तिनं तिला लहानपणापासून वाढवलेलं असतं आणि लग्न करून रिबेक्का Mandarlayमध्ये राहायला येते तेव्हा तिच्याबरोबर ती सोबत म्हणून आलेली असते, असंही नायिकेला कळतं. मालकीण म्हणून काही सामान्य निर्णय घेण्याचा नायिका प्रयत्न करते तेव्हा तेव्हा रिबेक्काचं उदाहरण देऊन ते निर्णय कसे बरोबर नाहीत असं सांगून मिसेस डॅन्व्हर्स त्यात मोडता घालत असते. तिचं रिबेक्कापुराण तर सतत चालूच असतं. एके दिवशी रिबेक्काचा लांबचा भाऊ मॅक्झिम नसताना Mandarlayला येतो. आपल्या नायिकेला तो फारसा आवडत नाही. तो रिबेक्काबरोबर लहानाचा मोठा झाल्यामुळे त्याचे आणि मिसेस डॅन्व्हर्सचे संबंध फार जिव्हाळ्याचे असतात. या सर्व गोष्टींमुळे नायिका अस्वस्थ होऊ लागते.

नायिकेच्या अस्वस्थेत भर पडते ती मॅक्झिमच्या वागण्यामुळे. कधी उत्साही, कधी आनंदी, कधी अतिशय प्रेमळ, कधी एकदम गंभीर. मॅक्झिम रिबेक्काविषयी चकार शब्दही तो कधी काढत नाही आणि तिच्याविषयी बोलायला नेहमीच टाळतो. अशा त्याच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे आणि आधीच मॅक्झिमच्या एकंदर समाजातील स्थानामुळे दबावाखाली असलेली कथानायिका त्याला या कुठल्याच गोष्टी सांगण्याचा धीर करू शकत नाही. तो कामात व्यग्र असल्यामुळे त्यांना एकत्र वेळ तसा मर्यादितच मिळत असतो आणि ती एकटी पडू लागते.

तिचा हळूहळू असा पक्का समज होतो की मॅक्झिम रिबेक्काला अजूनही विसरला नाहीये, तिच्या स्मृतीमुळे तो अजूनही अस्वस्थ आहे आणि एकाकीपणा टाळायला केवळ भावनेच्या भरात त्यानं आपल्याशी विवाह केला आहे. तिच्या या विचारांना अप्रत्यक्षपणे मिसेस डॅन्व्हर्स नेहमीच खतपाणी घालत असते. नायिकेच्या मनात मग सारखी स्वतःची रिबेक्काबरोबर तुलना सुरू होते आणि तिच्या तुलनेत आपण किती कमी आहोत ही भावना तिच्या मनात घर करू लागते. मिसेस डॅन्व्हर्सचं आपल्याशी वागणं बरोबर नाही हेही तिला कळू लागतं. पुढे तिला असं कळतं की Mandarlayला वर्षातून एकदा अतिशय जंगी फॅन्सी ड्रेस पार्टी होण्याची पूर्वापार परंपरा असते. त्याला पंचक्रोशीतल्या सगळ्या महत्त्वाच्या व्यक्तींना बोलावण्याचा प्रघात असतो. मॅक्झिमच्या नजरेत आपलं महत्त्व वाढावं म्हणून ही मेजवानी देण्याचा ती आग्रह धरते. मॅक्झिम जराशा नाखुशीनंच याला परवानगी देतो. हा समारंभ यशस्वी करण्यासाठी आपली नायिका जोरात कामाला लागते. या प्रसंगाला साजेसा असा कोणता पोशाख आपण घालावा या विवंचनेत ती असताना मिसेस डॅन्व्हर्स तिला Mandarlayमध्ये असणाऱ्या एका पूर्वजांचं तैलचित्र दाखवते आणि तसा पोशाख तिनं घालावा असं सुचवते. त्याप्रमाणे तसा पोशाख आपली नायिका शिवून घेते. मेजवानीच्या दिवशी लोक येण्याच्या आधी मोठ्या दिमाखानं तो पोशाख घालून ती मॅक्झिम समोर येते, त्याला खुश करण्याच्या उद्देशानं. पण, होतं उलटंच. तिला पाहिल्यावर मॅक्झिमचा चेहरा पांढरा फटफटीत पडतो आणि तुटकपणे तो तिला तो पोशाख बदलण्यासाठी सांगतो. तो संतापलेला आहे हे लक्षात आल्यावर तिचा अतिशय हिरमोड होतो. पोशाख बदलून ती मेजवानी कशीबशी निभावून नेते. मग तिला कळतं असाच पोशाख रिबेक्कानं तिच्या मृत्यूपूर्वी झालेल्या मेजवानीत घातला असतो आणि त्याचं खूप कौतुक झालं असतं. मिसेस डॅन्व्हर्सनं हे जाणूनबुजून केलं आहे हेही तिला उमगतं.

या समारंभानंतर नायिका मिसेस डॅन्व्हर्सला जाब विचारायला जाते तेव्हा मिसेस डॅन्व्हर्स आपला राग उघडउघड व्यक्त करते. त्यात आता कुठलाही छुपेपणा नसतो. तिचा आपल्या नायिकेविषयी असलेला पराकोटीचा द्वेष स्पष्ट होतो. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या नायिकेला ती आत्महत्या करण्यासाठी उद्युक्त करते. तिच्या बोलण्याच्या प्रभावाखाली येऊन नायिका तसा विचार खरोखरीच करू लागते. पण तेवढ्यात Mandarlayच्या नजीकच्या समुद्रात एक जहाज बुडतं आणि त्याचा मोठा आवाज आसमंतात पसरतो. त्या आवाजानं ती भानावर येते आणि आपण किती थोडक्यात बचावलो याची तिला जाणीव होते.

या जहाजाचा शोध घ्यायला काही पाणबुडे पाण्यात उतरतात. तिथं त्यांना रिबेक्काची बुडलेली बोट मिळते कारण

या सगळ्या उलथापालथीत ती वर आलेली असते. त्यात त्यांना एक सडलेलं शवही मिळतं आणि ही बातमी सगळीकडे वाऱ्यासारखी पसरते.

हे शव कुणाचं, ते रिबेक्काच्या बुडलेल्या नावेत कसं आलं. या सगळ्याचा Mandarlay वर आणि त्याच्या मालक-मालकिणीवर काय परिणाम होतो आणि शेवटी काय होतं या सगळ्यांची उत्तरं आपल्याला या कादंबरीत मिळतात.

Daphne Du Maurierनं ज्या प्रकारे या कादंबरीची बांधणी केली आहे त्यात तिचं असामान्य कौशल्य दिसतं. या कादंबरीची एक विशेषता म्हणजे या नायिकेचं नाव आपल्याला शेवटपर्यंत कळत नाही. तशीच तिच्या रूपाविषयी अगदी त्रोटक माहिती मिळते. तिचं नाव असाधारण आहे, ती अतिशय तरुण आहे म्हणजे विशी-बाविशीतली आणि दिसायला तशी देखणी आहे एवढंच आपल्याला कळतं. एखादं वस्त्र ज्या कौशल्यानं विणलं जातं त्याच कौशल्यानं या कादंबरीचं कथानक विणलं गेलं आहे. कथापटल हळूहळू आपल्यासमोर उलगडला जातो आणि त्यात या प्रथमपुरुषी कथनाचा प्रभाव दिसतो. एक लक्षात ठेवलं पाहिजे की आपल्याला जे जे दिसतं, आपल्या समोर जे जे घडतं त्याचं आकलन आपल्याला नायिकेच्या नजरेतून होतं आणि त्यामुळे एका तऱ्हेनं ते सीमितच आहे. यातच कादंबरीची खरी ताकद आहे.

या कथानकाला म्हणावं तर वेग आहे, पण जरा नीट विचार केला की आपल्याला कळतं की तसा हा वेग फसवा आहे. यात फार मोठ्या घटना एकामागून एक घडतात असं बिलकूल नाही पण Daphne Du Maurierनं अगदी छोट्या छोट्या घटनांनादेखील मोठं रूप देऊन आवश्यक तो परिणाम साधला आहे. नायिकेच्या नजरेतून या घटनांकडे आपण बघत असल्यामुळे त्या घटनांचा तिच्यावर होणारा परिणाम, त्यांचं तिनं केलेलं आकलन, त्यामुळे तिच्या मनात घोंगावणारे विचार, वेगवेगळ्या भावनांचे उठणारे काहूर यात आपण गुरफटून जातो आणि कथानकाला वेग आहे असं आपल्याला वाटतं.

कादंबरीत तशा व्यक्तिरेखा बऱ्याच आहेत. त्यात मॅक्झिमची बहीण आणि तिचा नवरा आहे, मॅक्झिमचा एजंट फ्रॅन्क क्राऊले आहे, Mandarlayच्या कर्मचाऱ्यांपैकी फूटमॅन असलेला रॉबर्ट आहे, फ्रीथ हा हेड बटलर आहे, क्लॅरिस ही नायिकेची खास मदतनीस आहे, रिबेक्काचा लांबचा भाऊ जॅक फ्लॉवेल आहे, ज्युलियन हा मॅजिस्ट्रेट आहे, अगदी सुरुवातीला नायिकेची मालकीण अमेरिकन मिसेस व्हॅन हूपर आहे, या सगळ्या व्यक्तिरेखा Daphne Du Maurierनं मोजक्याच शब्दांत पण अत्यंत ठळकपणे रेखाटल्या आहेत. अर्थात त्यांचा कादंबरीतला वावर तसा मर्यादितच आहे. या कादंबरीच्या मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे आपली नायिका, मॅक्झिम, मिसेस डॅन्व्हर्स आणि अर्थातच रिबेक्का. आपल्या नायिकेच्या व्यक्तिरेखेत Daphne Du Maurierनं गहिरे रंग भरले आहेत. तिचा बुजरा, लाजरा स्वभाव, तिचा भिडस्तपणा, तिच्यातला आत्मविश्वासाचा अभाव, तिचं अननुभवीपण, स्वतःला नेहमी कमी लेखण्याचा तिचा स्वभाव, तिची गोंधळलेली स्थिती, रिबेक्काशी सतत घडणाऱ्या तुलनेमुळे तिची होणारी घुसमट, तिचा एका अर्थी असणारा निरागसपणा, तिची असहाय्यता, तिचं एकटेपण, पुढची निराशा हे सगळं फार प्रभावीपणं दाखवलं आहे. मॅक्झिमची व्यक्तिरेखाही मॉरिएनं अतिशय नेमकेपणानं रंगविली आहे. कधी आनंदी, कधी एकदम गंभीर, फार कमी बोलणारा, स्वतःत व्यग्र असणारा, तर कधी एकदम संतापणारा, कधी शांत, संयमी तर कधी त्रासिक, अस्वस्थ असा हा थोडासा विक्षिप्त वाटणारा मॅक्झिम आपल्याला कोड्यात टाकणारा आहे. मिसेस डॅन्व्हर्सची व्यक्तिरेखा आपल्या मनात खास ठसते. रिबेक्कावर आंधळी, वेडी भक्ती असणारी, तिची स्मृती सतत उरात बाळगणारी, कारस्थानी, कपटी, खुनशी, कठोर, नायिकेशी उभा दावा मांडलेली, नायिकेबद्दल पराकोटीचा द्वेष असलेली आणि त्यामुळेच भयप्रद वाटणारी अशी ही मिसेस डॅन्व्हर्स. मॉरिएचं सगळ्यात मोठं यश आहे ते तिनं ज्याप्रकारे रिबेक्काची व्यक्तिरेखा उभी केली आहे त्यात. या कथानकात रिबेक्काचा वावर कुठेच नाही पण तिचं अस्तित्व क्षणाक्षणाला जाणवत राहतं. ही किमया आहे मॉरिएच्या लेखणीच्या जादूची. अतिशय सुंदर, अतिशय लोकप्रिय, अतिशय कर्तबगार, सगळ्यांच्या गळ्यातला ताईत असलेली, Mandalayची शान असलेली सर्वमान्य मालकीण, उत्तम यजमानीण, अतिशय रसिक, मॅक्झिमच्या खांद्याला खांदा लावून वावरणारी, सगळ्यांवर मोहिनी टाकणारी, सगळ्यांना आपलंसं करणारी अशी ही रिबेक्का आपल्यासमोर हळूहळू स्पष्ट होत जाते. हे सगळं होताना काही मोजके, पुसट संदर्भ आपल्याला सापडतात त्यामुळे या प्रतिमेत काहीतरी उणीव आहे, कुठेतरी विसंगती आहे याचीही अस्पष्ट कल्पना आपल्याला येते आणि रिबेक्काच्या भोवतीचं हे गूढ वलय आणखीनच गडद होत जातं. रिबेक्का हीच कादंबरीची एका अर्थी नायिका आहे अशी आपल्याला जाणीव होते. रिबेक्काची ही सावली हळूहळू मोठी होत जाते आणि शेवटी सगळ्या कथापटलाला ती पूर्ण व्यापून टाकते. हे सगळं मॉरिएइतक्या सहजगत्या करते, इतक्या हळुवारपणे करते, की हे आपल्या नकळतच घडतं.

या कादंबरीचं आणखी एक बलस्थान म्हणजे मॉरिएची भाषा. तिची भाषा म्हणजे अतिशय रसाळ आहे, ओघवती आहे, खरोखरची सुंदर आहे. त्यात एक डौल आहे, सोपी पण अत्यंत प्रवाही अशी ही भाषा आहे. या सगळ्या कथापटलावर एका अनामिक अस्वस्थ करणाऱ्या गूढतेच दाट सावट पसरलेलं आहे. हे सगळं भारलेलं वातावरण आपल्याला जणू कवेतच घेतं

आणि आपली विचारशक्ती कुंठित करून टाकतं.


रिबेक्का या कादंबरीचा उल्लेख बऱ्याचदा गॉथिक कादंबरी म्हणून केला जातो. काही लोक रिबेक्का ही रोमॅण्टिक गूढ कादंबरी आहे असंही म्हणतात. या कादंबरीत यातले काही घटक नक्की आहेत. पण खरं सांगू का, मॉरिएनं आपल्या लेखणीच्या ताकदीनं या कलाकृतीला त्याच्या पार पलीकडे नेलं आहे, या वर्गवारीत कुठेही अडकू न देता. द्वेष, मत्सर, अप्रस्तुत तुलना, आंधळी, वेडी, विनाशकारी भक्ती या मानवी भावनांचा अतिरेक होतो तेव्हा त्याचा माणसांवर होणार परिणाम, त्या परिणामामुळे त्यांच्यात निर्माण होणारे विचार, त्यातून त्यांच्या हातून घडलेल्या कृती, त्या कृतींतून पर्यवसित होण्याऱ्या घटना आणि या घटनांचा माणसांवर होणारा परिणाम या सगळ्या न संपणाऱ्या साखळीचं अत्यंत प्रभावी चित्रण या कादंबरीत आहे आणि म्हणूनच ही एक अत्यंत श्रेष्ठ कलाकृती आहे.

गेली ८२ वर्षं सतत प्रकाशनात असलेल्या या कादंबरीचा खप आजही अव्याहतपणे चालूच आहे. या कादंबरीला American Book Association चं राष्ट्रीय पारितोषिक मिळालं आहे. त्याचप्रमाणे The Big Read या योजनेखाली २००३ साली BBC नं देशातील १०० सर्वांत आवडत्या कादंबऱ्यांसाठी (Best Loved Novels) केलेल्या सर्वेक्षणात रिबेक्का १४व्या क्रमांकावर होती. या कादंबरीच्या प्रचंड लोकप्रियतेमुळे Alfred Hitchcockनं १९४०मध्ये त्यावर आधारित चित्रपट हॉलिवूडमध्ये काढला आणि त्यात Lawrence Olivier, Joan Fontaine, Judith Anderson या ख्यातनाम कलाकारांची प्रमुख भूमिका होती. या चित्रपटाला पारितोषिकही मिळालं आणि हा चित्रपट प्रचंड यशस्वी झाला. अगदी अलिकडे Netflix Adahr Rebecca हा चित्रपट नव्या संचात झळकला आहे. १९६४ साली 'कोहरा' नावाचा हिंदी चित्रपट आला होता तोही याच कादंबरीवर आधारित आहे. या कादंबरीवर आधारलेलं नाटकही प्रचंड गाजलं. जगातल्या अनेक भाषांत हिची भाषांतरं झालेली आहेत.

झपाटून टाकण्याचं जबरदस्त सामर्थ्य असलेल्या, क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवत नेणाऱ्या जवळजवळ ३५० पानांच्या या कादंबरीच्या मोहजालात आपण अडकतो ते कायमचंच! आणि म्हणूनच जागतिक वाङ्मयातील ही एक अविस्मरणीय कलाकृती आहे. रिबेक्काची जादू ही न संपणारी आहे. त्यामुळेच Daphne Du Maurierची ही सर्वश्रेष्ठ कलाकृती असं म्हटलं जातं यात आश्चर्य ते काय?

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

ग्रंथाली




## एका अभूतपूर्व मुलाखतमैफलीचे पुस्तक

ग्रंथालीने १९८५ मध्ये पं. कुमारगंधर्व यांची गायनासह रागदारी उलगडून दाखवणारी सलग सहा दिवस मुलाखतमैफल आयोजित केली होती, त्यातील त्यांच्या संगीतविचारांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यावेळी त्यांनी गायलेल्या बंदिशी चिजांचे चौपन्न क्यूआर कोड पुस्तकात आहेत. अतुल देऊळगावकर यांनी संपादन केलेल्या या पुस्तकाला पं. सुरेश तळवलकर यांची प्रस्तावना लाभली आहे. वाचावे, संग्रही ठेवावे, भेट द्यावे असे हे गंधर्वांचे देणे!

मूल्य ८०० रु.
सवलतीत ५०० रु.

घरपोच हवे असल्यास
पाठणावळ खर्च वेगळा
संपर्क : ९२२३४६६८६०



समरेंद्र निंबाळकर

# ज्यांची बाग फुलून आली..त्यांनी तरी!

**सहानुभूती किंवा उपकार म्हणून दिल्याने आपली जबाबदारी संपत नाही. सहवेदनेचा अनुभव महत्त्वाचा ठरतो. ही संवेदना रुजवणे हा इष्ट मार्ग होऊ शकतो. या प्रयत्नांची सुरुवात शालेय वयापासून होऊ शकते. समाज माझ्यासाठी काय करतो यापेक्षा मी समाजासाठी काय करतो, केले पाहिजे, हा मूल्यविचार आणि संस्कार करणे ही काळाची गरज आहे.**



***महाराष्ट्रात*** प्रबोधनाची संत परंपरा थोर.

मी अविवेकाची काजळी।
फेडोनी विवेक दीप उजळी।।
ते योगिया पाहे दिवाळी।।
निरंतर।। असे म्हणणाऱ्या संत ज्ञानेश्वरांची ही भूमी.
जे का रंजले गांजले। त्यासि ह्मणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।

असे सामाजिक बांधिलकीचे बाळकडू पाजणाऱ्या संत तुकोबांची ही अवनी.

पुढे समाजसुधारकांच्या चळवळीत तर महापुरुष, लोकोत्तर समाजसुधारकांची मांदियाळी पाहायला मिळते. इथे झालेली दीर्घ प्रबोधनाची चळवळ हे आभूषण आहे. सेवा आणि त्याग ही चिरंतन म्हणून मान्यता पावलेली मूल्ये. कष्टाची बरी भाजी भाकरी, तूपसाखरेची चोरी नको, हा रोखठोक संस्कार.

इतके सांस्कृतिक संचित पाठीशी असताना आजचा समाज आमूलाग्र बदलतोय का, हा खरा प्रश्न आहे. मूल्यव्यवस्था भ्रमित झाली आहे का?

खुली अर्थव्यवस्था, एका वर्गास मिळणारे आणि मिळालेले याचे फायदे यांचा अभ्यास व्हायला हवा. परंतु दिसते ते असे की पैसा, ब्रँड, लाइफ स्टाईल, सेलिब्रेशन, एन्जॉय, कूल हे आज परवलीचे शब्द होऊन बसले आहेत.काय करायचे तर लाइफ एंजॉय करायचे, टेन्शन नाही घ्यायचे असे नवीन पिढी काय लहान मुलेपण म्हणतात. एन्जॉय म्हणजे फक्त स्वतःचा एन्जॉय गृहीत धरला जातो आहे का? आपल्या-पलीकडे कोणी आहेत हे भान हरवत चालले आहे का? की फक्त आपल्याच प्रश्नात लोक गढून गेले आहेत.

येते ना पाणी डोळ्यांत कुणास्तव,
स्वतःसाठी सारेच रडतात आजकाल,
फक्त स्वतः करता जगणे हाच अग्रक्रम झाला आहे का?

उचभ्रू लोकवस्तीत तर माणसे घरात मरून दुर्गंधी येत नाही तोवर शेजाऱ्यास कळेनासे झाले आहे. शेतकऱ्यापासून पौंगडावस्थेतील मुले विविध कारणांनी आत्महत्या करत आहेत. आदर्श, मोठी माणसे म्हणजे कोण? हे कसे ठरवायचे?

ना बुवा ना बापू ना महाराज कोणी
सगळ्यांचेच पाय चिखलात आजकाल!

अशी स्थिती आहे. खरेखुरे आयडॉल या प्रकाशझोतात झाकोळले गेले आहेत का? जगण्याची स्पर्धा हीच शाश्वत ठरत आहे का? यशस्वी होणे एवढेच आयुष्याच्या सार्थतकतेचे परिमाण उरले आहे का? खूप वस्तू विकत घेण्याची क्रयशीलता मिळवणे हेच ध्येय आणि ध्यास झाला आहे का? या सगळ्या सुंदोपसुंदीत देण्याची निखळ भावना हरवत चालली आहे का? आनंदाने गरजू माणसास काहीतरी फक्त देण्यात आनंद असू शकतो, हा संस्कार विरळ होत चालला आहे का? किंवा मदत केली तर त्याचे उत्सवी प्रदर्शन करणे हा लोक रिवाज होत आहे का? एक काळे पडलेले केळे गरीब माणसास भेट देतानाचा फोटो कुणाच्यातरी स्टेटसवर होता! अतिशयोक्ती नाही. काय दर्शवते ही वृत्ती?

एक होतकरू पुस्तकविक्रेता भेटतो नेहमी सहज विचारणे होते सध्या कोणते पुस्तक मागणीत आहे वगैरे. तर तो मला सांगत होता, म्युच्युअल फंडात पैसा कसा मिळवायचा, घर बसल्या शेअर बाजार कसा चालवायचा, पैशातून पैसा कसा निर्माण करायचा असली काही पुस्तके असतील तर विकत घेऊन जास्त वाचली जातात. मी कवी असल्याने जरा आणखी कुतूहलाने विचारले. तर तो म्हणे एक टक्का पुस्तक विकत घेणारे वाचकदेखील कविता विकत घेत नाहीत! हा मुद्दा अलहिदा की कोणी काय वाचावे, परंतु वाङ्मयीन अभिरुचीला लागलेले भौतिकवादाचे, चलनवादाचे वळण ही नोंद घेण्यासारखी बाब वाटली.

'कर्मविरायन' हा चित्रपट पाहायला सात लोक होते थिएटरमध्ये अशी एक पोस्ट मध्ये वाचनात आली. नव्या 'श्याम ची आई' चित्रपटाचीसुद्धा तीच गत. कर्मवीर भाऊराव पाटील यांची सेवा निष्ठा, त्याग, समर्पणशीलता आता नको आहे का आपल्याला? पडद्यावर सुद्धा!. श्यामची आई म्हणते, 'पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस ना, तसे मनालाही जप हो,' असे उपदेश ऐकण्याची आपली मानसिक तयारी नाही राहिली का? पैशाची श्रीमंती महत्त्वाची ठरत असताना मनाच्या श्रीमंतीकडे दुर्लक्ष होत आहे का?

तर अशा परिस्थितीत, गरीब, वंचित, अनाथ, गरजू आहेत त्याविषयी कोणास काही पडले आहे का? त्यासाठी काम करणाऱ्या लोकांच्या पाठीमागे समाज उभा आहे का? या सेवाभावी संस्था, व्यक्तींना चळवळ म्हणून किमान राज्यव्यापी काही निर्माण करता आले आहे का? आणि नसेल तर का नाही? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा तरुण पिढीतील काही स्वंयसेवी कार्य करणारे लोक गवसले. प्रातिनिधिक म्हणून त्यांच्याशी गप्पा मारताना बदलता मध्यमवर्गीय समाज आणि स्वंयसेवी संस्थांतील समाजाचा सहभाग याबद्दल जाणून घेतले. परमेश्वर काळे, अनघा पेंडसे, सागर पाटील, अशोक देशमाने यांची मते याबाबत जाणून घेतली.




**सागर पाटील आणि नेत्रा पाटील (उजवीकडे)**

सागर पाटील हा नवव्या वर्षी संपूर्ण अंधत्व आलेला युवक. परंतु, हार न पत्करता तो शिकत राहिला. त्याचा शिकण्याचा वेग अफाट होता. ब्रेललिपीतून शिकता शिकता तो एम.ए. मराठी झाला. पण पांढरी काठी, टेलिफोन ऑपरेटर आणि समाजाची सहानुभूती इतक्या मर्यादित चौकटीत जगण्याचे त्याने नाकारले.

इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची आवड होती. त्यातून अंध व्यक्तींना हाताळता येतील अशी उपकरणे त्याने बनवली. त्यातून श्रशव बनवले. प्रख्यात कंपन्यांना ते विकले. आता यशस्वी उद्योजक झाला आहे. तेवढ्यावर न थांबता त्याने त्याची पत्नी नेत्रा पाटीलसोबत एक संस्था स्थापन केली. अनघा पेंडसे, या रुईया महाविद्यालयातील प्राध्यापिका या संस्थेत त्याच्यासोबत काम करतात. आणखी काही मित्रमैत्रिणी हातभार लावतात. IIG एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्ट स्थापन करून महाराष्ट्रातून अंध, दीव्यांग विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक उपकरणे बनवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. तसेच दिव्यांग व्यक्तीची रोजगारक्षमता विकसित होईल यावर भर दिला जातो. दृष्टी गमावली तरी अंतरदृष्टी देणारे हे महत्त्वपूर्ण काम मुंबई येथे चालू आहे.

अनघा पेंडसे व सागर पाटील यांच्या मते, समाज आत्मकेंद्री होतो, कारण माणसाला विचार करण्याची शक्ती लाभलेली आहे. तिचा वापर करणेच त्याने कमी केले आहे. उदाहरणार्थ, मला एखादा पत्ता शोधायचा आहे. आजूबाजूला हजारो माणसे आहेत, तरी आपण गुगल मॅप उघडतो आणि पत्ता शोधतो. परंतु आपण संवाद साधत नाही. यामुळे माणूस स्वतःमध्ये अधिक गुंतून पडतो. माणूस त्याची संवाद साधण्याची आणि विचार करण्याची शक्तीच विसरत चालला असल्यामुळे त्या शक्तीची जाणीव माणसाला करून देणे गरजेचे आहे. माणसाला शेपटीची गरज नव्हती, म्हणून ती गळून पडली असं सांगतात. त्याप्रमाणे माणसाच्या विचार

करण्याच्या शक्तीचे व्हायचे...

ते पुढे म्हणतात, की आजच्या माणसाच्या सर्वांगावर तंत्रज्ञानाने कब्जा करण्यापूर्वी समाज आणि माणूस यांचे परस्परसंबंध हे अतूट होते. ते एकमेकांपासून भिन्न दाखवणे कठीण होतं. पण अंदाजे २०१०च्या आसपास टच स्क्रिन मोबाइल, २४ x ७ उपलब्ध असलेल्या इंटरनेटमुळे तंत्रज्ञान माणसाच्या खिशात आले. त्याच्या अंगाखांद्यावर बागडू लागले. माणूस तांत्रिकतेच्या यांत्रिक गर्दीत हरवला आणि समाजाला पराङ्मुख झाला.

समाजाच्या तुटलेपणाविषयी ते सांगतात, समाज तुटला नाही, तर समाज स्वतःमध्येच गुंतला आहे. प्रत्येक व्यक्ती ही वैयक्तिक स्तरावर स्वतंत्र झालेली आहे. आपापली चौकट सांभाळून जगत आहे. आपापले चौकोन प्रत्येक जण सांभाळून बसला असल्यामुळे सगळ्यांनाच अढळपदं मिळालेली आहेत.

सुटे सुटे काम करणारे समर्पित लोक एकत्र येऊ शकतील का यावर ते म्हणतात, की एकाच प्रकारचे काम करणाऱ्या संस्थांचे एकमेकांशी नाते सध्या तरी नाही. ही कामे तुकड्यातुकड्यांत चालतात, कारण ज्यांनी चॅरिटेबल ट्रस्ट उघडले आहेत त्यातील निम्म्याहून जास्त लोकांची गरज ही त्यातून कमाई करण्याची किंवा जादा कमाई (काळा पैसा) लपवण्याची आहे. यामागे आणखी एक कारण लक्षात घ्यायला हवे, की तरुणांना नोकरीच्या संधी मिळत नाहीत. त्यामुळे आर्थिक बेकारीतून मार्ग काढण्यासाठी चॅरिटेबल ट्रस्टची निर्मिती होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. जेणेकरून लोकांचा पैसा वापरून ही मंडळी स्वतःच्या गरजा भागवू शकतात. 'चळवळ' निर्माण होण्यासाठी एक आचार - विचार - ध्येय यांसारख्या समान जाणिवांनी झपाटलेली माणसे लागतात, तर चळवळ यशस्वीरीत्या उभी राहते. आता हे सामूहिक झापटलेपण कमी झाल्याचे चित्र आहे.

समाज अशा प्रकल्पांशी जोडला जाण्यासाठी काय करता येईल, या प्रश्नावर ते म्हणतात,

समाजाच्या मनात प्रकल्पाबद्दल विश्वासार्हता निर्माण करणे, चॅरिटेबल ट्रस्ट असल्यामुळे आपण जो प्रकल्प राबवत आहोत त्याची इत्थंभूत माहिती प्रकल्पाला जोडल्या जाणाऱ्या व्यक्तीला देणे, जेणेकरून त्याला समजेल, की जो पैसा येत आहे, तो ट्रस्टच्या कामातच गुंतत आहे. 'आपण समाजाचे देणे लागतो' हे बाळकडू शैक्षणिक संस्थांच्या स्तरावर अगदी सुरुवातीपासून विद्यार्थ्यांपर्यंत (समाजापर्यंत) पोचवणे आवश्यक आहे. आपल्या ट्रस्टच्या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रकल्पातील सहभागी व्यक्ती हे काहीतरी वेगळे शिकत आहेत, असे जर सर्व स्तरांत पसरले, तर समाजाकडून मिळणाऱ्या प्रतिसादात वाढ होते.

अशी पक्की वैचारिक बैठक असलेली ही मंडळी दिसतात. दृष्टी असणे वेगळे आणि नजर असणे वेगळे. सागर पाटीलकडे भले दृष्टी नसेल पण नजर नक्की आहे. जिच्या जोरावर तो नजरेमध्ये नजर रोखून आयुष्याला उत्तर देत आहे. नवनिर्माण करत आहे.

'संस्कार संजीवनी फाउंडेशन'चे परमेश्वर काळेसर यांची परिवर्तनाची लढाई गेली चौदा वर्षे चालू आहे. स्वतः भटक्या जमातीत जन्म आणि लहानपणी आलेले अनाथपण वाट्याला घेऊन काळेसर घडत राहिले. घडवत राहिले आहेत.

त्यांनी विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे येथे कमवा व शिका योजनेतून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. डांगे चौक, थेरगाव येथे शिक्षक म्हणून रुजू झाले. परंतु आपण ज्या समाजातून आलो त्याचा विचार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. मग पुणे सोडले आणि सोलापूर जिल्ह्यात मुळेगाव येथे सन २०१०मध्ये त्यांनी आश्रम स्थापन केला. अनंत अडचणी आल्या. कुणाचेही पाठबळ नाही. गावकरी संशयाने या काम ाकडे पाहत. या साऱ्यास त्यांनी हिमतीने तोंड दिले. आणि दोन वर्षापूर्वी स्वतच्या जागेत हागलुर, जि. सोलापूर येथे आश्रम स्थापन केला.

या आश्रमात आज ते जवळपास पन्नास मुलांचे संगोपन करत आहेत. त्यांचा संघर्ष सुरू होतो, तो समाजातील मानसिक अडथळ्यांपासून. रूढार्थाने पारधी, फासेपारधी या जमातीस गुन्हेगार समजले जात असे. त्यामुळे या समाजातील मुले, हा माणूस का आणि कशासाठी सांभाळतो आहे, हा प्रश्न उभा राहायचा. म्हणून कोणत्याही सोयीसुविधा सोडाच साधा रहिवास दाखलासुद्धा मिळाला नाही. गॅस नाही. चूल पेटवायची. लाकडे आणायची. ती स्वतः फोडायची. मुलांना जेवूखाऊ घालायचे. शाळेला पाठवायचे. स्वतःची आर्थिक ओढाताण सहन करत तसेच पुन्हा शिक्षकाची नोकरी करत त्यांनी हिमतीने हा यज्ञ चालू ठेवला आहे.

समाज जसा या भटक्या जमातीच्या प्रश्नापासून अनभिज्ञ आहे तशीच परिस्थिती प्रशासनाची. या मुलांचे जन्मदाखले नाहीत. नोंदी नाहीत. अस्तित्वाचा पुरावा नाही. दखल नाही. शाळेत दाखला करण्यापासून अनंत संकटे.

सर सांगतात, मी ज्या उदात्त हेतूने हे कार्य करतोय, तो मानस समजून घेणे दूरच, उलट मलाच अनेक वेळा समाजाच्या रोषास सामोरे जावे लागले. माझी तडफड चालू होती व आहे ती एकाच कारणासाठी, की एका पिढीला शिक्षण मिळाले तर त्यांचे भविष्य घडेल. गुन्हेगार हा शिक्का पुसला जाईल. एक पिढी वाचेल. पण ही तळमळ समजून घेतली गेली नाही. त्यावेळी आपण कुणासमोर कशाची अपेक्षा करतोय हा प्रश्न निर्माण व्हायचा. आणि तो अजून अनुत्तीर्ण आहे! पारधी समाज आणि मुख्य प्रवाहातील समाज यामध्ये संवाद नाही. त्यामुळे दोन्हीकडच्या लोकांना कसे समजावून द्यायचे, परस्परसहकार्य




**परमेश्वर काळे, संचालक–संस्कार संजीवनी फाउंडेशन, सोलापूर वंचितांसाठी चालवली जाणारी संस्था**

कसे निर्माण करायचे, हाच मोठा प्रश्न सरांपुढे होता व आहे.

दुसरी बाजू अशी ही आहे, की पुण्या–मुंबईकडे हा आश्रम असता तर कदाचित सीएसआरमधून काही मदत मिळाली असती. पण, आडबाजूला असल्यामुळे जावे तितके लक्ष समाजाचे जात नाही. बरं जे काही लोक सुरुवातीला यायचे ते यावर लेख लिहायचे, प्रसिद्धी द्यायचे, पण यातून काही रचनात्मक घडायचे नाही. मदत मिळायची नाही.

शेवटी, विद्यार्थी सहायक समितीच्या माजी विद्यार्थ्यांनी त्यांना आताची जागा विकत घेऊन दिली. लोक हळूहळू जोडले गेले. जोडले जात आहेत. आश्रम अजून पक्का बांधून झालेला नाही. पत्र्याच्या शेड आहेत. निश्चित आकार आणण्याचे भगीरथ प्रत्यन चालू आहेत.

सध्या अनेक संस्था–संघटना या क्षेत्रात काम करतात, असे सर सांगतात. ज्या संस्था असे समर्पित काम करतात त्यांच्यातही म्हणावा तसा ताळमेळ नाही. आपसांत नेटवर्किंगचा अभाव आहे. त्यामुळे परस्परसहकार्य आणि सौहार्द या संस्थांम ध्ये निर्माण झालेले नाही. एकजीव होऊन अनाथ, गरीब, गरजू, वंचित मुलांच्या शिक्षणासाठी एकदिलाने काम करावे असे अजून ध्वनित होत नाही. त्यामुळे हे सुटे सुटे प्रकाशाचे ठिपके जोडणार कोण? हा प्रश्न उरतोच. चळवळ म्हणून या प्रश्नावर समाजजागृती होत नाही.

सरांचे स्वप्न आहे की किमान दोनशे विद्यार्थी सामावतील अशी शाळा निर्माण करायची. पालावर जी मुले राहतात. शाळेत जात नाहीत. ज्यांच्या वडिलांना शिक्षा झालेली आहे. आई भीक मागून उदरनिर्वाह करत आहे, त्या बालकांपर्यंत ही परिवर्तनाची चळवळ पोहचवायची. आणि हेच त्यांचे आता जीवनध्येय झाले आहे. हाच ध्यास घेऊन ते रोज सकाळी पाचपासून रात्री अकरा–बारापर्यंत कार्यरत असतात. नोकरी करतात. ते व त्यांच्या पत्नी आश्रम चालवतात. मुलांचे संगोपन, निवास, संस्कार यांच्यासाठी झटतात. हरवले आभाळ ज्यांचे, हो तयांचा सारथी, ही ओळ खऱ्या अर्थाने सार्थ करतात.

संस्कार संजीवनी फाउंडेशन
वंचित विद्यार्थी आश्रम
सोलापूर तुळजापूर हायवे हगलूर
नरवडे नगर, हगलूर.

'स्नेहवन' ही अशोक देशमाने यांची संस्था आत्म हत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृह म्हणून ही संस्था काम करते.

परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील मंगरूळ गावात जन्म झाला अशोकसरांचा. बालपण कष्टात गेले. स्वामी विवेकानंद यांचे विचार राहिले सोबत. पुढे महाविद्यालयीन जीवनात अडीअडचणीवर धैर्याने मात करण्याचे बळ दिले ते या संस्कारांनी, शक्तिशाली विचारांनी.

पुढे आयटीमध्ये नोकरीत असताना स्वधर्म आणि युगधर्म यांचा संघर्ष सुरू झाला. स्वतःची उन्नती इतकाच आपला स्वधर्म नाही. तर ज्यांचे सर्वस्व हरवले, हिरावून घेतले गेले त्यांचा कैवार हा युगधर्म आहे आणि तोच आपलाही स्वधर्म झाला पाहिजे, यातून 'स्नेहवन' ही संस्था आणि साधारण ८० मुलांचे संगोपन आनंदाने अनुदानाविना अशोकसर आणि त्याचे संपूर्ण कुटुंब आज आळंदी जवळ करत आहे.

सध्याच्या पराकोटीच्या आत्मकेंद्री समाजाबद्दल अशोकसर म्हणतात, समाजाचे आत्मकेंद्री वाढत जाणार आहे. आपण ते बघत बसण्यापेक्षा कृतीमध्ये भर द्यावी आपल्याकडून जे शक्य होईल ते काम करत राहावे. दुसऱ्यांचे दोष पाहणे हाही एक दोष आहे. त्यात प्रत्येक काळामध्ये समाजामध्ये चांगल्या–वाईट गोष्टींचे दर्शन होत असते. राम कृष्णाचा काळही त्यातून सुटला नाही.

त्यांनी स्वतः कधीही कोणापुढे हात पसरलेला नाही. अनुदान मागितलेले नाही. देणगी मिळत गेली. 'हम चलते गये सफर मे लोग मिलते गये और कारवा बनता गया,' हा खरा त्यांचा प्रवास. पत्नीचे मिसकॅरेज झाले असताना दुचाकी वरून पत्नीस त्यांनी भोसरी येथील डॉ. कुलकर्णी यांच्या दवाखान्यात नेले. याच डॉ. रवींद्र व स्मिता कुलकर्णी यांनी त्यांची भोसरी येथील दोन एकर जमीन अशोकसरांना दान दिली. असे अनेक हितचिंतक, सक्रिय मदत करणारे अनेक जण त्याच्याशी जोडले गेले आहेत.

समाज आणि माणूस हे नाते आजच्या काळात तुम्हाला कसे दिसते, तुमचे याबाबत विचार काय, असे विचारता, अशोकसर सांगतात, की समाज आणि माणूस हे नाते अतूट

आहे. समाजापासून दूर जाऊन माणूस जगू शकत नाही. परंतु प्रत्येक समाजामध्ये चांगले आणि वाईट दोन्ही गोष्टी पाहायला मिळतात. त्यातून आपण काय घ्यायचे. आणि ते नाते किती वाढवायचे हे ज्याचे त्याने ठरवायला पाहिजे. आजकाल सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे समाजाचे तुटलेपण जास्त वाढत आहे. आणि ते स्पष्टपणे दिसत आहे. समाजात उथळपणा फार वाढला आहे. लोकांचा पेशन्स ३० सेकंदाच्या वर राहिला नाही. प्रत्येक गोष्टीवर लगेच रिॲक्ट होणे, कोणत्याही गोष्टीचा मागचापुढचा विचार न करता व्यक्त होणे, त्यामुळे तुटलेपण वाढत जाणार आहे.

इतका ज्वलंत प्रश्न आहे शेतकरी आत्महत्यांचा. पण त्यांच्या मुलाबाळांसाठी कोणतीही लोकचळवळ होताना दिसत नाही. समाज एकसंघपणे या लेकरांच्या पाठीशी उभा राहताना का दिसत नाही, याबाबत अशोकसर म्हणतात, की कोणालाही रिस्क घ्यावी वाटत नाही. अरे एक ठिकाणी धोके खाल्ल्यानंतर प्रत्येकाला असे वाटते की आपल्या परीने जे करता येते ते करत राहावे. आजकाल कुठलीही चळवळ सुरू होत नाही. सुरू झाली तर ती पुढे जाऊ दिली जात नाही. समाजाचा ॲग्रेसिव्हपण त्याला कारणीभूत आहे. वेगवेगळ्या ठिकाणी चालणाऱ्या कामाचा एक धागा कॉमन असतो तो म्हणजे आपल्याला समाजाला काहीतरी द्यायचे आहे. ती धडपड, जिद्द सर्वांमध्ये सारखीच असते.

मग शेवटी प्रश्न पडतो, की समाजाला या प्रकल्पात सहभागी करून घ्यायचे असेल तर काय करावे लागेल. अशोकसर म्हणतात, की सामाजिक प्रकल्प चालवणाऱ्या लोकांमध्ये अध्यात्मिक प्रगल्भता वाढली पाहिजे. त्यामुळे कर्ते पणाचा भाव कमी होईल. कांचन, कामिनी आणि कीर्ती यामध्ये न फसता आपल्याकडे असलेल्या वेळेचा संसाधनाचा जास्तीत जास्त वापर समाजाला कसा होईल यावर भर देता येईल. त्यासाठी एकत्र येता आले तर अधिक चांगले काम होईल.

अगदी, एकला चलो रे, अशी त्यांची स्थिती नसली तरी अजून उजाडत नाही रे, अशी अवस्था नक्कीच आहे. म्हणूनच कदाचित अंधाराला हाक मारत, त्यांनी संस्थेचे नाव ठेवले आहे, 'स्नेहवन'.. एक आशेचा किरण!

या तरुण पिढीच्या प्रतिनिधिक कर्त्या लोकांच्या अनुभवांतून काय दिसते? समर्पित युवक झटत आहेत. अजून मी जहाज सोडलेले नाही, या लढवय्या बाण्याने त्यांची झुंज चालू आहेच. कोणी सोबत असो किंवा नसो त्यांचे कार्य हेच त्यांचे मिशन झाले आहे. त्यांनी केलेला त्याग आजच्या काळात लक्षणीय आहे.

एक गोष्ट दिसते की त्यांना त्यांचे काम उभे करायला खूप संघर्ष करावा लागत आहे. मेहनत घेण्यास त्यांची ना नाही. परंतु शक्ती कशात जास्त जाते आहे तर निधीसंकलन आणि समाजापर्यंत पोहचणे. विस्ताराच्या अनेक कल्पना मनात असूनही केवळ पाठबळ नाही म्हणून गरुडझेप घेता येत नाही. जे निर्माण केले आहे, ते टिकवून ठेवणे हाच प्राधान्यक्रम झाला आहे.

समाजातील लोक अगदीच पाठीशी उभे नाहीत, असे नाही. नाहीतर हेही काम होते ना. परंतु ज्या ज्वलंत प्रश्नास ही मंडळी हात घालत आहेत, त्याचे काय? वर्षानुवर्षे जातिव्यवस्थेचे चटके सहन करणारी भटक्या जमातीतील काळेसरांची मुले ही पारंपरिक व्यवस्थेविरुद्ध झगडत आहेत. तर देशमानेसरांची लेकरे नापिकी, दुष्काळ सोसून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची म्हणजे प्रचलित व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष आहे. तर सागर पाटील यांच्या संस्थेत शिक्षण घेणारी मुले दिव्यांग म्हणजे नैसर्गिक किंवा अपघाताने दिव्यांग झालेली. कारणे पारंपरिक, प्रचलित किंवा नैसर्गिक व्यवस्थेत दडलेली



**'स्नेहवन'मध्ये पत्नी व मुलांसह अशोक देशमाने**

असोत, समान बाब काय तर या सर्वांच्या नशिबी अंधार आहे. भविष्यातील काळाकुट्ट अंधार. शिक्षणाचा प्रकाश यांच्या जीवनात पोचून उजेड निर्माण झाला नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकार ही मुले, ही पिढी गमावून बसेल. ही एक पिढी आणि पर्यायाने पुढील अनेक पिढ्या वाचाव्यात, म्हणून या भगीरथ समर्पित ध्येयवेड्या लोकांची धडपड चालू आहे.

असे आणखी बरेच प्रयोग, प्रकल्प महाराष्ट्रात चालू आहेत, असतील. पण या सर्वांचा समाजावर ठाशीव ठसा उमटतो आहे का? मी अशा गरीब, वंचित मुलांच्या शिक्षणाकरता काही सक्रिय करतो आहे का, हा ज्याने त्याने स्वत:ला विचारायचा प्रश्न आहे. या संस्थांचे नेटवर्क उभे राहून चळवळीत रूपांतर होईल न होईल, पण आज एका तरी मुलाचे थांबलेले शिक्षण मी सुरू करू शकतो का, हा मुद्दा महत्त्वाचा.

जोपर्यंत समाज खंबीरपणे अशा कामाच्या मागे उभा राहणार नाही, तोपर्यंत या कामांचा विस्तार होणार नाही. समर्पित कार्यास वाहून घेणे पांढरपेशा समाजास कदाचित जमणार नाही. पण समयदान, वस्तुदान, आर्थिक मदत, संवाद साधणे, भेट देणे, इतके केले तरी कार्यकर्त्यांना हुरूप, उत्साह आपण देऊ शकतो. वेळ आली आहे की,

रिकामी करूयात भरगच्च कपाटे
सिग्नलला मुले थांबतात आजकाल

शेवटचा प्रश्न उरतो, तो म्हणजे माणसाचे माणसाशी असलेले नाते काय असते, असावे व सध्या आहे? माणसांचाच समूह आणि पर्यायाने समाज बनतो. ज्या समाजात आपण राहतो, त्याबद्दल काही देणेघेणे म्हणजे बांधिलकी किंवा सामिलकी आपण मानतो का? मानसा मानसा, कधी व्हशीन मानुस, लोभापायी रे झाला मानसाचा कानुस!, ही बहिणाबाईंची उक्ती आज सार्थ होताना दिसते. माणूस होणे हाच माणसाचा माणूस धर्म आहे. त्याचे अटळ गंतव्य आहे. तुकाराममहाराज म्हणतात तसे,

तुका म्हणे होय मनासी संवाद ।
आपुलाची वाद आपल्यासी ।।

हा वाद स्वत:शी संवाद साधणारा असावा. आपल्यातील वाईट दूर सारणारा असावा. तारतम्य बाळगत विवेक जागृत करणारा असावा. 'दुरितांचे तिमिर' जाऊन विश्वात स्वधर्माचा सूर्य पाहण्यासाठी आसुसलेला असावा. हे नैसर्गिक, जैविक आणि शाश्वत सामाजिक नाते आहे. जे आज हरवत चालले आहे.

सहानुभूती किंवा उपकार म्हणून दिल्याने आपली जबाबदारी संपत नाही. सहवेदनेचा अनुभव महत्त्वाचा ठरतो. ही संवेदना रुजवणे हा इष्ट मार्ग होऊ शकतो. या प्रयत्नांची सुरुवात शालेय वयापासून होऊ शकते. समाज माझ्यासाठी काय करतो यापेक्षा मी समाजासाठी काय करतो, केले पाहिजे, हा मूल्यविचार आणि संस्कार करणे ही काळाची गरज आहे. तर पुढील काळात माणूस आणि त्याचे सामाजिक नाते सुदृढ आणि निकोप राहू शकेल.

कवी दत्ता हलसगीकर यांची सुप्रसिद्ध कविता आहे, आवाहन. त्याची कडवी अशी आहेत :

आवाहन

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी द्यावीत

ज्यांच्या अंगणात झुकले ढग
त्यांनी ओंजळपाणी द्यावे
आपले श्रीमंत हृदय त्यांनी
रिते करून भरून घ्यावे

आभाळाएवढी ज्यांची उंची
त्यांनी थोडे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले
त्यांना थोडे उचलून घ्यावे

ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले आनंदाने आणि कृतज्ञतेने दिली पाहिजेत. किमान त्यांनी तरी.....!!


– **समरेंद्र निंबाळकर**
samarnimbalkar@gmail.com

ग्रंथाली

**अवघा रंग... एक झाला**

**समरेंद्र निंबाळकर**

कवितासंग्रह



**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



शुभा जोशी

# मनस्वी गायिकेचा परीसस्पर्श

**ताईंनी कंपोझ केलेल्या ठुमऱ्या, दादरे ऐकताना त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचं टॅलेन्ट प्रकर्षानं जाणवतं. त्यांच्या शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाचा, ज्ञानाचा अर्क ठुमरीमध्ये ते राग मांडताना, बंदिशी बांधताना यायचा. जे राग ठुमरीमध्ये विशेष गायले जात नाहीत – भटियार, बिभास, देसकार अशा रागांचं मिश्रण करून त्यांनी फार सुंदर बंदिश बांधली होती. ठुमरीचा रंग आणि त्या गायकीला अजिबात धक्का न लावता ती नजाकतीनं मांडणं हे ताईंचं वैशिष्ट्यं होतं.**

**शोभाताईंच्या** गाण्याकडे मी कशी आकर्षित झाले हा मजेदार किस्सा आहे. लहानपणापासून माझा आवाज भारी, काळी तीनचा. जड म्हणायला हरकत नाही असा आवाज. माझ्या वयाच्या आणि त्या काळातल्या इतर बऱ्याच गाणाऱ्या मुलींचे आवाज अगदी हाय पीचचे पातळ आवाज. लहानपणापासून माझा अनुभव असा, की अशा पातळ आवाजाच्या मुलींच्या गाण्याची वाहवा होत असे आणि मी गायला लागले की तोंडं वाकडी करायचे ऐकणारे. कुजबूजही करायचे, 'काय आवाज आहे हिचा! किती जाडाभरडा!' लहान होते तरी मला कळायचं त्यांच्या चेहऱ्यावरून की काय बोलताहेत. एवढं मात्र कळलं होतं की आपला आवाज निराळा आहे. पण आता काय करणार! याच आवाजात गावं लागेल. मी आपली माझ्या मनानं मजा घेत होते गाण्याची. परंतु बाहेर कुणासमोर गायचंच नाही असं ठरवलं होतं. पुढे एसएनडीटी कॉलेजमध्ये संगीत विषय घेतला. एकदा आमच्या विभागात शोभाताईंचं गाणं ठेवलं होतं. तेव्हा मी पहिल्यांदाच त्यांचं गाणं ऐकत होते. आमच्या संगीत विभागाची छोटीशी खोली होती; मात्र शोभाताईंचं गाणं आहे म्हटल्यावर खचाखच भरली. बाहेरचेही काही लोक आले होते ऐकायला. मी दाराच्या बाहेर उभी राहून त्यांचं गाणं ऐकत होते. पहिल्यांदा त्यांनी 'सा' लावला; सगळे जण वाहवा करायला लागले. मी एकदम चकित झाले की आवाज तर अगदी पुरुषी वाटतोय आणि हे लोक दाद देताहेत! अधिक लक्ष देऊन ते गाणं मी ऐकायला लागले. गाणं इतकं आवडलं मला की काय सांगू! इतकी आनंदित झाले मी – शोभाताईंचा आवाज आणि माझा आवाज याची जातकुळी सारखी वाटली मला. या आवाजात इतकं सुंदर गाणं होऊ शकतं याचं साक्षात दर्शन घडलं आणि आता आपण गायचंच असं ठरवलं. कालांतरानं मी शोभाताईंकडे शिकायला सुरुवात केली.

आता हे सांगताना शोभाताईंच्या स्वभावाचा एक फार सुंदर पैलू तुम्हाला सांगायचा आहे. आमच्या कॉलेजमधल्याच एक प्रोफेसर मला त्यांच्याकडे घेऊन गेल्या होत्या. ताई म्हणाल्या, "हं बेटा! काय गाते? जरा आवाज ऐकव." मी घाबरले तर होतेच. त्यांच्याकडे पाहिलं, तर म्हणाल्या, "काय झालं? काहीही गा. मला जरा आवाज ऐकायचाय." अशा

रेलून बसल्या होत्या सोफ्यावर. मग मी सुरू केलं मला जे येत होतं ते. त्यावेळी मला गजलची फार आवड होती. गजलचे शब्द कळत नव्हते, अर्थबिर्थ, काही कळत नव्हतं; पण का कोण जाणे मला गजलचं अतिशय आकर्षण होतं. राजूल मेहता नावाची माझी गुजराती मैत्रीण होती. तिच्याकडे गजलचा 'स्टॉक' होता. तिनं मला एक गजल शिकवली होती. 'शुभा, तुझ्या आवाजात छान वाटेल गजल', असं म्हणून तिने मला गायला लावलं होतं. तीच गजल मी शोभाताईंसमोर गायला सुरुवात केली. प्रेम धवनची रचना होती – 'मुझे मुबारक पुरानी यादें, तुम्हें मुबारक नया अफ़साना' मी दोन ओळी म्हटल्याही नाहीत तर शोभाताई एकदम सावरून बसल्या. मी घाबरलेच काय झालं म्हणून. तर म्हणाल्या, ''हं! हं! पुढे म्हण.'' पुढे कडवं म्हटलं. सगळं ऐकून झालं आणि म्हणाल्या, ''वा! खूप छान आहे. ए, मलाही शिकव.'' शब्दांतही वर्णन करता येणार नाही अशा त्यांच्या प्रांजळपणाचा तो पहिला अनुभव मी घेतला. आजही तो प्रसंग मला आठवतो आणि आश्चर्य वाटत राहतं. माझ्याबरोबर आलेल्या प्रोफेसरही आश्चर्यचकित होऊन ताईंना म्हणाल्या, 'ताई, आप ये क्या बात कर रहीं हैं। वो तो आपके पास सीखने आयी हैं।' शोभाताई तर खुश झाल्या होत्या माझ्यावर. ''ये तू बेटा शिकायला!'' असं म्हणाल्या आणि माझं शिकणं सुरू झालं त्यांच्याकडे.

शोभाताई उत्तम परफॉर्मर. त्यांना ते बैठक मारून शिकवायचा पेशन्स नव्हता. आठवड्यातून एक दिवस मी जायचे. गेल्यावर म्हणायच्या, ''हं! चल! तुला काय शिकवू?'' मी म्हटलं, ''मला ठुमरी शिकायचीए.'' तर 'देस'ची ठुमरी सुरू केली – 'सखी सावन आयो'... छान होती ठुमरी. शिकवायला तर घेतली त्यांनी; पण काही केल्या मला मुखडा कळेना. मी शास्त्रीय संगीत शिकले होते आणि याच भ्रमात होते की आपल्याला काय येईल हे. तालाची, सुरांची, थोड्या बहुत रागांची माहिती आहे, इतकं काही कठीण जाणार नाही आपल्याला. कसलं काय! तो मुखडा घेतानाच नाकी नऊ आले. आता एक-दोनदा त्यांनी गाऊन दाखवलं आणि मग त्यांचा पेशन्स संपला. त्या आपल्या त्यांच्या गात सुटल्या! घरी आल्यावर 'सखी सावन आयो' आठवायचा प्रयत्न केला. बरं तेव्हा काही रेकॉर्डिंग वगैरे करायची पद्धत नव्हती. पुढच्या आठवड्यात गेले तर 'हं! चला आपण हे करूया' म्हणून नवीन ठुमरी सुरू. गेल्या वेळी जे शिकवलंय, ते ऐकव, ते करूया, असं काही नाही. असं माझं वर्ष गेलं. दरवेळेस काही ना काहीतरी नवीन! त्यांचा रियाजही ऐकायला मिळायचा. ते ऐकण्याचा, अनुभवण्याचा आम्हाला आनंद व्हायचाच. मात्र दुसरीकडे असं व्हायचं, की शोभाताईंकडे जाऊन महिना-दोन महिने झाले नाहीत तर लोक विचारू लागले, काय शिकलीस ते गा म्हणू लागले. 'काय शिकलीस ताईंकडे? काढा पोतडीतून बाहेर' – असं म्हटल्यावर आता काय काढणार पोतडीतून? शोभाताईंच्या मागे तानपुऱ्याला बसत होते, तेही दिसत होतं सर्वांना. लोकांच्या अपेक्षा वाढायला लागल्या; पण इथे शिक्षण तर काहीच नाही अशी माझी अवस्था. हळूहळू मला त्यांचा स्वभाव कळू लागला होता. पठडीबद्ध शिकवणं हा त्यांचा पिंड नाही; मात्र शिकायचं आहे तर त्यांच्याकडेच. मग मी त्यांच्या मैफिली, कार्यक्रमांना जायला लागले, जास्तीत जास्त ऐकायला लागले. त्या आवाज कसा लावतात, शब्दांची फेक कशी करतात हे समजून घेण्याचा प्रयत्न करू लागले. तुम्ही शास्त्रीय गायन शिकला असाल, शब्द सारखे असले तरी त्यात होणारे शब्दोच्चार आणि ठुमरीची शब्दफेक यांत फरक आहे. ते लगाव निराळेच असतात. अगदी षड्ज लावायचा असला तरी इतका जीव ओतलेला असायचा शोभाताईंनी. शास्त्रीय गायनात शास्त्र मांडणं महत्त्वाचं असतं; तिथे तुम्ही भावपूर्णतेनं फार गात बसलात तर ते विस्कळीत होतं. मात्र होतं काय, शास्त्रीय गायनाची बैठक असली तरी ठुमरीची गायकी गळ्यावर चढायला जरा वेळ लागतो. आधी ते कळायला वेळ लागतो, कळल्यावर ते आत्मसात करून, रियाज करून मांडणं या सगळ्या पुढच्या पायऱ्या आहेत.

एकदा धीर करून शोभाताईंना मी सांगितलं, की ''ताई, कुणी गा म्हटलं की मला हे काही गाता येत नाही. आपण असं करूया का, की एक महिना तुम्ही मला एकच ठुमरी शिकवाल का? मला गायकी शिकायचीए.'' हो तर म्हणाल्या; मात्र पुन्हा तसंच. मग मीच सवय लावून घेतली स्वतःला. अतिशय एकाग्रपणे ऐकायचं, ऐकून ऐकून जे आत्मसात करता येईल ते करायचा प्रयत्न करायचा. मग त्या जिथे मिंड-खटका घेताहेत, जशी हरकत घेताहेत तशीच घ्यायची असं करायला लागले. काही काही वेळा मुद्दामहून चुकायचे. शोभाताई गायला लागल्या ना की 'ताई, असं आहे का?' 'नाही, नाही. असं नाही, असं आहे' म्हणत त्या गाऊन दाखवायच्या.

शास्त्रीय संगीतात गुरूचं अनुकरण करून शिष्य गातो. गुरूसुद्धा 'हे असंच गा', असं सांगणारे असतात. हा भाग सुरुवातीच्या टप्प्यावर शिष्यासाठी आवश्यक असतो कारण त्या अनुकरणाशिवाय ती गायकी, त्यातले रस्ते लक्षात येत नाहीत – म्हणजे रागाचे तर असतातच; गायकीचेही रस्ते समजून घ्यावे लागतात. आलापी-ताना यांची बढत कशी करायची, त्यांचे वेगवेगळे पॅटर्न कसे करायचे हे गुरू जाणीवपूर्वक सांगतो. मग शोभाताई जशी आलापी करतात तशीच करायला लागले. शिकायला येणाऱ्या काहीजणी स्वतःचंही गायच्या. त्यावेळी मला जाणवलं की कॉपी केल्याशिवाय काही ताईंच्या गायकीची मजा येणारच नाही. तुमचा गळा तयार आहे, गळ्यात सूर-हरकती आहेत, ताल कळतोय, तुम्ही तुमचं गा; पण त्यांच्या गायकीची मजा काही औरच आहे. अगदी प्रत्येक गोष्टीची

कॉपी करायची असं ठरवलं. मग ती इतकी करायला लागले की काही जे स्वतंत्रपणे गायचे थोडंफार कार्यक्रमांतून तेव्हा प्रतिक्रिया यायच्या, की तुम्ही अगदी शोभाताईंसारखी मान हलवता. आणि खरंच मी करायचेही तसंच. त्या गाताना जशी मान करायच्या अगदी तशीच मीही ठेवायचे. हे केल्याशिवाय तशी गायकी येणारच नाही आपल्याला असं ठाम मत झालं होतं. परफॉर्म करतानाही मी आठवून आठवून गायचे. काही टोकदार प्रतिक्रिया यायच्या, की छान गाता हो तुम्ही; पण कॉपी किती दिवस करणार? त्यावेळेस राग यायचा, वाईट वाटायचं. नंतर विचार केला की बरोबर आहे त्यांचं म्हणणं. शोभाताईंशीही बोलले मी याबद्दल. शोभाताई समजवायच्या, ''बोलू दे त्यांना. कॉपी केल्याशिवाय येणार नाही गाणं. अगं, आम्हीपण कुणाकुणाचं ऐकून असं कॉपी करत होतो.'' ताईंना बेगम अख्तरांचं गाणं खूप आवडायचं. जे गाणं आपल्याला आवडतं, सर्वांना आवडतं; तर त्यांच्यासारखं का नाही गायचं? सिनेमाचं गाणं आवडलं की आपण तसंच गायचा प्रयत्न करतो ना? कण, सूर, खटका याची कॉपी करतो. त्याशिवाय गाता येणारच नाही.

मी इतरांची गायकीही खूप ऐकली. बनारसमधील खास ठुमरी गायकी गाणाऱ्या सगळ्यांचंच गाणं काही मला आवडत होतं असं नाही. मात्र ऐकत होते. त्यांच्या आणि शोभाताईंच्या गाण्यात मला फरक जाणवला होता. शोभाताईंचं गाणं आवडत होतं कारण त्यांच्या आवाजाच्या लगावापासून ते ठुमरीच्या आलापीची बढत करण्याची पद्धत, एकेका सूराचा ठेहेराव (मात्र शास्त्रीय गाण्यात जसा पक्का, ठाम असतो तसा नव्हे), त्यात असणारा मुलायमपणा, गोडवा, त्या स्वरांचं तेज हे सगळंच अवर्णनीय होतं. त्या स्वत: विचारीही होत्या. त्यांनीही खूप ऐकलं होतं. त्यांच्या बुद्धिमत्तेचं कौतुक करण्यासारखं आहे. उत्तम क्लासिकल गायच्या त्या. मी त्यांच्याबरोबर जात होते तेव्हा ऐकलंय - प्रत्येक कार्यक्रमात आधी त्या क्लासिकल गायच्या. अनेक राग मी त्यांच्याकडून ऐकले. भीमपलास, मुलतानी, मारूबिहाग, यमन, भूपाली - असे कितीतरी राग आणि त्यांच्या अनेक सुंदर बंदिशी! क्लासिकल गाताना पूर्ण क्लासिकल गायच्या. त्यावेळी वाटायचंही नाही की या ठुमरी गायिका आहेत आणि ठुमरी गायच्या त्यावेळी शास्त्रीय गायनाचा शास्त्रीय रोखठोकपणा नाही. ठुमरीनंतर गजल गायल्या तर त्यात ठुमरीची झाकही येऊ देत नसत. हे 'स्वीच ऑन, स्वीच ऑफ' त्यांना फार उत्तम साधलं होतं. गाण्यातल्या प्रत्येक प्रकारात काय हवं ही नजर त्यांच्याकडे होती. ठुमरीच्या हरकती निराळ्या, गजलच्या निराळ्या. बरं आता यांत एवढ्या हरकती गायल्या तरी भजनामध्ये हवा तोच भाव येणार. त्यात मग ठुमरीतला कण-खटका-मुरकी नाही की गजलचा लेहेजा नाही. लावणी गायल्या तर लावणीचा नखरा. हे मला त्यांचं



शोभा गुर्टू

खूप आवडत होतं. शोभाताईंना लोकसंगीताचा बाजही (फोक स्टाइल) फार आवडायचा. राजूल मेहताने मला गुजराती फोक स्टाइल शिकवली होती. 'सुनो सुनो म्हारी अरजी' असं एक मीराबाईचं भजन आहे. शोभाताईंनी ते एका गुजराती लोकसंगीतावरून सुंदर बांधलं. खूप जण ते गातात. माझीही ध्वनिमुद्रिका निघाली. संगीताच्या प्रत्येक प्रकाराचा नीट अभ्यास केल्याशिवाय ते गायचं नाही, ही नजरही ताईंकडून मिळाली.

बडे गुलाम अली खाँसाहेब, बेगम अख्तर त्यांना खूप आवडायचे. शोभाताई लहान असताना बडे गुलाम अली खाँसाहेबांच्या रेकॉर्ड ऐकून पाठ करायच्या आणि त्यांच्या गुरूंना ऐकवायच्या. शोभाताई आम्हाला सांगायच्या की गुरूंना हे असं ऐकवलं की ते म्हणायचे, 'बेबी! आफत है ये आफत! कुछ भी गाती हो तुम और बहुत अच्छा गाती हो।' बेगम अख्तरजींच्या मागे तानपुऱ्याला ताई बसल्या आहेत असा एक फोटो मी पाहिला आहे. गुरूंविषयी त्यांना अपार आदर होता. घम्मन खाँसाहेबांनी शिकवलेल्या अनेक बंदिशी ताईंनी आम्हाला ऐकवल्या. परफॉर्मन्सचे अनेक धडे ताईंकडून मिळाले. त्या इतक्या चतुर होत्या की ऑडियन्स बघून त्यांना कळत असे की कुठे, किती आणि काय गावं. त्याप्रमाणे त्यांची मैफल नेहमी रंगतदार होत असे. प्रत्येक कलाकारात ही चतुराई उपजतच असते आणि असायलाच पाहिजे. ज्याच्यात ती नाही अशा आमच्यासारख्या कलाकारांना ही गोष्ट ताईंकडून शिकता आली. त्या बॉर्न आर्टिस्ट होत्या. शोभाताईंच्या गाण्यात ठुमरीगायनाची सगळी सौंदर्यवैशिष्ट्यं होती. ठुमरी गाताना त्यात 'पुकार' असली पाहिजे. शास्त्र माहीत असणं हा एक भाग; ठुमरी रंगतदारच व्हायला हवी. काहींना वाटतं की ठुमरीत खूप हरकती, कण, खटके, मुरक्या घेतल्या की ती ठुमरी झाली. पण असं नाही, योग्य ठिकाणीच मुरकी लावावी लागते, मिंड,



गुरुवर्य शोभा गुर्टू यांच्यासमवेत

खटका यावा लागतो. ठुमरी म्हणजे समर्पण! तो भाव असला पाहिजे. शोभाताईंची ठुमरी ऐकताना डोळ्यांत पाणी यायचं. शोभाताईंना गाण्याबद्दल सविस्तर बोलणं जमायचं नाही. कधी आपण विचारावं, ''ताई, हे गरेगमप असं आहे का नोटेशन?'' तर ओरडायच्या, ''ए!'' त्यांच्याशी हे काही बोलायचं नाही; त्यांचं गाणं ऐकूनच अभ्यास करायचा.

मी कांदिवलीहून ग्रँटरोडला जायचे शोभाताईंकडे. बरं प्रत्येक वेळी शिकवण्याचा मूड असेलच असं नाही. धावपळ करून आपण पोहोचलो की या विचारायच्या, ''ए, आज आपण फिरायला जायचं का? पिक्चरला जाऊया.'' असं म्हणत मला घेऊन जायच्या. मी कपाळावर हात मारत असे कारण तीन तास तो सिनेमा पाहिल्यावर घरी परत जायची वेळ व्हायची. एकदा मला म्हणाल्या, ''अग, तू राहतेस कुठे?'' मी म्हटलं, ''शोभाताई, खूप लांब आहे.'' ''मला घेऊन जा ना घरी एकदा,'' असं म्हणाल्या. आता काय करावं! एवढ्या लांब टॅक्सीनं नेणं तर मला परवडणारं नव्हतं. गाडीही नव्हती. मी म्हटलं, ''ताई, ट्रेननं जावं लागेल.'' ''हो, येईन की.'' मग एकदा रविवारी सकाळी उठून त्यांच्याकडे गेले. त्या इतक्या खुश होत्या, लोकलमध्ये खिडकीजवळ बसल्या. उत्साहानं बाहेर बघत होत्या. ''कित्ती मजा येतेए नाही!'' म्हणत होत्या. कांदिवलीला उतरल्यावरही स्टेशनपासून घर दूर म्हणून रिक्षा करून गेलो. मग म्हणाल्या, ''बाई, किती लांब राहतेस ग तू!'' मी म्हटलं, बघा आणि तुम्ही मला नेता कुठे कुठे. गोड हसल्या.

मी ताईंकडे जात राहिले. चिकाटी सोडली नाही. गुरूच्या सहवासात अनेक गोष्टी उलगडत जातात. गाणं शिकणं हा भाग आहेच; त्याचा आनंद कसा घ्यायचा, किंबहुना जगण्याचा आनंद कसा घ्यायचा हेही शिकता येतं.

ताईंनी कंपोझ केलेल्या ठुमऱ्या, दादरे ऐकताना त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचं टॅलेन्ट प्रकर्षानं जाणवतं. त्यांच्या शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाचा, ज्ञानाचा अर्क ठुमरीमध्ये ते राग मांडताना, बंदिशी (ठुमरीतल्या बंदिशी) बांधताना यायचा. जे राग ठुमरीमध्ये विशेष गायले जात नाहीत – भटियार, बिभास, देसकार अशा रागांचं मिश्रण करून त्यांनी फार सुंदर बंदिश बांधली होती. गावती, वृंदावनी सारंगमध्ये फार छान बंदिशरचना केल्या होत्या. हंसध्वनी, मारूबिहाग, शंकरा अंगाने जाणाऱ्या काही रचना होत्या. ठुमरीचा रंग आणि त्या गायकीला अजिबात धक्का न लावता ती नजाकतीनं मांडणं हे ताईंचं वैशिष्ट्यं होतं. पूरब अंगाच्या ठुमरीगायनाला एक वेगळा आयाम त्यांनी दिला. महाराष्ट्रीय असूनही ठुमरी गायनाला त्यांनी एक वेगळी उंची, नजाकत दिली की बनारसवाल्यांनीही त्यांची तारीफ करावी. त्यांचे गुरू घम्मन खाँसाहेब जयपूरचे होते. त्यांच्याकडे जी ठुमरी गायली जाते ती बनारस अंगापेक्षा थोडी वेगळी असते. तिथल्या लोकसंगीताच्या बाजाची छाप आहे ठुमऱ्यांवर. त्यामुळे तो ठुमरीचा निराळाच आणि सुंदर रंग आहे, जो ताईंच्या गाण्यांतून अनुभवता येतो. ताई अतिशय मोकळ्या मनाच्या आणि स्वतंत्र विचारांच्या होत्या; तितक्याच प्रेमळ, नम्र. अगदी नवीन मुलांबरोबरही गायला बसायच्या. कुणाचाही कधी अपमान करणं तर नाहीच. मी गायला बसायचे मागे, घाबरून आवंढा गिळत. तर या 'गा बेटा गा' म्हणत प्रोत्साहनच द्यायच्या. त्यांच्यामुळे मला मैफलीत गायची जरा जरा सवय होऊ लागली, लोकांसमोर गाताना आत्मविश्वास येऊ लागला.

प्रत्येक कलाकार आपल्या घडण्याच्या काळात आणि पैलू पडल्यानंतरच्या काळात अनेक अवस्थांमधून जात असतो. मी ताईंकडे शिकायला सुरुवात केली तेव्हा त्या टॉपवर होत्या. त्यावेळचं त्यांचं गाणं अगदी चैतन्यानं भरलेलं, बहरलेलं होतं. त्यामुळे ती समृद्ध गायकीच मला ऐकायला मिळाली. माझं त्यांच्याकडे जाणं थांबलं तरी कार्यक्रमातून, कॅसेटमधून त्यांचं गाणं पोचत होतं, ऐकत होते. कॅसेटही नंतर आल्या त्यांच्या; मात्र तेव्हाही गाणं तसंच होतं. त्यांच्या गायकीत बनारस अंगही आहे, मात्र त्यांनी कुठेही मूळ गाभा ढळू दिला नाही. ठुमरीच्या सौंदर्याला बाधा येणार नाही याबातीत त्यांचा कटाक्ष होता. ठुमऱ्या ब्रजभाषेत असतात. बनारसवाल्यांची शब्दफेकही निराळ्या पद्धतीची असते. शोभाताई महाराष्ट्रीयन होत्या. मला असं वाटतं त्यांची शब्दफेक जास्त सॉफिस्टिकेटेड होती.

कलाकार म्हणून आपल्याला त्या व्यक्तीची एखादी बाब, गुण प्रभावित करतो. ताईंच्या बाबतीत त्यांचं पूर्ण व्यक्तिमत्त्वच प्रभावित करणारं होतं. त्यांच्या अगदी सहज बोलण्यावागण्यातल्याही कित्येक गोष्टी साध्या वाटल्या तरी फार महत्त्वाच्या होत्या. त्या सांगायच्या, 'गर्व करायचा नाही. गर्वाचं घर खाली असतं.' गायला बसायच्या आधी तबजली

आणि हार्मोनियम वादकांना खाली वाकून नमस्कार करायच्या, मग ते कितीही वयाचे असोत. नारायणराव इंदूरकर तर अनेक कार्यक्रमांत साथीला असत. त्यांनी तर लहान शोभाताईंना अगदी मांडीवर खेळवलं होतं इतका जुना परिचय. ताई त्यांना वडिलांच्या ठिकाणीच मानायच्या. कार्यक्रमाच्या आधी त्यांच्या पाया पडायच्या आणि म्हणायाच्या, दादा, सांभाळून घ्या. ही लीनता, विनम्रपणा हा ताईंकडून शिकण्यासारखा गुण होता.

अनेक मोठमोठ्या कलाकारांचं त्यांच्याकडे येणंजाणं असे. किशोरीताई, पं. अभिषेकी, अंजनीबाई लोलेकर. मी नवीन नवीन शिकायला लागले तेव्हा एकदा म्हणाल्या, उद्या ये हं. उद्या जायचंय लताबाईंकडे. मी संकोचानं गेलेच नाही. हृदयनाथजी अनेकदा त्यांचं गाणं ऐकायला यायचे. घरातल्या काही सणासमारंभाच्या निमित्तानं येणाऱ्या कलाकारांच्या अनौपचारिक मैफिलीही ऐकता यायच्या. ताईंच्या मुलांपैकी रवी आणि त्रिलोक उत्तम वादक. नरेन मात्र उत्तम कानसेन. रवी तर इंडस्ट्रीत व्हिदमिस्ट म्हणून, संगीतकार प्यारेलाल यांचा अगदी लाडका वादक म्हणून प्रसिद्धच होता. उत्तम तबला वाजवायचा. एकदा 'म्होरो प्रणाम'च्या वेळी त्याने इतकं अप्रतिम वाजवलं की शोभाताईही खुश झाल्या त्याच्यावर.

शोभाताईंनी मला गजल शिकण्यासाठी उस्ताद ताज अहमद खाँसाहेबांकडे पाठवलं तेव्हा खाँसाहेबांनी मला पहिली अट हीच घातली की 'तुला जर माझ्याकडे गाणं शिकायचं असेल तर शोभाताईंचं गाणं विसरायचं. तरच मी गाणं शिकवेन.' त्यांच्याकडे मी गजल शिकायला गेले होते. शोभाताईंनीच मला पाठवलं होतं. शोभाताईंकडच्या सगळ्या गजला ताईंनी मला शिकवल्या. मी रेडिओवर ऑडिशन दिली होती गजल गायनासाठी. तेव्हा मजरूह सुलतानपुरी, शंकरजी परीक्षक होते. माझी गजल ऐकून मला थेट आत बोलवलं, डायरेक्ट 'ए' ग्रेड मिळाली मला. गझल हा प्रकार गाण्यासाठी हवं असतं उर्दू भाषेचं ज्ञान. ते मी शास्त्रशुद्ध लिहायला-वाचायला शिकले. उर्दू संस्थेचं प्रमाणपत्रही मला मिळालंय तर त्यानंतर रेडिओ स्टेशनवर गजलसाठी बोलावणी येऊ लागली. माझ्याकडे इतक्या गजलांचा साठा नव्हता. औरंगाबादला गेले होते तिथले स्टेशन डायरेक्टर मुस्लीम होते. माझं नाव वाचून त्यांना जरा शंका आली की ही काय गजल गाणार. केबिनमध्ये बोलावलं आणि 'आप क्या क्या गा रही हैं?' असं जरा दरडावून विचारलं. ताईंकडे शिकलेल्या गजल, गजलकार यांबद्दल सांगितलं, तर म्हणाले, 'इतने से क्या होगा?' मग एक बरीच मोठी यादी मांडली त्यांनी- ये पता है?- अशी लाजच काढली. आले ताईंकडे. म्हटलं काय करू? तर त्यांनी पाठवलं उस्ताद ताज अहमद खाँसाहेबाकडे. आणि ''जा हं! तो चांगलं शिकवेल तुला'' - हा मोकळेपणा शोभाताईंचा फार मोठा गुण होता. योग्य मार्ग दाखवणं ही सहजवृत्ती होती.

त्यांच्या शेवटच्या दिवसांत मी भेटायचे जाऊन अधेमधे. पूर्वी ग्रँटरोडला राहायच्या नंतर वरळीला राहायला आल्या. मी माझ्या वयाच्या विसाव्या वर्षी शोभाताईंकडे शिकायला सुरुवात केली. शोभाताई साधारण वयाची चाळिशी पार केलेल्या. त्यांचा ऐन उमेदीचा, लखलखीत गाण्याचा तो काळ होता. त्यांचा आवाज, गायकी पूर्ण बहरात होती. असं म्हणतात की खरा कलाकार तयार होतो ते हे वय असतं. नुसता गळाच फिरतो असं नव्हे; तर विचारही झाला असतो, गाणं पूर्ण मुरलेलं असतं, परिपक्व असतं. अशी बुद्धिमान गायिका कलाकार म्हणून जवळून पाहता आली, गुरू म्हणून सान्निध्य लाभलं. एका मनस्वी गायिकेचा परीसस्पर्श झाला आणि माझी सांगीतिक वाट झळाळून उठली, हे अहोभाग्यच!

**शब्दांकन : अस्मिता पांडे**


asmitapande@gmail.com

**विशेष आभार : पं. सुधीर नायक, ऋतुजा लाड**


॥ग्रंथाली॥

**मराठी भाषा :**
**लेखन-मार्गदर्शन**

सलील वाघमारे




या पुस्तकात रचनावादी पद्धतीने व्याकरण समजावून देण्याचा प्रयत्न आहे. व्याकरण विद्यार्थ्याला समजले पाहिजे. त्यासाठी ते सोपे झाले पाहिजे, भरपूर उदाहरणांनी ते साजरे झाले पाहिजे, अशा भूमिकेतून हे लेखन झाले आहे, असे मला वाटते.

**- प्रा. रमेश पानसे**

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये**



आदित्य विद्याधर ओक

# आमचे 'पटवर्धन' घराणे

**'नम्रता' हा फारच मोठा गुण गोविंदरावांच्यात होता. ते 'ज्याला मी साथ करतो, तो माझा गुरू' या भावनेने साथ करायला बसत. कोणत्याही गायकाला भारी होऊ शकतील इतकी कमालीची तयारी असूनही, गोविंदराव साथीच्या वादनात कधीही गायकावर कुरघोडी करत नसत. गायकाने 'वाजवा' अशी खूण केल्याशिवाय वाजवतही नसत. नुसते सूर धरून बसत.**

***डॉ. विद्याधर*** ओक हे माझे पिताश्री व गुरू. वैद्यकीय डॉक्टर, औषधशास्त्रतज्ज्ञ, ज्योतिषतज्ज्ञ, लेखक, वक्ते, बॅडमिंटन व बुद्धिबळ-खेळाडू, हार्मोनियम-वादक, २२ श्रुती संशोधक व २२-श्रुती-हार्मोनियमचे पेटंटप्राप्त निर्माणकर्ता. ताजमहालबाबतचे प्रत्यक्ष शाहजहानचे मूळ लिखाण शोधणारे संशोधक, संपूर्ण गीतेचे मराठी छंदबद्ध काव्य निर्माण करणारे कवी, आणि पुनर्जन्मावर संशोधन करणारे माझे बाबा, ही एकच व्यक्ती आहे, यावर कुणाचा विश्वास बसणार नाही.

असे वडील लाभल्यानंतर जे काही व्हायचे, ते झाले. म्हणजे मी हार्मोनियमवादक कधी झालो ते मला कळलेच नाही. त्यांचे गुरुजी पं. गोविंदराव पटवर्धन, माझ्या जन्माच्या आधीपासून आमच्या घरी येऊन त्यांना हार्मोनियम शिकवत असत. मला गोविंदरावांनी माझ्या लहानपणी थोपटून मांडीवर झोपवलेसुद्धा आहे. शिवाय, माझी आईसुद्धा मुंबई विद्यापीठाची 'मॅडम मेनका ट्रॉफी' सर्वप्रथम जिंकलेली कथक नृत्यांगना! मग काय, 'स्वर' आणि 'तालाची' माझी शिकवण आईच्या पोटातच सुरू झाली. वयाच्या ४-५ वर्षांपासून शाळेत हार्मोनियमवादन सुरू झाले, माझ्या १३व्या वर्षी बाबा त्यांच्या औषध-कंपनीच्या दौऱ्यावर अचानक गेल्यामुळे, प्रत्यक्ष गोविंदरावांना त्यांच्याच सांगण्यावरून त्यांच्या मैफिलीत केलेली हार्मोनियम संगत, आणि मग त्यांच्याकडून हार्मोनियम शिकण्याचे महाभाग्यसुद्धा मला फार लहानपणीच लाभले.

गोविंदराव आमच्या सायनच्या घरी, संगीत नाटकात कुठेतरी वाजवून नंतर रात्री १२-१२.३० वाजता येत. मग माझी आई त्यांना जेवण गरम करून देई. मग बाबांची शिकवणी सुरू होत असे. मी जागा असलो, तर मला थोपटून झोपवतसुद्धा, असे आईबाबा सांगतात. मला रात्री पेटी फक्त ऐकू येत असे. कधी गोविंदराव संध्याकाळी आले आणि माझ्या बाबांच्या बरोबर पेटी वाजवू लागले तर मात्र मी पेटीभोवती 'गोल गोल' फिरत असे. एकदा असेच धावताना माझा तोल गेला आणि पेटीच्या वरच्या बाजूला टोकावर माझे डोके आपटले. कपाळावर जखम झाली, त्याची कायमची खूणही अजून राहिली आहे. पुढे बऱ्याच वर्षांनी बाबांचे बालमित्र, केईएम हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजचेही मित्र आणि नंतर भारतात सुप्रसिद्ध झालेले ज्येष्ठ हृदयशल्यविशारद डॉ. अनिल तेंडोलकर आमच्या घरी आले असताना त्यांच्या

महामिश्कील स्वभावास अनुसरून म्हणाले, की बरोबर आहे, त्याच्या (म्हणजे माझ्या) नशिबातच पेटीच होती! प्रत्यक्ष गोविंदरावांच्या पेटीवर माझे नशीबच उजळून निघाले, ते असे!

पुढे बाबांकडून मी, विविध विषयांचा अभ्यास व 'आकलन' कसे करावे हे शिकलो. त्यांच्या 'हार्मोनियम एक रसास्वाद' या १५० कार्यक्रमांत मी त्यांना लहानपणापासूनच संगत केली आहे. साक्षात बाबांचे गुरू गोविंदराव पटवर्धनसुद्धा या कार्यक्रमांत ३ भैरव्या वाजवत असत. काही कार्यक्रमांत तर आमच्या तिघांच्याही हातात पेटी असे, हे मला आठवते आहे. बाबा आणि गोविंदराव यांच्याबरोबर एका स्टेजवर बसून हातात पेटी असणे, हा माझ्यासाठी केवढा भाग्ययोग होता! साहजिकच, ते दोघेही (म्हणजे बाबा व गोविंदराव) कसे बोलतात, वागतात, वाजवतात, वावरतात; याचे माझे शिक्षण कधी झाले, ते मला कळलेच नाही. परंतु गुरूच्या निकट राहिले की सर्व शिकता येते, हे सत्य मला आता कळते! म्हणूनच, प्राचीन काळापासून भारतात, वयाची ८-२० ही १२ वर्षे गुरूच्या घरी राहून शिकणे, ही एक दीर्घ व पवित्र परंपरा राहिली आहे. गुरूची कला, ज्ञान, विचार, मेहनत, आणि आविष्कार संपूर्णपणे शिकण्याचा दुसरा कोणताही मार्ग असू शकत नाही. बाबांचे तर गुरूच आमच्या घरी राहायला येत. त्यामुळे घराचाच छोटा आश्रम झाला होता.

निवृत्त झाल्यानंतर गोविंदराव आमच्या घरी शुक्रवारी येत, म्हणजे बाबा त्यांना दादरहून ऑफिसमधून येताना गाडीने आणत. त्यानंतर ते शुक्रवार-शनिवार-रविवार आमच्याकडेच राहात आणि सोमवारी ऑफिसला जाताना बाबा त्यांना परत दादरच्या त्यांच्या घरी सोडत. बऱ्याच वेळा बाबांना त्यांचे ऑफिसचे काम शनिवार-रविवारीही सोडत नसे. मग गोविंदराव आणि मी, आमची जोडी सुरू होई. एक ६१ आणि दुसरा १६! पण मलासुद्धा काहीही शिकवायची त्यांची तयारी असे. तुकडे, झाले, पदे, जे सांगू ते वाजवून दाखवत. त्यांचा हात तापलेलाच असे. आणि पुढे गोविंदराव गेल्यानंतर अनेक वर्षांनी बाबांनी सांगितले, की तेव्हाच गोविंदराव माझ्याबद्दल त्यांना म्हणाले होते, की 'हा मुलगा असाच वाजवत राहिला, तर चांगली पेटी वाजवेल!' त्यांचा हासुद्धा मला ठाऊक नसलेला एक आशीर्वादच होता.

मी बाबांकडून हार्मोनियमचे 'शास्त्र' आणि गोविंदरावांकडून हार्मोनियमची कला शिकलो, असे म्हटले तरी चालेल. आपण कितीही प्रयत्न केला तरी गुरूला गाठणे सोडाच, त्याच्या जवळपासही पोचू शकत नाही. बाबा नेहमी म्हणतात की माणसाला गुरूच्या ५ टक्के विद्या एका जन्मात हाती येते. म्हणूनच की काय, भारतात मोठमोठ्या कलाकारांच्या ३०-४० पिढ्या कलेची उपासना करत राहिल्या आहेत. सर्वसाधारणपणे, सामान्य पातळीवरची कला सहजसाध्य असली तरी निपुण



पं. गोविंदराव पटवर्धन

कलाकार होणे हे अतिशय कठीण असते. सारखे गुरूच्या विचारात राहावे लागते. नुसते त्याचे वादन ऐकून किंवा अनुकरण करून चालत नाही. एखादा अलंकार सोन्याचा असला, तरी पॉलिश केल्याशिवाय चमकत नाही, त्याप्रमाणे न कंटाळता एकच अलंकार तासन् तास घोटावा लागतो. 'एखाद्या नवीन अलंकाराची किंवा जागेची, तानेची मला मेहनत किती करावी लागेल,' या माझ्या प्रश्नाला, गोविंदरावांनी 'येईपर्यंत वाजव' असे मोघम उत्तर दिले होते. त्यांच्या काही जागा मात्र, कित्येक जन्म झाले तरी येणार नाहीत, असे मला आजही वाटते.

आपले वाद्य हे अशा मोठ्या कलाकाराचा जणू विस्तारित हातच होऊन बसते. एकदा विलायत खान यांची सतार विमानाने येणार होती, ती वेळेत पोचली नव्हती. तेव्हा, त्यांना आयोजकांनी, 'दुसरी सतार वाजवा की' असे म्हटल्यावर खानसाहेब उद्गारले होते, की 'माझी सतार माझ्या हाताचाच एक भाग आहे आणि माझ्या संपूर्ण हाताशिवाय मी कसे वाजवणार?' बहुतेक मोठ्या वादकांना आपले नेहमीचेच वाद्य लागते. मात्र, आमचे गोविंदराव कोणतीही पेटी किंवा ऑर्गन, सारख्याच सफाईने वाजवत असत. एकदा त्यांनी ऑर्गनची एक पट्टी अडकून राहिली असता, त्याच ऑर्गनवर संपूर्ण नाटक वाजवले होते. म्हणजे, वेगवेगळ्या पदांमधील वेगवेगळ्या रागांत तो अडकलेला स्वर येणार नाही, अशा पट्ट्या ते गायकांना देत होते! हा प्रसंग थेट नाटकात निभावणे हे किती कठीण आहे, ते कळण्यास एक जन्म नाटके वाजवत घालावा लागेल.

गुरू पटकन शिकवतो व मोकळा होतो. सुरुवातीस शिष्याला गुरूने वाजवलेले फक्त 'नोटेशन' कळते. मग, ते वादकांना वाजवता किंवा गायकांना गाताही येते. मात्र, तरीही



पंडितजींच्या साथीला बसण्याचा भाग्ययोग

त्या जागेचा योग्य परिणाम होत नाही, हे लक्षात यायला अनेक वर्षे जातात. मग त्यावर चिंतन केले, की त्यातली गोम लक्षात येते. कोणते बोट कुठे बदलायचे, कोणत्या स्वराचे फक्त 'कण' घ्यायचे म्हणजे 'हलका स्पर्श' करायचा आणि हाताचे 'वजन' काय ठेवायचे, हे सर्व कळले तर आणि तेव्हाच गुरूची सफाई आपल्यात पाझरू लागते. लडबडीत किवा बोबडे वाजले, की गोविंदराव सारखे बाबांना बजावत, 'साफ वाजव'. त्यामुळे स्पष्ट, नेमके आणि शब्दाबरहुकूम वाजवणे, हे आमच्या 'पटवर्धन घराण्या'चे वैशिष्ट्य राहिले आहे. नाटकातील पात्रांप्रमाणे गाण्यात शब्द 'प्रवेशतात' व त्यांचे काम करून जातात. म्हणजे, नाटकातील नटाप्रमाणे प्रत्येक शब्दाला गाण्यात त्याची 'एंट्री' व 'एक्झिट' असते. त्याची अचूकता वादनात दिसली पाहिजे. म्हणजे गळा थांबला, की पेटीवरचा हातही थांबला पाहिजे, व गळा सुरू झाला की सुरू. उगीचच स्वरांची गर्दी करून चालत नाही. शिस्तीत, परिमाणित असे वादन झाले पाहिजे, तरच ते सुंदर होते, छापील अक्षरासारखे!

'नम्रता' हा फारच मोठा गुण गोविंदरावांच्यात होता. गोविंदराव 'ज्याला मी साथ करतो, तो माझा गुरू' या भावनेने साथ करायला बसत. कोणत्याही गायकाला भारी होऊ शकतील इतकी कमालीची तयारी असूनही, गोविंदराव साथीच्या वादनात कधीही; अधीरता, आततायीपणा, व आगाऊपणा करत नसत. तसेच, गायकाने 'वाजवा' अशी खूण केल्याशिवाय गाण्यामध्ये स्वतंत्र असे वाजवीतही नसत. नुसते सूर धरून बसत.


त्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यांना विनम्र आदरांजली.

**– आदित्य विद्याधर ओक**

ग्रंथाली

# आरोग्याचे डोही

**डॉ. उज्ज्वला दळवी**




आरोग्याची काळजी घेताना आसपासच्या परिस्थितीचा, सद्यस्थितीत पर्यावरणाचा कसा परिणाम होतो हेही जाणून घेणं गरजेचं असतं. ते समजावून सांगायची उपयुक्त कामगिरी डॉ. उज्ज्वला दळवी यांनी 'आरोग्याचे डोही' या ग्रंथामार्फत केली आहे.

**– डॉ. बाळ फोंडके**

**मूल्य ४५० रुपये । सवलतीत २८० रुपये**



मनोज बोरगावकर

# जाऊ कवितेचिया गावा...

**जगातली पहिली कविता कोणती असेल किती छान सांगितलंय अमृता प्रीतमजींनी – पहिल्यांदा बाळ जन्माला आलं असेल भाषेचाही शोध लागण्याआधी.. त्यावेळी त्या बाळाला जोजवताना, खेळवतांना जे काही शब्दसदृश तिच्या ओठांतून बाहेर पडलं असेल तेच जगातलं पाहिलं गीत किंवा पहिली कविता.**



**कविता** म्हणजे माझ्यासाठी आयुष्याच्या सीरियसली काढलेल्या नोट्स किंवा पावसाच्या दोन थेंबामधले अंतर... जे कधीही पार करता येत नाही.

ज्ञानेश्वर आणि तुकारामांनी कवितेची शेती पिकवली. ब्रजभाषेचा आधार घेऊन सांगतो–

कविता करता दोन है
तुकाराम और ज्ञानेश्वर
कविता खेती ईन लिनी
सीला बीनत मंजूर..।

अर्थात कवितेची सुगी यांनी पिकवली आपण मात्र फक्त मजूर.

कवितासंग्रह प्रकाशित करताना किंवा स्टेजवर कविता सादर करताना नेहमी असं वाटतं राहतं.. 'साधना को सिद्धी कहकर कैसे बाँटू?' आपण अजून तर कवितेची बाराखडी गिरवतो आहेत.... आणि डायरेक्ट स्वतःला कवी म्हणून घेणं कवितेची किती तौहीन...!

खूप मोठा पैस असतो कवितेचा... तो तेवढ्या मोजक्या शब्दांत मांडणं खूप अवघड करामत असते. लय कवितेचा आत्मा... मुक्तछंदातल्या कवितेलाही लयीचा साज असला की ती किती देखणी दिसते.

कधी अनुभव तर कधी स्वानुभव यांच्या आत आत शिरता आलं की कवितेच्या काही ओळी पदरात पडत असाव्यात. गंमत अशी की कविता कोणत्याच व्याख्येत बसत नाही... ज्याची–त्याची आपली आपली समज आणि उमज!

ज्ञानदेवमाऊलीनीं किती छान म्हटलंय
झाडाशी साजणे। चाळावे गा।
उष्ण पांघुरावे। शीत वेढावे।
वृष्टीच्या असावे घराआतु।

अनुभवांचे अस्सलपण कवितेला आधिक तोलूनमापून साक्षात करत राहतं. अर्थात हे माझ्या माझ्या इवल्याशा अकलनांचे ठोकताळे.

कवितेनं समृद्ध केलं. उमेद दिली. सोझार व्हायव्योची कधीतरी वाचलेली एक कविता तर इतकी मनात रुतून बसली आहे –

प्रेत आपलं मरतच राहिलं
एक माणूस त्याच्याजवळ गेला
म्हणाला, अरे बाबा, जगण्यासारखं



खूप काही आहे - तरी प्रेत आपलं
मरतच राहिलं
दोन माणसं आली त्यांनी विनंती केली, बाबा रे,
जगण्यासारखं खूप आहे
तरी प्रेत आपल मरतच राहिलं
शहरातली सगळी माणसं आली
त्यांनीही विनंती केली
अरे बाबा, जगण्यासारखं खूप आहे.
मरू नकोस तरीही प्रेत
आपलं मरतच राहिलं -
शेवटी जगातली सगळी माणसं आली
त्यांनी विनंती केली, की बाबा रे,
मरू नकोस जगण्यासारखं खूप आहे -
ते माणूस ताडकन उठले
ज्या पहिल्या माणसानं
त्याला ही विनंती केली होती
त्याला मिठी मारली आणि
जगण्यासाठी निघून गेले..!

कवितेच्या नेमक्या ओळी अशाच असतीलही असा माझा दावा नाही, पण आशय मात्र हाच होता. या आशयानं भारावून टाकलं. चांगुलपणाची सुरुवात महत्त्वाची. मनात मळभ दाटून आलं की नकळत अशा चांगल्या माणसांचा शोध सुरू होतो.. आणि ती भेटतातदेखील अन् आलेलं मळभ कोसो दूर निघून जातं.

आजच्या काळात तर ही कविता तंतोतंत लागू पडणारी. कोणत्याही चांगुलपणाची सुरुवात करणारी व्यक्ती मोलाची, लाखमोलाची, ती प्राणपणानं जपली पाहिजे!

तरुणपणीचा एक काळ असा होता की हिंदी गझल आणि शेरोशायरीनं अगदी भारावून टाकलेलं. रात्री अंधार ओला करताना ऐकलेले गुलाम अली, चित्रा-जगजित यांच्या गझला ऐकताना जणू असं वाटायचं की प्रत्येक गझल आपल्यावरच बेतलेली आहे की काय जणू!

वय वाढतं गेलं, जगण्याच्या गदारोळात वाचन कमी होत गेलं, थोडं निर्ढावलेपण-निगरगट्टपण आलं... तरीही अस्सल कवितेच्या ओळी वाचण्या-ऐकण्यात आल्या की आजही आतले झरे फुटायला लागतात. माठ पाझरावा तसं आत काहीतरी पाझरत राहतं. कबीर असतील, कुसुमाग्रज असतील, नारायण सुर्वे असतील, ग्रेस असतील, अमृता प्रीतम असेल, पाकिस्तानी शायरा सारा शगुफ्ता असेल, मौत से पचपन मिनट पहिले लिहिणारा सायमी धुसवा असेल. यांच्या कितीतरी ओळी थेट काळजात जाऊन बसलेल्या.

याबरहुकूम काही समज मनात दृढ होत गेले, तुम्ही आतूनबाहेरून स्वच्छ होत गेलात की अजरामर कलाकृतींचं दान पदरात पडायच्या शक्यता निर्माण होत राहतात. द्वेषानं मळलेलं कलावंतांच्या हाती अस्सल कलाकृतीचं दान पडेलच असं

नाही! अर्थात हे माझे माझ्यापुरते भाबडे समज!

कवितेनं आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ संगत केली कितीतरी वेळ आणि कितीतरी वेळा.

माझ्यासाठी तर अनेक कवींनी उभारलेलं कवितेचे गाव आहे... भले हे त्यांनी उभं केलेलं गावं असलं तरी प्रत्येक वाचकाला तिथं लीलया प्रवेश आहे... अट एकच... मनाची कवाडं उघडी ठेवा अन् तर्काची निकषं थोडी बाजूला सारून भावनेच्या निकषांवर स्वार व्हा!

पाकिस्तानी शायरा सारा शगुफ्ताच्या आयुष्यातला एक वाकया सांगायचा मोह होतो. तिथल्या व्यवस्थेनं तिच्या लकिर से हटकर जगण्याला लगाम लावले. ती अमृता प्रीतमची चाहती होती... आणि अपघातात अमृताचा हात फ्रॅक्चर झाला. साराला हे कळालं. तिनं उलट टपाली अमृताला लिहिलं, अमृताबाजी जब तक आपका हात ठीक नहीं होगा, लिखने के काबिल नहीं होगा... तब तक मैं भी कलम हात मे नहीं लूंगी।

काय जगण्याची कद्र आहे... व्यक्त होण्याचा एकच मार्ग तिच्याकडे होता.... तरीही एका कवीवरील प्रेमापोटी तिनं तो मार्गही बंद केला!

आपोआपच कवीविषयी कवितेविषयीचा आदर दुणावत गेला. आणि लहानपणी मनात बांधलं गेलेलं कवितेचं घर अधिकाधिक मजबूत होत गेलं.

आजही मन उद्विग्न झालं किंवा काही कारणानं पलीकडची अस्वस्था दाटून आली की पुस्तकाच्या कपाटातल्या एखाद्या कवितासंग्रहाकडे हात ओढले जातात. त्या कविता मरहमचं काम करतात... आणि पुन्हा ताजंतवानं होऊन जगण्याला तहेदिल सामोरं जाण्याचं आत्मबळ मिळत राहातं. कोणालाही कोणाचे आईवडील ता उम्र पुरत नसतात... अशा वेळी कविता आणि तिची कूस दाटून आलेलं अनाथपण सनाथ करत राहते. एवढेच.

जगातली पहिली कविता कोणती असेल किती छान सांगितलंय अमृता प्रीतमजींनी –

पहिल्यांदा बाळ जन्माला आलं असेल भाषेचाही शोध लागण्याआधी.. त्यावेळी त्या बाळाला जोजवताना, खेळवतांना जे काही शब्दसदृश तिच्या ओठांतून बाहेर पडलं असेल तेच जगातलं पाहिलं गीत किंवा पहिली कविता.

किती ग्रेट आहे ना हे... आसमंतात विरून गेलेले ते बोल पुन्हा सापडतील?

सापडले तर ती शब्दांपलीकडली अजरामर कविताच असेल!

आता कवीचं नाव नेमकं आठवत नाही, पण कविता आठवते –

मेरे हाथ में बांसुरी
और कांधें पे कंबल
मैं सोया भी नहीं
और कही गया भी नहीं
फिर मेरे काधें पे लाश और
हाथ में बंदुक कोन रख गया है।

इतक्या मोजक्या शब्दांत जगण्यातल वास्तव फक्त आणि फक्त कवीच मांडू शकतो!

कळत्या वयापासून कवितेचं बोटं धरून हा प्रवास सुरू आहे. तिनं जोजवलं, तर कधी कवेत घेतलं, कधी समजावलं पण साथ मात्र सोडली नाही. एका लेखकानं म्हटले आहे की झाडांसोबत चालताना मला अधिकच उंच झाल्यागत वाटतं राहतं, त्यागतच कवितेसोबत चालताना अधिकच समृद्ध झाल्यागत वाटतं राहतं!


**– मनोज बोरगावकर**

korakagadnilishai@gmail.com

॥ग्रंथाली॥

**नदी वाहते आहे**

**मधुरा इंदापवार**



या कथांची मांडणी करताना मधुरा थेट अनभुवाच्या आतल्या गाभ्यालाच जाऊन भिडते. त्यामुळे तिची कथा आपल्या मनात वरवर रेंगाळत न राहता, आतवर खोल रूतून बसते. तिच्या वाचनाचा संस्कार दीर्घकाळ मनावर कायम असतो.

**– डॉ. रवींद्र शोभणे**

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**


परिवर्तन
• प्रभाकर वाईरकर.
काळ झटपट बदलतोय. नात्यांमधेही आमुलाग्र बदल होत आहेत. नात्यांमधील गोडवा, ओढ, प्रेम, माया, परंपरा, सद्भावना इत्यादींची जागा पैसा, स्वार्थ, व्यवहार, दांभिकता, एकलकोंडेपणा इत्यादींनी व्यापली आहे. त्याचे मर्म प्रभाकर वाईरकर सादर करीत आहेत.
शिष्य!
गुरूजी...
गाळगुच्चा, तर घातला...
माया!
अगं, 'त्याच' विमान नाही ते, घार आहे ती...


रिलॅक्स...
देवमाणूस!
500


सौजन्य!


चार वाजता
काम बंद कर...
Prabhakar Waikar


ज्ञानदान!
Prabhakar Waikar


चलो दिलदार चलो, चाँद के पार चलो
विश्वास
Prabhakar Waikar-24


...एक दुँजे के लिये।
Prabhakar Waikar-24



शिवकुमार आडे

# अंगण

**गाव फक्त गाव राहत नाही, तर ते विश्व बनते तेव्हा माणूस निर्माण होतो. हे माणुसकीचे नाते या गावाने शिकवले. ज्ञानोबांचे अभंग गावाला नव्या प्रकाशांनी जोडत जायचे. तुकोबांचे अभंग वृक्षवल्लीत पंढरीच्या पांडुरंगाला आर्जव करून माणुसकीचे दर्शन घडवायचे. एकमेकांशी नाते कसे जोडून ठेवता येईल, सामाजिक बांधिलकी कशी सांभाळता येईल या वयात आम्ही शिकलो होतो.**




***काल*** पावसाने थैमान घातले होते. मुंबईचा पाऊस हाहाकार माजून गेला होता. लोकल बंद झाल्या होत्या. टीव्हीवरच्या बातम्या मनाची घालमेल करत होत्या. पावसात ऑफिसला जायचे की नाही, याबद्दल मन सातत्याने विचार करत होते. काही महत्त्वाच्या मीटिंगबाबत काल मंत्रालयातून माहिती आली होती. नुकतेच लोकसभेचे निकाल लागून केंद्रात सरकार स्थापन झाले आणि महाराष्ट्र सरकारच्या वेगवेगळ्या विषयावर मीटिंग आयोजित केली होती. त्यामुळे मंत्रालयामध्ये जाणे महत्त्वाचे होते. मीटिंग बाबतच्या नोट्स मी तयार केल्या होत्या, लगबगीने मी ड्रायवरकडे बॅग देऊन निघालो होतो. तितक्यातच मोबाइलवर माझ्या भावाचा फोन आला बापू, मुंबईत पाऊस आहे काळजी घे. आमच्याकडे पावसाचा थेंब नाही. जमिनीला भेगा पडल्या आहेत आणि कास्तकार हवालदिल झाला आहे. तुझ्या मुंबईचा पाऊस पाठवून दे. गाडी रोडवर धावत पुढे जात होती. उंच उंच इमारती पावसामुळे धुऊन निघाल्या होत्या. डांबरी रस्ते लखलखीत झाले होते. गाडी सिग्नलमुळे मध्ये मध्ये थांबून पुढे जात होती आणि मी गावच्या आठवणीने ओलाचिंब होत होतो.

विदर्भातील उन्हाळ्यातील लाही लाही तापणारे उष्मघाताचे वारे मनात पिंगा घालत काळजाला भेगा पाडत होते. पाऊस नाही म्हटल्यावर गुरांचे काय होईल, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी होईल, शेतात पीक घेता येणार नाही, त्यामुळे गावातील शेतकरी लिंबाच्या झाडाखाली विचार करत असेल, पावसाने मुंबईत थैमान घालून काय फायदा आहे, दात आहेत तर चणे नाहीत, चणे आहेत तर दात नाहीत ही परिस्थिती... त्यामुळे काळजाच्या कोपऱ्यात अनेक प्रश्नांचे काहूर माजले होते. मुंबईत येऊन तीस वर्षांचा काळ कधी सरकला कळले नाही. नोकरीमुळे झालेल्या बदल्या, विविध शहरांमध्ये झालेले स्थलांतर, यामुळे आयुष्याचे क्षण कधी निसटून गेले कळले नाही. आयुष्याच्या वळणावर मागे वळून पाहताना जीवनाचा पट उभा राहतो. ज्या गावच्या वेशी ओलांडून पोटाची खळगी भरण्यासाठी मी या महाकाय शहरात दाखल झालो होतो, त्या गावाने मला लहानाचे मोठे केले. ज्या मातीत मी भरपूर खेळलो, ज्या ओढ्यामध्ये मी पोहणे शिकलो, ज्या जंगलामध्ये मी भटकंती केली, असे हे माझे गाव मच्छिंद्रा! मी या गावात जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये

शिकलो ती माझी शाळा. झाडे पाटलाच्या गोठ्यात होती. त्या वेळचे आदरणीय देवराव भोंगळेसर आमचे शिक्षक होते. त्यांचा स्वभाव शांत व विनम्र होता. परंतु शिक्षणाच्या बाबतीत तेवढेच कडक होते. ज्या शाळेत आम्ही शिकायचो त्या गोठ्यात रात्रीला गुरे बांधली जात आणि त्यात दिवसाला आम्ही पोरंपोरी शिकण्यासाठी बांधले जायचो. भोंगळेसर आम्हाला मोठ्या आपुलकीने शिकवत. मराठीच्या कविता, पाढे शिकवत. त्यांच्या शिकवण्यात फार आपुलकी होती. विद्यार्थी घडावा आणि गावातील मुलेमुली शिकून मोठी व्हावीत, ही त्या मागची भूमिका असायची. गावामध्ये जातिभेदाचे वर्चस्व होते. परंतु भोंगळेसरांच्या घरी जातिभेद दिसून आला नाही. त्यांची मुले आमच्यासोबत खेळायची, डबापण खायची. सरांनी शाळेच्या समोर व्हॉलीबॉलचे मैदान तयार करवून जाळी बांधली होती. तिथे मुले व्हॉलिबॉल खेळायची. शाळा सुटल्यावर मुलांवर चांगले संस्कार जडले पाहिजे, म्हणून खो-खो, कबड्डी, लंगडी खेळ सुरू करून शाळेत शैक्षणिक वातावरण निर्माण केले होते. गरिबीमुळे अनेक विद्यार्थी शाळेत येत नव्हते. पुस्तकेवह्या घेण्याची ऐपत त्यांच्याकडे नव्हती. परंतु सरांनी त्यासाठी कधी त्यांना शिक्षा दिली नाही. कधी कधी तर सरांनी आपल्या पगारातून वह्या किंवा पुस्तके घेऊन विद्यार्थ्याला दिले. त्यांनी आपल्या जगण्याचा एक हिस्सा खऱ्या अर्थाने शिक्षक कसा असावा, असा आदर्श घडवून दिला होता. आधुनिक काळात शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. त्यामुळे असे शिक्षक आजकाल भेटतात कुठे? आम्ही ज्या पंचक्रोशीत वाढलो त्या वेळची परिस्थिती सर्वसामान्य होती. गावामध्ये एकोपा होता. गाव एकमेकांच्या अडचणीला जरूर धावून जात नसले तरी, एकमेकांला आधार देत असे, कारण सर्वांची परिस्थिती सारखी होती. पानावर आणणे आणि हातावर खाणे याशिवाय पर्याय नव्हता. पन्नास वर्षांपूर्वी पाऊस झडी लागून सातत्याने पडायचा. त्यामुळे बऱ्याच घरी चूल पेटत नसे. ज्वारीच्या पिठाची आंबील रात्री प्यायची आणि रात्रीचा गुजारा करून आपले दुःख चुलीजवळ सांगत एकमेकांच्या घरी बसायचे. पाऊस सुरू झाल्यानंतर गावातील शेतकऱ्याचा हंगाम सुरू व्हायचा, त्यामुळे शेतीला कपाशीचे टोबण करण्यासाठी गावातील मुलेमुली शेतावर जायची. त्याचा मोबदला म्हणून २-३ रुपये मिळायचे. त्या बदल्यात आम्ही वह्या घेत होतो. घरी त्यामुळे मदत व्हायची. आमचा वेळ त्या चांगल्या कामासाठी जायचा. त्यामुळे मुलेमुली यांची मैत्री तयार व्हायची. गावातील एकोपा टिकायचा.

भारताच्या संस्कृतीनुसार महाराष्ट्रातही अनेक पारंपरिक उत्सव पावसाळ्यापासून सुरू होतात. त्यामध्ये वडसावित्री पौर्णिमा हा उत्सव प्रामुख्याने स्त्रिया करतात. वडसावित्रीच्या कार्यक्रमासाठी वडाच्या झाडाखाली गावातील बायका जमायच्या आणि आपल्या आयुष्यातील जोडीदार सदैव सुखी राहावा आणि सदैव हाच जोडीदार मिळावा अशी प्रार्थना करायच्या. आमच्याही गावात शाळेसमोर चिंचेचे आणि वडाचे झाड खूप वर्षांपासून उभे होते. त्या दोन्ही झाडांनी उन्हाळे, पावसाळे अंगावर घेऊन गावातील अनेक माणसांना आश्रय दिला होता. या झाडाखाली किती लोकांच्या कहाण्या दडल्या असतील. त्या झाडांनी कोणाला काय दिले नाही, असे झाले नाही. हिवाळा, उन्हाळ्यात आमची शाळा याच वडाच्या झाडाखाली भरायची. चिंचेच्या झाडाखाली मोहोर फुलायचा त्या वेळेस तोंडाला पाणी सुटायचे, त्या चिंचेच्या मोहोरची चटणी खाऊन आम्ही मुलांनी गोपाळकाल्याचा उत्सव केला असेल, परंतु आज ते चिंचेचे झाड उभे नाही. त्या चिंचेच्या झाडाचा मृत्यू वीस वर्षांपूर्वी झाला असावा. झाडाचा मृत्यू होतो काय, असे म्हणाल. परंतु झाडाला संवेदना असतात. झाडावर प्रेम करा, त्याच्यासोबत रोज बोला झाड बोलते. कारण या झाडाखाली आम्ही आमच्या बालपणापासून तारुण्यात प्रवेश केला होता.

श्रावण महिन्यात गावात सायंकाळला प्रभातफेरी निघायची. त्या वेळेस सखुबाई कुमरे, महादेव कुमरे, सूर्यभान कुमरे, हरिभाऊ कुमरे, नानाजी ताजणे, मोहितकर, लांबट, मोहितकर, भुजाडे, चरणदास मेश्राम, सरस्वती आडे, श्रीधर पेंदोर, लहुजी मेश्राम, कमलाकर आत्रम, सोनटक्के, तोडसाम आदी अन्य गावांतील भजनी मंडळी सहभागी व्हायची. ती प्रभातफेरी मारोतीच्या मंदिराजवळ येऊन थांबायची. ज्ञानेश्वरांचे, तुकारामांचे अभंग एक सुरात म्हणायची. गावातील शांतता या अभंगामुळे बांधली जायची. तुकोबांच्या अभंगाची सांगड मानवी देहाला पुजून नव्या जगाला जोडत होती. हे या गावात शिकता आले. गाव फक्त गाव राहत नाही, तर ते विश्व बनते तेव्हा माणूस निर्माण होतो. हे माणुसकीचे नाते या गावाने शिकवले. ज्ञानोबांचे अभंग गावाला नव्या प्रकाशांनी जोडले जायचे. तुकोबांचे अभंग वृक्षवल्लीत पंढरीच्या पांडुरंगाला आर्जव करून माणुसकीचे दर्शन घडवायचे. त्यामुळे बालमनावर चांगले संस्कार व्हायचे. वाईट कामाला आम्ही धजावत नव्हतो. तो आदरयुक्त धाक आम्हाला सजग करायचा. आनंदाचे डोही आनंद तरंग आम्ही गावातून अनुभवले. विश्वातील बांधिलकी आम्ही या गावातून शिकलो होतो. एकमेकांशी नाते कसे जोडून ठेवता येईल, सामाजिक बांधिलकी कशी सांभाळता येईल या वयात आम्ही शिकलो होतो. गावामध्ये रामायण, महाभारत वाचले जात असे. त्यामुळे चांगल्या आणि वाईट गोष्टींचा विचार करण्याची प्रवृत्ती मनामध्ये जडली होती. तसाच महत्त्वाचा उत्सव खेड्यामधील



बैलपोळ्याचा आहे. शेतकरी आपल्या शेतात बैलांना जुंपून वर्षभर कामे करून घेत असतो. परंतु आपल्यालाही या बैलांना एक दिवस सुखाचे क्षण द्यायचे आहेत. हे शेतकरी विसरत नसतो. म्हणून हा बैलपोळा ग्रामीण भागात फार मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. सकाळला बैलाला अंघोळ घालून त्याच्या शिंगाला रंगाने रंगवून व त्याला सजवून संध्याकाळच्या वेळी बैलाला मैदानात आणले जात असे आणि शेतकरी पोवाडा म्हणायचे. घरात पुरणपोळी आणि बैलासाठी विशिष्ट पदार्थ बनवून त्यांचे खांदे शेकत असे. मग पोळा पूर्ण झाल्यानंतर त्याला घरी आणले जात असे. बैलाची पूजा करून त्याला पुरणपोळी व विशिष्ट पदार्थ खाऊ घालत असत. शेतकरी या दिवशी बैलाला कुठेही कामाला लावत नाही. प्राण्याबद्दल माणुसकीचा विचार माणसाच्या जगण्यात असावा हे सांगणारा हा उत्सव ग्रामीण जीवनात पाहायला भेटतो.

दसरा, दिवाळी हे उत्सव मोठ्या प्रमाणात भारतभर साजरे केले जातात. दसरा, दिवाळीची चाहूल नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये लागायची. विदर्भात या महिन्यात थंडी चालू व्हायची. शेतकरी लोक लवकर उठत असे, अंघोळीनंतर न्याहारी करून बैलांना घेऊन शेतात जायचे. बैल बांधावर किंवा गोठ्यात बांधून शेतकरी न्याहारी करण्यासाठी घरी यायचा आणि नंतर दहा वाजता शेतामध्ये दिवसभर राबायचा. ज्वारीची कणसे डौलदारपणे शेतात डोलायची. हा हंगाम ज्वारीचा हुरडा खाण्यासाठी फार चांगला असतो. त्यामुळे शेतकरी शेतामध्ये हुरड्याची पार्टी करायचे. आमच्याकडे शेत नव्हते. परंतु शेजारी बापुराव कुमरे हे आम्हाला शेतावर घेऊन जायचे. वांग्याचे भरीत, हिरव्या मिरचीचा ठेचा, हुरड्यासोबत खायला द्यायचे. ही अप्रतिम चव अजूनही जिभेवर आहे. हा सलोखा आदरभाव ग्रामीण जीवनात अजूनही जिवंत आहे. गरिबांच्या घरी रात्री उपाशीपोटी कोणीही राहू नये याचे भान ग्रामीण जीवनात ठेवले जाते. खऱ्या अर्थाने माणूसपण ग्रामीण जीवनात पाहायला मिळते. दिवाळी सण ग्रामीण भागात मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. या महिन्यात शाळेमध्ये विविध स्पर्धा, डान्स, नाटक यासारखे उपक्रम राबवण्यात येत असतात. आमच्या बालवयात या कलागुणांना चालना देण्यात फार मोठा वाटा आहे. दिवाळीमध्ये गाव स्वच्छ केले जात असे. गावातील तरुण मुले, मुली नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी असायची. दिवाळीमुळे ते गावात यायचे, गाव आनंदाच्या उधाणाने भरून जायचे. घराघरात फराळ तयार व्हायचा. लाडू, चकल्या, शेव

याचा जिकडेतिकडे सुगंध पसरायचा आणि आनंदाचा सोहळा व्हायचा. एकमेकांच्या घरी फराळासाठी बोलावले जात असे आणि तासभर बसून एकमेकांच्या सुख, दु:खाबद्दल विचारायचे, लग्नाबद्दल विचारायचे, बहीण भावाबद्दल विचारायचे. जणू गाव एक घर होऊन जायचे. हा प्रीतीचा उत्सव माणसाच्या धर्माचा सोहळा साजरा करत असे. दिवाळी संपल्यानंतर गावातील नोकरी करणारी मुलेमुली बाहेर गावी निघाले असता गाव उदास होऊन एकमेकांना निरोप देत असे. ही एकमेकाबद्दलची आस्था, आपुलकी शब्दांत सांगता येणार नाही. कधी कधी मागच्या आठवणी डोळ्यांत दाटल्या की डोळे पाणावतात.

गाव १९९०नंतर अधिक झपाट्याने बदलले आहे. भारतामध्ये मुक्त अर्थव्यवस्थेने पदार्पण केले आणि आपण सर्वस्वी मानवी जीवनाची सांगड सोडून दिली. जिकडेतिकडे बाजारीकरण झाले. गावाकडील लोक नोकरीच्या शोधात शहराकडे ओढले, गाव दिवसेंदिवस रिकामे होऊ लागले. महाकाय शहरात गावातील लोंढे सरसावू लागल्यामुळे महाकाय शहर फुगत चालले. बकाल वस्त्या महाकाय शहरात निर्माण झाल्या. सांडपाण्याच्या गटारांना लागून झोपड्या वसू लागल्या. त्यामुळे माणसाचे माणूसपण इथेच हरवले, एकमेकांबद्दल आदरभाव, आस्था संपली आहे. गावातील उत्सव शहरात होत नाहीत. कोणी कोणाला आस्थेने विचारत नाही. शहरात एकमेकांच्या घरी कोणी जात नाही. कोंबड्याला एखाद्या खुराड्यामध्ये बंद करावे, तसे शहरातील माणसाचे जीवन झाले आहे. कोणाचे जगणे आणि कोणाचे मरणे हेच कळत नाही. उंच उंच इमारतीतील आकाशातील चांदणे रात्रीच्या कृत्रिम प्रकाशात नाहीसे झाले आहे. जिकडेतिकडे रस्त्याच्या कडेला रात्री माणसे कृमी कीटकासारखे फूटपाथवर झोपण्यासाठी जागा शोधतात. रात्रीच्या झगमग प्रकाशात ओठाला लाली लावून मुली चौकात उभ्या आहेत. रात्रीच्या अंधेरी नगरीत सुंदर मुलींचे देह विकले जातात. माणसासाठी आता मेट्रो सिटीने जागा ठेवली कुठे? माणसाचे माणूसपण आता वेशीवर टांगलेले आहे. खोट्या गप्पा, खोटे आश्वासन, खोटे जगणे या मस्तावलेल्या महाकाय शहरात विषवेली घेऊन वाढत आहेत. माणसासाठी माणसाला वेळ नाही, त्यामुळे सुखदु:खाच्या गोष्टी बसून कोणाला सांगता येत नाहीत. ग्रामीण जीवनात विविध उत्सवाच्या निमित्ताने अंगणात बैठक होते, आस्थेने विचारले जाते, एकमेकांना समजून घेण्यासाठी विचारांची देवाणघेवाण होत असते. वाटसरू दोन घटका बसत असे. गूळपाणी देऊन त्याच्याशी संवाद होत असे.

असे शहरात दिसत नाही. अंगणात चिंचेचे, पेरूचे, बोराचे झाड होते आणि त्या झाडावर उडत येणारे सायंकाळचे पक्षी किलबिलाट करत जगण्याला आनंद देत. शहरात मोबाइलचे नेटवर्क लागले आणि पक्षी नाहीसे झाले. अंगणात बसून आनंदाची मैफल सजायची अणि एकमेकांबद्दल प्रेमाने बोलायची ती मैफल आता राहिली नाही. त्यामुळे नात्यामध्ये दुरावे निर्माण झाले आहे. ही अवस्था सामाजिक स्तरावर निर्माण झाली आहे. मी माझे गावातील घर शोधतो, परंतु ते कुठल्या काँक्रीटच्या जगात गडप झाले कळले नाही.


गाडीच्या बाहेर मी डोकावत होतो. मरीन ड्राइव्हला पोहोचलो होतो. सागराच्या लाटा एकमेकांवर आदळत जल्लोष करत होत्या आणि पाऊस समुद्राच्या किनारी येऊन थांबला होता. मी मंत्रालयाच्या दिशेने ओढलो होतो. गावाकडील आठवणीचा गाज ऐकू येत होता. अनेक प्रश्नाचे मोहोळ रुंजी घालत आणि मी मंत्रालयाच्या पायऱ्या चढत होतो. त्या अंगणातल्या मैफलींची आठवण करत.

**– शिवकुमार आडे**
shiv67612kumar@gmail.com

ग्रंथाली

# बे दुणे पाच!

**सारिका कुलकर्णी**




मराठी साहित्यात सकस विनोदी लिहिणाऱ्या लेखिकांची अक्षरश: वानवाच आहे. या पार्श्वभूमीवर सारिका कुलकर्णी यांच्या दर्जेदार, निर्विष विनोदी लेखनाचा हा संग्रह उल्लेखनीय आहे.

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

प्रिय रसिक वाचकहो,

'ग्रंथाली'चे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्याची सुरुवात ४ एप्रिल २०२४ रोजी 'गंधर्वांचे देणे' पुस्तक प्रकाशित करून झाली. या वर्षी ऑक्टोबर ते ३० मार्च २०२५ या काळात ग्रंथाली विविध उपक्रम राबवणार आहे.

याही वर्षी २४ ऑक्टोबर २०२४ रोजी, कालिदास सभागृह, मुलुंड येथे बालकुमार वाचकांसाठी ग्रंथालीने दिवाळी संच योजना व विशेष दिवाळीसंध्याचा कार्यक्रम आखला. तर २६ ऑक्टोबर २०२४ रोजी वाचकांसाठी दिवाळी संच योजना व 'नृत्यसुरांची मैफल' दिवाळीसंध्येचा कार्यक्रम दीनानाथ नाट्यगृह, पार्ले येथे आयोजित केला आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्रातील २५ बालवाचनालये, २५ मोठ्यांची वाचनालये यांना २५ अंक व २५ पुस्तकांचे संच देणगीदार शोधून भेट दिले.

**यंदाचा वाचकदिन हा सुवर्णमहोत्सवी वाचकदिन आहे. हा वाचकदिन २३ ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे संकुल, तीन हात नाका, ठाणे (पश्चिम) येथे होणार आहे. हा वाचकदिन 'ग्रंथाली', 'ठाणे ग्रंथसंग्रहालय', 'विराट सामाजिक आणि सांस्कृतिक मंच' यांच्या संयुक्त विद्यमाने, ठाणे व मुलुंड येथील २० संस्थांच्या सहकार्याने होणार आहे. कार्यक्रमाचे स्वरूप ६ विविध स्वरूपांची प्रदर्शने / वर्कशॉप / ग्रंथप्रदर्शन / शाळा-महाविद्यालये-वाचनालये व वाचक यांच्यासाठी स्पर्धा/ परिसंवाद / सांगीतिक मैफल / पुस्तकप्रकाशन अशा स्वरूपाचे असणार आहे.**

राजीव श्रीखंडे सादर करत असलेल्या 'ग्लोबल साहित्यसफर', संजीवनी खेर सादर करत असलेल्या 'ग्लोकल लेखिका' या यूट्यूब कार्यक्रमांना धरून जानेवारी २०२५मध्ये दिवसभराचा परदेशी-देशी लेखकांशी संवाद-परिसंवाद-मुलाखत अशा स्वरूपाचा कार्यक्रम करणार आहोत.

फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्राबाहेरील इंदूर, बडोदा, दिल्ली, बेळगाव, हैदराबाद या ठिकाणी 'सुवर्णग्रंथाली' या नावे दोन दिवसांचा उपक्रम राबवणार आहोत.

४ एप्रिल २०२५ रोजी 'गंधर्वांचे देणे' या पुस्तकाच्या निमित्ताने पुण्यात कार्यक्रम करण्याचे आखत आहोत.

ग्रंथालीने 'शब्द रुची' मासिकाचा छापील अंक १ एप्रिल २०२५ पासून बंद करत आहोत असे निवेदन यापूर्वी प्रसिद्ध केले. ग्रंथाली १ एप्रिल २०२५ ते ३० मार्च २०२७ ही दोन वर्षे दर तीन महिन्यांनी ई-अंक प्रसिद्ध करेल. तो ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात असेल. जो सर्वांसाठी मोफत असेल. फक्त दिवाळी अंक छापील स्वरूपात प्रसिद्ध होईल. याचे संपादन अरुण जोशी करणार आहेत.

सुवर्ण ग्रंथाली

साहित्य-संस्कृतिकारणाची पन्नास वर्षे

ग्रंथाली गेली दीड वर्षे 'विज्ञानधारा' हे मासिक प्रसिद्ध करते. हा अंक मार्च २०२७पर्यंत प्रसिद्ध होईल. याचे संपादन शरद काळे करतात. याचाच एक भाग म्हणून शरद काळे शाळा-शाळांमध्ये जाऊन 'विज्ञानधारा'चे कार्यक्रमही करतात. या ऑक्टोबरपर्यंत १०० शाळांमध्ये कार्यक्रम झाले आहेत. मार्च २०२७पर्यंत ३०० शाळांमध्ये हे कार्यक्रम करणार आहोत. २७ फेब्रुवारी रोजी गेली दोन वर्षे ग्रंथाली शाळांसाठी मुलांमध्ये विज्ञान-जाणीव रुजावी म्हणून 'विज्ञान एकांकिका स्पर्धा' घेत असते. या वर्षी व पुढील दोन वर्षे ३०० शाळांचा सहभाग घेऊन महाराष्ट्रातील १० सेंटरमध्ये स्पर्धा घेणार आहोत. अंतिम फेरी विज्ञानदिनी होईल.

'विज्ञानगप्पा'चे कार्यक्रम सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते सादर करतात. याचेही १०० कार्यक्रम २०२७ पर्यंत करणार आहोत. दरवर्षी २५ डिसेंबरला 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने' हे पुस्तक प्रकाशित केले जातील. पुढील वर्षीपासून हे पुस्तक ई स्वरूपात प्रसिद्ध होईल व त्याला व्हिज्युअलची जोड दिली जाईल.

ग्रंथालीची दोन (ग्रंथाली वॉच व ग्रंथाली प्रतिभांगण) यूट्यूब चॅनेल असून त्यावरून आतापर्यंत १२ विविध कार्यक्रम राबवले आहेत. एकूण ५०० व्हिडिओ या दोन्ही चॅनलवर उपलब्ध आहेत. नवीन कार्यक्रम आखून ही संख्या ३० मार्च २०२७ पर्यंत १००० पर्यंत नेणार आहोत.

ग्रंथालीकडे ३० मार्च २०२५ पर्यंत प्रसिद्ध होणारी ६० हस्तलिखिते आहेत. ती टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध होतील. ग्रंथाली ३० मार्च २०२५ पर्यंत कुठलेही हस्तलिखित स्वीकारणार नाही. मुद्रण सुविधामधून पुस्तक प्रसिद्ध करून हवे असल्यास ती पुस्तके जानेवारी २०२५ ते ३० मार्च २०२५ या काळात करून देण्यात येतील.

**१ एप्रिल २०२५ पासून ३० मार्च २०२७ पर्यंत दरवर्षी 'ग्रंथाली' म्हणून २५ व 'मुद्रण सुविधा' म्हणून २५ अशी ५० पुस्तके प्रसिद्ध केली जातील. यासंदर्भात आपण अरुण जोशी (८९०८२४५७९७) यांच्याशी १ एप्रिल २०२५ नंतर संपर्क साधावा. स्वीकारलेली हस्तलिखिते जून २०२५ नंतर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध होतील. ग्रंथाली पुस्तकप्रकाशन कार्यक्रमाची कुठलीही जबाबदारी घेणार नाही. परंतु लेखकाने तो केल्यास त्यास ग्रंथालीकडून सहकार्य दिले जाईल. यासंदर्भातला निर्णय १ एप्रिल रोजी प्रसिद्ध केला जाईल.**

सुवर्णमहोत्सवी वर्ष ते हीरकमहोत्सवी वर्ष या वाटचालीचा कार्यक्रम कार्यकर्त्यांवर दोन-दोन वर्षांसाठी जबाबदारी देऊन सादर केला जाईल.

**- सुदेश हिंगलासपूरकर**

# मातीची ओल आणि तडा

सूर्यकांतदादाचा हा वेडेपणा आहे की शहाणपणा, कुणालाच कळेना. बातमी मात्र सगळीकडे पसरली. दादा असे काही करील यावर कुणाचा विश्वास बसत नव्हता. साधा सरळ माणूस. कधी कुणाच्या दारात नाही. कधी कुणाच्या व्यवहारात. कधी कुणाला शब्दाने दुखवणारा नाही. एक मात्र सगळ्यांना ठाऊक होते, मनावर घेतले त्यापासून तो माघारी येत नाही. तो आता कोयता घेऊन बसला आहे. म्हणजे त्याचा वापर केल्याशिवाय राहणार नाही.



चांगदेव काळे

‘‘हे पावसापाण्याचे दिवस आलेत जवळ. कवा व्हयाची मशागत?’’ सूर्यकांत दादाने गिरजाला विचारलं, जाब विचारल्यासारखे. त्यात रागद्वेष नव्हता. होती ती काळजी. बहिणीची. बहिणीच्या शेताची. बहिणीसाठी येणाऱ्या पीकपाण्याची. तसा आता तो निवांत होता, कुठलीच काळजी नसल्यासारखा. स्वतःच्या शेताच्या बांधावर उभा होता. समोर काळंभोर रान पसरलेले होते. वाळत घातल्यासारखे. त्याची नजर त्यावरून फिरत हेती. मायेची. गवताची एक काडी नाही की पिकाचे एक खोड नाही. नांगर झाला होता. त्यावरून वखराची पाळी झाली होती. बापजाद्यापासून चालत आलेली. आपली माऊलीच. त्यांच्या आशीर्वादाची. आपल्या पुण्याईची. आता तो वाट पाहात होता ती पावसाची. त्याचवेळी गिरजा समोर आली. त्याला वाटले आली शेताच्या काळजीने. नेहमी येते तशी.

गिरजाने काही पटकन उत्तर दिले नाही. डोक्यावरचा पदर सावरला. दादाच्या शेतावरून नजर फिरवली. मोकळे काळे रान पाहून तिचंही मन हरखले. ‘‘येते लेकीकडून. मंग बोलू.’’

‘‘आत्ता! अशा उन्हाची, तीही एकटीच?’’ सूर्यकांतदादा गडबडला. ‘‘काही गडबड?’’

‘‘काय नही. ते तिची सासू आन सासरा निघालेत काशीला. म्हण्लं यावं भेटून.’’ गिरजाने वाटेकडे पाहत कारण सांगितले. सूर्यकांतदादाने बांधावरून मागे नजर फिरवली. बाजूलाच बैलगाडी उभी. बैल खिल्लारी. गिरजाचा नवरा बसलेला, हातात कासरा धरून. नजर बहीणभावावर ठेवलेली. तसा सूर्यकांतदादा मागे वळला. जवळ येत मेहुण्याला रामराम घातला. बैलाच्या पाठीवर हात ठेवून मेहुण्याच्या जवळ पुढे गाडीत बसला. त्याच्या हातातला कासरा स्वतःच्या हातात घेतला. ‘‘व्हा मागं’’ म्हणत त्याने एका बैलाचा कासरा ओढून धरला. तोंडानेच चक्चक केलं. बैल सराईतपणे माग वळले. ‘‘बैस गाडीत.’’ त्याने गिरजाकडे वळून मागे पाहिले. ती गाडीत बसली तशी गाडी घराकडे निघाली. ‘‘असं परस्पर जातात का कधी भावाच्या दारावरून? म्हणी लेकीकडं चाललो.’’ सूर्यकांतदादाने नाराजी व्यक्त केली.

‘‘तसं नही. आम्ही येणारच होतो परत येताना.’’

गिरजाने खुलासा केला. सूर्यकांतदादाने ऐकून न ऐकल्यासारखे केले. काळजी त्याच्या नजरेसमोर होती, ''लोकांच्या मशागती झाल्यात. तुमची होणार कवा? पाऊस तोंडावर आलाय. तो सासरा आन सासू काय पळून चालले का कुठं? हातातलं काम सोडून चालले. का, तर म्हणी ते काशीला चालले. अशाने कुठं कामं होतात का शेतीचे?''

गिरजाला अधिक काही बोलता आलं नाही. मेहुणा गप्प राहिला बहीणभावाच्यामध्ये. असाही अधिक बोलावे, असा त्याचा स्वभाव नाही. बैलगाडी खळ्यात सोडून ते घरी आले. मग थांबले घटकाभर भावाकडे, ऊन खाली होईपर्यंत. त्या वेळेत वहिनीने आंब्याच्या रसाचा बेत केला. जेवण आटोपून निवांतपणाचा वेळ मिळाला. मेहुणा बाजेवर जाऊन आडवा झाला, दारासमोरच्या लिंबाच्या झाडाखाली. दोघे बहिणभाऊ बसले समोरासमोर. तसा सूर्यकांतदादाने विषय काढला, ''हे पाहा गिरजा, तू राहती लांब. तिथून शेताचं पाहायचं म्हण्जी तरास व्हणारच. तवा असं कर. लावून टाक कोणाला तरी ठोक्यानं नाहीतर बटाईनं.'' त्यात आपला स्वार्थ नाही, हेही त्याने लगेच स्पष्ट केले, ''म्हण्जी मालाच लाव असं नाही बरं का. तू कोणालाबी लाव. तरास वाचल तो तोहा.''

''माला काढूनच टाकायचं हे शेत.'' गिरजाने तिच्या मनातला विचार पुढे केला, ठरवून आल्यासारखा, ''दणदण मालाबी नही होत. केलं इतक्या दिवस, होत होतं म्हणून. आता नही होतं.''

सूर्यकांतदादाला हे अपेक्षित नव्हते. कधीतरी वाटायचे, आपणच करावे हे शेत. बटाईने नाहीतर ठोक्याने. पुन्हा विचार यायचा, नको. बहीणभावात असा व्यवहार नको. बरे दिसत नाही ते. लोक नाव ठेवतील. म्हणतील, बहिणीचं खातो. तरी लागली ती मदत करत होता. कधी वखरून दे. कधी पाळी घालून दे. बी नसेल तर बी दे. राखण तर होतीच. बहीण लहान होती. बापाने शेताची वाटणी केली. मुलांना सारखा वाटा दिला, तेव्हा तिलाही वाटा दिला. रीतसर तिच्या नावावर करून दिला. लग्न झालेले असूनही. तीनही भावांनी तिला भाऊच मानला चौथा. फरक इतकाच होता, सूर्यकांतदादाचा वाटा लांब होता. तिचा वाटा दोन्ही भावांच्या शेजारी होता. ही जमीन चांगली होती. सूर्यकांतदादा सगळ्यात मोठा. त्याच्या वाट्याला आली ती जमीन जरा हलकी होती. तरीही त्याची तक्रार नव्हती. सगळ्यांचा मोठा भाऊ होता. बापाच्या पाठी बाप म्हणून वागत होता. सगळ्यांना सांभाळून घेत होता. गिरजाचा काढलेला माल त्याच्याच घरात राहायचा कधी कधी. तोच पोच करायचा तिच्या घरी, वेळ मिळेल तसा. त्यांच्यात तसे कधी वितुष्ट आले नाही एवढ्यातेवढ्या कारणावरून. आताही त्याने काहीसे चकित होऊन तिच्याकडे पाहिले. अशी एकदम निर्णयावर कशी आली. बापाची वाटणी आहे. ती असे कुणी विकून टाकत नाही.

''असं नको करू. चारदोन वर्षं मी करून देतो पायजीन तर. पडीक राहू दे, नसंल होत तुझ्याकडून तर. पण विकू नको.'' सूर्यकांतदादाने तिच्या विचारावर नांगर फिरवण्याचा प्रयत्न केला. ती मात्र विचार करून आलेली होती. पक्का. हरळीसारखा.

''सारं खरं हे तू म्हणतो ते. केलं इतके दिवस बापाचं म्हणून. पण आता व्हईना. पोरं लागलेत कामाधंद्याला. ते काय शेताकडं पाहात नहीत. तोहा मेहुणा थकून जाते घरचं करता करता. मग ठेवून करतो काय इतक्या लांब?''

सूर्यकांतदादाने बाहेर झाडाखाली झोपलेल्या मेहुण्याकडं नजर टाकली. तो निवांतपणे आडवा झाला होता. एक हात कपाळावर आडवा ठेवलेला. गिरजाच्या बोलण्यात वावगे काहीच नव्हते. ती राहते दहा मैलांवर. तिची तिथे शेती आहेच. पोटापाण्यापुरती. मेहुणा करतो जमेल तशी. तिची मुले शिकली. नोकरीधंद्याला लागली. त्यामुळे आता शेतीची दगदग वाटत असावी. म्हणून ती या निर्णयावर आली असावी. सूर्यकांतदादाला मात्र हा निर्णय आवडला नव्हता.

''पाव्हण्याचं काय म्हणणं आहे?''

''त्यांचं काय असायचं. ते पाहतात का कधी व्यवहाराचं? मीच पाहते सारं. त्यामुळं सहन करावं लागतं ते सारं मालाच.'' गिरजाने स्वतःची अडचण पुढे केली.

''हे पाहा. माझं म्हणणं ऐक. तू शेत विकू नको. बापाची, माहेराची साडीचोळी हे ती. हक्काची.'' सूर्यकांतदादा तिला तिच्या निर्णयापासून परावृत्त करू पाहात होता, बापाच्या जागी. ''तसे आम्ही तिघं भाऊ आहोत. भक्कम. कधी कमी पडू नही देत तुला. पुढंही नाही पडू देणार. हां. नसंल होत तुझ्याकडून तर सांग तसं. मालाच सांग असं नही. उरलेल्या दोघांपैकी कुणाला सांग. कुणीही करून देईल तुझं शेत. बटाईने नाहीतर ठोक्याने. पण विकू नको. लोक काय, नुसता वास लागू दे. आता येतील पैसे घेऊन. टपूनच बसलेत लोक, शेत विकत घ्यायला. आता उरलेत कुठं कुणाकडं विकायला शेतं?''

सूर्यकांतदादा बहिणीकडे अपेक्षेने पाहू लागला. गिरजाला ते पटत नव्हतं असं नाही. तरी तिने आपला हेका सोडला नाही. मानेला जागीच फिरवून तिने स्पष्ट केले ठामपणाने, ''नकोच. टाकते विकून. नही होत आता दगदग.''

''तर सांग भाव.'' सूर्यकांतदादा एकदम निकरावर आला. विकायचेच म्हणते तर मग आपणच विचार करायला काय हरकत आहे? तिघे भाऊ राहू शेजारी शेजारी.

''जास्त नही सांगत. बाजारात चाल्ला तेच सांगते. सात लाख रुपये एकर.''



सूर्यकांतदादा बहिणीच्या तोंडाकडे पाहतच राहिला. म्हणजे ही चांगलीच तयारी करून आली म्हणायची. आपण कोणती पेरणी करायची ठरवतो तशी. ही लेकीकडे निघाली की शेत विकायला आली?

''तू घेत असलास तर एवढे. दुसऱ्यासाठी आठ लाख. पाहा तूच आता गिऱ्हाईक. निघू? उशीर होईल आम्हाला.'' गिरजा निघण्याची तयारी करायला लागली. तशी ती समाधानात होती. एक ओझे कमी होत आहे म्हणून. ''आमच्याकडं नऊचा भाव चाल्लाय. तिकडंच घेईन या पैशातून.''

बरे. म्हणजे असा व्यवहार आहे तर! बहिणीच्या हुशारीला सूर्यकांतदादाने दाद दिली. मनातल्या मनात. तसा तो व्यवहाराच्या दृष्टीने तयार झाला. ''तुझी तशीच तयारी असंल तर मग हरकत नही विकायला. ते सोयीचंही होईल तुला. शिवाय तुमच्या जमिनी भारी हेत आपल्यापेक्षा. घेऊन टाक तिकडंच. एका ठिाणी होईल. दगदग नको यायचीजायची. भावाचं बोल नीट. सातचा भाव जास्ती व्हतो. देणार असलीस तर सहाच्या भावाने घेतो. बोल. पोरीकडून ये. इसार देतो पन्नास हजाराचा. उरलेले खरेदीखत करायच्या टायमाला. दोन महिन्यांनी. आहे का तयारी? बोल.''

सूर्यकांतदादाने थेट व्यवहार पक्का केला. इतक्या झटपट तो होईल याची गिरजाला कल्पना नव्हती. तो असा व्हावा यालाही तिची तयारी नव्हती. तिच्या अंदाजात फरक पडत होता.

''इथली पाच एकर देऊन तिकडं तीन एकर घेऊ. सातच्या खाली नही.''

बहिणीचा हिशोब पाहून सूर्यकांतदादा चकित झाला. ही पक्की व्यवहारी म्हणायची तर. पण आता शब्दच निघाला व्यवहाराचा तर माघार घेऊन चालायची नाही. तसा आपला स्वभावही नाही. मनाशी त्याने हिशोब केला. तोच बहिणीपुढे ठेवला, ''हे पाहा. तुझे सात नको. माझे सहा नको. साडेसहाला करती का पक्का शब्द?''

''दादा, भाऊ म्हणून आता बोलता येत नाही. बोलायची हिंमतही होत नाही. बापाच्या ठिकाणी आहेस आम्हाला. पण परिस्थिती पाहा. पाच एकर शेत हे. त्याचे झाले किती?'' बहिणीने भावाच्या घराचे वासे मोजायला सुरुवात केली. घर जुनेच. बापाच्या काळातले. त्याचा दरवाजा अजून बदलला नाही. घरची शेती करतो ती बापाचीच. नवीन एक गुंठा घेतला नाही. इतके पैसे आणणार कुठून? अंगात बळ नाही. गोष्टी करतो पुरात उडी घ्यायच्या. कसे जमायचे?

सूर्यकांतदादा बहिणीकडे पाहातच राहिला. बहिणीने आपली किंमत करावी? लहान ती लहानच राहिली. तिला हा दादा कळलाच नाही म्हणायचा. त्याला हसूही आले तिचे. पण हसला नाही. लहान माणसाना हसायचे नसते. ''दळून देयाची तुझी तयारी हे का? ते सांग. थापायचं कसं, त्याची फिकीर तू नको करू.''

''माला वाटतं आपसात नको.''

''गहाण ठेवीन मी स्वतःला. तुझ्या व्यवहारात खोट आली तर बोल. फक्त हा म्हण.'' सूर्यकांतने स्वतः वरचा विश्वास तिच्यापुढे ठेवला. काहीशा दुखावलेल्या तरी पेटल्यासारखा ईर्ष्येने. तो बहिणीकडं रोखून पाहू लागला. बहीण म्हणून नाही, एक व्यवहार करणारी म्हणून.

गिरजाला माघारीचा दरवाजा बंद झाला. भाऊ बोलतो खरा. व्यवहारात नाही टिकला तर? नवरा, मुले दोष देतील ते आपल्याला. शेतात काम करताना मालकीण म्हणून वेगळे वागावे लागते. मजुरापेक्षा चार हात पुढे चालावे लागते. तेव्हा मजूर पाठून धावत येतो. तेच धोरण तिने कायम ठेवले, ''राखीला लुगडं आन ओवाळणीला बांगडी, ते चालायचं नही. भाव सातचा. त्याच्यात एक पैसा कमी नही.''

गिरजा निघण्याची घाई करत उठली. सूर्यकांतदादाला मांडी घालून बसायची सवय. त्यातला एक पाय दुसऱ्या मांडीवर ठेवण्याचीही सवय. आताही त्याने मांडी घातलेली होती. जेवणाच्या जागेवरून फक्त थोडासा बाजूला सरकलेला होता. टोपी डाव्या मांडीवर होती. आता त्याने डावा पाय उचलून उजव्या मांडीवर ठेवला. धोतर पायाच्या घोट्याजवळ ओढले. पायाच्या तळव्यावर उजव्या हाताने थाप मारून त्याने बहिणीला अडवले, ''थांब. हे सांग. तुझा विचार पक्का हे? सातच? चाल, ठरलं. ये लेकीकडं जाऊन. इसार घेऊन जा जाताना.''

''आन् व्यवहार?''

''दोन महिन्यांची मुदत. कागद आणून ठेवतो खरेदीखताचे.''

''मुदत टळली तर?''

''इसाराची एक पै परत करू नको. आणखी काही?''

''उद्या तुझ्या नावाला बट्टा लागायला नको. माझ्या माहेरचं नाव जायला नको. म्हणून मी...'' गिरजाने आपला खुंटा अधिक बळकट करण्यासाठी हातात दगड घेतला होता. त्याअगोदर सूर्यकांतदादाने तिचा खुंटा उखडून फेकला, ''तसं झालं तर तुझं माहेर मेलं तुझ्यासाठी. तू या भावाच्या दारात पाऊल ठेवू नको. मीही तुझ्या दारात पाऊल ठेवणार नही.''

इतकी निकराची बोलणी ती व्यवहारावर शिक्का उमटवण्यासाठी. गिरजाला आणखी बोलता आले नाही. भावाच्या आवेशाने तिला मुके केले. ती दारात जाऊन उभी राहिली. पायात चप्पल सरकावताना इतकेच म्हणाली, ''येते.''

गिरजा नवऱ्यासोबत बैलगाडीने तिच्या मुलीच्या सासरला निघून गेली. एका हातात व्यवहाराच्या समाधानो गाठोडे. दुसऱ्या हातात चिंतेची काठी. व्यवहार फसला तर हसू आपले होईल. ही काठी आपल्याच डोक्यावर मोडेल. तीच शक्यता तिला अधिक दिसत होती. ताब्यात एक शेत. पदरात दोन मुले. तीही शेतीत. घरचे कमी पडते म्हणून दुसऱ्यांची शेती घेतात कसायला. मग इतके पैसे आणणार कुठून?

अजूनही तिला वाटत होते, भावाने माघार घ्यावी. कदाचित तोच ही माघार जाहीर करील. तसे झाले तर बरेच. आपसात वाद होणार नाही. नात्याला बट्टा लागणार नाही. आपला जीव टांगणीला लागणार नाही. बरड जमिनीत उसाचे पीक येईल, त्यावर व्यवहार पूर्ण करू. असा प्रकार व्हायचा हा.

दोन दिवसांनी गिरजा लेकीच्या घरून आली. सूर्यकांतदादाने शब्दाला खाली पडू दिला नाही. ना तिच्या पाहुणचारात कमी पडू दिले. जेवणखाण झाल्यानंतर सूर्यकांतदादाने इसार तिच्या हातात ठेवला. पन्नास हजार. ''मोजून घे.''

गिरजा चपापली. दादाने पैसे आणले कुठून? त्याच नजरेने तिने दादाकडे पाहिले. तशी कधी दादाकडून पैसे मागायची वेळ आली नव्हती. उलट त्याचाच खर्च व्हायचा, खत, बियाणे, मजुरीचा. ते मग पिकातून वळते व्हायचे. साडीचोळी, ओवाळणी कधी चुकली नाही. मनाने कधी भेगाळल्यासारखा दिसला नाही. कधी दिसला नाही कुणाकडे हात पसरताना. तरी इतका मोठा व्यवहार? इसार पन्नास हजाराचा. उद्या नाही पेलवला नाही तर? वायदा करून आपल्याला टांगून ठेवले तर? नात्याचा पूर आडवा यायचा. पलीकडे जाणार कसे? तिच्या नजरेची भाषा सूर्यकांतदादाच्या मेंदूपर्यंत गेली, पावसाचे पाणी जमिनीत झिरपत जाते तशी. ओठांवर तो ओलावा पसरत गेला. हातानेच तिला खूण केली, चोरीचे नाहीत. कापसाचे आहेत. काळजी करू नको. व्यवहार

ठरला त्यात खोट येणार नाही. पैसे जपून ठेव.

गिरजाने पुढे काही विचारले नाही. विचारण्यासारखे काही राहिलेलेही नाही. इसार मिळाला. कणसांतल्या दाण्यांचे कोवळेपण सरले. पाखरे आता चोच लावणार नाहीत. पीक खळ्यात येईल. तिने नोटा पुन्हा पाहून घेतल्या. वाटले मोजून पाहाव्यात. मन आवरले. नको. अविश्वास दाखवल्यासारखे होईल भावावर. पिशवीतून साडी काढली. तिच्या पदरात नोटा बांधू लागली.

सूर्यकांतदादाने तिला अडवलं, ''जेवणात एकवेळ मीठ कमी चालतं. व्यवहारात अन् नात्यात मिठाचा खडा नको. पैसे मोजून घे.''

गिरजाने नकार दिला नाही. पैसे मोजून घेतले. सातवीपर्यंत ती शिकलेली होती, गावातल्या शाळेत. मास्तर कौतुक करायचे तिच्या हुशारीचे. तेच कौतुक सूर्यकांतदादाच्या नजरेत होते. शिकली असती तर मास्तरीण झाली असती, मास्तराच्या सांगण्याप्रमाणे. पुढे शाळाच नाही गावात. मग गेली लग्न होऊन सासरी. आता ती तिथे मास्तरकी करते संसाराच्या शाळेत. तिचे चांगले चालले याचा आनंद होताच. एकच बहीण म्हणून लाडही होते. म्हणून शेताच्या पैशांची अपेक्षा तिच्याकडून कधी ठेवली नाही. आताही तिची काळजी होती, व्यवहारात तिची फसवणूक झाली असे होऊ नये. गिरजाने नोटा मोजून पदरात बांधल्या. गाठ पक्की आवळली, व्यवहार ठरल्याची. साडी पिशवीत ठेवून म्हणाली, ''तेवढं व्यवहाराचं पाहा लवकर.''

''दोन महिने. झालं तर त्याच्या आत.''

गिरजा पिशवी सांभाळत घरातून बाहेर पडली. पाठोपाठ मेहुणा. रामराम घालून त्यांनी निरोप घेतला. सूर्यकांतदादा भिंतीला टेकून बसला. मांडीवर पाय आडवा ठेवून. तोच पाय हलवत तो मुलांकडे पाहून हसला. पिकाची पोती घरात आणून ठेवल्यासारखा. समाधानाने. पायावर हाताने थाप मारत त्याने विचारले, ''जमला ना व्यवहार?''

दोन्ही मुले, अमोल आणि विक्रम समोरच बसलेले होते. या व्यवहाराला साक्षीदार होते, पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबासारखे. एका शब्दाची चोच त्यांनी मध्ये खुपसली नाही. व्यवहाराला नकार दिला नाही, मनात प्रश्न असूनही. बोलण्याची आता संधी आली तसा विक्रम हळूच पुढे झाला,

''व्यवहार झाला चांगला. पण पूर्ण कसा करणार?''

आपण कितीही मशागत केली. पेरणी केली. पाऊस पडला. तरी इतकी रक्कम त्यातून येईल का? दोन महिन्यांत तर कोणतेच पीक येत नाही. अमोल स्वतःशीच विचार करत होता. विरोध केलेला बापाला आवडत नाही, हे तो अनुभवाने शिकला होता.

मुलांच्या पाठी त्यांची आई उभी होती, सावली धरलेल्या झाडासारखी. ''हा व्यवहार असा झाला, गायीपेक्षा तिची शिंगं मोठी. दोन महिन्यांत आणायचा कुठून इतका चारा? मुदत मागून घ्या. सांगा, फेडू जसं पीक येईल तसं. नाहीतरी आपणच करतो त्यांचं सगळं. एवढं नको का नातं सांभाळायला? कुठं चाललो का पळून? नाही जमलं तर म्हणा, घ्या शेत परत तुमचं तुमचं.''

''नका काळजी करू.'' सूर्यकांतदादाच्या बोलण्यात स्वतःवरचा विश्वास होता. ''शब्द दिला तो दिला. पेरलेलं बी उकरून काढता येतं का जमिनीच्या पोटातून?'' काहीवेळ तो मुलांची आणि बायकोची प्रतिक्रिया काय येते, या अपेक्षेत थांबला. खरे तर त्याला आता प्रतिक्रियाही नको होती. पाणी सांडले ते सांडले. शांतपणे त्यानेच समजूत काढली, ''प्रश्न पैशाचा, एवढंच ना? तर तो सुटतो.''

प्रश्न सुटतो म्हटल्यावर तिघेही सैल झाले. पिकातले गवत काढून आल्यासारखे. तरीही मुलांची आई, सरलाबाईने शंका घेतलीच,

''मेहुणा देणार का भाऊ? गाय शेजाऱ्याच्या दारात आन् तूप आपल्या मिशीला, असं झालं हे.'' सूर्यकांतदादाच्या लक्षात आला बायकोच्या बोलण्यातला उपरोध. तसा त्याने आपला बाणेदारपणा उघड केला, ''विक्रम, सांग तुझ्या आयला. हा सूर्यकांत कधी कुणाच्या दारात गेला नही रिकामं गाडगं घेऊन. पोटाला चिमटा घेतला स्वतःच्या, पण कुणाला उपाशी नही जाऊ दिलं.''

''तो तालेवारपणा मला बी ठाऊक हे. पण एवढं डबुलं आणायचं कुठून?'' सरलाबाईसमोरची काळजी मोठी होती.

''शेत विकायचं. आपलं.''

काय? सगळ्यांचे डोळेच विस्फारले, आश्चर्याने. आहे ते विकायचे आणि दुसरे घ्यायचे, यातले शहाणपण काय? बोअरचे पाणी विहिरीत सोडण्यासारखे झाले हे. आपलं शेत सात एकरांचे आहे. गिरजाआत्याचे पाच एकर. घेऊन उपयोग काय? अमोल तर पाहातच राहिला बापाच्या तोंडाकडे.

''नाही. असं काही करायचं नाही. दहा गायी विकायच्या आणि चार म्हशी घ्यायच्या, असं झालं हे.'' घर सूर्यकांतदादाच्या विरोधात उभे राहिले.

''तुम्हाला काय वाटतं, तुमचा बाप येडा झाला? तू म्हणतो तसंच खरं. चारच म्हशी घ्यायच्या.'' सूर्यकांतदादाने हाताने त्यांना शांत करत समजावलं, ''बरड जमीन आन् काळी जमीन, यातला फरक येतो का लक्षात? दोन्ही भाऊ आणि गिरजाच्या वाट्याला पाच पाच एकर आली. का? तर जमीन भारी आहे म्हणून. आपल्या वाट्याला सात एकर आली. का? ती जमीन हलकी आहे म्हणून. आता आपण तिची पाच एकर घेतली तर आपल्या भावांच्या सोबत राहू. सगळ्यांचा एकच गट होईल. आलं का लक्षात. अरे,

तुमचा बाप असा बिनडोक्याचा नही. त्यालाबी कळतो उन्हाळापावसाळा.''

घर राजी झाले ते नाइलाज म्हणून. मान राखण्यासाठी. त्यांना हे पक्के ठाऊक होते, दादाने मनावर घेतले की ते त्यापासून मागे येत नाहीत. इतरांचे ऐकायचे, हे तर त्यांना माहीतच नाही.

सूर्यकांतदादा लगेच कामाला लागला. स्वतःचे शेत विकणे ही त्याच्यासाठी मोठी शिक्षा होती, स्वतःचे काळीज कापण्यासारखी. बापजाद्यांपासून चालत आलेला वारसा आपण गमावतो आहोत. त्यासाठी घरातल्यांचा विरोध डावलतो आहोत. हे सारे तीव्रतेने जाणवले ते विकत घेणाऱ्यासोबत शेतात उभे राहताना. गावातलाच रामभाऊ तयार झाला होता घ्यायला. दोघे शेतात आले. चारही बाजूंनी बांधाबांधाने त्यांनी चक्कर टाकली. खाणाखुणा पाहिल्या. दोर टाकून मोजणी केली. खूण म्हणून दगड ठेवले. सगळे मनासारखे झाले. फक्त एकच मनाविरुद्ध झाले. भाव. रामभाऊने त्यात फार लोळण घेतली. तयार झाला तो पावणेपाचच्या भावाने. तेही उपकार केल्यासारखा. गरज नसल्यासारखा. तुझ्यासाठी म्हणून घेतो असा शब्द डोक्यावर ठेवून. सूर्यकांतदादाचे मस्तक गरम झाले, उन्हापेक्षाही. 'नाही विकायचं मला शेत. नीघ शेताच्या बाहेर. काय कर्जदार समजतोस की काय मला. आला मोठा शहाणा. तू नाही तुझा बाप दुसरा.' डोक्यात सगळं उतू जायला लागलं. तरी त्याने सावरले स्वतःला. गरजवंत असल्यासारखा. फक्त एकच अट घातली, ''पैसे रोख पाहिजेत आणि तेही एका महिन्याच्या आत. खरेदीखत करायच्या वेळी. इकडं पैसे ठेवायचे. तिकडं कागदावर सही.' रामभाऊ तयार झाला. बकरीच्या भावात गाय मिळते, नाही कशाला म्हणायचे.

शेताचा व्यवहार पार पडला. तरी गिरजाच्या पैशांची पूर्ण तरतूद झाली नाही. त्यासाठी बैलजोडी बाजारात उभी केली. कमी पडली म्हणून गाय वासरासहीत विकली. सगळी तयारी झाली तेव्हा त्याने कागद खरेदी केला खरेदीखतासाठी. तोच घेऊन बहिणीच्या दारात उभा राहिला,

''आक्का! चाल कर सही.'' सूर्यकांतदादाने कागद तिच्यापुढे ठेवला.

''आला तसं बैस. घाई काय इतकी?'' गिरजाने भावाला पाणी दिले हातपाय धुवायला. जेवण केले चांगले. निवांत वेळ मिळाला तसा भावाने पुन्हा विषय काढला. त्याला आता घाई झाली होती व्यवहार पूर्ण करायची. तो पूर्ण झाला की मशागतीच्या कामायला लागायचे होते. पावसाळा जवळ आला. भावांच्या शेजारी आपलंही शेत राहील. सगळे एकाच गटात राहू. त्यांनाही आनंद होईल. कदाचित नाव ठेवतील. मोठे शेत विकून लहान घेतले म्हणून. तेवढेच. म्हणू देत. त्याने मनाची तयारी केली होती, पोट भरल्यासारखी. बहीण समोर बसली. तिच्या नवऱ्याने पाठीला खांबाचा आधार घेतला. बहीण हळूच उतारावर आली,

''दादा! नको. माला नही इकायचं शेत.''

सूर्यकांतदादाच्या कानांत उकळत्या तेलाची वाफ गेली. बहीण काय म्हणाली? त्याने तोंडपुढे करून कान तिच्या तोंडाजवळ घेतला, ''काय म्हण्ली तू? ऐकू नही आलं माला नीट. पुन्हा सांग पाहू.''

गिरजाच्या लक्षात आले त्याचे सोंग. तरी खरकटा हात पाण्याने धुऊन काढावा इतक्या सहजपणे तिने उत्तर दिले, ''माला शेत इकायचं नही.''

सूर्यकांतदादा तिच्याकडे पाहू लागला ते अविश्वासाने. समोर बसलेल्या मेहुण्याकडेही त्याने पाहिले ते त्याच नजरेने. त्याच्यापुढे बोट करून विचारले, ''काय बोलून राहिली ही... इकायचं नही? म्या ऐकलं ते असंच. तुम्हाला काही येगळं आलं का ऐकायला?''

मेहुणा तसा साधासरळ माणूस. बहीणभावाच्यामध्ये आपण कशाला पडावे या विचाराचा. त्याने बायकोकडे पाहिले काय उत्तर द्यायचं याच्यासाठी. तशी तीच पुढं सरसावली,

''काय चुकीचं नही बोलले. खरं तेच सांगितलं. नही इकायचं.''

''इसार घेऊन आली पन्नास हजाराचा. लेकराबाळाच्या तोंडातला घास काढून दिला तुला. दोन महिन्यांच्या आत व्यवहार करायची, अशी बोली झाली आपली. त्याच्या अगुदर आलो तुझ्या दारात. आता तू हे काय सांगायला लागली? माला तं नवलच वाटायला लागलं तोहं.''

''म्हण्ले होते. आता नही म्हणते. इसार घेऊन जाय तोहा.'' गिरजा पैसे घेऊन समोर आली. ''आणले ते तसेच ठिवले. हात नही लावला कोणा. मोजून घे तरी.'' गिरजाने पैसे पुढे केले. सूर्यकांतदादा तिच्या तोंडाकडे पाहातच राहिला वेड्यासारखा. या उत्तराची अपेक्षाच नव्हती तिच्याकडून. चांगलं आलेले पीक अचानक करपल्यासारखे व्हावे, तशी गत झाली. तीही पाणीपाऊस, खत सगळे असताना. हे कसे? त्याला कळेना बोलावे ते काय.

''असं पाहा. नही म्हणते ती तर राहिलं. त्यात काय एवढं. द्या सोडून.'' मेहुणा मध्यस्थाच्या भूमिकेत आला. तेही अगदी शांतपणे. वाहत्या पाण्यावर ओरखडा उमटणार नाही अशा बेताने. तेच पाणी सूर्यकांतदादाच्या नाकातोंडात गेल्यासारखे झाले. तो ताडकन उठून उभा राहिला. हातातला कागद त्यांच्यापुढे नाचवीत ओरडला, ''हा कागद आणला. सही कर गुपचूप. हे घे पैसे मोजून.'' त्याने पैशांची पिशवी तिच्यापुढे फेकली. ''आपला ठरला होता व्यवहार. तो

पाळला म्या. आता तुझी पाळी.''

''हे पाहा. आरडावरड करू नको.'' गिरजा ठामपणे उभी राहिली. ''म्या काही तोहं डबुलं दाबलं नही. हा घेतला होता इसार, तो घेऊन जा. माला नाही इकायची जमीन. माझी मर्जी. तुझी बळजबरी कशाला?''

सूर्यकांतदादा खाईत सापडल्यासारखा झाला. अंगावर अंगार पडतो की गारांचा मारा, तेच कळेना. तिकडे आपण सगळे विकून बसलो. शेत. बैलजोडी. गायवासरू. आता ही म्हणते, माझी मर्जी! व्यवहार ठरल्याप्रमाणे झाला नाही तर दारात उभे राहणार नाही, इथपर्यंत गोष्टी गेलेल्या. आता माघार? त्याने पैशांची पिशवी उचलली. कागद नीट ठेवला जपून पिशवीत. ती हातात घेऊन हात जोडले. ''हे पाहा गिरजा, शब्दाला किंमत राहते. नीट विचार कर. आपण काही दुश्मन नही एकमेकाचे. बहीणभाऊ आहोत. एकाच रक्ताचे. तू अंगाखांद्यावर खेळली माझ्या. ऐक माझं. कुणी काही सांगितलं का तुला? माझ्यावर भरोसा नही का? अरे, पैसे कसे आन कुठून आणणार, याचा प्रश्न पडला होता तुला. पण हा दादा शब्दाला जागला. त्याने स्वतःला गहाण ठिवलं. तुझे पैसे आणले. ते बी मुदतीच्या आत. आन तू सहज मागं फिरली. ऐक माझं. हात जोडतो तुला. पाया पडू का तुझ्या. सांग. लाज नही वाटायची मला. बहीण आहेस तू माझी.''

सूर्यकांतदादा खरोखर तिच्यापुढे वाकला. गिरजा तशी मागे सरकली. आपल्या काळजाला तिने पाझर फुटू दिला नाही. ना काळजावरचा दगड दूर केला. हातानेच दादाला दूर करत म्हणाली, ''ए दादा, असं नको पायाबिया पडू. माला शेत इकायचं नही म्हण्जी नही. बास! नको बळजबरी करू.''

सूर्यकांतदादाला हा अपमान सहन करणे अवघड झाले. जू मोडले तर नवीन आणता येते. इथं बैलजोडी विकली. गायवासरू विकले. शेत विकले. हे सगळे गेले ते गेलेच. पैशाला किंमत नाही. शब्दाला किंमत नाही. नातं... त्यालाही किंमत नाही? असे काय झाले, ती अशी माघारी फिरली. आता करायचे काय?

''हे पाहा. तू नातं तोडायला निघाली. लक्षात ठीव. व्यवहार झाला नही ठरल्याप्रमाणे तर ... तर नातं नही पाहायचो. बहीण नाही पाहायचो. मुडदा पाडीन एकेकाचा. लिहून ठेव हे शब्द. पाव्हणे, साक्षीदार आहात तुम्ही.''

''मुडदा पाडायला मोगलाई लागली का? आम्ही मेल्यावर तुला सोडतील का पोलीस? म्हणी मुडदा पाडीन.'' गिरजा डगमगली नाही. नांगराच्या फाळाला खाली खडक लागावा तशी ती ठामपणाने समोर आली.

''सूर्यकांत बोलत नही, करून दाखवतो. फाशीवर जाईन, पण तुला सोडणार नही. ध्यानात ठेव.'' सूर्यकांतदादाला राग अनावर झाला होता. तितक्याच वेगाने त्याने बहिणीच्या घराचा निरोप घेतला.

''दादा, आपला व्यवहार मोडला, त्याला कारण आहे, अशोक. आपल्या मधल्या तात्याचा.'' दोन दिवसांनी बातमी कानांवर आणली ती विक्रमने. सूर्यकांतदादा आपल्या मोठ्या मुलाच्या तोंडाकडे पाहातच राहिला. गिरजाच्या घरून आल्यापासून तो धुमसत होता. काय करावे या विचाराने वेडापिसा झाला होता. बहीण ठरल्या व्यवहारापासून मागे का फिरली, याचाच तो विचार करत होता. तेही इतके सगळे ठरल्यानंतर? तेही अगदी साळसूदपणे. कुठलीही दिलगिरी न दाखवता? कुठले कारण न सांगता. हे घडले कसे? आणि आता ही बातमी कळली. पाणी गढूळ कुठून झाले, याचा उगम सापडला. विक्रमनेच पुढे खुलासा केला, ''अशोकनं व्यवहाराची रक्कम वाढवली आपल्यापेक्षा. एका एकरामाग पंचवीस हजार.''

''आस्सं?'' सूर्यकांतदादाने हातातले काम सोडले. तो बैलांचे कासरे नीट बांधून ठेवण्यात गुंतलेला होता. बैल गेले तरी कासरे मागंच होते. नवीन बैल घेऊ तेव्हा ते लागतील. तोपर्यंत जपून ठेवायला पाहिजे, असा त्याचा बेत होता. त्यातला एक कासरा हातात घेतला तसाच मधल्या तात्याच्या घरासमोर जाऊन उभा राहिला. तसे दोघांच्या घरात बरेच अंतर होते. हातातला कासरा गरागरा फिरवत त्याने आवाज दिला, ''अशोक! ये भायेर. लई पैशावाला झाला का? पाहतोच तोह्याकडं. माहा व्यवहार मोडला. तिथं आय घातली. ये भायेर.''

तात्याच बाहेर आला. सूर्यकांतदादाचा अवतार पाहून तोही चपापला. दबकतच त्याने विचारले, माहीत नाही असे दाखवत, ''काय झालं दादा?''

''विचार तुझ्या औलादीला.'' सूर्यकांतदादा तात्यावरच भडकला, ''माझा व्यवहार मोडला. बोलीव त्याला भायेर. पाहतोच त्याच्याकडं.''

''व्यवहार? नाही माहीत.'' तात्याने कानांवर हात ठेवले.

''नाही माहीत, मग व्हय बाजूला. बोलीव त्याला फक्त. सारं होईल माहीत आता. अशोऽऽक!''

सूर्यकांतदादाचा आवाज ऐकून दुसरा भाऊ आला. त्यांची मुले आली. सगळ्यांनीच अगोदर सूर्यकांतदादाला शांत केले. काय झाले त्याची चर्चा केली. त्यातून हे स्पष्ट झालं, सूर्यकांतदादाच्या व्यवहारात अशोकने ढवळाढवळ केली. पंचवीस हजार एकरामागे जास्त द्यायची तयारी दाखवली. त्यामुळे गिरजाने सूर्यकांतदादाशी केलेल्या व्यवहाराला नकार दिला. त्यातच अशोक तिथे आला. सगळ्यांनी त्याला घेरला. तर तोही वस्ताद निघाला. ''काय चुकलं माझं. मी गेलो का



कुणाच्या दारात? तीच आली घरी. तिनंच सांगितलं सगळं. वर तीच म्हणाली, दादा कुठून आणणार इतके पैसे? तू घेतो का? पण पैसे जास्त लागतील. मी तयारी दाखवली. यात चुकलं कुठं?''

अशोकच्या बोलण्यातले तथ्य नाकारण्याचे कारण कुणालाच सापडले नाही. सूर्यकांतदादा त्याच्याशी सहमत झाला नाही. ठरलेला व्यवहार मोडला म्हणजे काय? हा मोठाच अपमान होता त्याच्यासाठी. एकवेळ विस्तव हातात घेईल पण अपमान? तोही अविश्वासाचा? तो सहन करणे त्याला शक्य नव्हते. त्याने तिथून निघताना एकच आव्हान दिले, ''पाहतोच, तुमचा व्यवहार कसा होतो ते. नही एकेकाचा मुडदा पाडला तर नाव सांगणार नही. फाशीवर जाईन. पण तुम्हाला सोडणार नाही. भाऊ असू दे नहीतर बहीण. मुडदाच पाडतो आता.''

सूर्यकांतदादा नुसता बोलून थांबला असे झाले नाही. त्याने बाजारातून ऊस तोडायचा कोयता विकत आणला नवा. चांगला दणकट मुठीचा. लांबरुंद पात्याचा. वजनदार. घरासमोर बसून तो सहाणेवर धार लावू लागला. दररोज. सकाळी उठल्यापासून. बाकीचे तो सगळे विसरला. विसरता येत नव्हते ते विकलेले शेत. विकलेले गायवासरू, बैल. कशासाठी? ठरलेल्या व्यवहारासाठी. आणि तिथंच फसगत झाली. आपण उघड्यावर आलो. सगळ्यांच्या चेष्टेचा विषय झालो. अपमान... अपमान...! एकच उपाय, व्यवहार पूर्ण झाला पाहिजे ठरलेला. नाहीतर मुडदा. आड येणाऱ्यांचा. या विचाराच्या गतीचा वेग कोयत्याला धार लावण्याशी जोडला जात होता. धार आणखी चमकदार होत होती, दररोज. प्रत्येकवेळी तो तिच्यावरून बोट फिरवून पाहात होता, धार लागली किती.

सूर्यकांतदादाचा हा वेडेपणा आहे की शहाणपणा, कुणालाच कळेना. बातमी मात्र सगळीकडे पसरली. दादा असे काही करील यावर कुणाचा विश्वास बसत नव्हता. साधा सरळ माणूस. कधी कुणाच्या दारात नाही. कधी कुणाच्या व्यवहारात. कधी कुणाला शब्दाने दुखवणारा नाही. एक मात्र सगळ्यांना ठाऊक होते, मनावर घेतले त्यापासून तो माघारी येत नाही. तो आता कोयता घेऊन बसला आहे. म्हणजे त्याचा वापर केल्याशिवाय राहणार नाही.

''तात्यानं अशोकला समजावण्याचा प्रयत्न केला. पण तोही माघार घ्यायला तयार नाही. म्हणतो, मी काय मेलेल्या आईचं दूध पिलो नही. होई दे काय व्हायचं ते.'' विक्रमने तात्याकडील बातमी बापाच्या कानांवर घातली.

''पाहतो दोघांकडं. हा कोयत्या त्यांच्यासाठीच आणलाय. फक्त मुदत टळू दे खरेदीखताची.'' सूर्यकांतदादाने मान वर न करता आपला इरादा स्पष्ट केला. तो कोयत्याला धार काढत होता. एकीकडे लहान गिरजा समोर दिसत होती. तिला अंगाखांद्यावर खेळवलेले दिवस आठवत होते. तिच्या लग्नात किती थट केला ते दिसत होते. तिची नटलेली सजलेली मूर्ती पाहताना गहिवरून आले होते. पुढे तिचे सगळे माहेरपण केले. प्रत्येक भाऊबीजेला ओवाळणी घातली होती. ती मागेल तो हट्ट पुरा केला होता. लहान म्हणून सगळे लाड केले होते. ते सगळे दिवस समोर नाचत होते. बागडत होते, तिच्या अल्लड बाळलीलांसारखे. तिच्या मुलांचे कौतुक केले होते. त्यांनाही खेळवले होते अंगाखांद्यावर. मोठी झाली तरी मामा मामा करीत यायची. हक्कानं राहायची इथे. तिचे शेत झाले तेव्हा काय नाही केले. नांगरणी, पेरणी, कोळपणी. एकदोनदा तर पीक नेऊन घातले तिच्या घरी. ती... सारखी ती समोर दिसत होती. कायत्याला धार काढत होता. अशोकही दिसू लागला, रावणासारखा, शेत पळवून नेणारा. कधी भेदभाव नव्हता केला आपला की परका म्हणून. भावाची मुले ती आपली म्हणून वागवली आपल्या मुलांच्या सोबत. आता तोच वैरी झाला. पाहतोच एकेकाकडे... कोयत्याला धार लावताना अंग घुसळत होते. तसे विचार.

कोयत्याला धार येत होती तशी विचारांना. निश्चयाला. व्यवहार नाही तर मुडदा!

‘‘मामा, हे काय चाललं?’’ अलकनंदा, गिरजाची मुलगी त्याच्यासमोर उभी होती. झालेला व्यवहार आणि सूर्यकांतमामाची चाललेली तयारी तिच्या कानांवर पोहोचली होती. ती तात्यांनीच घातली होती, घाबरून. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी. त्यापेक्षा तिच्या आईच्या जिवासाठी. म्हणून ती धावत आली होती सासरहून, नवऱ्याला सोबत घेऊन.

‘‘तू पाहुणी झालीस आता. चहापाणी घे. जेवण कर. आणि आली तशी परत जा. तू नको पडू या भानगडीत.’’ सूर्यकांतदादाने भाचीशी बोलताना संयम राखला, जिवाच्या पलीकडे जाऊन. नाकातोंडात पाणी गेलेले असताना दुसऱ्याला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसासारखा. लेकराला भलतेसलते काही बोलून उपयोग नाही. तसाही काही उपयोग होणार नाही. उगाच दुखवू नये. ही त्याची तळमळ. अलकनंदा मात्र ऐकायला तयार नव्हती. तिने मामाच्या हातातला कोयता काढून घेण्याचा प्रयत्न केला. जे चालले आहे त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. अर्थात ते तिच्या आवाक्याबाहेरचे होते. मामाचा राग आणि ताकद यांचा अंदाज तिला नव्हता.

‘‘मामा, असं कुणी बहिणीला मारताना पाह्यला का कोयत्यानं? नातंबितं काही आहे का नही? ती लहान पण तुम्ही मोठे हे, ध्यानात नही येत का? लोक काय म्हणतील तुम्हाला?’’

पेटलेल्या आगीतून चिमणीने आपले घरटे वाचवण्याचा प्रयत्न करावा, तशी ती धडपड होती. शेवटी तिला कठोरपणाने सांगण्याची वेळ सूर्यकांतमामावर आलीच, ‘‘तुला सांगायचं ते तुझ्या आईला सांग. माला नको सांगू. नातंबितं गेलं चुलीत. आता एकच होईल, शेताचा व्यवहार माझ्याशी. ठरल्यापरमाणं. नाही तर तिचा मुडदा.’’

‘‘मग तुम्ही द्या वाढवून रक्कम. ती होईल तयार. स्वतःचं नुकसान कोण सहन करील?’’ मुलीने आईची बाजू घेतली. ती सूर्यकांतदादासाठी ठिणगी ठरली. हातातला कोयत्या तिच्यावर उगारत तो उठला, ‘‘जाते का घालू डोक्यात? मोठी आली अक्कल शिकवायला? कळतो का व्यवहार काय असतो ते? म्या इथं शेत विकलं माझं, माझ्या बापजाद्याचं. तुझ्या आईच्या शब्दाखातर. आता ती माघारी फिरली. काय घालू पोटाला माझ्या, माझ्या बायकूपोरांच्या? आता होऊच दे. असा उपाशी मरणारच. त्यापेक्षा मुडदा पाडून फासावर जातो.’’ अलकनंदा घाबरून मागे झाली. मामा ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही याची तिला कल्पना आली. तरीही तिने प्रयत्न केला, ‘‘मामा, ज्याला शेत विकलं. त्याच्याकडून घ्या तुमचं शेत परत. त्याचे पैसे देऊन टाका. झालं. मग भांडण कशाला?’’

‘‘तो तुझा बाप आहे का माझा? असं विकलेलं शेत कुणी परत करतो का? तुझी आय या जावयाला सांगेल का, तुमचं लग्न मोडलं. माझी पोर परत द्या. आन हा जावई ऐकणार का?’’ सूर्यकांतमामाचा चेहरा आक्रसून गेला तिच्या विचाराने. तशी अलकनंदा आल्यापावली माघारी वळली नवऱ्यासोबत. तोच सूर्यकांतमामाने तिला इशारा दिला, ‘‘सांग तिला, अजून सात दिवस राहिलेत दोन महिने भरायला. आठव्या दिवशी दारात येईन कोयता घेऊन.’’

मामा धुमसताना दिसत होता. बोलताना तोंडातून वाफा बाहेर पडत होत्या. अंगातली कोपरी बिना गुंड्यांची होती. ऊर जोरात धपापताना, उघडे पोट खालीवर होताना दिसत होते. त्याच्यावर घामाच्या धारा उतरल्या होत्या. कंबरेचे धोतर कंबरेला खोचलेले होते, ते गुडघ्यापर्यंत आले होते. त्याच्या हातातले तांब्याचे कडे मनगटात रुतले होते. त्याच्या हातातला कोयता चांगलाच चमकत होता, नागाच्या फणीसारखा. मामाच्या एकूण अवतार पाहताना अलकनंदाची खात्री झाली, मामा कोयत्याला खाली ठेवणार नाही. मरणाची भीती त्याने सहाणेवर घासून कोयत्याच्या धारेवर टांगली आहे. ती बळी घेतल्याशिवाय राहणार नाही. कंसाने देवकी आणि वसुदेवाला बंदिखान्यात टाकलं होतं, स्वतःच्या मरणाच्या भीतीने. हे ऐकले होते कीर्तनात. तसा मामा बहिणीच्या जिवावर उठला. मामा तिला कंसासारखा राक्षस दिसू लागला.

अलकनंदा तिसऱ्या दिवशी परत आली समाधान घेऊन. आपली मध्यस्थी फळाला आली. दोन जीव वाचले या विश्वासाने. ‘‘आई उद्या येणार आहे तहसीलदाराकडं. तिथं बोलावलं कागद आन पैसे घेऊन.’’

सूर्यकांतदादाच्या हातात कोयता होता. तो दारातच बसलेला होता पाय पसरून. विमनस्क अवस्थेत. डोक्याला मोठी जखम झालेल्या कुत्र्यासारखा. सारखा मान, डोळे फिरवत होता गरागरा. कुणाचा तरी शोध घेत असल्यासारखा. हाताची बोटं मोजून हिशेब करत होता. पुन्हा पुन्हा. हिशेब जुळत नसल्यासारखा. तसाच कोपरीची बटणे उघडी ठेवून. पोट उघडे. धोतर गुडघ्यापर्यंत वर घेतलेलं. कधीही धावत सुटण्याच्या तयारी असावा असा. अलकनंदाने निरोपाचा फेकलेला दगड नेमका त्याच्या जखमेवर आदळला. तसा तो ताडकन उडी मारून उभा राहिला, वेदनेचा कहर सहन न झाल्यासारखा. ‘‘व्यवहार तुझा माझा झाला?’’कोयता भाचीला दाखवत ओरडला, ‘‘तिला येऊ दे इथं दारात. इथं सांग म्हणा. जा सांग तिला.’’

भाचीच्या मुखावर असलेले समाधान क्षणात काळवंडले. धडावेगळे झाल्यासारखे. कोयत्याचे धारदार पाते तर लखलख करत होते. मामाच्या डोळ्यांतला अंगार त्या पात्यासारखाच दिसत होता. क्षणभर वाटले, आपल्यावरच

वार करील तो. मामा पिसाळला आता. पण तिने धैर्य गाठीला बांधलेले होते. तिने तिथेच उत्तर दिले, ''मामा, येणार तीच. तेही तहसीलदाराकडं. तुमच्या दारात नही. तुम्हीच फसवणूक केलीत तिची, नात्याचं नाव सांगून. वर तुम्हीच बसलात कोयता घेऊन तिच्या नावानं. संपलं तुमचं नातं इथून पुढं. तुम्हीच फिरवलात कोयता त्याच्यावर. या आता तहसीलदाराकडं. होऊ द्या तुमच्या समाधानासारखं.''

''येणारच. कोयताबी आणतो सोबत.'' सूर्यकांतमामाने कोयता उंचावलेला दिसत होता. अजूनही त्याच्या डोळ्यांत अविश्वास दिसत होता.

अलकनंदा माघारी परत वळली, कोयत्याने जखमी झाल्यासारखी. मामा कंसाचा अवतार आहे, याचीही खात्री झाली. वाईटही वाटले, आपण आईची मदत करू शकलो नाही. काय करता आले असते, तिने स्वतःशीच प्रश्न केला. मामाचे पैसे त्याच्या तोंडावर फेकले असते. शेत विकायचे नाही कुणालाच, ना मामाला ना अशोकला. असे ठरवले असते. बापाच्या, भावांच्या हातात कोयता दिला असता. गावकऱ्यांना, भावबंदांना समोर उभे केले असते. नाहीच काहीतर आपणच शेत विकत घेतले असते. असे अनेक पर्याय दिसत होते. पण तरीही मामाने ऐकले नसते. त्याच्या हातात कोयता आहे. शेवटी तोही शेत विकून बसला आहे. अलकनंदा स्वतःशीच विचार करत राहिली. त्यावेळी नवऱ्याने तिला आठवण करूनन दिली, ''पाहिलंस? आपण दारात उभे आहोत पाहुणे म्हणून. तरी कुणी तांब्याभर पाण्याला विचारलं नाही. व्यवहार असा असतो, तो पारखं करतो. माणसाला, माणूसपणाला, नात्याला. चल.''


अलकनंदा आणि तिचा नवरा वाटेला लागले निमूटपणे, परके असल्यासारखे.

**– चांगदेव काळे**
changdeokale12@gmail.com

ग्रंथाली

# कृष्णाकाठावरून

## सांगली ते मुंबई




**मोहन देशमुख**


सांगलीच्या छोट्या खेड्यातून व्यावसायिक होण्यासाठी मुंबईत आलेल्या मोहन देशमुख यांच्या आयुष्यातील विविध टप्प्यांवरील संघर्षाचा, सहजीवनाचा आणि स्वभानाचा आलेख म्हणजे त्यांचे हे आत्मकथन.

**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**

## अवघड वळणाच्या खडतर वाटेवर

# अल्मित्रा पटेल

## (पर्यावरणासाठी जीवन समर्पित केलेली विदुषी)




**शरद पांडुरंग काळे**

सर्वोच्च न्यायालयात अल्मित्रा पटेल यांनी सन १९९६मध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेमुळे भारत सरकारच्या अजेंड्यावर कचराव्यवस्थापन हा विषय प्राथमिकतेने अंमलबजावणीसाठी आला व त्या दृष्टीने कायदे बनू लागले. कचरामुक्त शहरांचा रोडमॅप देण्यात त्या यशस्वी ठरल्या.

**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**



संजीवनी खेर

# बदलती नातीगोती

**वेंकट आणि मैथिलीला धक्का बसला होता. मैथली म्हणाली, ''हा सगळा अमेरिकन विचारसरणीचा परिणाम आहे. ती असं वागते. आपण आपल्या मुलीच्या डेटवरून इतके चिंतीत आहोत; पण ही मोठी माणसं बघ कशी वागत आहेत.'' पण तिला बोलताना मध्येच थांबवून तो म्हणाला, ''काय तुला वाटतंय की आपल्या देशात सगळं आलबेल आहे?''**




***आपल्याला*** आधार असतो तो नात्यांचा, संस्कारांचा ज्यात भाषा, चालीरीती, सण, परंपरा, परिचित भूगोलाचाही हात असतोच. पिढ्यान् पिढ्या आपण एका विशिष्ट चाकोरीतून जगत आलेलो असतो. एका दृष्टीने तो आपला कमफर्ट झोन असतो. तो सोडून आपण दुसरीकडे रहायला गेलो तर हवामानापासून सर्वच बाबतींत आपल्याला अनोख्या गोष्टींना सामोरे जावे लागते. सुरुवातीला अवघडलेले आपण मग स्थिरावू लागतो. तोवर घरातली दुसरी पिढी नव्या जागेत वाढलेली असते. त्यांचा दृष्टिकोन वेगळा झालेला असतो. आणि मग दोन पिढ्यातील वादांना सुरुवात होते.

हे खासकरून १९६०च्या दशकापासून अधिक घडलेले दिसू लागले. त्याचा समाजशास्त्रीय अभ्यासदेखील अलीकडे सर्वत्र होऊ लागलाय; इतका हा प्रश्न सार्वत्रिक झालाय. त्याचे चित्रण तमिळ लेखिका शिवशंकरीच्या 'पोर्टेबल रूट्स, सागा ऑफ तमीळ डायस्पोरा' ह्या कादंबरीत प्रभावीपणे रेखाटलेले आहे. हे जे एका कुटुंबात घडतेय; ते आज भारताबाहेर गेलेल्या आणि राहिलेल्या पहिल्या पिढीच्या बाबत घडताना दिसतेय. ही पिढी मनाने आणि संस्काराने ओढाताण सोसताना दिसतेय. तिथेच वाढत असलेल्या पिढीला आपल्या आईवडिलांचे म्हणणे समजण्याच्या पलीकडे गेलेय असे वाटते नि संघर्ष अटळ होत चालला आहे.

अनेक कुटुंबे समृद्ध जीवनासाठी विदेशात स्थायिक झाली. आरंभी बहुतेकांचा विचार होता की काही काळ तिथे राहून, पैसाअडका कमावून, स्वदेशी परतायचे. खरे तर प्रामाणिक होते तेव्हाचे विचार. पण, तेथील जीवनशैली, प्रगतीच्या संधी, पुढे मुलांचे शिक्षण इत्यादीकडे पाहत तिथेच राहणे आवडू लागले आणि मनातले अपराधीपण हळूहळू कमी होत गेले.

आरंभी देशाची, गावाची, आप्तस्वकीयांची, आपल्या घट्ट मुळांची तीव्रतेने आठवण येई, जीव तळमळे पण हळूहळू तिथेही खूप मित्रपरिवार जमला, येणेजाणे, सणवार एकत्र साजरे होऊ लागले नि मग तमिळ संस्कृतीने त्या पिढीला दिलासा मिळाला. एरवी घराबाहेर एकट्याने न जाणाऱ्या अम्मा आता कार ड्राइव्ह करून शॉपिंगला जाऊ लागल्या. बँकेचे व्यवहार करू लागल्या. इलाजच नव्हता. नवऱ्यांना ऑफिसच्या कामातून उसंत नव्हती. इतर बायकांना घराबाहेर आत्मविश्वासाने वावरताना पाहून यांचीही भीड चेपली. त्यांच्या वागण्या-बोलण्यात फरक पडला.




शिवशंकरी



मुले शाळांत रमली. देशीविदेशी मित्रमैत्रिणींत रमली. फक्त त्यांना दर सुटीला आईवडील चेन्नईला घेऊन जात ते अजिबात पटत नव्हते, नव्हे त्यांना वैताग येई. एवढे मोठे जग सोडून दरवेळी आपले भारतात तेही चेन्नईला जायचे त्यांच्या जिवावर येई. तिथे त्यांच्या प्रत्येक बोलण्या-वागण्यावर मोठ्यांचे लक्ष असे, त्यावर टीकाटिप्पणी सतत ऐकावी लागे. असेच का करतात? नमस्कारच करत नाहीत. देवळात असे वागतात, मोठ्यांचा मान राखत नाहीत. काय रीतभात शिकवलीय की नाही यांना इत्यादी...

देवघरात अंघोळीशिवाय जाणे अगदी पापच समजले जायचे. तिथे खायप्यायचे खूप लाड व्हायचे पण सगळे पदार्थ फक्त दक्षिण भारतीय. त्यात बदल असत पण ते फरक ओळखण्याइतके मुलांना समजत नव्हते. ते पिझ्झा, बर्गर, सॉफ्ट ड्रिंक्स यासाठी अस्वस्थ होत. खाणेपिणे, कपडे घालणे, उठणे, बसणं सगळ्याचेच विशिष्ट नियम होते. भाषा हेही एक कंटाळा यायचे कारण असे. अमेरिकेत मुलांना इंग्रजीत बोलायचा सराव होता; तमिळ समजत होते पण बोलणे जमत नसे. सणावारांचे महत्त्व बेताचेच होते. त्यामुळे सगळ्याच बाजूने त्यांची कोंडी होई. चार दिवस काढायचेत असे मानून ते निभावून नेत.

वेंकट आणि मैथिलि यांच्या मुलांना भारतीय, खास करून तमिळ संस्कार यात घडवत होते. त्या आणि अमेरिकन शैलीत असलेला फरक समजणे मुलांना कठीण जात होते. वेंकट अमेरिकन ड्रीम पुरं करायची खटपट करत एका नंतर एक मोठ्या विद्यापीठात अभिमानास्पद काम करत होता, पैसा कमावत होता. घर, मुले पूर्णपणे मैथिली चालवत होती. तिच्या मते सारे काही ठीक चालले होते पण? जेव्हा त्यांच्या लेकीने गौरीने मित्राबरोबर डेटला जाणार असल्याचे आईला सांगितले. ती प्रचंड चिडली. दोन कारणांनी. एक तर मुलगा अमेरिकन होता, दुसरे, गौरीने परवानगी नव्हती विचारली, तर थेट जाते असे सांगितले होते. वास्तविक तेथील पद्धतीत हे साधं होतं. गौरी काही लहान नव्हती पंधरा वर्षांची होती आणि चित्रपटाला वा डेटला जाण्यात काही अनुचित नव्हतं. पण, इथे तर डोंगर कोसळला होता. कसे हाताळायचे हे प्रकरण?

वेंकट तर फारच संतापला होता. त्याने गौरीला चिडून तसे करण्यापासून थांबवले तर माहीत नाही ती कसे वागेल. आईवडील म्हणून आपण कमी पडलो की काय असा स्वत:ला दोष देऊन काही उपयोग नव्हता, पण हे -डेट प्रकरण- होऊ देणे आणि पुढे काही विपरीत घडले तर? आपल्या समाजात तोंड दाखवणे शक्य होणार नाही. अगोदर आपल्याच लोकांत हे कसे हाताळले जाते याचा अंदाज घ्यायचे ते ठरवतात. वास्तविक माइक हा तसा प्रतिष्ठित घरातला मुलगा असतो, पण गोरा मुलगा? त्यातून वेगळ्या धर्माचा. कसे होणार? वास्तविक डेटला गेले म्हणून उद्या ते लगेच लग्नबिग्न करणार असे थोडीच होते? पण पतीपत्नी दोघे सैरभैर झाले होते. मैथिली शक्कल लढवते. त्या दिवशी घरी मोठी हळदीकुंकू समारंभाची तयारी करायची आहे त्यामुळे तू माझ्या मदतीला हवीच आहेस; तर आज नको ना जाऊस, असं सांगून ती गौरीला थांबवते. ती साहजिकच नाराज होते. नि आईच्या ह्या तथाकथित धार्मिक रितीचा रागही करते. आईला आपल्या समाजात मान खाली घालायला लागू नये म्हणून ती सगळे करते. माइकला सांगून डेट बदलते.

'देव सर्वत्र असतो तर देवघरात बूट घालून का यायचे नाही?' तुम्ही चार दिवस कशा बाजूला बसत होतात? यात विश्रांती वगैरे काही नसे, खूप कामे करत होतात की? तिकडे

तू आप्पांना नावाने कधी हाक मारत नव्हतीस इकडे तू हाक मारतेस. तुम्हीही बदललात की. पण आप्पा कधीही तुला घरकामात मदत करत नाहीत? इथे बाकीचे पुरुष बरोबरीने मदत करतात. सोयीचे बदल करता का, तिचे वाक्ताडन सुरू असे. बऱ्याच गोष्टी तार्किक दृष्ट्या बरोबर होत्या. गौरी अमेरिकन वातावरणात वाढत होती. जिथे न पटणाऱ्या गोष्टींना प्रश्न विचारणे गैर नव्हते. ते ठीक, पण डेट? मैथिलीला पटत नव्हते.

आपले चेन्नईमधले जगणे, ती बैठी घरे, जातीनिहाय गावाची रचना. सारे तिच्या डोळ्यांसमोर तरळत होते. आता हजारो मैल दूरच्या, अनेक धर्मांच्या लोकांत वेगळ्याच जगण्याच्या नियमात नि राहणीत तिचे कुटुंब समाधानात जगत होते तरी तिला आठवत होतं चेन्नईतील जगणे. तेथील गरजा, घरगुती जीवन, आजीचा दरारा, परंपरा सुरू ठेवण्याचा अट्टहास नि गरज, सगळा समाजच त्या चाकोरीत जगत होता. उन्हाळ्याची, वाळवणाची कामे, मुलींसाठी वागण्याचे कडक. तरी इतरांना जीव तोडून मदत करणारी आजी कठोर पण हळुवार. कुठले बरोबर, कुठले चूक हे ठरवणे अवघड झालेले होते. मन प्रचंड गोंधळलेले होते. 'डेट' ह्या कल्पनेने तिला घेरले होते.

प्रत्येक बाबतीत तिला दोन देशांतील लोकांच्या वागण्यातला फरक जाणवत होता. इथल्या बायका बाळंतपणानंतर किती चटकन कामाला लागतात. आपण शेक-शेगडी यात किती महिने आराम करत होतो. घरात आपल्याला आई आली मदतीला, पण घरकामाला हात लावू द्यायची नाही. शुद्धअशुद्धतेचे नियम किती कडक होते. खरं तर अजूनही आहेत आपण तिथे नाही एवढेच. आई म्हणायची त्यांची देखभाल करणारे कुणी नसते म्हणून त्यांना तसे करावे लागते मी असताना तू कशाला धडपडतेस? आराम कर.

ती लग्नाची झाली तेव्हाची गोष्ट -तिने बीएससी केले होते. ती घरकाम नि अभ्यासात कशी तरबेज आहे याचे कौतुक घरच्या बायका खास करून आजी करत होती. वेंकट हुशार होता. विदेशी कंपनीत होता. अमेरिकेत गेला तर खूप मोठ्या हुद्यांवर भरपूर पैसा कमावू शकेल. हा मुद्दा होता. शिवाय नातेवाईकांत माहीत असलेला होता. कुंडलीही तंतोतंत जुळत होती. आणखी काय पाहिजे? असे ते दोघे बंधनात अडकले.

त्या दिवशी वेंकट घरी आला तो जरा अस्वस्थ होता. तीही कसे काय समजून घ्यावे ह्या द्विधा मन:स्थितीत होती. त्याच्या सेक्रेटरीने सुटी घेतली होती एक दोन दिवस. कारण? तिनं सांगितले की तिच्या तेरा वर्षांच्या मुलीचे अबॉरशन करून घेतले होते. ह्या दोघांच्या पायाखालची जमीन हादरली. त्याच्या सेक्रेटरीनेच त्याला सारे सांगितले की असे आमच्या घरात पहिल्यांदाच झाले. ह्या वयात मुलांची जबाबदारी घेणे तिला नि तिच्या प्रियकराला जमणे शक्य नव्हते. त्या दोघांनी चूक कबूल केली 'आम्ही खूप वाहवत गेलो. परत असं करणार नाही' असे कबूल केले नि प्रोसिजर करून घेतली. वेंकट नि मैथिलीला दोघांना एक अनामिक भीतीने ग्रासले. दोघे एकमेकांना घट्ट घरून बसले होते. अमेरिकेत हे प्रकार वाढत असल्याचे त्यांच्याही कानांवर आले होतेच.

एक दिवस मैथिलीच्या जिवलग मैत्रीणीने- अंबिकाने- तिला आपल्याकडे तातडीने बोलावून घेतले. ट्रेनने ती तिच्याकडे गेली. मैत्रीण तणावाखाली होती. खाणेपिणे करून तिने मैथिलीचे हात हातात घेतले म्हणाली, 'तुला धक्का बसेल पण मी आणि नारायणने वेगळे व्हायचे ठरवले आहे. मी दुसरे लग्न करतेय नि माझी लेक माझ्याबरोबर राहील नि मुलगा त्याच्या.' मैथिलीचा कानावर विश्वासच बसला नाही. इतके अनुरूप जोडपे, इतक्या वर्षांच्या सुखी संसारानंतर वेगळे होताहेत? हे कसे शक्य आहे. आपण त्यांना समजावू ते नक्कीच परत एकत्र राहतील भलतेच काही करणार नाहीत. मैथिलीने बोलायचा, समजावायचा प्रयत्न केला; पण खरे तर फक्त अंबिकाने नव्हे त्या दोघांनी हे पक्के ठरवले होते. (हा जन्मोजन्मीचा संबंध असा तोडताहेत?)

''मी आणि माझा बॉस स्टीव्ह एकमेकांवर खूप प्रेम करत आहोत. गेली तीन चार वर्षं आम्ही बरोबर आहोत. आता वेगळं राहणं शक्य नाही.''

''नारायणाचं काय म्हणणं आहे? मुलांचं काय म्हणणं आहे?.''

''त्यानं 'हं' म्हणून जणू अनुमोदन दिलं. तो पडला साधू वृत्तीचा. त्याला काही फरक पडत नाही. मी असं नीरस आयुष्य नाही जगू शकत. मुलगी मोठी आहे. ती म्हणाली, ''आई हे तुझं आयुष्य आहे, तुला ज्यात सुख मिळेल तसं तू जगावंस.' छोटा रडला पण त्याची समजूत काढली. तेव्हा शांत झाला. सगळ्या गोष्टीचा विचार केलाय आम्ही. तुला इतर लोकांकडून कळू नये म्हणून तुला बोलावून सांगितलं. तू वेंकटला सांग, मी शिकागोला शिफ्ट होतेय.''

वेंकट आणि मैथिलीला धक्का बसला होता. मैथली म्हणाली, ''हा सगळा अमेरिकन विचारसरणीचा परिणाम आहे. ती असं वागते. आपण आपल्या मुलीच्या डेटवरून इतके चिंतीत आहोत; पण ही मोठी माणसं बघ कशी वागत आहेत.'' पण तिला बोलताना मध्येच थांबवून तो म्हणाला, ''काय तुला वाटतंय की आपल्या देशात सगळं आलबेल आहे? तिथेही नाही का त्या डॉक्टरनं २५ वर्षांचा संसार मोडून आपल्या मुलीच्या वयाच्या नर्सबरोबर लग्न केलं. वकील सुब्रह्मण्यमची मुलगी एका लफंग्याबरोबर पळून गेली. चांगलं वाईट सगळीकडे असतंच ग.''

''आज तुम्ही वेगळंच बोलताहात. काय झालंय काय? काहीतरी लपवता आहात.'' मैथिली म्हणाली.

''तसं खास नाही, पण काल गोविंदराज म्हणत होता, त्यांच्या मुलीनं काल लग्न केले. ती जिथे अभ्यासासाठी जिनिव्हाला गेली होती तिथेच तिनं रजिस्टर लग्न केलं नि आईवडिलांना कळवलं की घाईत लग्न केलं. तुमचे आशीर्वाद असूद्यात. थोडे दिवसांतच आम्ही दोघं येऊ.''

''कमाल झाली बाई ह्या वागण्याची. ही काय रीत झाली लग्नाची? गोविंदराजची केवढी स्वप्नं होती तिच्या लग्नाबाबत.''

''म्हणूनच तिनं असं केलं. तिला फार बडेजाव नको होता.''

''अरे, पण लग्न म्हणजे काय फक्त मुलामुलीचाच विचार असतो की काय? घरच्यांनाही काही वाटत असतं ना त्याबाबत.''

''पण आईवडील विरोध करतील, मग सारा समजूत घालायचा ड्रामा होईल, भरमसाट खर्च होईल; तमिळ पद्धतीने विधी करायचे तर गोतावळा जमेल इत्यादी म्हणून म्हणे लेकीनं असं लग्न केलं. अमेरिकेत आहोत म्हटलं आपण. संस्कार, नातेवाईक यांना महत्त्व नाही इथे. इथली रीत वेगळी आहे.''

नाइलाजाने का होईना स्थलांतरितांना हे मान्य करावे लागत होते. त्यातच आणखी एका सधन तमिळ कुटुंबाने आपल्या भूमीची ओढ, सणसमारंभ, नातीगोती यांचे प्रेम आणि आकर्षण म्हणून अमेरिकेतील गाशा गुंडाळून चेन्नईला भलीमोठी इस्टेट खरेदी केली आणि तिथे शिफ्ट झाले. साहजिकच तेथील समाजात त्यांचा भाव वधारला होता. त्यांनी सांगितले, 'नातेवाईक, शेजारीपाजारी त्यांच्या वैभवाकडे डोळे विस्फारून पाहत होते. मुले नवीन शाळेत ऐटीत जाऊ लागली. क्लबजीवन पतीपत्नीला आवडू लागले. पण?

मुलांच्या तक्रारी रोज येऊ लागल्या. शाळेत शिक्षक प्रश्न विचारू देत नाहीत वा उत्तरे देत नाहीत. इतर मुले ह्यांच्या बोलण्याची, उच्चारांची टर उडवतात. ती फारच उदास राहू लागली. रडू लागली की 'परत जाऊ या आप्पा, चला न परत.' एकूणच त्यांना तिथली शाळा नि शिकण्याची पद्धत पचनी पडत नव्हती. शिवाय आपल्या सणसमारंभाचे, मोठ्यांशी वागण्याच्या रीतींचे नियम त्यांना जाचक वाटू लागले. आम्हाला वाटले हा सुरुवातीचा ॲडजस्ट होण्याचा काळ आहे. जरा शांतपणे घ्यावे, पण हे सारे फारच गंभीर होत गेलं. मुलांनी सरळ अन्नपाणीच सोडले. अखेर आम्हाला माघार घ्यावी लागली. आम्ही परतीची तिकिटे काढली. तेव्हा मुले खुश झाली. आम्हाला वाटते आमचा हा अनुभव आपल्या मित्रमैत्रीणींनाही सांगावा, आपल्यापुढे अनेक पेच आहेत, आपण आता इथे स्थिरावलोत, मुलांना हा देश आपण दिलाय, त्यांनी नव्हता ना मागितला? आता आपण त्यांना इथे जे चांगले आहे त्यांची जाणीव करून द्यायला हवी. खरे तर आपणही समजून घ्यायला हवं की इथे किंवा तिथे सगळेच काही चांगले वा वाईट नाही. आपली लादलेली मते इथे वाढलेली पिढी ऐकून घेणार नाही. उगीचच ताण वाढत जातील तेव्हा ही बदललेली स्थिती समजून नाती जपायला हवीत. या निष्कर्षापर्यंत या अनुभवातून आम्ही आलो आहोत.

ह्या घटनेनंतर वेंकट आणि मैथिलीलाही जाणवले की ह्या मातीत रुजवलेली रोपटी इथले हवापाणी मातीच्या गुणांनी वाढतील ती मुळासकट उपटून दुसरीकडे लावण्याचा अट्टहास फलद्रूप होणार नाही.

बदलत्या नात्यांचा हा गुंता ह्या कादंबरीत परदेशस्थ तमिळ समूहाचा आहे, पण तो आपल्या देशातील कुठल्याही प्रांतातील, भाषेतील कुटुंबाचा असू शकतो. कारण माणूस हा फक्त संपत्तीने घडत नाही तर धर्म, संस्कार यांनी घडतो. विदेशात स्थिरावतांना हा झगडा होणारच आहे, पण तो नाजूक हातांनी सोडवला तर तिथेही स्वदेशाचा कोपरा जपता येतो.


**– संजीवनी खेर**

sanjeevanikher@gmail.com

ग्रंथाली

# पूजनीय आधारवड

**दिगंबर वामन राऊत**




केळवे–बोर्डी परिसरात सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नती संघाची स्थापना शतकापूर्वी झाली. त्या संस्थेसाठी व त्यायोगे समाजाच्या उन्नतीसाठी काम केले त्या व्यक्तींचा परिचय करून देणारे पुस्तक.

**मूल्य ६५० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये**



श्रीकांत बोजेवार

# ‘सुवर्णकाळा’नंतरचा रफी

**सुवर्णयुगातील गाण्यांच्या दर्जाबद्दल, त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल दुमत अजिबातच नाही, परंतु त्यानंतरची गाणी पूर्णपणे दुर्लक्षित ठेवणं हा रफीवर, त्या संगीतकारांवर मोठाच अन्याय ठरेल. आज ४०-४५ वर्षांनंतरही ही गाणी स्मरणात आहेत, याचा अर्थच असा की टिकून राहण्याची क्षमता त्यांच्यातही आहे, ती टिकून राहणारही आहेत.**

**हिंदी** चित्रपटसंगीतामध्ये एक काल्पनिक सूवर्णयुग आहे. सिनेमा बोलू लागल्यानंतरच्या चार-पाच वर्षांनंतर म्हणजे साधारण १९३७-३८च्या सुमारास, सैगलच्या ‘बाबूल मोरा’ (स्ट्रीट सिंगर) या गाण्यापासून हे सुवर्णयुग होतं आणि १९६५मध्ये त्याची दारे बंद होण्यास सुरुवात होते. थोडी थोडी बंद होत १९७० साली ती पूर्णपणे बंद होतात. चित्रपटसंगीतावर लिहिणाऱ्यांनी बहुधा याच काळातील गाण्यांवर लिहिलेलं आहे. त्यातही लता मंगेशकर यांच्या ‘आयेगा आनेवाला’ (महल, १९४९) या गाण्यानंतरचा काळ अधिक लोकांना अधिकच जवळचा वाटतो. त्यामुळे या तथाकथित सुवर्णकाळात सैगल, सुरैया, नूरजहां आदींचा साधारण १२-१३ वर्षांचा काळ आणि लता, आशा, रफी, मुकेश, किशोर, तलत, मन्ना डे आदींचा साधारण २० वर्षांचा काळ असे दोन तुकडे पडतात. स्वतःला गाण्यांचे शौकीन, दर्दी आणि चित्रपटसंगीताचे विश्लेषक म्हणवणारे याच दोन कालखंडांविषयी बोलतात, लिहितात त्यामुळे हा पस्तीसेक वर्षांचा काळ म्हणजेच सुवर्णकाळ अशी समजूत गेल्या अनेक वर्षांत दृढ होऊन गेलेली आहे. चित्रपटसृष्टीतील लोक हुशार आणि पूर्ण व्यावसायिक वृत्तीचे असल्यानं ते या तथाकथित सुवर्णयुगाच्या प्रेमातून वेळीच बाहेर पडले, कालानुरूप बदलले आणि म्हणूनच टिकून राहिले. एखाद्या गायकाच्या, संगीतकाराच्या कारकिर्दीवर काही लिहिलं जातं तेव्हा साधारणतः याच सुवर्णकाळातील गाण्यांची पुन्हा पुन्हा उजळणी केली जाते. २४ डिसेंबर १९२४ रोजी जन्माला आलेल्या मोहम्मद रफी यांचं हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्त त्यांची स्मृती जागवताना पुन्हा त्याच काळात डोकावायचं म्हणजे ज्या गाण्यांच्या श्रेष्ठत्वाचे गोडवे अनेकदा गाऊन झाले, तेच पोवाडे जी जी रं जीचा ताल धरत पुन्हा गायचे असं होईल. त्यापेक्षा सुवर्णकाळाच्या थोडे पुढे यावं आणि त्यानंतरच्या काळातही रफीची जी अनेक उत्तम गाणी आली आहेत, त्यांचा थोडा आस्वाद घ्यावा असं वाटतं.

मोहम्मद रफी यांचं ३१ जुलै १९८० रोजी अकस्मात निधन झालं. त्यासुमारास ध्वनिमुद्रित झालेली त्यांची काही गाणी साधारण १९८३-८४पर्यंत येत राहिली त्यामुळे १९७० साली तथाकथित सुवर्णयुग संपल्यावरही जवळपास १३-१४ वर्षं त्यांच्या कारकिर्दीची आहेत. अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या सुवर्णयुगात जशी रफींची शेकडो

उत्तम गाणी आहेत तशीच या अखेरच्या दीड दशकातही त्यांनी अनेक चांगली गाणी गायली आहेत.

चित्रपटसंगीताच्या धाटणीतले बदल १९६५ पासूनच दिसू लागले होते याचे कारण शंकर-जयकिशन, मदन मोहन, एस.डी. बर्मन, ओ. पी नैय्यर, नौशाद यांची सद्दी संपू लागली होती. रोशन अकाली गेले होते. लक्ष्मी-प्यारे, आर. डी. बर्मन, कल्याणजी-आनंदजी, भप्पी लाहिरी, रवींद्र जैन, राजेश रोशन असे नवे संगीतकार पुढे आले होते. आनंद बक्षी, इंदीवर, मजरुह सुल्तानपुरी, अंजान हे नवे गीतकार आले होते. हिंदी चित्रपटांचा आशयात्मक साचा बदलून त्यानेही नवे रूप धारण केले होते आणि समाजात आक्रोशाची भावना निर्माण झाल्यामुळे हळुवार संगीताची मागणी कमी झाली होती. उर्दूचा प्रभाव ओसरू लागला होता त्यामुळे गाण्यांची भाषा बदलू लागली होती. या बदलांसह मोहम्मद रफीनं आपल्या दमदार आवाजाचा, गानकौशल्याचा उपयोग या काळातही तेवढ्याच उत्कटतेनं केला. सुवर्णयुगातील गाण्यांच्या दर्जाबद्दल, त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल दुमत अजिबातच नाही, परंतु त्यानंतरची गाणी पूर्णपणे दुर्लक्षित ठेवणं हा रफीवर, त्या संगीतकारांवर मोठाच अन्याय ठरेल. आज ४०-४५ वर्षांनंतरही ही गाणी स्मरणात आहेत, याचा अर्थच असा की टिकून राहण्याची क्षमता त्यांच्यातही आहे, ती टिकून राहणारही आहेत.

'आराधना' प्रदर्शित झाला १९६९ साली, म्हणजे संगीताच्या शैलीतील बदलांच्या उंबरठ्यावर. किशोरकुमार यांच्या प्रचंड लोकप्रियतेचा 'आराधना'नंतर सुरू झालेला वादळी काळ हा रफी यांच्या पीछेहाटीचा काळ होता आणि पंचम ऊर्फ आर.डी. बर्मन यांनी 'हम किसीसे कम नही' मध्ये 'क्या हुवा तेरा वादा' हे गाणे रफीकडून गाऊन घेतल्यावर १९७७ साली रफी पुन्हा स्पर्धेत आला असं म्हटलं जातं. त्या गाण्यासाठी त्यांना फिल्मफेअरसुद्धा मिळालं होतं. परंतु त्याच्याही तीन वर्षं आधी १९७४ साली आलेल्या 'हवस' या चित्रपटातील गाण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होतं. तुलनेनं व्यावसायिक दृष्ट्या फार मोठी संगीतकार नसलेल्या उषा खन्नांचं या चित्रपटाला संगीत होतं आणि अनिल धवन सारखा नवखा नायक होता, त्यामुळे कदाचित असं होत असेल. 'हवस'मधलं ते गाणं होतं, 'तेरी गलियों मे ना रक्खेंगे कदम आज के बाद...' या गाण्यातला दर्द आजही पिळवटून टाकतो, भिडतो. सावनकुमार टाक यांनी लिहिलेलं साध्याशा, अंलाकारिक ओळी-

घिर के आयेगी घटाए फिर से सावन की,
तूम तो बाहों मे रहोगी अपने साजन की,
गले हम गम को लगाएंगे सनम... आज के बाद

उर्दू शायरीचे दिवस संपून जनसामान्यांच्या भाषेतील गाण्यांचे दिवस आले होते. 'आराधना'मुळे किशोरकुमारचा झंझावात आला होता, त्यात रफीच्या या गाण्यानं लक्ष वेधून घेतलं होतं. रफीला त्याचा आत्मविश्वास खरं तर या गाण्यानं परत मिळवून दिला होता. मात्र चित्रपट 'लो बजेट' असल्यानं, फारसा चाललेला नसल्यानं त्याचं श्रेय त्याला मिळत नाही. 'क्या हुवा तेरा वादा' या गाण्याचे महत्त्व कमी करण्याचा हा प्रयत्न नाही, तर ज्याचं श्रेय त्याला मिळावं यासाठीचा हा खटाटोप आहे. 'आराधना'मध्येही रफीची दोन गाणी होती. 'गुनगुना रहे है भंवरे' आणि 'बागों मे बहार है.' ही गाणीही लोकप्रिय झाली होती, परंतु तरीही राजेश खन्ना म्हणजे किशोरकुमार असं समीकरण तयार झालं. 'आराधना'नंतर 'दो रास्ते', 'दि ट्रेन', 'सच्चा झूठा', 'सफर', 'आन मिलो सजना', 'कटी पतंग', 'हाथी मेरे साथी', 'आनंद', 'दुष्मन' 'अमर प्रेम' असा साधारणतः पाच ते सात वर्षं टिकला. या चित्रपटांपैकी 'दी ट्रेन'मधलं 'गुलाबी आंखे जो तेरी देखी', 'सच्चा झूठा'मधलं 'युही तुम मुझसे बात करती हो', 'आन मिलो सजना'चं शीर्षक गीत आणि 'कोई नजराना लेकर आया', 'हाथी मेरे साथी'मधलं 'नफरत की दुनिया को छोड के' ही गाणीही चांगली चालली. परंतु 'अमर प्रेम', 'कटी पतंग', 'आपकी कसम', 'प्रेमनगर' या चित्रपटांच्या यशाचा प्रभाव एवढा व्यापक होता की जणू इतर कोणी राजेश खन्नासाठी गायलाच नाही असा आभास निर्माण झाला. त्यात 'आनंद', 'सफर', 'कटी पतंग' यामधली मुकेशची लोकप्रिय गाणीही अनेकदा दुर्लक्षित राहतात. एखादे नॅरेटिव्ह सेट केले जाते आणि मग तेच खरे आहे असे पुढे सतत गृहीत धरले जात राहते. तसेच रफीबाबत झाले.

आरडी-किशोर-राजेश खन्ना यांच्या चलतीच्या काळातच लक्ष्मी-प्यारेलालही जोरात होते आणि त्यांनी रफीकडे कधीही दुर्लक्ष केलं नाही. १९६४ साली आलेल्या 'पारसमणी' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटात त्यांनी रफीला 'रौशन तुम्हीसे दुनिया' आणि 'वो जब याद आये' यांसारखी अप्रतिम गाणी दिली, पुढेही देत राहिले. एलपीने किशोरकुमारलाही भरपूर गाणी दिली परंतु रफी हासुद्धा अखेरपर्यंत त्यांचा एक लाडका गायक होताच. १९७० नंतरच्या रफीगीतांचा विचार करताना एलपी आणि रफी हे समीकरण म्हणूनच ठळकपणे आठवते. 'झीलमिल सितारों का आंगन होगा' (जीवनमृत्यू, १९७०) 'ये दिल दिवाना है' (इश्क पर जोर नही, १९७०) 'रहने दो ये गिले शिकवे' (रखवाला, १९७१) 'कुछ कहता है ये सावन' (मेरा गांव मेरा देश, १९७१) 'के आजा तेरी याद आयी' (चरस, १९७६) अशी अनेक युगुलगीतं तर आहेतच, परंतु रफीनं एकट्यानं गायलेली खिलौना जानकर तून तो (खिलौना, १९७०), ये जो चिलमन है (मेहबूब की मेहंदी, १९७१) 'आज मौसम बडा बेईमान है बडा' (लोफर, १९७३), तेरे नाम का दिवाना (सूरज और चंदा, १९७३) 'मै जट यमला' (प्रतिज्ञा, १९७५) अशी एकट्याचीही भरपूर गाणी त्यांनी दिली, ही यादी शंभरच्याही पुढे जाईल आणि त्यातलं प्रत्येक

गाणं आजही लोकप्रिय आहे. रफीनं अखेरचं गाणं गायलं ते धर्मेंद्रच्या 'आसपास' या चित्रपटासाठी आणि एलपीच्याच संगीत दिग्दर्शनाखाली. दिलीपकुमारनंतर रफीचा आवाज खरा शोभून दिसला तो धर्मेंद्रच्या व्यक्तिमत्त्वालाच. एक योगायोग म्हणजे दिलीपकुमारसाठी मुकेशनं 'मधुमती'मध्ये 'सुहाना सफर और ये मौसम हसी' म्हटलं होतं. त्याच पद्धतीचं गाणं रफीनं धर्मेंद्रसाठी म्हटलं, 'दिल कहे रूक जा रे रूक जा' (मन की आँखे, १९७९). दोन्ही गाण्यांत खांद्याला स्वेटर गुंडाळून निसर्ग न्याहाळत वाटचाल करत असलेला नायक आहे. दोन्ही गाणी आणि त्याचं चित्रीकरण अत्यंत सुंदर आहे. परतु 'मधुमती'चा उल्लेख वारंवार होतो आणि 'दिल कहे रूक जा रे रूक जा' या गाण्याची आठवण मात्र कोणीच काढत नाहीत. आपल्या मानसिकतेमधील ही उणीव आहे. एकुणातच रफीनं १९७० नंतरही अनेक उत्कृष्ट गाणी दिली आहेत. 'कोई नजराना लेकर आया हूं मैं दिवाना तेरे लिये' (आन मिलो सजना) 'आजा तुझको पुकारे मेरे गीत' (गीत, १९७०), 'सुख के सब साथी' (गोपी, १९७०), 'ये जो चिलमन है' (मेहबूब की मेंहदी, १९७०) ही यादी खूप मोठी आहे.

जितेंद्रला स्टार बनवणाऱ्या 'फर्ज'मधली सर्व गाणी रफीची होती त्यातल्याच 'बार बार दिन ये आए' या गाण्याला आजतागायत 'रिप्लेसमेंट' मिळालेली नाही. 'जिने की राह'-मधलं 'आने से उसके आए बहार', बॅडमिंटनच्या ठेक्यावर बांधलेलं 'हमजोली'मधलं 'ढल गया दिन, हो गयी रात', 'कारवां'मधलं 'गोरीया कहां तेरा देस रे', 'नागिन'मधलं 'तेरे संग जीना तेरे संग मरना' ही यादीसुद्धा फार मोठी आहे.

१९७०च्या आधी ज्यांची चलती होती त्यापैकी काही संगीतकारांची उत्कृष्ट गाणी सत्तरच्या दशकातही आली. उदाहरणार्थ, प्रेयसीच्या सौदर्याचं वर्णन करण्याची परंपरा पुढे घेऊन जाणारं 'खुदाभी आसमांसे' (धरती, १९७०) यांच्या नेहमीच्या शैलीत न बसणारं आणि प्रत्येक कडव्याला वेगळी चाल असणारं 'ये दुनिया ये महफील' (हीररांझा, १९७०), शंकर-जयकिशनचा परिचित ठसा घेऊन आलेलं 'तुम मुझे यूं' (पगला कहीं का, १९७०), आणि मदन मोहन यांच्या कारकिर्दीतलं मैलाचा दगड ठरलेलं, 'तुम जो मिल गये हो' (हसते जख्म, १९७३) ही गाणी त्यात सांगता येतील. मात्र याहून अधिक कौतुकाची गोष्ट अशी की काही नवीन येऊ घातलेल्या अथवा ज्यांनी फार कमी चित्रपटांना संगीत दिलं आहे अशा संगीतकारांनीही रफीला या दशकात अत्यंत मधुर गाणी दिली. 'पोंछकर अश्क अपनी आंखोसे' (नया रास्ता, एन. दत्ता, १९७०), 'कानमे झूमका चालमे ठूमका' (सावन भादो, सोनिक ओमी, १९७०), 'ओ गोरी जुल्म करे जुल्फ का बिखर जाना' (प्यार बना अफसाना, इकबाल कुरेशी, १९७२) 'नजर आती नही मंजील' (कांच और हीरा,



मोहम्मद रफी

रवींद्र जैन, १९७२) 'तेरी गलियोंमे ना रक्खेंगे कदम' (हवस, उषा खन्ना, १९७४) 'यार मेरे मेरी बाहोंमे आजा' (जीवन रेखा, जगदीश जे, १९७४), 'जनम जनम का साथ है' (भीगी पलके, जुगल-तिलक, १९८२) अशी काही गाणी सांगता येतील.

पंचम ऊर्फ आर.डी. बर्मन यांच्या संगीताचे सूर किशोरकुमारशी अधिक जुळले असे म्हटले जात असले तरीही 'गुलाबी आंखे जो तेरी देखी', 'मैंने पूछा चांदसे' आणि अर्थातच 'क्या हुवा तेरा वादा', 'चांद मेरा दिल', 'चुरा लिया है तुमने जो दिलको', 'यम्मा यमा' अशी काही उत्तम गाणी त्यांनी रफीला दिली आहेत. लक्ष्मी-प्यारेंनी अनेक प्रेमगीतांमधून आणि एकल गीतांमधून तर रफीचा आवाज वापरलाच मात्र 'परदा है परदा', 'तैयब अली प्यारका दुष्मन' या दोन कव्वाल्यांचा खास उल्लेख करावा लागेल. कव्वाली या दमदार गीतप्रकाराला रफीशिवाय पर्यायच नव्हता, त्यामुळे या दशकात 'हम किसीसे कम नहीं' (आर.डी.), 'पल दो पलका साथ हमारा', 'इशारों को अगर समझो' (कल्याणजी आनंदजी), ये माना मेरी जान मोहोब्बत सजा है (मदन मोहन) या कव्वाल्यांनाही रफीच्याच आवाजानं उंचीवर नेलं. सुवर्णकाळ आणि नंतरचा काळ या दोन्हीमधला आदर्श दुवा म्हणता येईल अशा संगीतकार खय्याम यांनी या दशकात रफीला 'सिमटी हुई ये घडिया' सारखं अप्रतिम गाणं दिलं तर वडिलांची पुण्याई सांगत आपल्या प्रतिभेचा स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या राजेश रोशन यांच्यासारख्या नवख्या संगीतकारानंही रफीकडून 'मुझे छू रही है तेरी गर्म सांसे' (स्वयंवर) 'चल कही दूर निकल जाये' (दुसरा आदमी), 'बांहोंमे तेरे मस्ती के फेरे' ही नितांतसुंदर युगलगीतं गाऊन घेतली.

अगदी 'तेरे हांथो में पहना के चुडिया' (जानी दुश्मन), 'क्या देखते हो' (कुर्बानी, कल्याणजी आनंदजी), 'कौन


किसी को बांध सका' (आर.डी.) या गाण्यांपर्यंत रफीचा आवाज नव्या धाटणीच्या गाण्यांशीही जुळवून घेत होता आणि किशोरकुमार नावाच्या वादळातून तो सुखरूप बाहेर पडला होता. १९८० साली रफीचा आवाज कायमचा शांत झाला, त्या वर्षी प्रदर्शित झालेल्या चित्रपटांमधील काही गाण्यांचीही एकदा उजळणी करू या. तू इस तऱ्हा से मेरी जिंदगी में शामील है (आप तो ऐसे न थे, उषा खन्ना), धक धक से धडकना भुला दे (आशा, एलपी), मेरे दोस्त किस्सा ये क्या हो गया (दोस्ताना, एलपी), लोगों का दिल अगर जितना तुम को हो तो (मनपसंद, राजेश रोशन). ही गाणी ऐकली तर लक्षात येतं की आणखी किमान १५ वर्षं तो गात राहिला असता. रफीच्या अकस्मात मृत्यूनंतर त्याच्या आवाजाच्या नकलांनीही (शब्बीर कुमार, मोहम्मद अजीज, अन्वर, कमलेश अवस्थी) दशकभर राज्य केलं आणि किमान ३००-४०० गाणी ते गायले. यावरून रफीच्या जाण्यानं केवढी पोकळी निर्माण झाली होती ते लक्षात येईल. रफीच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धातील सर्व उत्तम गाण्यांचा आढावा घेणं किंवा नुसता उल्लेख करणंही एका लेखात शक्य नाही. सुवर्णकाळाच्या प्रेमातून बाहेर पडून, १९७० नंतरच्या रफीच्या गाण्यांचा विचार केला तर तर तिथेही तेवढीच उत्तम गाणी आपल्याला ऐकायला मिळतात, हे लक्षात आणून देणं एवढाच या लेखाचा हेतू. आधीची गाणी श्रेष्ठच आहेत, परंतु या गाण्यांनाही जरा 'कान' आणि 'मान' द्या, एवढंच.

**– श्रीकांत बोजेवार**
shrikant.bojewar@gmail.com

॥ग्रंथाली॥

# डॉ. आंबेडकर


**भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव**




**डॉ. नरेंद्र जाधव**

**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**

# ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ




**सुनीता सावरकर**

ढोर, चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी चळवळीतील कार्याचा आणि जाणिवांचा शोध घेण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. यातून वाचकांना ढोर-चांभार स्त्रियांच्या कार्याची माहिती मिळून त्यांच्याही जाणिवांचा परीघ विकसित होईल, याची मला खात्री वाटते.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# वेगळं काही...

गिऱ्हाइकांच्या संवादांतून, कॉलनीतल्या माणसांच्या भेटण्यातून आणि अर्चीच्या तिच्याशी होणाऱ्या एकतर्फी संवादांतून सखीला हळूहळू अर्चीबद्दल, तिच्या एकल आयुष्याबद्दल काही समजलं. अर्थात सगळंच उमगलं नाही. संध्याकाळी पिंपळाखाली किंवा आपल्या खोलीजवळ आणून अर्चना तिला उभं करायची, तेव्हा सखीला वाटायचं, अर्चीनं तिच्या घरातच आपल्याला घ्यावं, पण ते शक्य नव्हतं.



डॉ. निर्मोही फडके

***सकाळचा*** घरातला धबडगा आवरून ती निघाली. नेहमीप्रमाणेच. पायात चपला सरकवतानाच कपाटाच्या आरशात तिनं स्वतःला पाहिलं. सुरकुतलेला युनिफॉर्म हातानंच ठीकठाक केला. गुलाबी रंग आपल्याला शोभून दिसतो, असं उगीचच तिच्या मनात आलं. युनिफॉर्मवरची स्वतःच्या नावाची पट्टी तिनं ठीकठाक केली. 'अर्चना सी.' दारामागच्या हूकवर असलेल्या दोन किल्ल्या आणि पाण्याच्या बाटलीची पिशवी घेऊन, घराला कुलूप लावत मनगटावरच्या घड्याळात पाहत ती स्वतःशीच पुटपुटली, 'हुश्श, अजून दहा मिनिटं आहेत राहू काळ सुरू व्हायला.' आपल्याच वाक्याचं हसू आलं तिला. तिचा विश्वास नव्हता अशा गोष्टींवर, पण आता तिला ह्या गोष्टी नव्यानं कळल्या होत्या. मग घाईघाईनं ती खोलीला वळसा घालून खोलीच्या उजव्या भिंतीपाशी आली. सखीजवळ.

सखी उभी होती शांतपणे. सखीला आता सवय झाली होती, गुपचूप कोपऱ्यातल्या पिंपळाखाली किंवा खोलीच्या भिंतीजवळ उभं राहण्याची आणि नंतर... आडोशातून तिच्या घराकडे टक लावून पाहत बसण्याची. रात्रभर जवळ झोपणाऱ्या भुरीला आणि तिच्या पिलांना सखी आपलीच वाटू लागली होती. सखीलाही त्यांची रात्रीची सोबत आवडायची. धीर देणारी. झुंजरूक-मुंजरूक वेळेला ती पिलावळ तिच्याजवळून उड्या मारत, पळत कॉलनीत शिरायची. रात्रीच्या काळोखात उशिरापर्यंत त्या घराच्या खिडकीतून दिसणारी, तेवणाऱ्या पिवळट बल्बची झुगी सखीला हवीशी वाटायची. मात्र मागच्या तीनेक महिन्यांपासून अधूनमधून आणि हो... कालही त्या पिवळ्या बल्बच्या प्रकाशात फिरणाऱ्या सावल्या आणि दबक्या आवाजात आलेल्या विचित्र आवाजांनी ती जरा घाबरली होती. 'हल्ली मध्यरात्रीला, अधूनमधून ह्या खोलीतून काहीतरी बोलण्याचे, काही म्हणण्याचे आवाज येतात...' सखीचं स्वगत चालू होतं.

कोपऱ्यातल्या पिंपळाखाली सखीला उभं केलं, की कावळ्यांची घाण काढण्यात सकाळची दहा मिनिटं वाया जातात म्हणून हल्ली बऱ्याचदा ती सखीला खोलीजवळच उभी करून ठेवायची. आजही नेहमीप्रमाणेच घराबाहेर आल्यावर आपल्या हातातली

पाण्याच्या बाटलीची पिशवी सांभाळत पिंपळाच्या दिशेनं ती झपझप चालू लागली. उलट बाजूनं येणाऱ्या रंजनामावशीनं विचारलं,

'अर्ची, आज उशीर का गं?' तिला उत्तर म्हणून अर्चीनं... अर्चनानं नुसता हात हलवला. रिकामी बाटली घेऊन ती पिंपळापलीकडच्या लहानशा खड्ड्यात दोन पावलं खाली उतरली. तिथून जाणाऱ्या पाण्याच्या पाइप लाइनचं पाणी ती कॉलनी राजरोसपणे चोरी करून वापरत होती. पाइप तिथेच खड्ड्यात गळत असायचा. तिनं दोन मोठ्या बाटल्यांमध्ये पाणी भरून घेतलं.

एकीकडे हातातल्या बाटल्यांच्या पिशवीला आणि स्वतःला सांभाळत, तर दुसरीकडे मोबाइलवर बोलत बारीकशी चढण चढून, सखीजवळ येऊन तिनं दीर्घ श्वास घेतला. सखीनं कान टवकारले होते, पण तेवढ्यात मोबाइलवरचा संवाद थांबल्यानं तिचा हिरमोड झाला. कुणाशी बोलत होती अर्ची? जाऊ दे. नंतर कळेलच. असं स्वतःशीच बोलून तिनं स्वतःची समजूत घातली. जुन्या कापडाचा तुकडा घेऊन अर्चनानं सखीच्या अंगावरची धूळ झटकायला सुरुवात केली. सखी ह्या क्षणांची रोजच वाट पाहत असे. नंतर बाटलीतल्या पाण्याचे शिंतोडे तिच्या अंगावर उडवत उडवत अर्चना सखीशी बोलू लागली,

''काय ग सखे, काय टकामका पाहतेस ग? आणि त्या भुरीला नि तिच्या पिलावळीला कशाला घेऊन झोपतेस रात्रीची? निस्ता वास येत ऱ्हातो. आता मला परफ्युम मारलाच पायजे.''

सखीला तेच तर हवं असायचं. नेहमीप्रमाणेच छानपैकी स्वतःला ती स्वच्छ करून घेत होती. मनासारखी साफसफाई झाल्याची खातरी करून घेतल्यावर अर्चनानं आतल्या कप्प्यातून उदबत्ती काढून पेटवली. वर अडकवलेल्या देवीच्या छोट्या तसबिरीपुढे ओवाळली. कोपऱ्यात खोचली. उदबत्तीचा मंद दरवळ सगळीकडे पसरल्यानं सखीलाही प्रसन्न वाटलं. देवीची तसबीर मागच्या काही दिवसांपासून बदलल्याचं तिच्या लक्षात आलं होतं. ही कुठली देवी? तेवढ्यात पिंपळानं सकाळच्या वाऱ्यावर आपल्या पानांची सळसळ केली. तिच्या मनातला प्रश्न वाऱ्यावर विरून गेला. रात्रीच्या त्या झिल्लट सावल्या मनावरून पुसून गेल्यासारखं वाटलं तिला. हे असं हल्ली कधीतरी जाणवायचं.

चला, आता कामाला सुरुवात बरं का सखीबाई..., सखी स्वतःशीच पुटपुटली. अर्चनानं स्टार्टर मारला. 'चल मेरी धन्नो'च्या रुबाबात, आणि सखी स्टेशनच्या दिशेनं सुसाट निघाली. मात्र लगेचच पुढे येणाऱ्या जाखमाता मंदिराच्या चौकात अर्चनानं ब्रेक मारला. सखीला रस्त्याच्या कडेला उभं करून ती मंदिरात न जाता भराभरा चालत मंदिराच्या मागच्या बाजूस गेली. सखी विचारात पडली. ही इतकी देवीभक्त कधीपासून झाली? तीही जाखमातेची भक्त? पण आतली तसबीर वेगळ्याच देवीची दिसतेय.

खरं तर अर्चनाकडे येऊन सखीला आता जवळजवळ दीड वर्ष पूर्ण झालं होतं. ह्या दीड वर्षात बऱ्याच गोष्टी तिच्या लक्षात आल्या होत्या. आईशिवाय कुणीच नसलेली अर्चना तशी खूपच अबोल. तिचं रूटीन... एकल आयुष्य सवे घेऊन जगणारी. पण सखीशी मात्र ती खूप बोलायची. अगदी कधी कधी शाळेतल्या जुन्या कविताही तिला म्हणून दाखवायची.

''सखे, ऐक ना'', असं अर्चनानं म्हणायचा अवकाश, की सखी तिच्या दोन्ही आरशांखालचे कुणालाही न दिसणारे कान टवकारायची.

'राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली,

ती सर्व प्राप्त झाली, ह्या झोपडीत माझ्या,' ही अर्चनाची आवडती कविता होती. दिवसातून एकदा तरी ती ही कविता मोठ्यानं म्हणायची. कस्टमर नसताना. आणि कधीकधी चक्क त्याच सुरांत पुढे असंही म्हणायची... 'ती सर्व प्राप्त झाली, ह्या सखीमुळे माझ्या.' मग म्हणायची, ''काय सखे, मी काय बोलतेय ते कळतंय ना? हसतेयस ना खुदुखुदु. समजतंय बरं का सखीबाई आम्हाला.'' तिची ही बडबड ऐकून सखीला खरंच खूप हसू फुटायचं. एरवी अबोल आणि गंभीर असणारी अर्ची आपल्यापाशी किती खुलते, ह्याचं तिला अप्रूप वाटायचं. कधीकधी स्वतःच्या भाग्याचा हेवादेखील. कारण तिच्याबरोबरीच्या शोरूममधल्या तिच्या इतर मैत्रिणी रस्त्यात, सिग्नलला कुठे ना कुठे दिसायच्या, भेटायच्या. तेव्हा जातायेता एकमेकींना आपली दुःख सांगायच्या. कुणाचा मालक घरी पिऊन बायकोला मारतो, कुणाचा मीटर फास्ट करून गिऱ्हाइकांना फसवतो. कुणाचा ड्रायव्हर भेसळ असलेलं डिझेल भरतो. त्यामुळे, तिची तब्येत सारखी बिघडून तिचं आयुष्य कमी होतं. इत्यादी इत्यादी कितीतरी दुखणी. सखीच्या लक्षात यायचं, इतर जणींच्या मानानं आपण खरंच खूप भाग्यवान. आधी वाटायचं, मुलंबाळंवालं घर मिळायला हवं होतं. कुठे ह्या एकलकोंड्या बाईच्या घरात आलो. पण अर्ची किती काळजी घेते आपली. खूप जीव लावलाय हिनं.'

सखी आयुष्यात यायच्या आधी अर्चनाच्या उत्पन्नाचं साधन होतं, हार-फुलांचं एक दुकान, खरं तर टपरी. कौपिनेश्वराच्या मुख्य प्रवेशद्वारापाशीच असलेलं ते दुकान होतं तसं लहानसंच, पण ठाण्यासारख्या शहरात त्या जागेची किंमतही काही कमी नव्हती. अर्चनाला आईकडून वारसाहक्कानं मिळालं होतं ते. राहायची खोलीही. आईच्या अचानक झालेल्या मृत्यूनंतर अर्चना आणखीनच अबोल झाली. आईची दूरच्या नात्यातली एक बहीण तेवढी येऊन

गेली तिला भेटायला. बाकी एकही नातेवाईक नाही. कॉलनी मात्र लोटली होती. सगळ्यांशीच तिच्या आईचे मायेचे संबंध होते. आईच्या पश्चात अर्चना ते सांभाळून होती. कॉलनीत चक्क गावातल्या वस्तीसारखा एकोपा होता. गरजा माणसाला जितक्या क्रूर बनवतात, कदाचित तितक्याच मायाळूही बनवत असाव्यात.

मुळातच अबोल असल्यानं कुणाच्या अध्यातमध्यात नसायची अर्चना. काही वर्षं तिनं आईचं हार-फुलांचं दुकान चालवलं. मात्र बारावीची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेल्या आणि कॉलेजच्या पहिल्या वर्षापर्यंत शिकलेल्या अर्चनाला एकाच ठिकाणी बसून हार-फुलं विकण्यात तितकासा रस नव्हता. तिनं ते दुकान कॉलनीतल्याच रूपालीला भाड्यानं चालवायला दिलं. जागेच्या डिपॉझिटमधून काहीतरी वेगळा व्यवसाय करायची इच्छा होती तिची. शक्यतो फिरतीचा. लहानपणापासून तिला अशा वेगळेपणाचं आणि फिरण्याचं एक आकर्षण होतं. म्हणूनच तर अविवाहित राहायचा निर्णय घेतला तिनं.

साधं-सामान्य रूप असलेली ती. एक-दोन नाजूक क्षण आले होते आयुष्यात, पण तिनंच ते दूर केले. धूसर होत गेले ते. आपल्या आयुष्यात वेगळं काही घडत नाही, ह्यासाठी स्वतःबद्दलचं एक चिडचिडलेपणही असायचं. वेगळं काय? ते कळायचं, सुचायचं मात्र नाही.

अचानक तशी वेगळी संधी आली. महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत ठाणे शहरात महिलांना रिक्षा विकत घेण्यासाठी खास परमिट मिळणार असल्याची बातमी तिला कळली. अर्चनानं सहज अर्ज भरला आणि तिचा नंबर लागला. कागदपत्रांची पूर्तता, ड्रायव्हिंग प्रशिक्षण, लायसन्स इत्यादी बाबी पूर्ण झाल्या आणि तिनं तिच्या सखीला... तिच्या रिक्षाला घरी आणलं. मोठ्या आवडीनं 'सखी' अशी लयबद्ध अक्षरं तिनं स्वतःच काचेवर रंगवली. सखीला आपल्या परीनं सजवलं. गुलाबी युनिफॉर्म घालून ती पहिल्यांदा सखीला सजवून, घेऊन निघाली तेव्हा कॉलनीतल्या आयाबायांनी टाळ्या वाजवल्या. कुठूनशा एक-दोन शिट्याही वाजल्या. कॉलनीच्या पलीकडे मखमली तलावाच्या बाजूला असलेला जुना दर्गा. छोट्या इनायतनं तिथल्या आवारातनं प्रेमानं आणलेलं लाल गुलाबाचं फूल तिनं कौतुकानं सखीच्या मीटरजवळच्या फटीत खोचलं. तीन चाकांची सखी, तिची खरोखरच 'सखी' झाली आणि अर्चनाच्या आयुष्याला वेगळं वळणही लागलं.

सकाळी स्टेशनवर येणाऱ्या इंटरसिटीचं हमखास मिळणारं गिऱ्हाईक घेऊन तिचा दिवस सुरू व्हायचा. बहुतेक वेळा महिला प्रवासीच असायचे. गिऱ्हाइकांशी गप्पा मारणं तिच्या स्वभावात नव्हतं. काही महिला प्रवासी मात्र कधी उत्सुकतेपोटी काही बोलत, तर कोणी उगीच चौकश्या करत, कोण, कुठली, हा धंदा का करावासा वाटला, घरच्यांचं काय, पुरुषांचा त्रास इत्यादी शंभर शंका. अर्चना जेवढ्यास तेवढं सांगायची. बऱ्याचदा ज्येष्ठ वयाच्या बायका जाता जाता कौतुकपर काही बोलून जायच्या. सखीला हसू यायचं. अर्चनाला आता आपल्याच शहरातले वेगळे रस्ते कळू लागले, वेगळी माणसं भेटू लागली आणि वेगळे अनुभवही येऊ लागले. पुरुष गिऱ्हाइकांचा तसा काही त्रास नव्हता. मुळात मुंबईला धावणाऱ्या चाकरमान्यांना ट्रेन पकडण्याची आणि ऑफिसची वेळ गाठण्याचीच चिंता. मीटरप्रमाणे पैसे दिले-घेतले, की रस्ते वेगळे. नाही म्हणायला काही स्टँडवर काही ठरावीक रिक्षाचालकांची दादागिरी चालायची. पण अर्ची कधी वाद घालायला गेली नाही. त्याचमुळे की काय, नंतर ते रिक्षावालेही तिच्याशी सौजन्यानं वागू-बोलू लागले.

दुपारच्या आणि संध्याकाळच्या वेळेत अर्चनाला सरस्वती शाळेची ठरावीक गिऱ्हाइकं मिळाली होती. दोन घरांतल्या तीन मुली. त्यांच्याशी अर्चना खूप बोलायची. त्यांच्या शाळेतल्या गमतीजमती ऐकायला आवडायचं तिला. सखीलाही ते संवाद ऐकताना मजा यायची. त्या मुली कधी कधी घरून आईनं दिलेला मोगऱ्याचा गजरा आणायच्या अर्चनामावशीसाठी. हार-फुलं-गजरे विकणारीची मुलगी असूनही अर्चनानं कधीच डोक्यात फुलं, गजरे माळले नाहीत. मग मुलींनी आणलेले गजरे ती सखीच्या आतल्या आरशाला अडकवायची. ''बघा गं पोरींनो, आपली सखी गजरे माळल्यावर भारी दिसते किनी?'' तिच्या ह्या प्रश्नावर मुली खिदळायच्या. सखी सुखावायची. मोगऱ्याचा वास तिला खूप आवडू लागला होता. अर्चनामावशी त्या मुलींची लाडकी झाली होती, सखी दोस्त झाली होती आणि त्यामुळे, त्यांचे पालक निर्धास्त झाले होते.

गिऱ्हाइकांच्या संवादांतून, कॉलनीतल्या माणसांच्या भेटण्यातून आणि अर्चीच्या तिच्याशी होणाऱ्या एकतर्फी संवादांतून सखीला हळूहळू अर्चीबद्दल, तिच्या एकल आयुष्याबद्दल काही समजलं. अर्थात सगळंच उमगलं नाही. संध्याकाळी पिंपळाखाली किंवा आपल्या खोलीजवळ आणून अर्चना तिला उभं करायची, तेव्हा सखीला वाटायचं, अर्चीनं तिच्या घरातच आपल्याला घ्यावं, पण ते शक्य नव्हतं.

पत्र्यांची छपरं असलेली ती कॉलनी 'पत्र्यांची कॉलनी' म्हणूनच प्रसिद्ध होती. अधिकृत बैठ्या खोल्यांवर काही जणांनी एकेक, काहींनी दोनदोनही अनधिकृत खोल्या चढवल्या होत्या. त्यातून मिळणारं भाडं हे ठाण्यासारख्या मोठ्या शहरात उत्पन्नाचं एक उत्तम साधन होतं. अर्चनानं ते धाडसही केलं आणि वर्षभरापूर्वी बांधून घेतलेल्या वरच्या खोलीला लगेचच भाडेकरू मिळाला... खरंतर भाडेकरू मिळाली.




बह्लिशिखा चक्रबोर्ती... पत्र्यांच्या कॉलनीत राहायला आलेली अर्चनाची नवी भाडेकरू. भारताच्या ईशान्य-पूर्व प्रदेशातल्या स्त्री सौंदर्याच्या सगळ्या वैशिष्ट्यांनी भरलेलं असं तिचं व्यक्तिमत्त्व.

पहिल्यांदा सखीनं तिला पाहिलं, तेव्हा तीही जरा गडबडली. अर्चनाशी ती बोलत असताना सखीही कान देऊन ऐकायची. भारतातलं कुठलंतरी आसाम नावाचं राज्य, त्यातल्या मियाँग गावातली होती ती.

'कायतरी विचित्र नाव... आमचं आपलं ठाणं, पुणं, मुंबई... म्हणायला किती सोपं, आणि हिचं नाव तरी केवढं कठीण नि मोठं... काय तर म्हणे बह्लिशिखा... जाऊ दे... आपल्याला काय करायचंय?'

सखी नेहमीप्रमाणे स्वतःशीच चरफडली... विनाकारण.

बह्नी आल्यापासून सुरुवातीचे काही दिवस रूटीन जसं होतं तसंच चालू होतं. बह्नी कुठेतरी नोकरी करायची. केव्हाही जायची नि यायची. सखीचा एक वर्षाचा वाढदिवस आला. तो अर्चनानं तिच्या परीनं छान साजरा केला. सखीला तिनं फुलांच्या माळांनी सजवलं, आतमध्ये नवे रेशमी गोंडे

लावले. मधोमध सुंदर मोत्यांची झुबकळी अडकवली. नव्या परफ्युमनं सखीला सुगंधी केलं. शेजारच्या बाळगोपाळांना तलावपाळीवर चकरा मारून आणलं. ''आपली सखी एक वर्षाची झाली,'' असं म्हणत त्यांना चॉकलेटं वाटली. पोरं सखीजवळ येऊन किलबिलली. दोन खोल्या पलीकडे राहणाऱ्या आणि अर्चीवर माया करणाऱ्या अक्कांना अर्चीनं कौपिनेश्वराला नेऊन आणलं. नमस्कार करणाऱ्या अर्चनाला आशीर्वाद देताना अक्कांनी सखीलाही आशीर्वाद दिले, ''अशीच नीट चालू दे गं बाये तुजी सखी. भरभराट होऊ दे.'' हे ऐकून सखी शहारली. तो दिवस तिच्यासाठी खूप समाधानाचा होता. खूश होती ती...

मात्र संध्याकाळी नेहमीचा शिरस्ता मोडून अर्चीनं आपल्याबरोबर त्या बह्नीला फिरवायला नेणं, तिला तितकंसं आवडलं नाही. त्या दिवशी सखी एका वेगळ्याच भागात गेली. ठाण्याचा चप्पा चप्पा आपल्याला आता माहीत झालाय, असं वाटायचं तिला. परंतु हे शहराबाहेरचं ठाणं वेगळं होतं. गायमुखच्याही पलीकडचा, खाडीसमोरच्या डुंगलीतला, गर्द झाडीचा येऊरच्या जंगलाचा तो भाग सखीला आणि अर्चीलाही अनोळखी होता.

'आपण इथलेच असून आपल्याला आपलं गावही पूर्णपणानं माहीत नाही, आणि ही कोण, कुठली बाहेरच्या राज्यातली. हीच आपल्याला आपल्या गावातला रस्ता दाखवतेय!'

अर्चीचा मनातल्या मनातच चरफडाट झाला.

बह्नी सांगेल तसं अर्ची जात होती. एके ठिकाणी बह्नीनं अर्चीला थांबायला सांगितलं. कच्च्या रस्त्याच्या कडेला असलेल्या भल्याथोरल्या, जुनाट वडाखाली सखीला उभं करून अर्ची बह्नीसोबत समोरच्या झाडीत दिसेनाशी झाली. तेवढ्या वेळेत त्या कच्च्या रस्त्यावरून चार कातकरणी त्यांच्या बोलीत काही बडबडत पुढे गेल्या. नंतर दोन सायकलस्वार तिडमिडत गेले. बस्स... इतकीच जा-ये. दोघी तिकडून तासाभरानं बाहेर आल्या. सखी कंटाळून पेंगत होती. आता पुन्हा इथून इतक्या दूर घरी जायचा तिला खूप कंटाळा आला होता. आपल्या एक वर्षाच्या वाढदिवसाचा असा शेवट झाला, ह्या विचारानं तिला अधिकच वैताग आला. पण, ती काय करू शकणार होती?

ह्यानंतर महिन्यातून एकदा तरी अर्ची आणि बह्नी तिकडे जात आणि अर्थात सखीही. शहराबाहेर असलेल्या त्या जंगलात, संध्याकाळच्या काळोखात तासभर तिथं थांबणं सखीला असह्य व्हायचं. काहीतरी वेगळं घडत असल्याची चाहूल तिला लागली होती, पण काय ते कळत नव्हतं. पूर्वी रोज रात्री अर्चीच्या घराकडे बघत ती निर्धास्त झोपायची, पण हल्ली अशी शांत झोप तिला मिळेनाशी झाली. मागच्या तीनेक महिन्यांपासून अधूनमधून अर्चीच्या खोलीतल्या पिवळ्या बल्बच्या प्रकाशात फिरणाऱ्या त्या सावल्या आणि दबक्या आवाजात आलेल्या विचित्र आवाजांनी तिच्या झोपेचं खोबरं केलं होतं. एखादा नक्तंचर अर्चीच्या घराभोवती आणि आपल्याभोवती फिरतोय असा भास तिला होऊ लागला होता.

अर्चीच्या खोलीजवळ उभं असताना तीन-चार वेळा अर्धवट किलकिल्या राहिलेल्या खिडकीतून सखीनं आत पाहण्याचं धाडस केलं. आतमध्ये थोडं पूजा-साहित्य मांडलं होतं. अर्ची आणि बह्नी समोरासमोर बसल्या होत्या. बह्नी 'जय माँ उग्रोतारा' असं काहीसं म्हणत होती. कुठल्यातरी वेगळ्या भाषेतले श्लोक म्हणत होती. अर्ची तिच्यापुढे अगदी आज्ञाधारक मुलीसारखी बसली होती. सखीला तिचं हे रूप पाहून खूप आश्चर्य वाटलं. नंतर तासाभरानं त्यांची ही पूजा आटोपली आणि बह्नी वरच्या खोलीत गेली. महिन्यातून एकदा शहराबाहेरच्या जंगलात जाणं, तासभर थांबणं, आणि अधूनमधून मध्यरात्रीची ती पूजा पाहणं हे सखीला त्रासदायक झालं होतं, हे काय आहे? हे सांगणार कुणाला? अर्चीला कसं विचारायचं?

जेव्हा जेव्हा ती बह्नी अर्चीबरोबर यायची, तेव्हा तेव्हा तिच्याबद्दल काही समजून घ्यायचा प्रयत्न सखी करायची. ती आसामची, दूर राहणारी वगैरे कळलंच होतं.

ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावरचं तिचं मियाँग हे निसर्गसौंदर्यानं नटलेलं गाव, त्याबद्दल ती भरभरून सांगायची. 'असेना का', सखी पुटपुटली. तिला काही नीटसा संदर्भ लागला नाही.

आजही जाखमाता मंदिराच्या मागच्या बाजूनं अर्चना बाहेर आली. तिच्या हातात जाताना जी पिशवी होती, ती पिशवी नव्हती, तर फक्त पाण्याची बाटली होती. सखी विचारात पडली. सखीला घेऊन ती निघाली. रोजचाच रस्ता, पण आज हिच्या मनात काही खळबळतंय असं जाणवलं सखीला, आणि अचानक अर्ची सखीशी बोलू लागली,

''सखे, कसला विचार करतेस गं?'' हिला कसं कळलं, आपण विचारात पडलोय ते? सखीला आश्चर्य वाटलं.

''तुला वाटत असेल मी त्या बह्नीच्या कह्यात जातेय म्हणून. पण तसं नाय ग बाय. घाबरू नकोस. मी पक्कं ओळखलंय तिला. अश्शी जाम करते बघ तिला, नायतर अर्चना नाव नाय सांगणार.'' सखीला काहीच कळेना.

त्या दिवशी...

दिवसभराचा धंदा उरकून संध्याकाळी अर्चना सखीसह घरी आली. रोजच्यासारखं तिनं सखीला खोलीच्या भिंतीजवळ उभं केलं. काहीशी अस्वस्थ वाटत होती ती. सखी सारं

निरखत होती. पिंपळाची सळसळही वेगळी वाटली तिला आज.

झिरुमिरु संध्याछाया लुप्त झाल्या आणि काळोखाची झाल पसरली. कॉलनीतल्या पिवळ्या दिव्यांनी आपल्या कुवतीनुसार उजेड पसरवला. सखीनं अंदाज घेतला... आज आभाळभर चांदण्याच! चांदला उगवला नाही. तिनं अर्चीच्या खोलीकडे नजर टाकली. आतमध्ये पिवळा बल्ब लागला होता, वरच्या खोलीतही. म्हणजे ती बह्नीही आली वाटतं. कधी, जाते नि कधी येते, काही कळतच नाही. वरच्या खोलीचा जिना नेमका पलीकडे असल्यानं वहिवाट कळत नाही. सखी उगीच चरफडली. तेवढ्यात तिचं लक्ष अर्चीच्या खोलीच्या खिडकीवर गेलं. जमिनीतून खिडकीपर्यंत चढत गेलेली एक वेल तिला दिसली. काळोखात नक्की समजत नव्हतं, पण बहुतेक चिऱ्हाटी असावी. काटेरी वेल. तिला छाटायला हवं, अहं, मुळापासूनच उपटायला हवं तिला, हे अर्चीला कधी कळेल? सखीच्या मनात विचारांचं मोहोळ उठलं होतं.

पेंगणाऱ्या सखीला मध्यरात्री अचानक जाग आली. पिंपळानंच विचित्र सळसळ करत आपल्याला जागं केलं असं वाटलं तिला. तिनं अर्चीच्या घराकडे नजर टाकली. अर्चीच्या खोलीत, पिवळ्या बल्बच्या प्रकाशात सावल्या फिरत होत्या. अस्फुट असे विचित्र आवाज येत होते. सखी असहायपणे घुमी घुमी होऊन बघत होती. अंदाज घेत होती. तेवढ्यात वाऱ्यामुळे खिडकीचं दार किलकिलं झालं. आतमध्ये केस मोकळे सोडून घुमणारी अर्ची बघून सखी अवाक् झाली. अर्चीचं हे रूप तिच्यासाठी नवं होतं. समोर खूप फुलं, पानं नि काय काय मांडलं होतं, पण सगळं विचित्र दिसत होतं. बह्नी खूश दिसत होती. तिच्या भाषेत काहीतरी म्हणत होती. तासाभरानं सगळं शांत झालं. दिवे मालवले गेले.

झांजरलं आणि पुन्हा कुठल्याशा आवाजानं सखीला जाग आली. अर्चीच्या घराभोवती माणसांची गर्दी जमली होती. सखीनं बाजूला पाहिलं आणि ती दचकलीच. तिथे पोलिसांची गाडी उभी होती. पलीकडे आणखी दोन गाड्या. आता मात्र ती हडबडून जागी झाली. आपलं सगळं अंग थरथरतंय असं वाटलं तिला. आपलं नाक नि त्यावरचा हेडलाईट ह्यांना समोर ताणून ती पाहू लागली. अर्ची ठीक असेल ना? तिला काही? तेवढ्यात बह्नी आपलं तोंड झाकून दोन महिला पोलिसांच्या बरोबर गाडीत येऊन बसली. काही जण तिच्या झाकलेल्या चेहऱ्याचे फोटो काढत होते. दहा मिनिटांनी अर्ची बाहेर आली आणि तिला लोकांनी गराडा घातला. कॅमेरे, मोबाइल घेऊन गर्दी धावली. सखीच्या जिवात जीव आला.

सखीजवळ उभी असलेली एका टीव्ही चॅनेलच्या बातमीदार कॅमेऱ्यासमोर उभी राहून ओरडून, ओरडून प्रेक्षकांना सांगत होती,

'ब्रेकिंग न्यूज... काळ्या जादूच्या नावाखाली ब्राऊन शुगरची तस्करी करणाऱ्या टोळीचं रॅकेट उघड. ठाण्यातल्या रिक्षाचालक महिला अर्चना सी. ह्यांची अभूतपूर्व कामगिरी.'

'जाखमाता मंदिर परिसरात जाखाईजोखाई भक्तिणींच्या रूपात फिरणाऱ्या महिला पोलिसांची खबरी होऊन महिला रिक्षाचालक अर्चनानं पत्करला मोठा धोका.'

'ठाणे शहरातल्या गायमुख परिसराच्या पुढे असलेल्या येऊरच्या जंगलात लपून शहरात ब्राऊन शुगरचा धंदा करणारी टोळी मुद्देमालासह पोलिसांच्या ताब्यात. मंत्रतंत्र, काळी विद्या अवगत असल्याचा दावा करणारी बह्निशिखा चक्रबोर्ती ही टोळीप्रमुख आणि तिचे सहकारी ह्यांना पकडण्यात अर्चनाच्या मदतीमुळे आणि धाडसामुळे ठाणे पोलीस यशस्वी.'

अर्ची शांतपणे खोलीतून बाहेर आली. तिला गराडा घालणाऱ्या जमावाला पोलिसांनी दूर केलं. अर्चीनं सखीकडे पाहिलं, तिच्या काचेवर हात फिरवत ती हसत म्हणाली,

''सखे, तुला बोल्ले होते ना, पक्कं जाम करते म्हणून. केलं का नाय? अगं, पण हे सगळं तुझ्यामुळे बरं का सखीबाई. नाहीतर कशाला गेले असते मी येऊरच्या जंगलात? तू होतीस, म्हणून तर...येतेय मी पोलीस स्टेशनला जाऊन लगेच. नंतर लाँग ड्राइव्हला जाऊ.''

''ये गं, अर्चे, लवकर परत ये. तुझं भारी कौतुक वाटतंय बघ. केवढी हुशार आहेस तू. तुझी सखी म्हणून जाम भाव खाईन आता मी...'' सखीला खूप गहिवरून आलं. तिच्या आरशावरचे गोंडे वाऱ्यावर हलले. गुलाबी युनिफॉर्ममधल्या अर्चनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ती पाहत राहिली.

कॉलनीत कुणीतरी फटाके वाजवले. बायाबापड्या, पोरंसोरं टाळ्या वाजवत होती.

अर्चना पोलिसांच्या गाडीत बसली. अर्थात सन्मानानं. गाडी निघाली. खोलीच्या भिंतीपाशी सखी शांतपणे उभी असलेली पाहिली तिनं. हिला आता नव्यानं नटवण्यासाठी काय काय आणायचं ह्याचे विचार अर्चनाच्या मनात सुरू झाले.

तिच्या आयुष्यात खरोखरच खूप वेगळं काही घडलं होतं. अभिमानास्पद वेगळं काही.

**– निर्मोही फडके**
nirmohiphadke@gmail.com



**डॉ. अविनाश सुपे**

## डॉ. विनायक श्रीखंडे

# बहुगुणी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

**डॉ. श्रीखंडे हे केवळ कुशल शल्यचिकित्सक नव्हते, त्यांनी अनेक जटिल शस्त्रक्रियाही अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडल्या. त्यांच्या व्याख्यानांचा अनुभव देखील प्रेरणादायी होता. ते हळूहळू बोलत असत, परंतु त्यांचे प्रत्येक वाक्य अनुभवाने भरलेले आणि तत्त्वज्ञानाने समृद्ध असायचे. केवळ शस्त्रक्रियाच नाही तर अनेक विषयांवरील त्यांचे व्याखान हा एक सुखद व प्रेरणात्मक अनुभव असायचा.**

***आपल्या*** आयुष्यात काही व्यक्ती शिक्षक म्हणून आल्या नसल्या तरी त्या आपल्याला वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात. ह्यानाच आपण इंग्रजीमध्ये Mentor किंवा मराठीमध्ये गुरू म्हणतो. माझे श्रीखंडेसरांचे नाते हे असेच होते. सरांशी माझी भेट अचानकच झाली. मी निवासी डॉक्टर असताना एकदा डॉक्टर बापट यांना भारतरत्न भीमसेन जोशींच्या कार्यक्रमाचे दोन पास मिळाले होते. कार्यक्रम बॉम्बे हॉस्पिटलच्या बाजूला असलेल्या बिर्ला सभागृहात होता. कार्यक्रमाला डॉ. व्ही.एन. श्रीखंडेदेखील आले होते. कार्यक्रमानंतर परत येताना मी टॅक्सी शोधत असताना श्रीखंडेसर भेटले व म्हणाले, मी तुला केईएमला सोडतो. परतीच्या प्रवासात सरांबरोबर अनेक विषयांवर चर्चा झाली. आम्ही कुठल्या शस्त्रक्रिया करतो. त्यांना स्वादुपिंड व पित्ताशयाच्या शस्त्रक्रियांमध्ये जास्त रस होता. त्याचबरोबर त्यांना असलेली संगीताबद्दलची आवडही माझ्या लक्षात आली. माझ्यासारख्या नवोदित निवासी डॉक्टरबरोबर त्यांनी मनमोकळेपणे चर्चा केली. श्रीखंडेसरांचे हेच एक वैशिष्ट्य होते की आपल्या वागण्याने व बोलण्याने ते रुग्ण असो की डॉक्टर, पहिल्याच भेटीत जिंकून घेत असत. पहिल्या भेटीतच त्यांनी मला एक महत्त्वाचा धडा दिला, की आयुष्यात रुग्ण असो अथवा कोणीही व्यक्ती असो, त्यांच्याशी संवाद कसा सांधायचा. पुढे अनेक वर्षे विविध परिषदांमध्ये व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांच्याची गाठभेट होत राहिली. एक उत्तम शल्यचिकित्सक, तत्त्वज्ञानी, शिक्षक म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती होती. त्याचा अनुभव मला अनेकदा घेता आला.

डॉ. विनायक नागेश श्रीखंडे हे भारतातील शल्यचिकित्सा-शास्त्र, सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी (जठरांत्र शल्यचिकित्सा), आणि एचपीबी (यकृत, पित्ताशय व स्वादुपिंड शस्त्रक्रिया) या क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव होते. एका मध्यमवर्गीय कुटुंबात, कोल्हापूरसारख्या लहान शहरात जन्मलेल्या या तेजस्वी तरुणाने केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या विचारशील आणि कौशल्यपूर्ण कार्यामुळे आदरणीय स्थान निर्माण केले.

डॉ. श्रीखंडे यांचा जन्म ८ मार्च १९३१ रोजी कोल्हापूर येथे झाला. शालेय शिक्षण त्यांनी बेळगावमध्ये पूर्ण केले, तर उच्च माध्यमिक शिक्षण पुण्याच्या प्रतिष्ठित फर्ग्युसन महाविद्यालयात घेतले. वैद्यकीय शिक्षणासाठी ते मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाले, जिथे त्यांनी एमबीबीएस पूर्ण केले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले आणि त्या काळातील अत्यंत आव्हानात्मक FRCS परीक्षा पहिल्याच

प्रयत्नात उत्तीर्ण केली.

मुंबईत परतल्यानंतर, त्यांनी शल्यचिकित्सेची प्रॅक्टिस सुरू केली. प्रारंभी ते जी.टी. रुग्णालयात मानद शल्यचिकित्सक म्हणून काम करत होते, जिथे त्यांनी अनेक गरीब आणि गरजू रुग्णांवर उपचार केले. त्याचप्रमाणे, बॉम्बे हॉस्पिटलमध्येही त्यांनी मानद शल्यचिकित्सक म्हणून दीर्घकाळ सेवा दिली. याशिवाय, हिंदू कॉलनीत त्यांनी 'श्रीखंडे क्लिनिक' नावाचे एक छोटे रुग्णालयही चालवले.

सन १९७०-८०च्या दशकात स्वादुपिंड, पित्तनलिका, आणि पित्ताशयाच्या शस्त्रक्रिया फारच कमी शल्यचिकित्सक करत असत. डॉ. श्रीखंडे यांनी या क्षेत्रात अत्यंत कौशल्य मिळवले होते. त्यांनी १९८५ साली मुंबईत आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिली 'इंटरनॅशनल हेपॅटो-पॅन्क्रिएटो-बिलीरी परिषद आयोजित केली आणि जगभरातील प्रख्यात शल्यचिकित्सकांना आकर्षित केले. त्यांच्या त्या परिषदेमुळे पित्ताशय व स्वादुपिंडाच्या शस्त्रक्रिया मुंबईमध्येच नव्हे तर भारतामध्ये व्हायला लागल्या. त्याच परिषदेमध्ये त्यांनी दुर्बिणीतून शस्त्रक्रिया करणाऱ्या अनेक तज्ज्ञांना बोलावले होते. ह्याचे पुढचे पाऊल म्हणून त्यांनी टाटा रुग्णालयामध्ये डॉक्टर जगन्नाथ यांच्यासोबत यकृत, पित्ताशय व स्वादुपिंडाच्या कर्करोगावर कार्यशाळा आयोजित केल्या. या वेळीही त्यांच्या आयोजनकौशल्याने व दूरदृष्टीने आम्ही भारावून गेले होतो. याच काळात जगभरात International Hepato Pancreatico Biliary Association (IHPBA) ही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापली गेली. या विषयावरील आजारावर संशोधन व शस्त्रक्रिया याचा प्रसार होण्यासाठीच ही संघटना सुरू झाली. पुढे IHPB या संस्थेची भारतामध्येही शाखा स्थापली तेव्हा भारतातील पहिल्या अध्यक्षपदाचा मान त्यांना २००१मध्ये मिळाला. ह्या संघटनेचा पाया त्यांनी रचला त्यामुळेच आज ही संघटना गेली २४ वर्षे यशस्वीपणे कार्यरत आहे. याच काळात या संघटनेचा मी खजिनदार होतो त्यामुळे त्यांचाशी काम करण्याचा जवळून संबध आला व त्यांच्याकडून खूप शिकता आले.

डॉ. श्रीखंडे हे केवळ कुशल शल्यचिकित्सक नव्हते, त्यांनी अनेक जटिल शस्त्रक्रियाही अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडल्या. त्यांची कौशल्यपूर्ण हाताळणी इतकी प्रसिद्ध होती, की भारताचे माजी राष्ट्रपती श्री. शंकर दयाळ शर्मा यांच्यावर अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांना दिल्लीला बोलावण्यात आले होते. त्यांनी ती शस्त्रक्रिया यशस्वीरीतीने पार पाडली. त्यांना राष्ट्रपती भवनमध्ये काही दिवस राहावे लागले होते. त्याचा किस्सा ते गप्पा मारताना नेहमी रंगवून सांगत असत.

शल्यचिकित्सेच्या क्षेत्रात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरातून शल्यचिकित्सक त्यांच्याकडून शस्त्रक्रियेचे धडे घेण्यासाठी येत असत. त्यांनी ग्रँट



डॉ. व्ही.एन. श्रीखंडे

मेडिकल कॉलेज आणि बॉम्बे हॉस्पिटलमध्ये शल्यचिकित्सेचे प्राध्यापक म्हणून कार्य केले आणि प्रशिक्षणार्थींच्या अनेक पिढ्यांना घडवले. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले शल्यचिकित्सक देशभरातील विविध शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांमध्ये नेतृत्व करत आहेत. त्यांच्या व्याख्यानांचा अनुभव देखील प्रेरणादायी होता. ते हळूहळू बोलत असत, परंतु त्यांचे प्रत्येक वाक्य अनुभवाने भरलेले आणि तत्त्वज्ञानाने समृद्ध असायचे. कोणत्याही परिषदेत त्यांचे व्याख्यान म्हणजे एक विशेष आकर्षण ठरायचे, आणि त्यांना ऐकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असे. केवळ शस्त्रक्रियाच नाही तर अनेक विषयांवरील त्यांचे व्याखान हा एक सुखद व प्रेरणात्मक अनुभव असायचा. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात त्यांचे विद्यार्थी पसरलेले होते. लोकप्रिय शिक्षक तर ते होतेच, तसेच एक दिशा दर्शक गुरू म्हणून त्यांचा लौकिक होता.

डॉ. श्रीखंडे यांचे वैद्यकीय कार्य जसे उल्लेखनीय होते, तसेच मराठी साहित्यातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे पुस्तक आणि दोन हात हे वाचकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरले. या पुस्तकात त्यांनी आपल्या वैद्यकीय अनुभवांचे मनोरंजक आणि प्रेरणादायी वर्णन केले आहे. वैद्यकीय शिक्षण व त्यांचे इंग्लंडमधील अनुभव वाचनीय आहेत. या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले, आणि ते मराठी वाङ्मयात एक महत्त्वाचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झाले. लेखनासोबत संगीताचा ही त्याना खूप शौक होता. एकदा एका रुग्णासाठी मी त्यांच्या क्लिनिकमध्ये गेलो होतो. गप्पा मारताना विषय निघाला व त्या वेळी त्यांनी व त्यांचे जावई डॉक्टर नांदे यांनी मला पंडित कुमारगंधर्व यांच्या अनेक मैफिलींचे रिकॉर्डिंग ऐकवले. त्यांच्या संगीताच्या प्रेमाचे मला कौतुक वाटले होते. डॉ. नांदे यांनी दिलेल्या ह्या मैफिलींचा आजही अनेक वेळा आनंद घेतो. त्यांना संगीताची आवड होती त्याबरोबर फोटोग्राफीसारख्या



**डॉ. श्रीखंडे यांच्यासमवेत**

इतर कलांमध्येही रस होता. माझे छायाचित्रण शिक्षक, हवाई छायाचित्रकार, गोपाल बोधे यांचे २०१४मध्ये निधन झाले. जुलै २०१४मध्ये त्यांच्या वाढदिवशी, आम्ही आमचे पहिले आरोग्य पुस्तक सायन हॉस्पिटलमध्ये प्रकाशित केले. श्रीखंडेसर आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी सायन रुग्णालयात या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. नंतर बोधे यांच्या पुस्तकांच्या सर्व फोटोग्राफिक लॉन्चसाठी ते नियमित यायचे आणि माझ्याशी आणि बोधेसरांचा मुलगा कौस्तुभ यांच्याशी चर्चा करायचे. फोटोग्राफिक प्रदर्शनांना ते नियमित भेट देत असत आणि कलेचे ते खूप कौतुक करणारे होते. त्यांची ऊर्जा, उत्साह आणि कलेवरील प्रेम पाहून मी नेहमीच थक्क होतो.

त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. परंतु त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे त्यांच्या रुग्णांची कृतज्ञता आणि वाचकांचे प्रेम होते. प्रत्येक रुग्ण त्यांच्यासाठी तेवढाच महत्त्वाचा होता. एखाद्या रुग्णाला शस्त्रक्रिया आवश्यक नसेल तर ते कधी करत नसत. केवळ पैसे कमावण्यासाठी त्यांनी कधीच अनावश्यक शस्त्रक्रिया केल्या नाहीत व त्याचमुळे त्यांनी सर्व त्यांच्या विद्यार्थ्यांना व सहकाऱ्यांना नैतिकतेचा धडा घालून दिला. वैद्यकीय विद्यार्थी असताना त्यांनी माझ्या आईवर जी.टी. रुग्णालयात छोटीशी शस्त्रक्रिया केली होती आणि तेव्हा त्यांच्या सेवा-समर्पणाने मी भारावून गेलो होतो.


शेवटपर्यंत त्यांचे मन तरुण होते आणि ते नेहमीच नव्या शोध, तंत्रज्ञान, आणि साहित्यिक प्रवाहांबद्दल उत्सुक असायचे. त्यांच्यातील हा उत्साहच त्यांना शेवटपर्यंत सक्रिय ठेवू शकला. २०२१ साली, माझ्या आत्मकथनपर पुस्तक 'सर्जनशील'साठी त्यांनी प्रस्तावना लिहावी, अशी मी विनंती केली होती. ते एकच म्हणाले, ''अविनाश - मला १५ दिवस दे.'' प्रकृती नाजूक असतानाही, त्यांनी त्या पुस्तकाचा सखोल अभ्यास करून सुंदर, वाचनीय व अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली. खरं तर श्रीखंडेसरांचे हेच वैशिष्ट्य होते. कुठलीही गोष्ट घाईघाईने किंवा करायची म्हणून करत नसत. प्रत्येक गोष्टीच्या खोलात जाऊन त्याचे सार ते सांगत असत. अजूनही रुग्णसेवा करताना किंवा शस्त्रक्रिया करताना त्याचे मोलाचे उपदेश आठवतात.

डॉ. श्रीखंडे यांचे निधन म्हणजे शल्यचिकित्सेच्या क्षेत्रातील एक महान व्यक्तिमत्त्व हरपणे होय. त्यांचे वैद्यकीय कार्य, साहित्यिक योगदान, आणि त्यांचा समृद्ध वारसा नेहमीच पुढील पिढ्यांना प्रेरणादायी राहील. त्यांचे पुत्र डॉ. शैलेश श्रीखंडे हेही आज जागतिक पातळीवर प्रख्यात शल्यचिकित्सक आहेत. त्यांचे जावई डॉ. आनंद नांदे हेही प्रसिद्ध शल्यचिकित्सक आहेत. डॉ. श्रीखंडे यांच्या निधनाने आपण एक उत्तम व कुशल शल्यचिकित्सक, विचारी-तत्त्वज्ञानी शिक्षक, लेखक व दिशादर्शक गुरू गमावला आहे.

**- डॉ. अविनाश सुपे**
avisupe@gmail.com

||ग्रंथाली||

# एकदा आपणच व्हावे मोर



मोहन काळे

बालकवितेच्या या पुस्तकात मोर, पक्षी, मनीमाऊ, मधमाशी, ससा, कावळा, चिऊताई, भातुकली, चांदोबा, आभाळ, डोंगर, वारा, ढग, पाऊस, फुलपाखरू आणि राणीचा बाग ह्या साऱ्या मुलांच्या भावविश्वातल्या गोष्टी नव्या नव्या करून, अगदी नटवून-सजवून पेश केल्या गेल्या आहेत. ह्या कविता वाचा, गा, आणि जमले तर कवितेच्या तालावर नाचा, मजा मजा करा...

**मूल्य १२५ रुपये । सवलतीत ८० रुपये**



प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे

# वारीच्या पालखीचा भोई

**राजूबाबांची विठ्ठलभक्ती पाहून त्यांच्या मोठ्या भावाने त्यांना जमातमध्ये पाठवले. मनाच्या विरुद्ध का होईना राजूबाबा त्यात सामील झाले आणि योगायोगाने त्यांचा पहिला मुक्काम पंढरपूरला झाला. राजूबाबांनी चोरून विठुरायाचे दर्शन घेतले. जमातीबरोबर महिनाभर फिरून झाल्यानंतर सगळे सांगली ला आले. रात्री झोपेत त्यांना टाळमृदुंग आणि हरिनामाचा जागर कानावर आला आणि आपूसकच त्यांचे पाया भजनाकडे वळले.**



भारतीय परंपरा अतिप्राचीन असून तिची पाळेमुळे अगदी खोलवर रुतलेली आहेत. हा देश बहुभाषक असूनसुद्धा अनेक समाज समतेने, एकतेने इथे नांदतात. इथे प्रत्येक बारा कोसांवर भाषा बदलते. जशी भाषा बदलते तसाच भाषेचा लहेजा बदलतो. इथल्या यात्रा-जत्रा-उत्सव-महोत्सव बदलताना आपण पाहतो. धर्म आणि धार्मिकता याच्या डोळ्यावर भारतीय समाजाने आपली वज्रमुठ आवळलेली आहे. त्यात महाराष्ट्रही मागे नाही. महाराष्ट्रात भक्तिपरंपरा, विधिपरंपरा आणि रंजनप्रधान परंपरा या त्रिसूत्रीचा अवलंब लोकसंस्कृतीत केला जातो. हिंदू, मुस्लीम, शीख, इसाई, बौद्ध अशी धर्मव्यवस्था महाराष्ट्रात रूढ आहे. महानुभावपंथाच्या स्थापनेपासून चक्रधर, माहीमभट्ट, बसवेश्वर, दासोपंत या संतानी आपल्या लीळाचरित्राच्या आणि पासोड्याच्या माध्यमातून इथल्या मराठी माणसाचे प्रबोधन-उद्बोधन केले. पुढे वारकरी सांप्रदायाची पताका भगवान विठ्ठलाला केंद्रस्थानी मानून संतानी खांद्यावर घेतली. संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंत तुकारामापासून एकनाथ, नामदेव, सावता, चोखामेळा, सोपान, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा इत्यादी संतांनी समाजाला आपल्या अभंगांतून, भजनांतून, भारूडांतून, विरहण्यांतून समाजाला लोकशिक्षण दिले. संतपरंपरेत अनेक जातीचे लोक होते. असे असूनसुद्धा या सर्वांचे दैवत म्हणजे विठूमाउली माउलीची भक्ती करताना प्रत्येकाने आपल्या रूपकाच्या माध्यमातून सर्वांचा ईश्वर एकच आहे, सर्वच ईश्वराची लेकरे आहेत, यामुळे सर्वांनी समतेने वागवे हा संदेश वारकरी संप्रदायातील संतेंनी आपल्या अनुयायांना दिला. त्यातलेच वारीनृत्य माहाराष्ट्रात लोकप्रिय करणारे ह.भ.प राजूबाबा शेख हे होत. राजूबाबांचे मूळ नाव रियाझुद्दीन अब्दुल गणी शेख. त्यांचा जन्म बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात १७ एप्रिल १९४२ रोजी झाला. त्याकाळी मराठवाड्यात रझाकारांचे राज्य होते. निजामशाहीमध्ये अनेक अत्याचाराला मराठवाड्यातील जनता बळी पडली होती. रझाकारी शासन तेथील शेतकऱ्याकडून शेतसारा बळजबरीने वसूल करून घेत असत. त्याचा विरोध म्हणून अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्याविरुद्ध बंड पुकारले आणि वंदेमातरमचा नारा दिला. त्यात स्वातंत्र्यसैनिक माणिकचंद पहाडे, गोविंदराव पानसरे, गोविंदभाई श्रॉफ, बाळाराम काबरा, दगडाबाई शेळके या आणि अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा मराठवाडा मुक्ती आंदोलनात सहभाग होता. त्यात राजूबाबा शेख यांच्या वडिलांचा सिंहाचा वाटा

होता. रझाकाराला विरोध करत करत निजामाच्या तावडीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी राजू बाबा शेख यांच्या वडिलांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. पुढे या कुटुंबाची वाताहत सुरू झाली. मुस्लीम समाजातील या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाला पोटाची खळगी भरणे कठीण झाले. वडिलांच्या पश्चात राजूबाबांच्या आईने कुटुंबप्रमुख म्हणून सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. राजूबाबांच्या घरात त्यांच्यासह चार भाऊ व बहिणीला घेऊन आई केजला मामाच्या गावी म्हणजे किसनराव पाटील यांच्याकडे आली. राजूबाबा अवघ्या सात वर्षांचे असताना त्यांच्यावर मोलमजुरी करण्याची जबाबदारी पडली. आईबरोबर आजोळी आलेली ही मुले दुसऱ्याच्या शेतात राबराब राबायची. आई लोकांची धुणीभांडी करायची. अवघे सात वर्षांचे राजूबाबा शेतीतील कामाबरोबर कावळे हाकलणे, गायीम्हशी सांभाळणे, गुरांची चारावैरण करणे, शेत कुलपणे, पेरणी करणे, मालकाच्या घरी पानाड्याचे काम करणे अशी अनेक कामे वाढत्या वयाबरोबर करू लागले. लौकिक अर्थाने कुठल्याही शाळेची पायरी न चढलेले राजूबाबा शंकरराव पाटलाच्या शेतामधील शेंगा फोडायचे व शेंगादाणे खिशात भरून वाण्याला विकायचे. त्याच्या पाठीमागे राजूबाबांची शिकण्यासाठीची धडपड होती. त्या पैशांतून त्यांनी बाराखडीचे पुस्तक घेतले आणि बाराखडी पाठ केली. पुढे हरिपाठ, ज्ञानेश्वरी, अभंग मुखोद्‌गत केले. यातून राजूबाबांना हरिनामाचा छंद लागला. परंतु समाज त्यांना नीट जगू देत नव्हता. रामरंगी रंगलेल्या राजूबाबांना उमेदीच्या काळात खूप संकटांचा सामना करावा लागला. जातीने मुसलमान असल्यामुळे हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मियांनी त्यांना समाजातून बहिष्कृत केले. मुसलमान समाजात कोणी मुलगी देईना, तर हिंदू समाज देवळाची पायरीसुद्धा चढू देईना. इस्लाम धर्मात जमात नावाचा एक प्रकार आहे. गावातल्या तरुण मुलांना घेऊन मुल्लामौलवी गावोगावी इस्लाम धर्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून गावोगावी घेऊन जात. ह्याला जमात असे म्हणतात. राजूबाबांची विठ्ठलभक्ती पाहून त्यांच्या मोठ्या भावाने त्यांना जमातमध्ये पाठवले. मनाच्या विरुद्ध का होईना राजूबाबा त्यात सामील झाले आणि योगायोगाने त्यांचा पहिला मुक्काम पंढरपूरला झाला. राजूबाबांनी चोरून विठुरायाचे दर्शन घेतले. जमातीबरोबर महिनाभर फिरून झाल्यानंतर सगळे सांगलीला आले. रात्री झोपेत त्यांना टाळमृदुंग आणि हरिनामाचा जागर कानावर आला आणि आपूसकच त्यांचे पाया भजनाकडे वळले. मौलवी राजूबाबांना शोधात आले आणि त्यांना ओढत पुन्हा मशिदीत घेऊन गेले. राजूबाबादेखील हट्टाला पेटले आणि मशिदीतच मोठमोठ्याने भजन म्हणू लागले. हे एकताच बाकीच्यांनी त्याचे तोंड दाबण्याचा प्रयत्न केला तर कोणी लाथाबुक्क्यांचा मार देऊ लागले. राजूबाबांना खूप त्रास सहन करावा लागला. या सर्वावर मात करत राजूबाबांनी हरिनामाची कास सोडली नाही. वयाच्या सातव्या वर्षापासूनच ते पंढरीला जायला लागले. जातीने मुसलमान असल्याने त्यांना राममंदिर, बालाजीमंदिरात प्रवेश नसे. राजूबाबा मंदिराची साफसफाई करू लागले. पुढे देवळात रात्रभर खांद्यावर वीणा घेऊन राजूबाबा जागर करू लागले.

मुळात मुस्लीम समाजातील वारकरी संत, कीर्तनकारांची परंपरा मोठी आहे जैतूनबी, मेहबूब महाराज, नगर जिल्ह्यातील वाहिऱ्याचे शेख महम्मद, औरंगाबादचे ताजुद्दीनबाबा ही त्यातील मोठी नावे. राजूबाबा शेख त्यांच परंपरेतले. त्यांनी अभंगाची पुस्तके आणून पाठ केली, पण नुसतेच अभंग पाठ करून चालणार नव्हते तर मुखाने कीर्तन व्हायला हवे होते हे लक्षात येताच त्यांनी या अनुषंगाने सराव करण्यास सुरुवात केली. अभंग पाठ झाले. परातीवर नाचून, समई डोक्यावर घेऊन समतोल राखण्याचा सराव केला. मंदिराबाहेर बसून अभंग कानावर यायचे ते लक्षात ठेवायचे, रामकथा, गीता कानावर पडायची. हे करत असतानाच लोकांनी वाळीत टाकलेल्या या अवलिया कलाकाराला त्याच लोकांनी त्यांना कार्यक्रम करून दाखवा असे सांगितले. राजूबाबांना गावातील लोकांनी राममंदिरात कीर्तन करण्याची परवानगी दिली. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी पहिला कार्यक्रम केला. त्यांच्या भक्तिनृत्याची रसिकांकडून खूपच प्रशंसा झाली आणि त्या कार्यक्रमातून राजूबाबांना ऐंशी रुपये मिळाले. त्या पैशांतून त्यांनी पंढरपूरला जाऊन घुंगरू, घागर, पराती खरेदी केले आणि आजतागायत वारीनृत्याची माळेत राजूबाबा गुंफत गेले. आज त्यांचे कार्यक्रम संपूर्ण भारतात होतात. त्यांची भक्ती,कला, नृत्य, गायन, कीर्तन ऐकणारा प्रेक्षक मंत्रमुग्ध होतो.

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकरांची सह्याद्री वाहिनी–वरील 'दिंडी' ही मालिका त्याकाळी फार प्रसिद्ध झाली होती. त्या मालिकेतसुद्धा राजूबाबांना कीर्तन सदर करण्याची संधी तेंडुलकरांनी दिली. त्यावेळी घरोघरी टीव्ही नव्हता तो कार्यक्रम त्यांनी औरंगाबादला जाऊन पाहिला. पद्मश्री गोविंदराजांच्या हस्ते २००० साली राजूबाबांना राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. संगीत नाटक अकादमीतर्फे राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन राजूबाबांना सन्मानित करण्यात आले आहे. वारीनृत्याची ही परंपरा राजूबाबांना आजच्या पिढीकडे संक्रमित करायची असूनदेखील चांगळवादात अडकलेली आजची पिढी ही वारीनृत्याची परंपरा शिकण्यासाठी तयार होत नाही, याची खंत राजूबाबा शेख यांना वाटते. लोककला आणि लोकसंस्कृतीचा अभ्यासक म्हणून वारीनृत्याची परंपरा ही महाराष्ट्राच्या इतिहासात निशितच नोंद घेण्याजोगी आहे, असे मला वाटते.

**– प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**
विभागप्रमुख, लोककला अकादमी
ganesh.chandan20@gmail.com



अश्विनी भोईर

# शिक्षक-विद्यार्थी बदलते नाते

**चौकोनी कुटुंबव्यवस्था, क्लास व स्टेटस सिम्बॉल जपणाऱ्या शाळांचं उदंड पीक, शिक्षणक्षेत्राचं बाजारीकरण, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, माहितीचा विस्फोट अशा अनेक कारणांमुळे आम्ही व आमच्या आधीच्या पिढीनंही शिक्षक-विद्यार्थी नात्यातील जे सौहार्द, जो जिव्हाळा अनुभवला आहे, अगदी ते सौहार्द आज जसंच्या तसं टिकून नसेल, पण काळानुसार या नात्यात जो अधिक मोकळेपणा, स्वातंत्र्य निर्माण झालं आहे, त्याचा स्वीकार आपल्याला करावा लागेल.**



***मूल*** जन्माला आल्यानंतर सर्वात आधी त्याचं सामाजिक भावविश्वाशी नातं निर्माण होत ते शाळेत. शाळेत जाताना आईच्या कडेवरच रडणारं मूल शिशुमंदिरातील बाईंचं बोट पकडून जीवनातील एका नव्या भावविश्वाला सामोरं जातं. तिथे त्या मुलाचं त्या बाईंशी म्हणजेच आताच्या भाषेत सांगायचं तर प्री-प्रायमरी टीचरशी नातं अगदी नेहमीच आई-मुलासारखं असेलचं असं नाही, पण आई-मुलाच्या नात्याच्या जवळ जाणारं असतं. आईच्या पंखाखाली असणारी माया, सुरक्षिततेची भावना व आवश्यक ती शिस्त असे काही समान धागे या नात्यात असतात. या पातळीवर आई आणि शिक्षिका या प्रतिमांची सरमिसळ आपल्याला दिसते. ज्यामुळे आपण आईला आपली पहिली गुरू वा शिक्षक असं म्हणतो तर तीच आई शाळेत जाताना रडणाऱ्या आपल्या मुलाला सांगते, 'तुझी टीचर तुझ्या मम्मासारखीच आहे. तुझी मम्मा कशी तुला नवीन नवीन गोष्टी शिकवते, चुकीचं काही केलं तर रागावते, खायचं कसं ते शिकवते. तसंच तुला शाळेत टीचर शिकवणार आहे.


या लेखात चर्चा करणार आहोत ती शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील सकारात्मक नात्याची, काळानुसार या नात्यात होत गेलेल्या स्थित्यंतराची. नातं बदलत गेलं असं म्हणण्यापेक्षा सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांसोबत नात्यातही स्थित्यंतरं होत गेली, असं म्हणणं उचित ठरेल. बदल होत असताना बहुतांश वेळा एखाद्या गोष्टीचा स्थायीभाव जाऊन नवं रुपडं, नवी ओळख मिळत असते, पण स्थित्यंतरं होत असताना काळाच्या टप्प्याबरोबर एखाद्या गोष्टीच्या स्थायीभावासकट इतरही काही गोष्टी मिसळत जाऊन ती गोष्ट प्रवाही राहते. हे प्रवाहीपण आपल्याला मानवी नातेसंबंधांमध्ये दिसते कारण तिथे आपल्या भावभावना गुंतलेल्या असतात. ही नाती रासायनिक प्रयोगशाळेतील रसायनांच्या नात्यांप्रमाणे नसतात. अमुक एका रसायनाचा अमुक एका रसायनाशी संयोग झाला म्हणजे काही अपवाद वगळता हेच निर्माण होईल, असे ठोकताळे मानवी नात्यांमध्ये बांधता येत नाहीत व नात्यांबद्दल सर्वसमावेशक विधानेही करता येत नाहीत. कारण प्रत्येक व्यक्ती वेगळी, त्या व्यक्तीची कौटुंबिक-सामाजिक, भौगोलिक पार्श्वभूमी वेगळी. त्यामुळे वर्गात शिकवणाऱ्या एका शिक्षकाच्या वर्गातील साठ

मुलांशी असणाऱ्या नात्याला बहुविध पदर किंबहुना अनेक पापुद्रे असतात. एकाच वर्गातील एखाद्या मुलाचं आपल्या शिक्षकांशी मित्रत्वाचं नातं असेल तर त्याच वर्गातील एखाद्या विद्यार्थ्याला तेच शिक्षक आपले शत्रूही वाटत असतील, इतका विरोधाभास आपल्याला या नात्यात व्यक्तिपरत्वे गवसू शकतो.

खरं तर काळानुसार कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक सर्वच नातेसंबंधांमध्ये आपल्याला स्थित्यंतरं झालेली दिसतात. मग शिक्षक-विद्यार्थी नातंही त्याला कसं अपवाद ठरेल. पुलंनी 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात उभारलेली चितळेमास्तरांची प्रतिमा आजही अनेकांच्या स्मरणात असेल. चितळेमास्तरांबद्दल लिहिताना लेखाच्या सुरुवातीलाच ते 'एके काळी' हे शब्द वापरतात. ज्यातून या प्रतिमेमागे काळाचे संदर्भ आहेत हे त्यांना सुचवायचे आहे. या लेखात ते चितळे मास्तरांबद्दल लिहितात, 'एके काळी आमच्या गावात पोराला एकदा बिगरीत नेऊन बसवले की ते पोर मॅट्रिक पास किंवा नापास होईपर्यंत आईबाप त्याच्याविषयी फारसा विचार करत नसत. कार्टे चितळे-मास्तरांच्या हवाली केलं आहे, ते त्यांच्या हाती सुखरूप आहे.' अशी ठाम समजूत असे. तर याच लेखाचा शेवट करताना आपल्या घराबाहेर राहिलेल्या चपला पाहून निवेदक म्हणतो कि एवढ्या झिजलेल्या चपला या नक्कीच चितळे मास्तरांच्याच असणार. पुलंनी लेखाची केलेली सुरुवात आणि अखेरीस निवेदकाच्या तोंडी दिलेली ही प्रतिक्रिया समाजातील शिक्षकांच्या प्रतिमेविषयी व शिक्षक-विद्यार्थी नात्याबद्दल बरंच काही सांगून जाते. नात्यात असलेला विश्वास, आपुलकी व आदर यातून व्यक्त होतो.

शिक्षकीपेशा म्हणजे खरं तर सेवाक्षेत्रातील एक क्षेत्र. जिथे व्यावसायिकतेपेक्षा आपण समाजाच्या उत्कर्षासाठी एक सेवा देत आहोत या भावनेतून काम करणं अपेक्षित असतं. किंबहुना, महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक वातावरणाचा विचार केला तर शिक्षक म्हणजे केवळ वर्गात येऊन पाठ्यपुस्तक शिकवण एवढ्यापुरतीच शिक्षकाची भूमिका मर्यादित राहिलेली दिसत नाही. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी समाजाच्या रोषाला न जुमानता समाजातील सर्व स्तरांच्या उत्कर्षासाठी शिक्षक म्हणून सेवा दिली. स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडं उघडली. फुले दाम्पत्याचा वारसा जपणारी भूमिका जेव्हा जेव्हा शिक्षकांनी बजावली आहे तेव्हा तेव्हा शिक्षक-विद्यार्थी नातं एका वेगळ्या आदर्श उंचीवर गेलेलं आपल्याला दिसतं. आजही समाजात आपल्याला अशी उदाहरणं सापडतात, हे आपलं सुदैव आहे. 'ग्रंथाली'तर्फे आयोजित केलेल्या विज्ञान एकांकिका स्पर्धांच्या कार्यक्रमात शास्त्रज्ञ पद्मश्री शरद काळे यांना ऐकण्याचा योग आला होता. आपल्या छोट्याशा गावातील शिक्षकांमुळे आपण कसे घडलो याविषयी ते अतिशय आत्मीयतेनं बोलले होते. आपल्या शिक्षकांनी ज्या पद्धतीनं आपल्याला डॉ. अब्दुल कलाम यांच्याविषयी माहिती सांगितली होती, ज्यामुळे आपण शास्त्रज्ञ व्हायचंच हे बीज आपल्या मनात शालेय जीवनात पेरलं गेलं, ती प्रेरणादायी आठवण त्यांनी मुलांना सांगितली होती. शिक्षक-विद्यार्थी नात्यातील ओलावा त्यांच्या आठवणीत जाणवला होता.

आजच्या काळात हे नातं नेमकं कसं आहे, हे आपण काही प्रातिनिधिक प्रतिक्रियांमधून जाणून घेणार आहोत. आजच्या पिढीतील मूल म्हणजे त्यांना कोणतेच संस्कार नाहीत, शिक्षकांबद्दल आदर नाही, प्रेम नाही; तर आजचे शिक्षक म्हणजे केवळ पाट्या टाकणारे शिक्षक, असे सरधोपट आरोप शिक्षक-विद्यार्थ्यांवर केले जातात. नेमकं काय घडत आहे हे विद्यार्थी-शिक्षक यांच्याकडूनच जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नववी-दहावीतील काही मुलींशी गप्पा मारताना त्या म्हणाल्या, आम्हाला माहीत आहे, टीचर आमच्यावर खूप रागावल्या तरी त्यांच्या मनात आमच्याबद्दल प्रेम आहे. आम्ही चुकलो तर त्या रागावतात आणि आमची चूक नसली तर इतर शिक्षकांदेखत आमची बाजूपण घेतात. पण काही टीचर उगाचच मुद्दामहून वर्गात आम्हाला इन्स्लटिंग वाटेल असं बोलतात. उगाच आमच्यामागे कटकट करत असतात, असे शिक्षक आम्हाला आवडत नाहीत. कोणतंही नातं निर्माण होण्याचा पहिला धागा असतो तो विश्वास. जिथे शिक्षक मुलांच्या मनात हा विश्वास निर्माण करण्यात यशस्वी होतात, तिथे एक सकारात्मक नातं निर्माण होण्याची बीजे पेरली जातात. आजची पिढी ही बरीच मोकळी आहे. आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करायला कचरत नाही. शिक्षकांबद्दल थेट चांगल्या-वाईट प्रतिक्रिया सोशल मीडियावरही देत असते. अर्थात, आजचे शिक्षकही सोशल मीडियाच्या काळातीलच आहेत, त्यामुळे तेही तितकेच चाणाक्ष असून मुलांशी आपण नेमकं कसं वागावं हे ते जाणतात. माध्यमिक वर्गात शिकवणारी माझी एक शिक्षक मैत्रीण यासंदर्भात म्हणाली की आज मुलांच्या हातात मोबाइल आहे. समोर संगणक आहे. आंतरजालाचा वापर त्यांना सहज करता येतो. त्यामुळे पुस्तकी ज्ञान, माहिती मिळवण्यासाठी त्यांना शिक्षकांची गरज उरलेली नाही. त्यात आता घरी अभ्यासाकडे लक्ष द्यायला कोणी नाही त्यामुळे सर्रास बालवाडीपासून मुलांना क्लासला घातलं जातं. त्यामुळे बराचसा अभ्यास अगोदरच क्लासमध्ये झालेला असतो, शाळेत येऊन शिकण्यासारखं फारसं काही राहिलेलं नसतं. बहुतांश मुलं शाळेत येतात ती मजा करण्यासाठी. प्रामाणिकपणे शिक्षक शिकवू पाहतात पण




ते ग्रहण करण्याची त्यांची मानसिकता नसते. त्यामुळे आज शिक्षकांना पाठ्यपुस्तकाबाहेर जाण्याची आवश्यकता आहे. शिक्षकाची भूमिका मार्गदर्शकाची असावी लागते. कधी कधी मुलांना शिक्षकांपेक्षा अधिक माहिती असते. तेव्हा शिकवताना आपलंच म्हणणं रेटण्यापेक्षा विद्यार्थ्यांना जे माहीत आहे ते सांगण्याची संधी देणं आवश्यक असतं आणि आपण केवळ मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहून शिकवावं लागतं.

एमएच्या (मराठी साहित्य) दुसऱ्या वर्षाला असणारी वनश्री विद्यार्थी-शिक्षक नात्याबद्दल बोलताना म्हणाली, पालकांप्रमाणे सांभाळणारे शिक्षक, आदरयुक्त भीती वाटणारे शिक्षक आणि आता मित्रत्वाच्या भावनेने विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देऊ पाहणारे शिक्षक असं शिक्षकांचं बदलतं स्वरूप मी अनुभवलेलं आहे. मला वाटतं हे विद्यार्थी बदलल्यानं होत असेल. सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान अपेक्षित नाही, तर त्या ज्ञानाचं उपयोजन अपेक्षित आहे. म्हणून आताचे शिक्षक मार्गदर्शकाच्या भूमिकेत दिसतात. तर मुलुंड येथील वझे-केळकर महाविद्यालयात द्वितीय वर्ष कला शाखेत मानसशास्त्र शिकणारी वेदिका नरवणे म्हणाली, माझं माझ्या प्रोफेरशी असलेलं नातं खूप प्रोफेशनल आहे, पण कोरडं नाही. मी मानसशास्त्राची विद्यार्थिनी असल्यामुळे असेल कदाचित पण आमचे प्रोफेसर आम्हाला सौहार्दपूर्ण वागणूक देतात. आमच्या मनातले गोंधळ, आमचे ताण ते जाणतात. शिक्षक व विद्यार्थी या नात्यात सहानुभूती आणि शिस्त यातील तोल ते उत्तमरीत्या सांभाळतात. मानसशास्त्र विषयाच्या सखोल अभ्यासाबरोबरच व्यावसायिक आयुष्यात कसं वागावं, याचेही धडे आम्हाला कळतनकळत आमच्या शिक्षकांकडून मिळत असतात. शिक्षक म्हणून एखादी गोष्ट लादण्याऐवजी समोरच्या विद्यार्थ्यांचा विचार करून शिकवण्यातून शिक्षक-विद्यार्थी नात्यात मोकळेपणा निर्माण होतो. शिक्षकांची ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे.

कवयित्री व शिक्षिका स्वाती भोईर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या, मी राजगुरू ह.म. पंडित विद्यालय, सफाळे, पालघर इथे तीस वर्षांपासून शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. मी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिकवते. मी ज्या भागात शिकवते तो भाग ग्रामीण आदिवासीबहुल आहे त्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांवर बोलीभाषेचा पगडा जास्त प्रमाणात आहे. सफाळ्यापासून पाच ते आठ किलोमीटर अंतरापर्यंत असणाऱ्या गावांमधून येणाऱ्या मुलांबाबत हे


सांगावसं वाटतं, की शाळेत ज्ञान मिळवण्यापेक्षा बऱ्याच विद्यार्थ्यांचा कल हा क्रीडा क्षेत्राकडे जास्त आहे. राकट-काटक शरीरयष्टी असणारी ही मुलं प्रेमळ आहेत. पालकांची शिक्षणाबाबतची उदासीनता जास्त प्रमाणात दिसून येते. इयत्ता पाचवीच्या आणि आठवीच्या वर्गांतील विद्यार्थ्यांमधला फरक असा दिसून येतो की पाचवीत जशी निरागस आणि बिनधास्त मुलं दिसतात, इयत्ता आठवीमध्ये ती तितकी निरागस दिसत नाहीत. त्यांच्यातला चुकीच्या पद्धतीचा बिनधास्तपणा वाढलेला दिसतो. माझ्या काळातील विद्यार्थी आणि आजचा विद्यार्थी यात नक्कीच फरक जाणवतो. तेव्हा आपल्याला शिक्षकांबद्दल खूप भीती वाटायची ती आदरयुक्त असायची. आता बहुतेक विद्यार्थी हे खूप मोकळेपणाने संवाद साधतात. आपण शिक्षकांसमोर बोलत आहोत याचं भानही कधी कधी त्यांना नसतं. इतके सरळ सरळ बिनधास्त बोलतात. विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांबद्दल प्रेम आहे, पण आदरयुक्त संस्कृती मात्र थोडी ढासळलेली लक्षात येते. सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतीत मात्र असं म्हणता येणार नाही कारण काही विद्यार्थ्यांना घरातूनच बाळकडू मिळालेलं असेल तर त्या विद्यार्थ्यांची मात्र वागण्याची बोलण्याची पद्धत नम्रपणाची असते. मोबाइल त्यांच्या भोवताली घेर धरून असल्यामुळे त्यांचं लक्ष अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडे जास्त वेधलं जात आहे. विद्यार्थ्यांना मोठ्यानं ओरडलं तरी लगेचच पालकांच्या तक्रारी येऊ शकतात, त्यामुळे शिक्षा करणं तर खूप दूरची बाब आहे. शाळेत विद्यार्थ्यांना वळण लागलं पाहिजे असा पालकांचा आग्रह असतो, परंतु आमचा मुलगा लाडाचा किंवा लाडाची मुलगी आहे हे सांगायलाही पालक विसरत नाहीत. अलीकडे विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टी प्रसारमाध्यमांद्वारे कळतात त्यामुळे आजची मुलं ही ॲडव्हान्स असणारी मुलं आहेत असं म्हणायला काही हरकत नाही. तरीही गुरुशिष्यपरंपरा जी अतिशय संस्कारक्षम आणि विश्वासू परंपरा आहे, म्हणून बदलत्या काळात शिक्षकांनी बदल अंगीकारला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कलेनं घेणं हे आजच्या दृष्टीनं मला महत्त्वाचं वाटतं.

विरार येथील विवा कनिष्ठ महाविद्यालयातून निवृत्त झालेले प्राध्यापक नारायण गिरप या विषयावर प्रतिक्रिया देताना म्हणाले, जवळपास ३५ वर्षं मी ज्ञानदानाचं कार्य करत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगाबद्दल असं म्हटलं जात की 'साऱ्या क्लासची जमते भट्टी कारण आजचा विद्यार्थी मार्कांशी करू पाहतो गट्टी आणि ज्ञानार्जनाशी घेऊ पाहतो कट्टी.' आजच्या स्पर्धात्मक युगात टक्क्यांचा पिंगा चालू असतो. यामुळे आमच्यावेळेस आमचं शिक्षकांशी जसं आपुलकीचं नातं असायचं तशी जवळीक आताच्या विद्यार्थ्यांशी निर्माण होत नाही, याची खंत वाटते. तरीही महाविद्यालयात शिकवत असताना विद्यार्थी माझ्याकडे छोटे छोटे कार्यालयीन प्रॉब्लेम घेऊन यायचे. ते सोडवण्यात मी त्यांची मदत करायचो, ज्यामुळे आमची मैत्री व्हायची व एक भावनिक नातं निर्माण व्हायचं.

शैक्षणिक क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव असलेले गिरपसर म्हणताहेत ते अगदी खरं आहे. आज विद्यार्थ्यांना प्रचंड मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावं लागतं आहे. तसंच, शिक्षकांवरही शिकवण्याव्यतिरिक्त अनेक कामांचं ओझं आहे. आपल्या आजूबाजूचं सामाजिक-सांस्कृतिक वातावरणंही बदललेलं आहे. चौकोनी कुटुंब्यवस्था, क्लास व स्टेटस सिम्बॉल जपणाऱ्या शाळांचं उदंड पीक, शिक्षणक्षेत्राचं बाजारीकरण, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, माहितीचा विस्फोट अशा अनेक कारणांमुळे आम्ही व आमच्या आधीच्या पिढीनंही शिक्षक-विद्यार्थी नात्यातील जे सौहार्द, जो जिव्हाळा अनुभवला आहे, अगदी ते सौहार्द आज जसंच्या तसं टिकून नसेल, पण काळानुसार या नात्यात जो अधिक मोकळेपणा, स्वातंत्र्य निर्माण झालं आहे, त्याचा स्वीकार आपल्याला करावा लागेल. शिक्षक-विद्यार्थी नातं आज व येणाऱ्या काळात अगदी आदर्श राहिलंच असं नाही; पण ते स्खलनशील होणार नाही, याची खूप मोठी जबाबदारी आपल्या सगळ्यांवरच आहे. कारण आजचा विद्यार्थी हे उद्याच्या भारताचं भवितव्य आहे.

**– अश्विनी भोईर**
ashwinibhoir23@gmail.com

॥ग्रंथाली॥




## गाव तिथे मानसोपचार

**मानसिक साक्षरतेची अभिनव चळवळ**

**मूल्य २५० रु.। सवलतीत १५० रु.**



डॉ. अनंत पां. लाभसेटवार

# न सांधलेली नाती
# लग्नकहर!

**हल्ली लग्नाचं माहात्म्य या देशात घटत आहे. दोन दशकांपूर्वी ५० टक्के तरुणतरुणी बोहल्यावर चढून संसार थाटण्यात आनंद मानत असत. आज ते प्रमाण २० टक्क्यांवर येऊन ठेपलं. तुलनेनं ६२ टक्के लोक जवळचे मित्र असणं बायको असण्यापेक्षा महत्त्वाचं समजतात.**



***अमेरिकेतल्या*** मुलामुलींना अलीकडे लग्नगाठ बांधण्यात फारसं स्वारस्य वाटत नाही. लग्नबेडी म्हणजे एक प्रकारचं स्त्रीवर लादलेलं दास्य अशी भावना झाली आहे. कुटुंबसुखामुळे आनंदी होण्याऐवजी मुली गृहिणीची भूमिका बजावण्यास संकोचतात. गर्भधारणा, स्वयंपाक, कपडे व धुणीभांडी आणि नवऱ्याला संतुष्ट ठेवण्याची अश्लाघ्य जबाबदारी बघून त्या संसार थाटण्यास भितात व एकटं राहणं पसंत करतात. तीन दशकांपूर्वी या देशात कधीही बोहोल्यावर न चढलेल्या स्त्रियांचं प्रमाण ५ टक्के असे. आता ते २९ टक्क्यांवर पोचलं आहे. खरं म्हणजे एकटं राहणाऱ्यांची संख्या प्रौढांमध्ये जवळजवळ निम्मी आहे. यात २९ टक्के कधीही लग्न करणारे, घटस्फोटित व विधवा आणि विधूर यांचा समावेश होतो.

इथे नवलाची बाब अशी की गृहिणी घरातली कामं कष्टाची म्हणून जी कारणं पुढे ढकलते ती खरी नसून एक निमित्त आहे. कारण आजकाल स्वयंपाकघराचा फारसा उपयोग केला जात नाही. एक तर तयार केलेली जेवणं गरम करून पुढे मांडण्यात येतात, नाहीतर रेस्टॉरंटमधून पदार्थ घरी मागवले जातात. आठवड्याच्या शेवटी तर जोडपी बाहेर जेवायला जाणं पसंत करतात. भांडी आणि कपडे धुण्याची यंत्र उपलब्ध असल्यामुळे ती कामं कितीतरी सुलभ व सुसह्य झाली आहेत. मग राहिलं झाडू लावण्याचं काम. त्यासाठी शास्त्रज्ञांनी एक यंत्र गृहिणींना देऊन संसाराचा बोजा कितीतरी हलका केला आहे. कळ दाबली की ते यंत्र पद्धतशीरपणे सगळं घर स्वच्छ करू शकतं. शिवाय चहा करण्यास, डोकं चेपण्यास आणि अंगमर्दन करण्यास चालतंबोलतं यंत्र उपलब्ध असतं. त्याला नवरा म्हणतात. एवढी ऐषआरामी असूनही संसार म्हणजे सक्तमजुरीची सजा असं म्हणणं सत्याला धरून नाही असं कुणीही म्हणेल.


हल्ली लग्नाचं माहात्म्य या देशात घटत आहे. दोन दशकांपूर्वी ५० टक्के तरुणतरुणी बोहल्यावर चढून संसार थाटण्यात आनंद मानत असत. आज ते प्रमाण २० टक्क्यांवर येऊन ठेपलं. तुलनेनं ६२ टक्के लोक जवळचे मित्र असणं बायको असण्यापेक्षा महत्त्वाचं समजतात. आणि ६७ टक्के लोक बायकोपेक्षा नोकरीला जास्त प्राधान्य देतात. म्हणजे अर्धांगिनी किंवा नवऱ्यापेक्षा मित्रमंडळी व नोकरी जीवनासाठी

निर्णायक ठरली आहे. या बाबतीत देव, कुटुंब व देश असा क्रम असे. आता ती सगळी आदरस्थानं उलथून पडलीत.

कुटुंबव्यवस्था मोडकळीस आली आणि देशासाठी रक्त सांडणारे वेड्यात मोजण्यात आले. त्यांची जागा मित्रमंडळानं व नोकरीनं घेतली. ही बदललेली मूल्यव्यवस्था देशाच्या भविष्याला घातक समजली जाते. भारतात मात्र परमेश्वर, कुटुंब व देश हा क्रम कायम आहे. अनंत अंबानीचं लग्न इथे टीव्हीवर दाखवण्यात आलं आणि वैदिक संस्कारानं नटलेला हा विधी बघून जनता विस्मयजनक झाली. न्यायाधिशासमोर कागदावर सह्या केलेलं लग्न जेवढ्या त्वरेनं होतं तेवढ्याच गतीनं मोडतं. म्हणजे लग्न हा या देशात एक अडगळीत पडलेला विधी झाला आहे. मातृत्वाचं किंवा पितृत्वाचं ऋण फक्त २० टक्के तरुण पिढी कबूल करते. या बदललेल्या, कुणी म्हणेल उलटच्या मानसिकतेचे, समाजावर दीर्घकालीन परिणाम होतात.

या सामाजिक परिवर्तनास स्त्री व समहक्काच्या चळवळी कारणीभूत आहेत असं म्हटलं जातं. त्या एकोणीसशे सत्तरच्या दशकात या देशात जन्माला आल्या. त्यांचा मूळ उद्देश व्यावसायिक महिलांविरुद्ध जो पक्षपात होई तो दूर करणं होता. राजकारणात त्यांना फार महत्त्व नसे. परंतु या चळवळी सरकारच्या पाठिंब्याशिवाय केवळ लिंगसमतेच्या लढ्यानं एवढ्या यशस्वी झाल्या की आज ५० राज्यातल्या १२ प्रांतांचे गव्हर्नर (म्हणजे आपले मुख्यमंत्री) महिला आहेत. २०२३ मध्ये अमेरिकेच्या लोकसभागृहात २९ टक्के सदस्य महिला होत्या. अजून स्त्री अध्यक्ष झाली नसली तरी उपाध्यक्षा आणि तीदेखील कृष्णवर्णीय झाली आहे.

वैद्यकीय व्यवसायात त्या अपवादात्मक असत. माझ्या अर्धांगिनीनं स्त्रीरोग व प्रसूती विभागात निवासी डॉक्टरसाठी अर्ज केला तेव्हा तिथले अधिकारी स्तंभित झाले होते. आता पुरुषांपेक्षा स्त्रिया या क्षेत्रात जास्त प्रमाणात आढळतात. स्त्रियांना महिला डॉक्टर जास्त आवडतात. दूरदर्शनावरील निवेदकाचं किंवा वार्ताहाराचं काम स्त्रिया क्वचितच करत. स्त्रियांनी निवेदित केलेल्या माहितीवर कुणी



विश्वास ठेवणार नाही असा त्यावेळी समज होता. आता टीव्ही क्षेत्रात त्यांचा भरणा एवढा वाढला आहे की पुरुषवर्ग मागे पडला. स्त्रिया वैमानिक होत नसत. आता त्यांनी या क्षेत्रात प्रवेश केला. इथे मात्र जनमानस अजून सुधारलं नाही. स्त्री वैमानिक हे प्रवाशांना कळलं तर त्यांची घबराट होईल म्हणून ती अबोल राहते. सर्व प्रक्षेपण पुरुष वैमानिक करतात. अर्थात हे लिंगसंक्रमण होण्यास फार काळ लागणार नाही.

अमेरिकन सैन्यात स्त्रियांना काही अपवाद सोडले तर सर्व दालनं खुली झाली आहेत. हेरगिरी क्षेत्रात स्त्रियांचा वापर मुख्यत्वेकरून युद्धात विरोधी जवानांमध्ये लालसा निर्माण करण्यासाठी केला जाई. इथे अमेरिकेची सेंट्रल इंटलिजन्स एजन्सी अग्रणी आहे. तिच्या संचालकपदी ट्रम्पनी जिना हासपेल नावाची महिला नेमून इतिहास घडवला होता.

याप्रमाणे स्त्रीवादी व स्त्रीहक्कांच्या चळवळी एवढ्या यशस्वी झाल्या की संस्थापक संघटना (National Organization For Women - NOW वगैरे) नामशेष झाल्या. त्यांची जरुरी राहिली नाही.

या स्त्रीवादामुळे व समहक्कांमुळे कलह लोप पावून सौख्य निर्माण झालं का? मुळीच नाही. त्यामुळे वेगळेच सामाजिक प्रश्न निर्माण झाले. याची अमेरिकेचं पदोपदी अंधानुकरण करणाऱ्या भारतासारख्या देशांनी दखल घेणं आवश्यक आहे.

दोन लिंगांमध्ये स्पर्धा सुरू होऊन पुरुष स्त्रियांचा हेवा करू लागले. स्त्रियांना अबला समजून प्रत्येक क्षेत्रात सबळ करण्यासाठी जे प्राधान्य देण्यात येतं ते पक्षपाती असं पुरुष म्हणतात. लिंगसमतोल ढळला कारण लैंगिक होकायंत्राची सुई स्त्रीवादामुळे त्याकडे वळून असंतुलन निर्माण झालं. पुरुष स्त्रियांच्या यशाचा हेवा व मत्सर करू लागले. १८ ते २९ या लग्नाळू वयोगटातली ४५ टक्के मंडळी स्त्रीवादाचा द्वेष करतात असं आढळून आलं.

या व्यक्ती व आत्मनिष्ठेचा एक भाग म्हणजे स्वेच्छेनं पत्करलेलं वंध्यत्व. ज्या स्त्रिया मातृत्वापासून दूर राहतात त्या त्यांच्या विवाहित भगिनींपेक्षा कमी सुखी व तृप्त असतात असं अमेरिकेत संशोधनांती सापडलं. कुटुंब नावाची जी सामाजिक संस्था आपण ओळखतो तिलाच अमेरिकेत व युरोपमध्ये तडा गेलेलं आढळतं.

या प्रक्षोभाचं दक्षिण कोरियात '4B' नावाच्या सामाजिक संघटनेत रूपांतर झालं. या चळवळीनुसार स्त्रियांनी लग्न, मातृत्व, प्रियाधारन व कामकृतीपासून दूर राहाणं व लग्नबद्ध झालेल्यांनी घटस्फोट घेणं अमलात आणावे म्हणजे विवाह ही संकल्पनाच त्यांनी मोडीत काढली. त्याचे समाजावर अपेक्षित परिणाम झाले. त्यामुळे देशातला प्रसवदर कमी झाला. म्हणजे प्रत्येक प्रजननक्षम स्त्रीमागे एकापेक्षा कमी अपत्य निर्माण झालं. लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी तो २:१ असावा लागतो. भारताचा त्यापेक्षा अंमळ जास्त असल्यामुळे आपली लोकसंख्या व मजूरवर्ग सारखा वाढत आहे तर पाश्चात्य देशांचा, चीन, जपानचा त्यापेक्षा कमी असल्यामुळे ती आक्रसत आहे. सरकारनं स्त्रियांना मातृत्व पत्करण्यासाठी पैशांची लालूच दाखवली, पण तिचा काही फायदा झाला नाही. लोकसंख्येचा आलेख सारखा खाली जात आहे.

ही चळवळ आता अमेरिकेच्या किनाऱ्यावर येऊन थडकली आहे. सध्याच्या तरुणपिढीतल्या ३३ टक्के लोकांनी आपण आयुष्यात दोनाचे चार हात कधी करणार नाही अशी भीष्मप्रतिज्ञा जाहीर केली. याचं कारण म्हणजे ५० टक्के घटस्फोट. लग्नमोडीची शक्यता एवढी असताना त्याच्या वाट्याला कशाला जा. शिवाय कौटुंबिक जबाबदारीला स्त्रिया व पुरुष भितात. ही आत्मकेंद्रित व स्वार्थी वृत्ती लोकसंख्या घटण्याचं मुख्य कारण. अनेक मुलींनी 'पुरुष' नावाच्या रोगापासून कायमचं दूर राहण्याचं ठरवलं. पण त्यांच्या कामेच्छांचं काय? अमेरिकन स्त्री अत्यल्प व घट्ट कपडे चढवून व सौंदर्यसाधनं वापरून नेहमी कामसज्ज असते अशी प्रतिमा हॉलिवूडनं जगभरात पसरवली. वास्तव वेगळं आहे. जवळजवळ ५० टक्के स्त्रियांनी वर्षभर तरी आपण शरीरसुखापासून लांब राहिलो असं सर्वेक्षणात कबूल केलं. ज्या कार्यरत आहेत त्यांनी ते सुख महिन्यातून एकदा किंवा त्यापेक्षा कमी अनुभवलं असं प्रांजळपणे म्हटलं. या प्रवृत्तीचा दक्षिण कोरियाप्रमाणे अमेरिकेच्या प्रजननदरावर अनिष्ट परिणाम झाला. अनेक दवाखान्यांत प्रसूती विभाग बंद करावे लागले. अमेरिकेनं जगातून मजूर आयात केले व आपली अर्थव्यवस्था पहिल्या नंबरवर ठेवली. परंतु संरक्षणदलात देशात जन्मलेले नागरिकच स्वीकारले जातात. त्यांची वानवा झाल्यामुळे पायदल, जलदल व वायुदलामध्ये हजारो जागा रिकाम्या राहिल्या.

आता नवीन पिढीनं हजारो वर्षांच्या लग्नाच्या प्रथेवर पाणी सोडलं. पाश्चात्त्य देशांत या पिढीनं एकटं राहण्याचं ठरवलं किंवा लग्न पुढे ढकललं. इथे भारतात व अमेरिकेत जो फरक आढळतो तो झोप उडवणारा आहे. आपल्या देशात वधूचं सरासरी वय १९.२ वर्ष. वयाच्या २५व्या वर्षापर्यंत ९५ टक्के मुली बोहल्यावर चढून संसाराला सुरुवात करतात. तेच लग्नाचं वय अमेरिकेत मुलींसाठी २८.४ तर मुलांसाठी ३०.२ वर्ष आहे. इथे महत्त्वाचं असं की २५ टक्के मुली आजन्म एकटेपणा पत्करतात. म्हणजे त्या कुमारिका असतात असं नव्हे.

बरं जे दोन हाताचे चार करण्याचं धाडस करतात, त्यांची लग्नजोडी निरगाठ न ठरता रेशीमगाठ ठरते. लग्न स्वर्गात आणि संसार पृथ्वीवर होतो यावर पाश्चात्यांचा विश्वास नाही.

प्रत्येकाच्या जीवनात उंचसखलपणा असतो. ऊनसावल्या सगळ्यांना अनुभवाव्या लागतात. तिथे निरगाठीची परीक्षा होते, पण रेशीमगाठ उसवते. अमेरिकेतली अर्धी लग्नं मोडतात हे सर्वांना ठाऊक आहे. भारतात ते प्रमाण ५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. पहिलं लग्न सरासरी ७-८ वर्षं टिकतं. त्यामुळे २५ वर्ष संसार करणाऱ्यांनी विक्रम केला असं इथे समजण्यात येतं. आपल्या देशात लग्नाचा ५०वा किंवा ६०वा वर्धापनदिन साजरा करणारे काही अपवादात्मक नाहीत. इथे त्यांचे फोटो वर्तमानपत्रात प्रसिद्ध होऊन त्यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात येतात. एवढी वर्षं संसार करण्याचं गमक काय म्हणून चॅनलवाले पृच्छा करतात व टीव्हीवर दाखवतात.

एकदा ठोकर बसली की मनुष्य हुशार होतो असं म्हणतात. परंतु लग्नाच्या बाबतीत ते खरं नाही. या देशातल्या प्रौढांमधल्या २५ टक्के लोकांनी दुसऱ्यांदा लग्नाची शपथ घेतलेली आढळते. त्यालादेखील भंगण्याचा शाप लागलेला. ते तर पहिल्यापेक्षा सुमारे एक वर्ष कमी टिकतं असं आढळून आलं. म्हणजे पहिल्या चुकीपासून कुणी फार शिकलेलं नसतं.

भारताच्या दीर्घकालीन लग्नप्रथेवर टीका करण्याचा मोह पाश्चात्त्यांना आवरत नाही. ९५ टक्के लग्नातले सगळेच जोडीदार सुखी नसून ते केवळ सामाजिक दडपणामुळे एकत्र राहतात असं ते म्हणतात. हे अंशत: खरं असलं तरी त्यातून भारतातली त्यागवृत्ती व कुटुंब अखंडत्व किती महत्त्वाचं आहे हे व्यक्त होतं. केवळ वैयक्तिक सुखासाठी लग्नमोड करून मुलांच्या आयुष्याकडे दुर्लक्ष करण्यात फक्त स्वार्थ दिसतो. पण मुलांचं भविष्य लक्षात घेऊन वैयक्तिक सुखाचा त्याग करण्यात अधिक धैर्य आहे असं आपली संस्कृती म्हणते. पाश्चात्त्य स्त्रीच्या अप्पलपोटेपणामुळे पिढीसातत्य खंडित होऊन त्याचे सामाजिक दुष्परिणाम कसे होतात हे ते दुर्लक्षित करतात. या देशात ७२ टक्के कृष्णवर्णीय व ४२ टक्के श्वेतवर्णीयांचे जन्म लग्नबाह्य संबंधातून होतात. ही आकडेवारी बोलकी आहे. कारण अशी पितृछत्र न लाभलेली मुलं उनाड होतात, शाळेला दांडी मारतात व गुन्हेगारीप्रवण असतात हे सिद्ध झालं आहे. कारावासात कृष्णवर्णीयांचं प्रमाण ३९ टक्के तर सामान्य जनतेत १३ टक्के आहे. परंतु तुरुंगवासाची शिक्षा भोगणाऱ्यांमधल्या ८० टक्के कैद्यांना बाप म्हणजे कुठला प्राणी हे ठाऊक नाही.

पाश्चात्त्यांच्या विस्कटलेल्या कुटुंबरचनेचे दूरगामी परिणाम गोचर होतात. सामाजिक स्थैर्य मृत्युशय्येवर पडलं आहे. इथल्या मोठ्या शहरांत गुन्हेगारीचं प्रमाण एवढं वाढलं आहे की रस्त्यावरून चालताना जीव मुठीत धरावा लागतो. जुलै ४ हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन. त्या सुटीत एकट्या शिकागोमध्ये मी तिथे असताना १०९ गोळीबार व १९ खून झाले. अशी युद्धसदृश परिस्थिती रणांगणावरदेखील सापडत नसावी.


मुलांपुढे स्वत:चं सुख महत्त्वाचं समजून लग्नमोड करणाऱ्या सर्वच स्त्रिया पुनर्लग्न न करता आयुष्यभर एकटं राहण्याचं ठरवतात. अशा जीवनशैलीत एकलपणाचा रोग उद्भवतो. या देशात पुरुष लग्नबद्ध होण्यास तयार असतात. परंतु ७२ टक्के स्त्रिया घटस्फोटाची मागणी करतात. त्यांच्या वाट्याला हा रोग येतो. तो एवढा बोकाळला आहे की अमेरिकेचा सर्वोच्च आरोग्य अधिकारी विवेक मूर्तीनं ही मानसिक पीडा धूम्रपानाएवढीच अनारोग्यकारी आहे असं नुकतंच खळबळजनक विधान केलं. एकलपणामुळे डोक्यात अनेक मानसिक रोग उद्भवतात असं तो म्हणाला. आत्महत्येचे विचार सारखे येतात. मतिमांद्यता ग्रासते. लग्न व मूलबाळ नाही म्हणजे आप्त नाहीत. आईवडील जन्मभर सोबत देऊ शकत नाही. त्यामुळे हा रोग अधिक गंभीर होतो. तुलनेनं विवाहितांचं मानसिक व शारीरिक स्वास्थ्य कितीतरी आरोग्यदायी असतं असं आढळून आलं. संसारी लोक अविवाहितांपेक्षा जास्त सुखी असतात. अर्भकाचं निर्व्याज हास्य, पिढीसातत्य राखण्याचं साफल्य आणि वाढदिवसानिमित्त कापलेला केक या सर्वांमुळे संसारसुख लाभतं. कठीण प्रश्न सुसह्य होतात. एकट्यांना ते दु:सह्य वाटतात. व्यावसायिक यशापेक्षा दोघांमधील अद्वैत व प्रेम जीवनाला बहर आणतात. याचा अर्थ लग्नबद्ध झाल्यानं स्वर्गसुख लाभून संसाराचे सगळे प्रश्न सुटतात असा नव्हे. परंतु त्यांना दोघांनी एकत्र भिडलं तर त्याचं निराकरण करण्याची शक्यता वाढते.

या देशात एकलपणाला सामाजिक मान्यता मिळाली आहे. तरी कायदे विवाहितांकडे झुकतात. उत्पन्नकराचे दर लग्नबद्ध जोडप्यांपेक्षा एकल राहणाऱ्यांमध्ये जास्त आहेत. याला लग्नदंड (Marriage Penalty) म्हणतात. तसंच वारसाहक्क कुटुंबाला अधिक अनुकूल आहेत. म्हणून या लोकांनी हे बदलण्याची मागणी केली. सध्या तरी सरकारनं तिकडे लक्ष दिलं नाही. कुटुंबव्यवस्था किडलेली असली तरी अमेरिकन लोक आपले अध्यक्ष लग्न केलेले असावेत अशी अपेक्षा करतात. अमेरिकेच्या इतिहासात घटस्फोटित अध्यक्ष कधी निवडून आला नाही हे विशेष.

भारतीय संस्कृतीला जे चिरंजीवीत्व लाभलं आहे ते पाश्चात्त्य संस्कृतीला मिळालेलं नाही. याचा अर्थ कालापरत्वे बदल झाला नाही असा नव्हे. परंतु आपल्या संस्कृतीचा पाया कायम राहिला. एकूण १२०० वर्षं पारतंत्र्यात घालवली तरी परकीय संस्कार देवघरात शिरले नाहीत. अमेरिकेत, युरोपी देशात व दक्षिण कोरियात तर ते केव्हाच स्वीकारार्ह झालं आहे.

**– डॉ. अनंत पा. लाभसेटवार**
anantlabh@gmail.com

# कविता



### धूसर आठवण

कॉफीचा सुंदर दरवळ
हळुवार थेट,
मेंदूतल्या कागदावर काहीतरी...
काहीतरी... रेखाटत जातो.
दूरवरच्या डोंगरावर
हिरवेगार गवत
कॉफीचा सुगंधवर डोलणारे,
त्या चवीत मिसळताहेत.
मग कुणाचीतरी आठवण
फोर्टमधल्या त्या हॉटेलातली
की मद्रास कॅफेमधली
Yes...
तिथलीच...
तेच टेबल कोपऱ्यावरचे
तेच दोन कप कॉफीचे
कागदावर ओलसर रंगातली पावले
शुभ्र, लाल, पिवळी, हिरवी
मध्येच एक निळी रेष,
डावीकडून उजवीकडे.
कॉफीचा धुरासोबत विरघळत
आठवणींचा एक एक घोट
एक एक क्षण मागेपुढे
कॉफी संपून जाते पण...
कपाच्या तळाशी कुठेतरी
थोडीशी कॉफी...
तशीच
किंचितशी तिची आठवण तशीच ठेवून
निघून जातो.
दरवळासारखा धूसर होत...!

**– प्रदीप म्हापसेकर**
pmpm007@gmail.com



### नंतर नंतर...

आठवणींची झाली अडगळ... नंतर नंतर!
अश्रूंचेही सुकले ओघळ...नंतर नंतर!

ओढ न उरली... भेटीचेही सरले अप्रूप,
स्पर्शामधली सरली सळसळ... नंतर नंतर!

कधीकाळची अखंड बडबड, कुठे हरवली?
हा मौनाचा अभेद्य कातळ... नंतर नंतर!

परस्परांना ठेच लागता.... रडू यायचे,
फक्त कोरडी उरली हळहळ,नंतर नंतर!

कळले नाही, बहर कधी ओसरला अपुला
मागे उरली फक्त पानगळ... नंतर नंतर!

**– सदानंद डबीर**
(९८१९९१७८४२०)




## अनाम नाते पुस्तकांशी!


मनकळत्या वयात मी खेळणी सोडून
पुस्तकांकडे झेपावायचे,
असे आई सांगते कधीतरी,
जेव्हा मी पुस्तकांच्या गराड्यात
बसलेली असते शांतपणे कोपऱ्यात.
मी पुस्तकावरची नजर काढून
तिच्या नजरेत नजर मिळवते
तेव्हा ती खूप कौतुकाने पाहत असते माझ्याकडे,
जशी लहानपणी पाहायची अगदी तशी!
अशा वेळेस मला कळत नाही की
पुस्तके बाजूला सारून
साधावा का तिच्याशी संवाद?
की तिच्याशी बोलावे हातातल्या पुस्तकाबद्दल?
मी विचारांच्या गर्तेत आणि तोपर्यंत ती,
लोडावर रेलून हातातल्या पुस्तकामध्ये गर्क!
आईवडिलांचे गुण मुलात उतरतात, असे म्हणतात.
ते दोघेही कायम पुस्तकातच रमलेले पाहिलेत मी.
अभ्यासाच्या पुस्तकातून बाहेर पडल्यावर
हातात पुस्तक पाहायला मिळत नाहीत, आजकाल
भल्याभल्या विद्वानांच्या घरीसुद्धा!
प्रचंड सुंदर सजावटीच्या घरात
टीपॉय असतो संपूर्ण रिकामा
वर्तमानपत्राशिवाय...
असे घर पाहून भडबडून येते मला.
पुस्तकांशिवायच्या घराचा
विचारच करू शकत नाही मी...
आणि माझ्या बाबतीत म्हणाल तर
माझ्या घरात पुस्तके आहेत,
हे सांगण्यापेक्षा
अभिमानाने मला सांगावेसे वाटते,
'पुस्तकांच्या घरात राहते मी!'

**– प्रतिभा सराफ**

pratibha.saraph@gmail.com



## चकचकीत सॉफिस्टिकेशन



मोबाइल घणाणत राहतो
कर्कश घंटानादासारखा
अन् सायलेन्स मोडवर पण
थरथरून कंपवातच आणतो अडवा
– बास्टर्ड!

सालं हे कसलं उठवळ आणि उथळ आयुष्य
कुणीही त्यात बरबटलेलं नाक खुपसावं
आणि कुणीही त्यात मुतून जावं
– बिनदिक्कतपणे, हक्कानं!

तिचा एसेमएस ही वाचते
अन् त्याचा मिस्ड कॉल तो बघतो
हे असले गैरविश्वासू संबंध
अन् संशयाचे महासमंध
नात्यांच्या वैराण माळावर
दात विचकत हिंडणारे!

लंपट, लघळ ई-मेलचा कडबा खाऊन
आपण आपलं रवंथ करत राहावं रात्रभर
चावून चोथा झालेल्या प्रेमाचा
आणि फेसबुकवर उडवत राहावेत
कलरफुल, सुबक, फोटोजेनिक बुडबुडे
छिनाल शब्दांचे आणि बाजिंद्या चेहऱ्यांचे!
कम्युनिकेशनच्या भल्यामोठ्या विद्रूप दगडांखाली
आपले हात आणि मेंदूही
चेपवून घेत जगावं-
बारा महिने, चोवीस तास!

मागे तो स्टीव्ह जॉब्ज गेला!
पण म्हणून आयपॅडवर थोडंच थांबलं-
आपल्या टेक्नोसॅव्ही नात्यांचं
हे चकचकीत सॉफिस्टिकेशन?

**– दिलीप पांढरपट्टे**

dilip.pandharpatte@gmail.com

## विश्वासघात

माझ्यासाठी
एक फूल जपून ठेवलं आहेस
म्हणाला होतास त्यावेळी
'योग्य वेळ आली की नजर करीन' म्हणालास ऐटीत
आश्वासन दिलं होतंस, त्याच्या अक्षय सुगंधाबद्दल

त्या विश्वासावर
एकेक पाऊल चालत राहिले
खूप काही सोसत राहिले

आज, देहलीदीप विझू येता
सांगतो आहेस, 'असं काही फूलबिल नव्हतंच'
काटेच होते इथलेतिथले गोळा झालेले
लपवले होते
तुला बोचू नयेत म्हणून
घेऊन जातोय तेच माझ्यासोबत...

**– उषा मेहता**
ushasmehta@gmail.com



## मरण

जास्त क्लेशकारक काय आहे
माणसाचं मरण
की त्या माणसाबरोबरच्या नात्याचं मरण?

माणसाचं मरण लक्ष वेधत येतं
बराच काळ गाजत राहतं
तो शोक, ती सांत्वनं
त्या प्रेतयात्रा, त्या शोकसभा
हळूहळू मृत्यू पचतो जीवलगांना
आणि जीवनाचे कोंभ रसरसून
डुलू लागतात वाऱ्यावर

नात्यांचं मरण विलक्षण
काही नाती कधी मेली
हेच कळत नाही
जेव्हा जाणीव होते
तेव्हा कलेवराशी केलेल्या शृंगाराने
येते शिसारी आपलीच आपल्याला
मॅकबेथच्या बायकोसारखी

मेलेल्या नात्यातली माणसं
तरीही जगत राहतात
ओढत राहतात त्या नात्याचं शव
सर्व ताकदीनिशी
कारण माणसांप्रमाणे नात्यांवर
नाही करता येत अंत्यसंस्कार
त्यांना ना पुरता येतं, ना जाळता

मेलेलं नातं हीच होते
मग त्यांची ओळख
मेलेल्या नात्याचे गातात ते गोडवे
आणि रोज काळजीपूर्वक
होतात बेभान, करतात वार
मेलेल्या नात्यावर नव्या ईर्ष्येने
बीभत्स आणि भयाण.



**– जान्हवी खांडेकर**
janhavip@yahoo.com



## वीण


झाडावरच्या पक्ष्यांचा किलबिलाट
पोरांचा गलबलाट
ओढ्याचा मंजूळ आवाज
सांज भरलेली अंगणातील मैफल
गावातील लग्नाच्या गोष्टी
समाजकारण, राजकारण
शेतकऱ्याच्या शेतावरच्या गप्पा
ज्वारीच्या कणसाचा हुरडा
आणि हिरव्या मिरचीचा ठेचा, वांग्याचं भरीत
गाव विणलं गेलं होतं
प्रेमाच्या धाग्यांनी...
सुखदु:खाच्या क्षणाला
एकमेकांसाठी धावून जायचं
आता गावं गिळंकृत केली शहरांनी
उरलं नाही अंगण आणि पक्ष्यांचा किलबिलाट
समाजकारण, राजकारण याची पाऊलवाट
जाते बाजारहाटात...
चार भिंतीच्या आत इडियट बॉक्सनं कब्जा केला
आणि हातातल्या खेळण्यांनी माणसाचा आवाज बंद झाला
कशिदा निसटावा तशी माणसाच्या नात्यातली
वीण हळुवार निसटत आहे
आणि माणूस माणसापासून
दूर पळतो आहे...

**– शिवकुमार आडे**
shiv67612kumar@gmail.com

## ऑक्सिजनचा रक्तगट

सायरनचे आवाज आणि सलाईनची लगबग
लसीची प्रतीक्षा आणि रेमिडीसीवरची धगधग
रुग्णवाहिकेचा भोंगा आणि पोलिसी शिट्ट्यांचा दंगा....
नातेवाईकांचा पाश आणि अखेरची श्वास धडपड
आप्तेष्टांचा हुंदका आणि शुभ्र कपड्यांची फडफड.
संसर्गाचा संग, संगे वेदनाशामक डंख
अश्रूंचा संपे साठा आणि रावाचा होई रंक.
रक्तचाचणीचा अहवाल आणि क्ष किरणांचे हाल.
रे निश्चेष्ट पडलेल्या भावा, कर ऑक्सिजनचा धावा...
लांबून दिसते स्मशान परि जळत नाही प्राण
दंडवत माझा माथी, लांबदूर थांबवी नाती
तुझ्या जगण्याची बहु ख्याती,
परि आज तुला नगरपालिकेची माती.

**– संजय कृष्णाजी पाटील**
sanjaykpatil1967@gmail.com



## नियम

नात निरखते आरशात चोरून
उगवते दोन दान
मागे बसलेल्या आज्जीची
तेव्हाच वळते मान
नातीवर ती पुन्हा ओरडते
आरशात अशी राहू नकोस
कपाटाच्या ऐन्यात सारखं
निरखून अशी पाहू नकोस
तरुण असताना मीही चोरून
पाहायची त्या आरशात
आणि कोपऱ्यातली माझी आज्जी
ओरडायची तेव्हा जोरात
डोंगरांचा त्या मोह सोड गं बाई
त्यातच आहे एक मोठी दु:खाची खाई
दुधासारखा पवित्र विचार तिथे पाहून यायला हवा
तरच जन्माला येईल पुरुष तुला हवा तसा नवा
तुझ्या वयाची होती तेव्हा
मला हे कळलं नाही
आज कळतंय सगळं संपल्यावर
पण वेळ परत फिरत नाही
एक लक्षात ठेव बाई आपल्या मनात कायम
पारा उडून जाणारच कधीतरी हाच असतो नियम
पारा उडून गेल्यावर उरते फक्त काच
आणि मग मनात आपल्या लागून राहते आच
तीच आत मनात कुणीतरी आरसा हा फोडावा

**– किरण येले**
kiranyele@gmail.com





## शून्य प्रहरात..

श्वासांना
गवसत जाते ना लय थोडी
तेव्हा, नावच होत जाते नावाडी,

आलेलो असतो आपण,
भर मध्य समुद्रात,
ना रात्र, ना पहाट अशा गहिऱ्या प्रहरात!
अजून नाव ठरायचे असलेल्या
संथ शहरात!

स्वत:चीही सोबत सुटू लागते,
नि जडत जाते,
त्याहून खोल,
त्याहूनही खोल
निळे नाते!

आता ना गर्दी, ना एकटे!
नाव संथ सरकत जाते!
शून्याच्या तलम रेषेवर
अवकाश वितळत जाते..

ना ऐल
ना पैल
अशा मौन मैफलीत
होत जातो आपण
आपल्याहीपासून दूर..
अनाहतातून
घुमत राही
ओंकार पूर!

**– प्रवीण दवणे**
भ्रमणध्वनी : ९८२०३ ८९४१४


## नात्यांचे सोस

नावीन्याची छाप
वठवली पुन्हा संसारी
अन् आठवले पुन्हा
जुने जर्जर भरजरी

नवलाईचे कुतूहल
दाटले पुन्हा गाभारी
नवरचना पुन्हा वस्तूंची
फडताळी जुळली दुहेरी
मागच्या रांगेत होतीच
धुळकट भातुकली सारी
पुढे रचली नवीकोरी

पाटी कोरी होत नसते
सारे खाक होत नसते
ऊर ढवळते प्रहरोप्रहरी
मोहरलेल्या श्वासांच्या
होतात करपट ढेकरी

स्वस्थ-अस्वस्थ बाराखड्या
आलटूनपालटून गाता
अनाकलनीय आकड्यांच्या
पाठोपाठ उजळण्या होतात
नात्यांच्या जळतात किनारी
करपतात नाती सारी सोनेरी





उगीच होत नसते काव्य
देह पेटतो हृदय जळते
मन जळून खाक होते
शब्द अर्धमेले होतात
तुटके-जळके-पोळके
शब्द सांगाडा बनतात
हाडांच्या पोकळ छातीने
लयीचे क्षेम देऊ पाहतात
शुष्क नाती केवळ उरतात

होरपळलेल्या शब्दांच्या
मग कविता होतात
पुन्हा तेच ते शब्द
नवी वर्णमाला बनतात
दुहेरी छंदाच्या, दुटप्पी ढंगाच्या
ज्वाला बनून हृदयास
रोज पुन्हा छळतात
पुन्हा पुन्हा छळतात...
तरी नात्यांचे कुठले सोस
तुम्हा आम्हास कळतात ?

**– लक्ष्मीमंगेश**
manerikarvs@gmail.com

## स्वतःशी बोलू थोडं !

घराशी बोलू थोडं
छताशी बोलू थोडं
भिंतींशी बोलू थोडं
मनाशी बोलू थोडं!

घरातील खाऊ थोडं
घराला देऊ थोडं
मुलांशी खेळू थोडं
स्वतःशी बोलू थोडं!

घरातच फिरुया थोडं
घरातच वाचू थोडं
घरातच खेळू थोडं
स्वतःशी बोलू थोडं!

घराला शोधू थोडं
मनाला शोधू थोडं
हरवलं शोधू थोडं
स्वतःशी बोलू थोडं!

वेळेशी जोडू थोडं
नात्यांना जोडू थोडं
जुनेपण आठवू थोडं
स्वतःशी बोलू थोडं!

**– मोहन काळे**
kalemohanm@gmail.com





## हायकू : नात्यांचे

प्रत्येक नात्यामधलं फुलपाखरू
घट्ट पकडून ठेवावं
हृदयामध्ये सर्वांसाठी जागा असते...

ओळख कुणाची कुठेही होते
नात्यांची गुंफण मजेशीर असते
ओवायचा धागा चाचपून पाहावा...

नात्यांना फक्त नावं देतो
अपेक्षांचे ओझे घेतो
पेलवेल का? ते नंतर ठरवावे...

शुद्ध अपेक्षा...सळसळतात पानं
एकमेकांचा हात धरून जाणं
प्रारंभाला न विसरणं...

कोरांटीशी नातं असतं
मोगरा व चाफ्याशीही असतं
दोन्हींच्या नात्यांमधून आपण चालायचं असतं...

भरतीच्या लाटा प्रसन्न करतात
ओहोटीच्या मन खिन्न करतात
नात्यांची तटबंदी आपण वाळूची बांधत असतो...

सगळ्यांशी पटलंच पाहिजे असं कुठे! (?)
मतलबी वागायचं नाही असं कुठंय्! (?)
नात्यांमधलं 'हेही' नातं खरं असतं...

काटेरी कुंपण टाळायला पाहिजे
जमलंच तर त्यावरून उडी मारली पाहिजे
या सर्व कसरती नाती शिकवत असतात...

कठीण असतं बुवा नाती जपणं
तोंड वेंगाडून हसत राहाणं
डोंबाऱ्याची दोरी सोप्पी असते...

आंधळी कोशिंबीर खेळ जमला तर ठीक आहे
अन्यथा पट्टी काढावी, दुसऱ्याला आऊट करावे
नात्यांच्या घरांवर 'इन, आऊट'ची पाटी असतेच...

नातं नातं कोवळं पातं
दळण दळायला घ्या बरं 'जातं'
दळता दळता आपलेही पीठ होते...

**– प्रदीप गुजर**
(मनकवी)



## रानफुलं

त्वचेच्या आत अगदी खोल
जन्मतःच म्हणे पेरलेल्या असतात रानफुलांच्या बिया.

जगण्याचे ऋतू मनातून झिरपतात,
पोचतात देहाच्या अणूरेणूपर्यंत.
तेव्हा उगवतात
रंगीबेरंगी रानफुलांची झाडं, वेली,
न कळताच आतल्या आत.

एखादा अनपेक्षित आनंदऋतू येतो आयुष्यात किंवा
पहाटस्वप्नं उतरतात सत्यात,
तेव्हा बहरून येतात
मनाच्या, देहाच्या आतली
अनेक रंगीत फुलझाडं.

त्वचेची सीमा पार झुगारून
देहभर रंध्रारंध्रातून उमलून येतात
रंगीत रानफुलं...
शहारे, रोमांच, गहिवर.

बहराचे ऋतू परतले तरी
उरतो मागे एक आठव
त्वचेच्या अगदी आतून
प्राणपणानं दरवळून आलेल्या फुलांचा...
आणि उतरते कागदावर
कविता.

**– माधुरी ताम्हाणे देव**
madhurideo227@gmail.com

## आई : ऑनलाइन–ऑफलाइन..

व्हिडिओ कॉलवर
ज्यावेळी बाळ रडताना दिसते लॅपटॉपवर,
अश्रू पुसण्यासाठी त्या कोकराचे, इच्छा असूनही,
तिचे मायाळू हात पुढे करणे आईला होतच नाही शक्य..

घरात कोणीतरी असतं म्हणा
पण बाळ रडायचे थांबेल तर ना;
आईला बघून ते आणखी जोमाने भोकाड पसरते
त्यालाही आईच्या कुशीत शिरता येत नाही अलगद, तळमळीने,
भारी किमतीच्या लॅपटॉपमधूनही.. हताश दिसते..

लॅपटॉपवर ऑनलाइन असतात उपलब्ध जगण्याचे मोठाले तंत्रज्ञान
आणि बरीचशी उपयुक्त कौशल्ये, इथे मात्र ते सारे बिग झीरो टर्न–अप;
तसे कार्पोरेट वर्ल्ड आहे एका उंच उन्नत शिडीसारखे
तुमचा आमचा जगण्याचा स्तर वाढवत नेणारे एक आश्वासक गिल्ड..
सोलार पॅनल्सनी आच्छादलेले..

दरम्यान आई आणि बाळ यांची भेट
कशी व्हावी थेट यावर व्हावे थोडे ब्रेनस्टॉर्मिंग..
ताटातूट घडवणारे थांबवायला हवे हे जोखीमभरले क्रॉसिंग.. सर्वत्र..

हा प्रसंग लॅपटॉपवर फक्त पाहता येतो, उकल त्याची जमत नाही
बरे, ऑनलाइन आता नेहमीसाठी राहिले नाही
आणि ऑफलाइन कामाच्या गराड्यात
बाळाचा तो नेमका फोटो सापडत नाही नजरेसमोर असायलाही..

आईपासून तुटल्यासारखे घरात होते बाळही सैरभैर
आईलाही विदीर्ण वाटते खरे, बाळाने स्तनपानापासून मुकणेही गैर
घर आणि दूरवर कंपनी, दोन्ही जगात ती जगते खूप काही अस्वस्थ..
बाळही कुठे आहे जरा तरी स्वस्थ..?
तिला खोल खलणारा प्रश्न करतो त्रयस्थ..
लॅपटॉप हळवा होऊन आता क्षणभर बोलला पाहिजे,
आई आणि बाळ दोघांना नव्या कार्पोरेट जगाचे सदस्य केले पाहिजे..

कंपनीला ऑनलाइन, बाळाला ऑफलाइन
अशी इनोव्हेटिव्ह ऑफर आईला दिली पाहिजे
मग ठरावीक कालावधीसाठी तरी बाळ लॅपटॉपवर हसताना दिसेल
नि 'आईपण' पाळण्यात रमताना..

परिणामतः ही रंगीत खेळणी फेर धरून नाचू लागतील.. घरभर छनछन!

**– सतीश लोथे**
satyamlotus@gmail.com

# ‘काहीतरी विशेष’चे दोन भाग







**सुहासिनी मालदे आणि शुभांगी पोवार यांच्याशी संवाद साधताना सुधा तुंबे**

ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित ‘काहीतरी विशेष’ कार्यक्रमाच्या पाचव्या भागात ‘ऑटिझम’ (आत्ममग्नता) या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईतील आशियाना इन्स्टिट्यूट फॉर ऑटिझम या संस्थेच्या संस्थापक व कार्यकारी विश्वस्त सुहासिनी मालदे यांना ३ सप्टेंबर २०२४ रोजी आमंत्रित करण्यात आले होते. लेखिका सुधा तुंबे यांनी सुहासिनी मालदे यांची मुलाखत घेतली. ‘ऑटिझम’ग्रस्त मुलांचे व त्यांच्या पालकांचे प्रश्न, समाजाचा दृष्टिकोन, ऑटिझमग्रस्त मुलांचे पुनर्वसन इत्यादी मुद्यांवर सुहासिनी यांनी मार्गदर्शन केले. सुहासिनी या मुळातील आर्किटेक व इंटिरिअर डिझायनर. परंतु, वैयक्तिक आयुष्यतील काही दुःखद घटनांमुळे आपण आपले उर्वरित आयुष्य समाजासाठी समर्पित करायचे असा निर्णय त्यांनी घेतला व त्याला त्यांच्या पतीचीही खूप मोलही साथ मिळाली. त्यांच्या एका मित्राच्या ऑटिझमग्रस्त मुलामुळे त्या या कामाकडे वळल्या आणि त्यातूनच ‘आशियाना’ या संस्थेची स्थापना झाली, असे त्या म्हणाल्या. ऑटिझमग्रस्त मुले ही अतिशय निरागस असतात. या मुलांकडे काय नाही, याचा विचार न करता त्यांच्याकडे कोणती कौशल्ये आहेत याचा विचार करून या मुलांना दिशा दाखवली पाहिजे, असे सांगताना त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या विद्यार्थ्यांचे विविध अनुभवकथन केले.

‘काहीतरी विशेष’ कार्यक्रमाच्या सहाव्या भागात, २ ऑक्टोबर २०२४ रोजी ‘मतिमंदत्व’ या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईतील देवराजी गुंडेचा पुनर्वास विशेष शाळेच्या मुख्याध्यापक शुभांगी पोवार यांना वांद्रे येथील प्रतिभांगण येथे आमंत्रित करण्यात आले होते. विशेष शिक्षण क्षेत्रातील बीएड पदवी संपादन केल्यावर शुभांगी यांनी पुनर्वास शाळेत शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि आज त्या त्याच शाळेच्या मुख्याध्यापक म्हणून शाळेचा कारभार पाहत आहेत. जवळपास गेली ३० वर्षे शुभांगी या विशेष शिक्षणक्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी मुलाखतीतून विशेष मुलांचे वर्तन, त्यांच्याशी शिक्षक-पालकांचा संवाद कसा हवा, विशेष मुलांचे पुनर्वसन कसे करता येते आदी मुद्यांवर मार्गदर्शन केले. तसेच, त्या म्हणाल्या की बौद्धिक अक्षमता असलेल्या ह्या मुलांच्या कौशल्यांना शाळेत प्रोत्साहन दिले जाते व मुले स्वावलंबी कशी बनतील यावर भर दिला जातो. विशेष मुलांसाठीचा पाठक्रम हा व्यक्तिगत असतो. त्या मुलाची प्रगती, क्षमता आदी गोष्टींचा अंदाज घेत विद्यार्थ्यांना घडवले जाते, ज्यात पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असते. तसेच, मुलांना शिकवताना गाणी, नृत्य आदी कलांच्या माध्यमातून शिकवल्यास त्यांच्यापर्यंत शिक्षण अधिक चांगल्या प्रकारे पोचते. विशेष मुलांना ‘अरे रे’ असे म्हणत दिल्या जाणाऱ्या सहानुभूतीची गरज नाही आहे, तर गरज आहे ती सहकार्याची आणि समाजाच्या निकोप दृष्टिकोनाची, असेही शुभांगी पोवार मुलाखतीत म्हणाल्या . लेखिका सुधा तुंबे यांनी नेहमीप्रमाणेच अतिशय सहजसुंदर शैलीत प्रश्न विचारून शुभांगी यांना बोलते केले.

•

दिव्यांग व्यक्तींच्या समस्या आणि पुनर्वसन
या विषयी प्रबोधन करणारे
**‘काहीतरी विशेष’चे** भाग पाहाण्यासाठी
**granthali pratibhangan**
या यूट्यूब चॅनेलला भेट द्यावी.
आणि तो सबस्क्राइब करावा.

## ऐल तटावर पैल तटावर – ललितगद्य विशेष




सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे

ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित 'ऐल तटावर पैल तटावर' या साहित्यविषयक कार्यक्रमाच्या सहाव्या भागात कवयित्री सुनंदा भोसेकर व लेखिका राणी दुर्वे यांनी शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ रोजी 'ललितगद्य विशेष भाग सादर केला. ललितगद्य म्हणजे काय, काळाच्या ओघात या साहित्यप्रकाराने कोणती वळणे घेतली, ललितगद्य लेखन करणाऱ्या लेखक लेखिकांच्या लेखनाची वैशिष्ट्ये, काही निवडक उताऱ्याचे वाचन असा अनेकविध बाबींनी वेध या कार्यक्रमात सुनंदा आणि राणी यांनी घेतला. पुलंच्या बेगम अख्तर यांच्यावरील लेखातील काही भागाचे अभिवाचन कार्यक्रमाच्या पूर्वार्धात करण्यात आले. इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत, वि.द. घाटे, रा.भि. जोशी, ना.ग. गोरे, माधव आचवल, महेश एलकुंचवार, सुरेश मथुरे, रेवा दुभाषी, दत्ता दामोदर नायक, शरदिनी डहाणूकर, रश्मी कशेळकर, मधुकर धर्मापुरीकर, विंदा करंदीकर आदींच्या ललितगद्यातील उताऱ्याचे अभिवाचन करत, त्यांना समकालीन असणाऱ्या लेखक–लेखिकांच्या लेखनाची वैशिष्ट्ये उलगडत ललितगद्य विशेष कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. संपूर्ण कार्यक्रम वाचकांना 'ग्रंथाली–प्रतिभांगण' या यूट्यूब चॅनलवर पाहता येईल.

•


॥ग्रंथाली॥




हा ध्यास जीवनाचा
शिल्पगंधर्व सदाशिव साठे यांचे आत्मकथन
सहलेखन–शब्दांकन
सतीश कान्हेरे

मूल्य ७५० रुपये
सवलतीत ४५० रुपये

राजा जाधव
यांचा जीवनप्रवास
दादर ते दादर
दादासाहेब दापोलीकर




मूल्य ७५० रुपये
सवलतीत ४५० रुपये

## कृष्णाकाठावरून – सांगली ते मुंबई पुस्तकाचे सांगली येथे प्रकाशन




**पुस्तकप्रकाशनसमयी सुरेश देशमुख, राजश्री देशमुख, जयश्री देशमुख, लेखक मोहन देशमुख, जयंत पाटील, कुमार केतकर, अशोक घोरपडे, अजित देशमुख आणि सुदेश हिंगलासपूरकर**

मुंबई येथील प्रकाशनानंतर, १४ सप्टेंबर २०२४ रोजी, मोहन देशमुख यांच्या 'कृष्णाकाठावरून – सांगली ते मुंबई' या आत्मकथनाचे दुसरे प्रकाशन सांगली येथील रोटरी क्लबच्या सभागृहात पार पडले. यावेळी कुमार केतकर, जयंत पाटील, सुदेश हिंगलासपूरकर, लेखक मोहन देशमुख, त्यांच्या पत्नी जयश्री, पत्रकार अशोक घोरपडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना घोरपडे म्हणाले, ''हे आत्मकथन लिहिताना देशमुखांनी केवळ कृष्णाकाठावरचे जीवन नाही, तर आयुष्याच्या विविध पैलूंचे वर्णन केले आहे. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या उक्तीची प्रेरणा घेऊन देशमुख म्हणतात, मी मिणमिणती पणती नाही, मला मशालीसारखं काम करायचं आहे.''

''ब्रिटिश कालखंडात स्वदेशी उद्योजकता टाटांनी आणली. त्याप्रमाणे पारशी समाज उद्योग निर्माण करण्यात अग्रेसर होता. त्या समाजाइतकेच श्रेय विविध उद्योग निर्माण करणाऱ्या किर्लोस्कर आदी सांगलीकर उद्योजकांना द्यायला हवे. त्या अनेकांत मोहनराव देशमुख एक आहेत,'' असे गौरवोद्गार यावेळी बोलताना कुमार केतकर यांनी काढले. ''जगन्मान्य खेळाडू नंदू नाटेकर, राष्ट्रीय विचाराचे हजारो कार्यकर्ते निर्माण करणारे क्रांती शहा, समाजभान राखत अनेक सामाजिक संस्था, कार्यकर्त्यांना अर्थ बळ देणारे सुनील देशमुख असे अनेक मान्यवर, समाजाला भूषण अशी व्यक्तिमत्त्वे सांगलीत झाली. त्यांच्या कार्याची दखल घेणारे सांगलीत काही उभे राहावे,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ''मोहन देशमुखांनी सांगलीच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील अशा अनेकांचा उल्लेख आवर्जून या कथनात करण्याचे मोलाचे काम केले आहे. त्यातून प्रेरणा घेऊन या साऱ्याची कहाणी सांगणारा सांगली जिल्ह्याचा स्वतंत्र, समग्र इतिहास लिहिला जावा. तसेच, मोहन देशमुख यांनी जीवनाबद्दलचा दृष्टिकोन यात मांडला आहे, तो आपण आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला तर वेगळी विपश्यना करावी लागणार नाही,'' असे म्हटले.

मोहन देशमुख यांनी लेखक म्हणून मनोगत व्यक्त केले. वडिलांची चिकाटी, नियमितपणा, त्यांचे संस्कार यांचा उल्लेख करून ते म्हणाले, की गरिबी आमचा कधी अडसर झाली नाही. त्याकडे आव्हान म्हणून पाहत आयुष्य जगण्याचे बाळकडू आई-वडिलांकडून मिळाले. यावेळी त्यांनी पुस्तकात लिहिलेल्या आठवणी जागवल्या.

जयंत पाटील यावेळी बोलताना म्हणाले, ''त्यांचा-माझा ऋणानुबंध इतका जवळचा आहे, की हे पुस्तक वाचायची गरज नाही. तरी ते वाचल्यावर त्यातले बारीक तपशील दिसतात. मोहनराव यांनी योग्य वेळी निवृत्ती स्वीकारली हे फार महत्त्वाचं आहे. ते समजणं महत्त्वाचं आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहणं हे त्यांचं दुसरं स्वभाववैशिष्ट्य आहे. ते राजकीय विचारधारेपासून अलिप्त राहिले, एका अंतरावर राहिले तरी सर्वांशी त्यांचे सलोख्याचे संबंध राहिले. त्यांचं हे पुस्तक समृद्ध जीवनात काय काय करता येतं आणि दुसऱ्यांच्या जीवनात आनंद वाटण्यासाठी कसं जगावं, यांचं भान देतं म्हणून प्रत्येकानं ते वाचायला हवं,'' असे उद्गार काढले. ●

दीपावलीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा

IDBI BANK

# आयडीबीआय बँक


प्लॉट नं. १ व २, कोहिनूर भवन,
दादर रेल्वे स्टेशनजवळ, स्वामी नारायण मंदिरासमोर,
दादर (पूर्व), मुंबई-४०००१४

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**माझे इंद्रधनू**
**दिनेश अडावदकर**



**तरल संवेदनांचा भावपूर्ण आविष्कार**

'मी माझे इंद्रधनू मनात रेखित होतो
अन् क्षितिजावरती पाऊल टाकीत होतो
हसरी ती पहाट होती केवळ माझी
किलबिलती गाणी माझीच होती वाणी
उधळीला चहुकडे गुलाल वेचित होतो'

इंद्रधनू म्हटले की आपल्याला सप्तरंगांची मैफल समोर दिसू लागते. प्रत्येक रंग वेगळा तरी एकमेकांच्या हात हातात घेतलेला. या रंगांना ठाऊक असते की खरी प्रतिमा बिंबवायचे तर आपल्याला सोबत असायला हवे. कवीसुद्धा हा एक इंद्रधनुचाच दूत असतो, जो आपले रंग भावनांतून, संवेदनातून प्रकट करत राहतो. कवी दिनेश यांचा 'माझे इंद्रधनू' हा कवितासंग्रह याच भावनांचे आणि संवेदनांचे इंद्रधनू आहे.

या संग्रहात एकूण ४० कवितांचा समावेश आहे. यात विविध भावना आणि संवेदनांचा तरल असा आविष्कार आपल्याला वाचायला मिळतो. निसर्ग हा जसा बाहेर दिसतो तसाच तो कवीच्या अंतरंगातही विसावलेला असतो आणि म्हणूनच त्यांच्या कवितेतून निसर्गाची विविध रूपे आपल्याला दिसू लागतात. पाऊस आहे जो सगळ्यांचा जीवनदाता म्हणून आपण पाहतो, परंतु कवीला त्याची अनेक रूपे दिसू लागतात. तो येतो तेव्हा इंद्रधनुष्य सोबत घेऊन येतो आणि वाट पाहायला लावतो तेव्हा उंबरठ्याचे इंद्रधनुष्य त्याच्याकडे डोळे लावून उभे राहते. अनेक रूपके कवीने समोर केलेली आहेत. 'छत्री उलटीपलटी झाली पण आयुष्य सरळ झालं, हे काय कमी आहे?' यातच कवीचे मन पावसाशी नव्हे तर जीवनाशी एकरूप झालेले दिसून येते. फुलांचे उमलणे जसे सहज आहे तसेच त्यांचे निर्माल्य होणेदेखील, परंतु या फुलांच्या सोबत असणारे काटे हे मात्र कधीही निर्माल्य होऊ देत नाहीत. स्वतःचे तसं झाडालाही वाटते कोकिळेसारखे आपल्याला गाता यायला हवे.

प्रियेचा अबोला, विरह हा एक मनाचा हळवा कोपरा. एका बाजूला अत्तर असते तर दुसऱ्या बाजूला विषारी फुत्कार असतो. एका बाजूला आभाळ गच्च दाटून आलेले असते तर दुसऱ्या बाजूला मन तितकेच डहळून झालेले असते. मिठीत एका बाजूला अंतरीची आग विझते तर विरहात तीच आग मनाला जाळत जाते. तर दिलासा देणारा भाग म्हणजे, प्रियेचा हात हातात असताना समाजभानाचे काळोखही तपासून पाहावे लागतात. मातीमध्ये मिळून जाऊ, तृण इवलासा होऊनी उगवू, एका थेंबामध्ये मिसळू, लाट भरतीची होऊन उसळू, अशी आशेची एक सुंदर लय ओठावर आपोआप येते. त्या अर्थाने 'सल', 'आषाढ सरी', 'तूच तू', 'चंद्र' अशा कविता आपल्या मनात सहज रुंजी घालू लागतात.

कवी कल्पनेच्या भरारीतही सध्याचे वास्तव विसरू शकत नाही. कवी कृष्णालाच त्याची जाणीव करून देतात, की कुरुक्षेत्रावर तू जे काही केलंस ते आजही घरोघरी शिल्लक आहे. आता जग चालवणे तितकेसे सोपे राहिलेले नाही. तीच गोष्ट आपल्या आजूबाजूला असणारे अनेक प्रश्न, जे सोडवण्यासाठी हल्ली एक हत्यार उपसले जात आहे. ते म्हणजे उपोषण. त्यावरही कवी भाष्य करतात. 'तृण पाते', 'आनंदसोहळा', 'निरोप', 'नवे वर्ष', यासारख्या कविता कोरोना, राममंदिर, गणपतीसोहळा या शतकातील प्रमुख घटनांकडे ते लक्ष वेधतात.

एक ऋजू आणि भक्तिमय भाव आपल्याला विठू माऊली मध्ये अनुभवायास मिळतो. 'विठ्ठलाच्या रूपे दिसे आज आई, डोळ्यातले पाणी आवरी रखुमाई'. या भावातून अनेक संतांची सुमधुर अभंगांची वचने नजरेसमोर उभी राहतात. कवी बालपणाकडेही तितक्याच तरलपणे पाहतात. लहान मुलांना मोठं होण्याची घाई असते तर मोठ्यांना लहान होण्याची आस लागते. याचे सुंदर उदाहरण 'इंजेक्शन' या कवितेमध्ये आपल्या अनुभवास येते.

या संग्रहातील कविता वाचत असताना अनेक रूपकांचा, उपमांचा प्रत्यय आपल्याला येतो तसाच या कवितेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही लक्षात येतो. कवितेची अनेक रूपे सादर करताना ती कधी गझलच्या जवळ जाते तर अभंगाचा नाद आपल्यात एकरूप करून घेते. त्यामुळे वाचत असताना आपोआपच त्यांचा ताल आपल्या ओठावर येतो आणि त्याचवेळी अनेक कवितांचे संदर्भ आपल्यासमोर उभे राहतात. कवी आपल्या कवितांच्या बाबतीत जागरूक आहेत हेही जाणवत राहते. परंतु त्यामध्ये कुठेही ओढाताण नाही. तर एक सहज तरलपणा त्यातून प्रवाही पद्धतीने साकारलेला आहे. छंदबद्ध आणि आताच्या सांगीतिक भाषेत बोलायचे झाले तर मीटर मध्ये असलेल्या या कविता आहेत. यांचा सुंदर अल्बम देखील होऊ शकतो. या कविता मुळाततच फुलासारख्या फुलून आलेल्या आहेत त्यांना सोबत आहे ती सुंदर आणि भावणाऱ्या रेखाचित्रांची.

दिनेश अडावदकर हे आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमात व सांस्कृतिक क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहिलेले आहेत. साहित्य, संगीत, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या मुलाखती त्यांनी घेतलेल्या आहेत. अनेक मान्यवर दिवाळी अंक तसेच नियतकालिकांमधून त्यांच्या कविता व लेख प्रसिद्ध झालेले आहेत. मालिकांसाठी शीर्षकगीतांचे लेखन त्यांनी केलेले आहे.

प्रा. संध्या शहापुरे यांनी या संग्रहाचा घेतलेला रसास्वाद खूप सुंदर आहे. तो प्रस्तावना स्वरूपात या संग्रहाला लाभलेला आहे. तसेच उषा मेहता यांनी कवी आणि कवितांना दिलेल्या शुभेच्छा सोबत आहेत. कवीने स्वतःचे व्यक्त केलेले मनोगत हे त्यांच्या जडणघडणीचा संस्कार स्पष्ट करतात.


संग्रहातील सुंदर रेखाचित्रे डॉ. भाऊ दांदडे यांनी रेखाटलेली आहेत. तर मुखपृष्ठावरील सुंदर भाव सतीश भावसार यांनी साकारलेला आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**प्रवरेचा दाता**

**दादासाहेब रुपवते**




**एका कालखंडाचा साक्षीदार**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि आपल्या सर्व समाजबांधवांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली, ही ऐतिहासिक घटना आपल्याला ठाऊक आहे. केवळ १९५६ साली नागपूर येथे झालेला हा समारंभ तिथेच संपलेला नाही तर तो पुढेही अव्याहत चालू राहिला. हा सगळा इतिहास ज्यांनी स्वतः पाहिला, अनुभवला किंबहुना एक सहकारी साथीदार म्हणून सहभाग नोंदवला असे दामोदर तात्याबा ऊर्फ दादासाहेब रूपवते हे त्यापैकी एक होत. त्यांनी तो संपूर्ण कालखंड, सामाजिक व राजकीय घटनाक्रम आपल्या नजरेतून मांडलेला आहे. तो ऐवज म्हणजे 'प्रवरेचा दाता'.

दादासाहेब रूपवते हे नगर जिल्ह्यातील अकोला इथले. त्यांचे बालपण तेथेच गेले. पुढे नाशिक, मुंबई इथे त्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली. यामध्ये नाशिकचे दादासाहेब गायकवाड यांचा मोलाचा वाटा आहे तसाच मुंबईत डॉक्टर बाबासाहेब यांचाही मदतीचा मोठा वाटा आहे. दादासाहेबांनी उच्च शिक्षण घ्यावे आणि त्यात घरची परिस्थिती आड येऊ नये यासाठी बाबासाहेबांनी केलेली मदत फार मोलाची ठरलेली आहे. डॉ. बाबासाहेबांचा जवळून लाभलेला सहवास, त्यांची कार्याची धडाडी, समाजाविषयी असलेली आत्मीयता, यातून दादासाहेबांना प्रेरणा तर मिळालीच याशिवाय खूप काही शिकायला मिळाले. त्यांचा तो वारसा त्यांनी अतिशय तळमळीने, आंतरिक प्रेरणेने पुढे चालवलेला आहे तो त्यातूनच.

राजकारण हा विषय वाटतो तितका सोपा नाही. त्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात, अनेक व्यूह रचावे लागतात, आपल्या सर्व नेत्यांचा–सहकाऱ्यांचा विचार करावा लागतो. या सगळ्यात आपली स्वतःची –पक्षाची शक्ती किती आहे हे महत्त्वाचे असते. त्यामुळेच रिपब्लिकन पक्ष चालवताना अनेक आघाड्यांवर काम करावे लागले, या पक्षाची धुरा समर्थपणे वाहून त्याचे अस्तित्व कायम राहील याची काळजी घेतली, यात दादासाहेबांचा वाटा नक्कीच लक्षणीय आहे.

राजकारणामध्ये स्वतःच्या तत्त्वांना मुरड घालून तडजोड करायची काय, हा एक मोठा प्रश्न नेहमीच समोर येतो. दादासाहेब रूपवते यांनी आपल्या तत्त्वाला कधी मुरड घातलेली नाही. खुद्द डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सल्लासुद्धा त्यांनी आपल्या तत्त्वासाठी नाकारलेला आहे. १९६८ साली विधान परिषदेवर ते निवडून गेले ते काँग्रेसच्या सहकार्याने. विधान परिषदेमध्ये काँग्रेसच्या मार्फत राजकीय तडजोड करण्यास भाग पडण्याची वेळ आली तेव्हाही दादासाहेबांनी आपल्या तत्त्वाला तिलांजली दिलेली नाही. अर्थात त्यासाठी त्यांना त्याची राजकीय किंमत मोजावी लागली. यातून दादासाहेबांचा स्वतःच्या निर्णयावर ठाम राहण्याचा गुण लक्षात येतो.

वकिलीपेशा स्वीकारल्यानंतर कायम त्यातच राहता दादासाहेबांनी आपली चळवळ, आपला पक्ष, आपल्या समाजबांधवांची प्रगती याकडे अधिक लक्ष दिलेले आहे. त्यांना अमेरिका आणि लंडन येथे उच्च शिक्षणासाठी जाण्याची संधी मिळाली परंतु तब्येतीच्या कारणास्तव त्यांना ही संधी सोडून द्यावी लागली. दादासाहेबांनी भूमिहीन सत्याग्रहात भाग घेऊन त्यांचे अध्यक्षपद भूषवले. भारतीय बौद्ध महासभेचे उच्चपद भूषवले. जिल्हा परिषद शैक्षणिक बोर्डाचे अध्यक्षपद भूषवले. त्याहीपेक्षा त्यांचे खरे कार्य दिसून येते ते डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या प्रबुद्ध भारताचे संपादकत्व आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सुरू केलेल्या विश्वकोशाच्या संपादकानाचे कार्य.

दादासाहेबांनी राजकीय–सामाजिक कार्य केले त्यांची ओळख 'प्रवरेचा दाता' या ग्रंथात वाचायला मिळते. परंतु त्यांचा पिंड हा जसा पहिलवानकीचा होता, कलावंताचा होता, तसाच आपल्या भोवतीच्या निसर्गाकडे पाहणाऱ्या रसिकाचाही होता. अकोला या परिसराला लाभलेला भौगोलिक वरदहस्त, या भागातून वाहणाऱ्या पंचगंगा त्यांचा इतिहास, आध्यात्मिक पार्श्वभूमी आणि लाभलेली तीर्थक्षेत्रे यांचा जो परिचय ते करून देतात तो त्यांच्या रसिकत्वाचा एक भाग आहे. दादासाहेब ज्याप्रमाणे आपल्या समाजबांधवांचा, जातींमध्ये असलेल्या पोटभेदांचा परिचय करून देतात, तसाच आपला कौटुंबिक वारसा आणि परिस्थिती यांचाही परिचय करून देतात. मुलांचे शिक्षण उत्तम झाले आणि ते आपल्या उच्चस्थानी विराजमान झाले यात आपले कर्तृत्व नसून मुलांच्या आईने हे सगळे केलेले आहे, हे ते कृतज्ञतापूर्वक नमूद करतात. आपल्या मुलांचे विवाह आंतरजातीय आहेत हे सांगताना त्यानिमित्ताने आलेले अनुभव खूप मनोरंजक आणि तितकेच उद्बोधक आहेत. यातून सामाजिक दृष्टीच व्यक्त होते असे नाही तर मुलांचाही संस्कार त्यातून स्पष्ट झालेला आहे.

'प्रवरेचा दाता' हे पुस्तक आत्मचरित्रात्मक असले तरी त्याची मांडणी सलग अशी प्रकरणनिहाय नसून समोरच्याशी बसून संवाद साधतो आहोत इतका सहजपणा यात भरलेला आहे. यात आपले स्वतःचे मोठेपण मिरवण्याचा किंवा मी मी सांगण्याचा नसून एक कार्यकर्ता, एक कुटुंबवत्सल कुटुंबकर्ता आणि मनात असूनही कलावंत होता आले नाही तरीही रसिकत्व जपलेला एक रसिक म्हणून ते आयुष्याच्या उत्तरार्धात आपल्या आयुष्याचा पट सोयीप्रमाणे उलगडताना दिसतात. यातले व्यक्त होणे हे प्रामाणिक, प्रांजळ आणि तितकेच उत्स्फूर्त आहे. त्यामुळे संपूर्ण ग्रंथ वाचून होतो तेव्हा दादासाहेब रूपवते यांची एक गाथा संपूर्णपणे आपल्यासमोर उभी राहते.

त्यांचे चिरंजीव ॲडव्होकेट संघराज दादासाहेब रूपवते आणि सुशीलाबाई दादासाहेब रूपवते यांनी, दादासाहेबांच्या मृत्यूपूर्वी त्यांनी ऑडिओ कॅसेटवर कथन केलेली ही गाथा त्यांच्या २५व्या स्मृतिदिनी प्रकाशित करण्याचे औचित्य साधलेले आहे. त्यांच्या मनोगताप्रमाणे 'बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे शिलेदार दामोदर तात्याबा ऊर्फ दादासाहेब रूपवते यांचे व्यक्तिमत्त्व व आयुष्य हा प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री यांचा अपूर्ण संगम होता. अनेक विस्मयकारी आणि संघर्षपूर्ण घटनांनी त्यांचा जीवनप्रवास उद्बोधक व प्रेरणादायी ठरला.' सदरची आत्मगाथा पुढच्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल याची सूचकता या मनोगतात आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रकाश पारखे, संगमनेर यांनी सजवलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

## गावाकडच्या गोष्टी

### अर्जुन वेलजाळी




**मृद्गंधात माखलेली स्मरणयात्रा**

अनेकदा शिक्षण, नोकरी व अन्यकारणाने ग्रामीण भागातून शहरी भागात आल्यानंतर मनुष्य सिमेंट-काँक्रीटसारखा शहरी भागाचा एक भाग होऊन राहतो. परंतु तो ज्या मातीतून आलेला आहे त्या मातीचा गंध त्याला कधीही सोडत नाही. अशा नाळ जुळलेल्या लेखकांचे लेखन हे कितीही शहरी अत्तराने न्हाऊ घातले तरी त्याचा मृद्गंध आपले अस्तित्व टिकवूनच धरतो. अर्जुन वेलजाळी हे एक लेखक असेच या मृद्गंधात न्हाऊन निघालेले आहेत. तो संपूर्ण दरवळ बाह्यअंगी नसून अंतरंगातसुद्धा मि सळलेला आहे. म्हणूनच त्यांचे 'गावाकडच्या गोष्टी' हे आत्मकथन वाचत असताना सतत तो गंध आपल्या भोवती दरवळत असल्याचे जाणवत राहते.

'गावाकडच्या गोष्टी' हे अर्जुन वेलजाळी यांचे आत्मकथन आहे. आत्मकथन लिहिताना अनेकदा लेखकाकडून आत्मप्रौढी, परिस्थितीचे गांजलेपण आणि शहराविषयीची वाटणारी ओढ यांचा भरणा अधिक असतो; परंतु अर्जुन वेलजाळी हे त्याला अपवाद आहेत असे म्हणावे लागेल. आयुष्याचा उमेदीचा काळ शिक्षकी पेशाच्या निमित्ताने त्यांना शहरात व्यतीत करावा लागला हे खरे. परंतु या काळाविषयी किंवा त्या संपूर्ण कालखंडातील अनुभवाविषयी ते पायात बेडी घातल्यासारखे गुंतून पडलेले नाहीत. तर त्यांनी घालवलेला बालपणीचा कालखंड आणि त्यावेळेसचे अनुभव यांना जसे प्राधान्य दिलेले आहे तसेच कृषिसंस्कृतीमध्ये असणाऱ्या अनेक टप्प्यांचा व अलीकडे नामशेष होत चाललेल्या शब्दांचा व संस्कारांचा त्यांनी आवर्जून या लेखनामध्ये समावेश केलेला आहे. हे लेखन वाचत असताना प्रामुख्याने लेखकाचा हळवेपणा आणि संवेदनशीलपणा यांचा प्रत्यय बहुतेक प्रसंगांतून अनुभवास येतो. साळुंकी नावाच्या पाखराला झालेली इजा, खारुताईच्या गोजिरवाण्या निरागस व स्वच्छंदी पिल्लाची व चिमणीची झालेली हत्या, अशा तीन घटना घडल्या त्या अजाणतेपणाने. तरीही त्यांचा ओरखडा लेखकाच्या मनावर आजही कायम आहे, शालेय वयापासून. त्याचप्रमाणे एसटीच्या बसमधून आपण विनातिकीट प्रवास केला याची लागलेली बोच ते विसरू शकलेले नाहीत. थोर साहित्यिकांच्या स्वाक्षऱ्या घेणे ही जिज्ञासू वृत्ती लेखकाजवळ आहेच. सुप्रसिद्ध साहित्यिक उत्तम कांबळे यांची स्वाक्षरी त्यांनी घेतली परंतु ती घेत असताना त्यांच्या मनात उठलेल्या आंदोलनाचे हिंदोळे कुठल्याही बालसुलभ हळव्या वृत्तींना शोभणारे आहेत. आपल्या वाचनाच्या छंदापाठी अरुण शेडगे यांच्यासारख्या ज्या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्याविषयीचे कृतज्ञता त्यांच्या मनात कायम आहे. आपल्या शिक्षकी पेशाला साजेसे आणि आपल्या छंदाचा विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा या उदात्त हेतूने त्यांनी 'वर्ग वाचनालय' ही संकल्पना राबवली, ती अभिनवच म्हणायला हवी.

लेखकाच्या मनातील एसटीविषयी कृतज्ञ भावना नक्कीच जाणवणारी आहे. शालेय काळात एसटीतून येणारे जेवणाचे डबे हे केवळ डबेच नव्हते तर दूर असलेल्या आईवडील यांचा आणि लेकरांचा संवाद साधणारे एकमेकांना निरोप देणारे माध्यम म्हणून या एसटीचा मोठा वाटा आहे. त्याविषयी ते लिहितात, 'एसटी केवळ आमच्या जेवणाच्या डब्यांची ने-आण करत असे नव्हे, तर ही एसटी म्हणजे आमचे कुटुंब व आम्ही यांच्या संवादातील महत्त्वाचा दुवा होती. डब्यांच्या माध्यमातून ती आमचे संवाद एकमेकांना पोहोचवत.' म्हणूनच एका प्रकरणात तर ते एसटी केव्हा सुरू झाली आणि तिचे पहिले चालक आणि वाहक कोण होते यांचाही संदर्भ ते नमूद करतात.

आपल्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी घेतलेले कष्ट व खाल्लेल्या खस्ता त्यांना विसरता आलेल्या नाहीत. आपल्या लेकराच्या शिक्षणासाठी आईने गळ्यातले मंगळसूत्रसुद्धा मोडलेले आहे, तेही कुठे वाच्यता न करता. हा सगळाच प्रवास खूप संवेदनशीलपणे मांडलेला आहे.

आपला गाव, तो परिसर, शाळा, शिक्षक, आई-वडील, शेतीमध्ये करायची कामे, त्यात घेतलेला सहभाग, या सगळ्यांच्या विषयी लेखकाने तन्मयतेने आणि तितक्याच हळुवारपणे लिहिलेले आहे. यातली वर्णने खूप खोलवर जाऊन केलेली नाहीत तरीही त्यांची खोली मोजक्या शब्दांतून व्यक्त झालेली आहे. ग्रामीण संस्कृतीमध्ये असलेले मातेरा, मुसके, इर्जिक, कलवड, सरवा, भोगा/तुकडे, हे शब्द केवळ लिहिण्याचे व वाचण्याचे नाहीत तर ते अनुभवण्याचे आहेत. आपल्या लेखनाला सुटसुटीतपणा यावा म्हणून त्यांनी ३० प्रकरणांत त्याची विभागणी केलेली आहे. शिवाय रेखाचित्रांचाही समावेश केलेला आहे. लेखकाची भाषा सहजसोपी, सरळ, अनअलंकृत आणि नेमकेपणा व्यक्त करणारी आहे. तिला वैचारिकतेची जोड आहे आणि मानसशास्त्रीय बैठकदेखील आहे. त्यांनी काही काळ वृत्तपत्रात काम केलेले आहे. अनेक नियतकालिकांमधून त्यांनी कविता व लेखन केलेले आहे. 'स्मृतिगंध', 'सुविचारातील आई', 'शालेय विषय दिनविशेष', 'संत सावता महाराज चरित्र', इत्यादी त्यांचे साहित्य प्रकाशित झाले आहे.

'लेखकाची लेखनशैली फ्लॅश बॅक सदरात मोडते, व्यक्तीचित्रणे, स्वभाववैशिष्ट्ये यांच्यासोबतच निसर्गालाही त्यांनी एक व्यक्तिमत्त्व म्हणून सादर केलेले आहे. जल, वायू, अग्नी, पृथ्वी, आकाश या पंचम हाभूतांची अनुभूती त्यांच्या लेखनातून आपल्याला वारंवार जाणवते. युवा पिढीतील प्रत्येकाने हे पुस्तक वाचायला हवे', असे विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी प्रस्तावनेत लिहिले आहे. 'माझ्या जीवनाला विविध टप्प्यांवरील ज्या घटनांनी चांगले वळण लावले त्यांचे वर्णन म्हणजे हे आत्मकथन,' असे लेखक त्यांच्या मनोगतात नमूद करतात.


या पुस्तकाचे शीर्षकच 'गावाकडच्या गोष्टी' असे आहे. त्यातूनच त्याच्या अंतरंगाची आपल्याला कल्पना येते. मुखपृष्ठावर दिलेले चित्र हे आतील एका प्रकरणाच्या वर्णनाचे सार आहे. तसेच जिद्दीने त्यांनी आपल्या परिस्थितीवर मात करून धैर्याने यशस्वी वाटचाल केली त्याचे ते प्रतीकही आहे. हे मुखपृष्ठ व आतील रेखाचित्रे प्रमोद जोशी यांनी साकारलेली आहेत.

**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**




# ग्रंथपान

**शेर काही ...अनुभवावे**
**गझलकार : सदानंद डबीर**
**संकलन : शेखर जोशी**




**अनुभवावेत असे सर्व शेर**

'मला सांगायला काही, किती लांबून आलेली
अरे, ही सांज, दाराशी दिवे माळून आलेली!
जरी नि:शब्द आहे ती, मला कळते तिची भाषा
जणू कविताच ही माझी, किती आतून आलेली!'

कविता छंदबद्ध असावी की मुक्तचंदात असावी, मुक्तछंदालाही छंद आहेत ते पाळावेत की गद्य स्वरूपात सरळतेचे भक्त व्हावे, मग ही श्रेष्ठ की ती श्रेष्ठ, असा हा अलीकडचा कवितेबाबतचा वाद. परंतु कवी लिहितो तेव्हा तो काय लिहितो आणि किती सकस लिहितो, हे पाहिले तर असा व्याकरणाचा अट्टहास कवितेमध्ये अनाठायी ठरतो आणि अलीकडील बहुतेक सर्वच कवींनी त्याला मान्यता दिलेली आहे, परंतु आजच्या गझललेखन करणाऱ्या एकूण गझलकारांकडे पाहिले तर ते व्याकरणापासून दूर जाण्यास राजी नाहीत, असे म्हणण्यापेक्षा गझल त्यांना दूर जाऊ देत नाही, हे सत्य आहे. यातला आणखी दुसरा भाग असा की, कवितेमधून जे सांगायचे आहे, व्यक्त व्हायचे आहे, तो व्यक्त – अव्यक्त भाव, संवेदना, कल्पना, विषय, आशय, हे सांगण्यासाठी अनेक ओळींची मदत घ्यावी लागते. त्या उलट गझलमध्ये इतके पर्याय उपलब्ध नाहीत. गझलेला रदीफ, काफिया, नाद, माधुर्य, आशय संपन्नता या सगळ्यांच्या सक्त पहाऱ्यातून स्वतःला सिद्ध करावे लागते. तो दंडक कवितेसाठी नाही म्हणून गझल ही कवितेहून वेगळी आहे, आणि तिचे स्वतंत्र स्थानदेखील आहे. इतकेच नव्हे तर गझल देणारे गझलकार यांचेही स्थान स्वतंत्र आहे. अशा स्वतंत्र स्थानांमध्ये आज ज्यांचा समावेश होतो त्या गझलकारांपैकी सदानंद डबीर यांचा उल्लेख आवर्जून करायला हवा.

सदानंद डबीर यांच्या प्रकाशित गजलांचे संग्रह आपण यापूर्वी वाचलेले आहेत. अलुफ, तसबीर, काळीज गुंफा, तिने दिलेले फुल, खयाल, सांज हे त्यापैकी काही संग्रह. या संग्रहातील निवडक शेरांचा संग्रह म्हणजे 'शेर काही अनुभवावे'.

सदानंद डबीर यांच्या गजलांचे संग्रह वाचत असताना जो आनंद मिळाला तो पुन्हा प्रत्ययास आला तो या संग्रहामुळे. डबीरांचे शेर विशेष लक्षात राहतात ते त्यांच्या वेगवेगळ्या अनुभवांच्या पातळीमुळे. त्यामुळे हे शेअर अनुभवावे असे आहेत म्हणण्यापेक्षा हे अनुभवलेले शेर असे म्हणायला भाग पाडणारे आहेत. याचे कारण डबीरांचा विषयांचा चौफेरपणा. यात प्रेम हा प्रमुख भाग स्वीकारला तरी निसर्ग, आपल्या भोवतीचे वास्तव, राजकारण, दैनंदिन जगणे, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या अनेक कसरती, सुख–दुःख–विरह–मिलन यांनी व्यापलेले मनाचे डोह, असे कितीतरी विषय वेगवेगळे टप्प्यांवर आपल्याला भेटतात.

या सर्व शेरांची निवेदन पद्धती प्रथमपुरुषी असल्याने हे सर्व अनुभव सदानंद डबीरांचे अनुभवलेले आहेत याच दृष्टीने आपण त्यांच्याकडे पाहू लागतो. डबीर आशय व्यक्त करताना किती तरलतेने त्याची मांडणी करतात हेसुद्धा पाहण्यासारखे आहे. त्यांच्या शेरांमध्येच ते स्पष्ट करतात की, निसर्ग हा नुसता पाहायचा नसतो तर तो पचवायचा असतो. श्रावणाचे ओलेगीत ओठांवर येण्यापूर्वी मन आसवाच्या पावसाने भिजावे लागते. हंगामामध्ये फक्त पीक–पाणी व ऋतूंचा बदल असतो असे नाही, तर दुःखांचाही हंगाम बारा महिने असतो. दुःखाला नवीन फांद्या फुटतात. धूप माझ्या वेदनेचा सारखा हा दरवळू दे, अंधाराला क्षितिजच नसते, ते पाखरू खुशीने पारध्यांचे होत गेले, अशा ओळी वाचताना आपण सुख दुःखाचा निसर्गाशी मिसळलेल्या शिवाराच्या सीमारेषा गझलकाराच्या नजरेतून पाहात राहतो. त्याचवेळी तारुण्याची अतृप्तता ययातीच्या रूपाने प्रत्येकाच्या मनात आस ठोकून आहे हेही आपण मान्य करतो. एकूणच गझलकार आपला भोवताल, आपले मन, आपली प्रिय व्यक्ती, निसर्ग यांना पचवून व्यक्त झालेला असतो हे या संग्रहात पदोपदी प्रत्ययास येते त्यांच्याच भाषेत बोलायचे झाले तर–

चेहरे चुरगाळलेले चाळतो मी
वेद त्यांच्या वेदनांचे वाचतो मी

जगण्यामध्ये चढ–उतार, विरोधाभास यांचे जे वास्तव समोर दिसते ते कुरवळत बसण्यापेक्षा जगणे महत्त्वाचे आणि म्हणून गझलकार सांगतात, रडावे वाटले तेव्हा हसावे लागले होते. जमले तर जाताना गाणेच गायचे आहे. आशा–निराशा हे सगळे खेळ ऊनसावलीसारखे असतातच, तरीही हरूनही जिंकायचे असते, उन्हाळ्याचे शब्द आणि सावल्यांचे सूर तरी ते गीत गायले तर दुःख दूर भासमान ठरते, लय सगळ्यालाच असते अगदी थेट सरणावरील ज्वालेला; परंतु तिच्या राखेला मात्र ती नसते. अशी निरीक्षणे नोंदवताना लिहितात,

या जगण्याने कला शिकवली मला अशी की
दुःखाचाही उत्सव करतो खुशाल आता

सदानंद डबीर यांच्या या संग्रहाची निश्चितच दखल घ्यायला हवी. याची अनेक कारणे आहेत. कुठलाही शेर मनाची थेट पकड घेतो. इतकेच नव्हे तर उत्स्फूर्तपणे त्याची दाद थेट काळजातून उसळून ओठांवर येते.


शेखर जोशी यांनी हे शेर संकलन करण्याची मोठी अवघड जबाबदारी अतिशय कुशलतेने आणि तितक्याच रसिकपणे पार पाडलेली आहे. त्यांनी लिहिलेले मनोगत हा त्यांच्या रसिकपणाचा पुरावा म्हणता येईल. गझलसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्राचा, सौंदर्याचा, आशयाचा आणि गझलकाराच्या प्रतिभेचा भारावलेला प्रभाव वाचकांचे प्रतिनिधी म्हणून ते मनमुक्तपणे व्यक्त झालेले आहेत, 'नादमय शब्द, सहजसुंदर लय, यांनी भुरळ घातली. फुल उमलावे इतक्या सहजतेने ही गझल उमलते. वाचता वाचता आपल्या मनात उलगडत जाते आणि अंतर्मनाला साद घालते. डबीरांची गझल सौंदर्यवती आहे, भरजरी शब्दांचे वस्त्र लिहून ती सजली आहे , असे हे तिचे सौष्ठव आहे. काफिया व रदीफ तिची आभूषणे आहेत आणि गजलीयतचा तोरा मिरवत लयबद्ध पदन्यास करीत ती आपल्या भेटीला आली आहे.'

रसिकांना भुरळ घालावा असा हा गझल शेरांचा संग्रह आहे. मिलिंद जोशी यांनी या संग्रहाचे मुखपृष्ठ साकारताना सदानंद डबीरांच्या प्रतिमेचा सुंदर उपयोग केलेला आहे.

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**


यंदाची दिवाळी साजरी करा
दुप्पट आनंदाने!
शुभ दिपावली
आमच्या सर्व
ग्राहकांना व हितचिंतकांना
दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा !
फेस्टिव्ह बोनान्झा ऑफर
गृह कर्ज
व्याजदर 8.35%* पासून पुढे
शून्य प्रोसेसिंग शुल्क
कार कर्ज
व्याजदर 8.70%* पासून पुढे
*नियम व अटी लागू.
अर्जासाठी स्कॅन करा
किंवा digileads.bankofmaharashtra.in ला
भेट द्या.
CELEBRATING 90 YEARS
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
व्हॉट्सॲप करा : 70660 36640 I टोल फ्री क्र.: 1800 233 4526 I फॉलो करा @ mahabank :

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.